पिकासह तुझा
अवघा श्वास त्या गवताच्या मुठीत
आता तरी त्याला
काडी
लावणारेस का नाहीघ
(आगंतुकाची स्वगते पृष्ठ २१)

कवी पिकामध्ये वाढलेल्या तणरूपी गवताला पिकासह काडी लावण्याचा सल्ला देतात. कवी उद्‌ध्वस्त जीवनाच्या कारणमीमांसेचा शोध घेण्यामध्ये यशस्वी झाले आहे. गावाच्या अस्सलतेला शहरीकरणाची संसर्गजन्य लागण होताना कवीचे मन अस्वस्थ होताना दिसते. आजही अस्वस्थता विश्वातल्या ग्रामीण मना.मनाला व्यापून राहिली आहे. आजचा गाव कुठे जाईल कुणाच्याच ध्यानात येत नाही. ही गोंधळलेली अवस्था प्रत्येक माणसाची आहे. ती नेमकी व्यक्त करण्याच काम कवीची स्वगते करतात. ग्रामीण मनाला आशेच्या मृगजळाने पूर्णत: व्यापून टाकले आहे. या सा—या व्यवस्थेला कारण ठरलेली माणसाची न क्षमणारी हव्यासाची तहान आणि न भागणारी स्वार्थाची बकाल भूक या व्यवस्थेच्या —हासाला कुठंपर्यंत घेऊन जाणार आहेघ याला काही अंत आहे की नाही' या गोंधळाच्या गर्तेत कवीचे स्वगत वारंवार अडकताना दिसते.

कवितेच्या मध्यगर्भात शिरताना मात्र कवी उजाड, ओसाड आणि कोरड्या पडलेल्या नदीपात्राच्या काठा.काठाने मानवतेचा ओलावा शोधण्याचा प्रयत्न करताना म्हणतात,

नानीच्या काठाने/वाढे वंशवेल
सारेअलबेल/ म्हणवेना.
;नानी. नदीचे नावद्ध
(आगंतुकाची स्वगते पृष्ठ २५)

स्वत:तल्यास्वत:चा आणि अंतरात्म्याशी सुसंवाद साधणा—या भाशेच्या अभिमान बाळगत कवी युध्दाचे नव्हे तर बुध्दाचे समर्थन करताना म्हणतात,

तुझ्या वृक्षाच्या छायेत
जगा भेटू देत बुध्द
जावेझडूनी किटाळ
वारा वाहू देत शुध्द!

(आगंतुकाची स्वगते पृष्ठ ४९)

महामानव गौतम बुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा यांच्या मानवतावादी विचारांचा वारसा या जंजाळातून बाहेर पडण्यासाठी आणि उद्‌ध्वस्त वर्तमान वाचविण्यासाठी उपयोगात येईल असे सांगतात.
पुढे तिस—या आवर्तनात कविता दिसा.मासाने जाणवणा—या गटा.तटाच्या, जाती.पातींच्या, धर्माच्या, अधर्माच्या, पिढ्यां.पिढ्या मधील अंतराच्या संघर्शाचा उद्‌वेग मानताना कवी म्हणतात,

अन् माझ्या मागे लागला आहे
बेचैनीचा आग्या जाळ!
बेसरमीची काठी घेऊन मारत सुटल्या आठवणी
ओरडताहेत त्या
'चल निघ...! हा गाव तुझा नाही'

पृष्ठ ६२

हरवत चाललेल्या गावाच्या गावपणाचे शेताच्या हिरवेपणाचे, रानातल्या जिवीत्वाचे आणि माणसातल्या माणुसपणाचे पुनर्प्रस्थापन करण्याची धडपड कवीच्या शब्दा शब्दामधून व्यक्त होते. हरवलेल्या गावपणाचं हे दुखणं कवीला वारंवार टोचताना दिसते.

तरीही या सर्वातून बाहेर पडण्यासाठी कवीचा सर्वात मोठा विश्वास आहे तो मातीत राबणा—या शेतक—यावर. कारण त्या शेतक—याने कुणाच्याही आशीर्वादावर भरवसा न ठेवता फक्त मातीचा श्लोक मनात जपला आहे आणि या एकाच श्लोकाच्या जीवावर तो निश्चितच मानव जातीला या भयानक गर्तेतून बाहेर काढेल असा आशावाद कवी व्यक्त करतो.

कविता व्यक्त होताना आलेल्या प्रतिमा आणि प्रतीके ही गावातल्या विझत, धुमसत चाललेल्या चुलीच्या आतून, व्याकूळ मनाच्या अंतरातून, मातीच्या प्राक्तनातून, शोशितांच्या अंतर्मनातून आणि उद्‌ध्वस्त होत चाललेल्या शेतक—याच्या वेदनेच्या गर्भातून प्रसवतात. त्या वाचकाच्या काळजाला गवसणी घालतात, म्हणूनच ही 'आगंतुकाची स्वगते' वाचकाला अस्वस्थ करून सोडतात. खरंतर साहित्यकृतीचे हेच खरे यश आहे या अर्थाने कवी कैलास दौंड यांची ही स्वगते समर्थपणे व्यक्त होण्यात यशस्वी ठरली आहेत ही स्वगते वाचताना,

रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग।
अंतर्बाह्य जग आणि मन।।
या मनाच्या अवस्थेत घेऊन जातात हे मात्र नक्की.

**निष्कर्ष:**

१. कैलास दौंड यांच्या कवितेतून गावशिवार आणि कृशिकेंद्रिंत संस्कृती मरू घातली आहे. राजकारणांने बरबाद झालेली गांवे हे आजचे भीशण वास्तव पानापानातुन आले आहे.

२. एकविसाव्या शतकातील उपभोक्तावाद कैलास दौंड यांच्या कवितेने विविध प्रतिमातून चित्रीत करून वेगळेपण जपले आहे.

३. समाजजीवनातील राजकारण, धर्मकारण, संस्कृती, माणसा माणसात आलेला खोटेपणा आणि मूल्यविहीनता या बाबी कवितेच्या केंद्रस्थानी आहेत.

४. या कविता समाजव्यवस्थेचे दाहक वास्तव आपल्या समोर मांडतात.

५. माणूस, समाज आणि संस्कृती या संबंधीचे चिंतन व्यक्त होते.

६. सभोवतालचे वास्तव नेमकेपणाने शब्दांकित करते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. दौंड कैलास : आगंतुकाची स्वगते २०२१ए चपराक प्रकाशन कोथरूड पुणे
२. त़त्रैव पृ. ११
३. त़त्रैव पृ. १२
४. तत्रैव पृ. २०
५. तत्रैव पृ. २१
६. तत्रैव पृ. २५
७. तत्रैव पृ. ४९
८. तत्रैव पृ. ६२
९. गुंदेकर श्रीराम, ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन१९९९ दिलीपराज प्रकाशन पुणे पृ. ६५

◆◆◆

# संत कवियित्री सोयराबाई

**डॉ.भैरगुंडे एस.एस.**
मराठी विभाग
वसंतराव नाईक कला वाणिज्य महाविद्यालय, मुरुड जंजिरा जि.रायगड

प्रस्तावना :-

भारतीय भक्ती संप्रदायामध्ये महाराष्ट्रात तेराव्या शतकाच्या अखेरीस संत ज्ञानदेव व संत नामदेव यांनी सांस्कृतिक चळवळीला प्रारंभ केला. वैदिक धर्मातील कर्मकांड, उच्चनीच, वर्ण, विषमता, क्षुद्र देवतांचे पूजन, स्त्री-पुरुष मतभेद इत्यादीमुळे समाजात सर्वसामान्य व्यक्तीच्या विकासाला वाव नव्हता. अशा परिस्थितीत स्वधर्म सामाजिक नीती व जाती भेदातील अशी मानवतेची शिकवण देणे आवश्यक होते. संत ज्ञानेश्वर व संत नामदेव या दोन संतांनी आपल्या समत्वादी भूमिकेतून महाराष्ट्रात पंढरपुरच्या चंद्रभागेच्या तीरी वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेंढ रोवली. भक्ती व अध्यात्म हे एका विशिष्ट वर्णाच्या बंदिखान्यात बंदिस्त असलेले दोन महत्वपूर्ण भाग सर्वांसाठी खुले केले. त्यातूनच अध्यात्मिक लोकशाही स्थापन केली. महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये आगळावेगळा प्रयोग संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांनी केला. पिढ्यानपिढ्या ज्यांच्यावर अन्याय झाला. जे ज्ञानापासून वंचित होते. सामाजिक विषमतेचे बळी ठरले होते. क्षुद्रातीक्षुद्रांना जाती बंधनात अडकावून ठेवले होते. त्यामुळे त्यांची प्रगती थांबली होती. धर्माचा अर्थ कुणाला कळत नव्हता. त्यामुळे धर्माच्या नावाखाली अनेक अप्रवृत्ती वाढल्या होत्या. जाती भेदाची, उच्चनीचतेची मूळ खोलपर्यंत रुजली होती. अठरापगड जाती धर्मातील लोकांची सर्व बाजूंनी कुचंबना चालू होती. अशा यज्ञ आणि ग्रस्त जणांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविण्याचे कार्य संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांनी केले.

वर्ण व्यवसायाचे भेद व्यक्तीच्या अध्यात्मिक विकासाच्या आड येत नाहीत असेही सांगितले. ज्ञानदेव, नामदेव, सेना न्हावी, सावता माळी, गोराकुंभार, विसोबा खेचर, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, मुक्ताबाई, सोयराबाई, कान्होपात्रा अशा अठरापगड जातीतील सारे संत एकत्र आले. इतकेच काय तर चोखोबा सोबत त्यांच्या घरातील माणसे त्यांची पत्नी सोयराबाई, मेव्हणा बंका, बहिण निर्मळा, मुलगा कर्म मेळा, यांनी भक्तीचा आनंद लुटला आहे. असे असले तरी या संप्रदायात स्त्री संताना म्हणावे तेवढे स्थान प्राप्त झालेले नाही.

आधुनिक मराठी वाङ्मयाची सुरुवात उच्च वर्णातील व उच्च वर्गातील लोकांकडून झाली. त्यामध्ये स्त्रीला दुय्यम दर्जा दिला गेला. पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्री-पुरुष समतेचे मूल्य स्त्री ला जाणवले नसावे. स्त्रियांनी रचलेल्या ओव्यात किंवा लोक गीतातून काल्पनिक उदात्तीकरण केलेले सुख, समृद्धी, वैभव यांचे चित्रण मोठ्या प्रमाणावर येते. पण दु:ख, दारिद्य, गुलामगिरी, अपमान यांचे थेट वास्तवदर्शी चित्रण फारसे येत नाही. स्त्रियांच्या ठिकाणी हळवी, भावूक वृत्ती असते. लोकगीते, मंगळागौर, भोंडला इत्यादी प्रसंगातील गाण्यांतून स्त्री आपल्या भावना व्यक्त करते. स्त्रियांची विद्रोही

मानसिकता क्वचितच दिसून येते. साहित्य, साहित्यिकांनी, सांस्कृतिक दृष्ट्या व्यक्त होणारे स्त्रीजीवन अनेक पुरुष साहित्यिकांनी चित्रित केले आहे. स्त्रियांनीही स्वतःचे भावविश्व स्वतः उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. जनाबाई, मुक्ताबाई,सोयराबाई,कान्होपात्रा,बहिणाबाई इत्यादी संत कवियित्री आपल्या अभंगातून आपल्या स्त्रीजीवनाला प्रगट करतात.

प्रस्तुत निबंधात संत सोयराबाईच्या साहित्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. तेराव्या शतकातील संत चोखामेळा यांची पत्नी संत सोयराबाई यांनी पतीकडूनच भक्तिमार्गाचा उपदेश घेतला. पांडुरंग कृपेने त्यांना कर्ममेळासारखा मुलगा झाला आहे. भाऊ बंका चोखोबाची धाकटी बहिण निर्मळा हे सर्व कुटुंब मंगळावेढ्यात राहत असे. चोखामेळा श्रेष्ठ भागवत भक्त आहेत. संसारातल्या अनेक आपत्तीत आणि दारिद्र्यात सोयराने चोखोबांना साथ दिली. चोखोबांच्या संसारिक व पारमार्थिक जीवनातही सोयरा एकरूप झाली होती. चोखोबांप्रमाणे ती हरीभक्तीत रममाण झाली आणि आपले अध्यात्मिक अनुभव तिने शब्दबद्ध केले. ती आपल्या अभंगाच्या शेवटी चोख्याची महारी म्हणवून घेते. हरीभक्त, पतिव्रता संत सोयराबाई या पहिल्या दलित संत कवियित्री होत. त्यांनी संत चोखामेळा यांच्या समाधीचे अभंग लिहिले आहेत. संत सोयराबाईचे एकूण बासष्ठ अभंग उपलब्ध आहेत. सरळ, निष्कपट अंतकरणाचा प्रामाणिकपणा, पारमार्थिक प्रवासात तिला आलेला अनुभव तिने उत्कटपणे पण सध्या सोप्या रसाळ भाषेत वर्णन केले आहेत. प्रासादिकता तिच्या अभंगात सर्वत्र आढळते.

सोयरा आपले आराध्य दैवत विट्ठलाला हाक मारीत आहे. तो शिणल्या भागलेल्यांचा विसावा आहे. आपल्या उद्धारासाठी सोयाराला विट्ठलाची पूजा करायची आहे. ती म्हणते–

येई येई गरुड ध्वजा | विटेसहित करीन पूजा ||
धूप दीप पुष्पमाला | तुज समर्पू गोपाळा ||
पुढे ठेवोनिया पण | वाढी कुटुंबि ते अन्न ||
तुम्हा योग्य नव्हे देवा | गोड करुनिया जेवा ||
विदुरा घरच्या पातळ कन्या | खासी मायबाप धन्या ||

येथे तिच्या उत्कट पांडुरंगभक्तीची आपणांस प्रतीती येते. आपण संसारात बुडत आहोत. देहाची शुद्द्धी नाही. देवा बुडत्याला बाहेर काढावे. सर्वसामान्य तळा गाळातल्या स्त्रीपुरुषानाही कळावे असे तिचे निवेदन सोपे, सुलभ आहे. पुढील अभंग पाहा.

हीन मी काय वानूं देवा | तुम्ही केशवा उदार ||
करा माझें समाधान | दाखवा चरण आपुले ||
लोटलेसे महानदी | नाही शुद्धी देहाची ||
बुडत्ये काढावे बाहेरी | म्हणे चोख्याची महारी ||

यावरून तिच्या प्रांजळ आणि निरागस मनाचा प्रत्यय आपणांस येतो. आपल्या हीनत्वाची तिला जाणीव आहे. देवा मी हीन असल्याने जर मला तू दूर लोटले असशील तर हे तुझ्या ब्रीदाला शोभणारे नाही. मी तुझाय पदर धरून तुला शरण आले आहे. तुमचा त्रिभुवनाता ठसा आहे, मग तू मला का पाठ दाखवतोस ? असे तिचे सरळ सरळ निवेदन आहे. या उत्कट आत्मियतेमुळे तिचे अभंग रसाळ वाटतात.

मनाचा ठाव घेतात. आणखी इतर देवांची भक्ती करू नका. उगीच त्यामुळे शीण होईल. म्हणून ती सर्वांना विट्ठलाचे नामस्मरण करण्याचा उपदेश करते.

सुखाचे हे नाम आवडीने गावें | वाचे आळवावे विठोबासी ||
संसार सुखाचा होईल निर्धार | नामाचा गजर सर्व काळ ||
कामक्रोधांचेन चलेचि काही | अशा मनशा पाही भूर होती ||
आवडी धरोनी वाचे म्हणे हरी हरी | म्हणतसे महारी चोखियाची ||

या अभंगातून नामस्मरण करणाऱ्या विट्ठलाला शरण गेलेल्या भक्ताचे चित्र उभे केले आहे. त्यातील प्रासादिकता आणि गेयता यामुळे हा अभंग गोड वाटतो. रसाळ वाटतो 'र' आणि 'व' या वर्णाच्या पुनरुक्तीमुळे नकळत अनुप्रासहि साधला आहे. त्यामुळे भक्तीची गोडी आणि काव्याची रसाळता दोन्हींचा प्रत्यय येथे येतो. तिचा उपदेश आहे कि,

सुलभ सोपे वाचे नाम गाता | पापाच्या चलता पळती पुढे ||
वाचे हरी हरी जो कोणी उच्चारी | नर अथवा नारी पवित्र ते ||

नामामुळे पाप पळावे, तसे निर्मळाच्या सोप्या, सहज व स्त्री सुलभ निवेदनामुळे काठीण्य दूर पळून जाते.

तो सुख सोहळा दिवाळी दसरा |
वोवळी सोयरा चोखी यासी ||

असे चरण वाचताना टाळ मृदुंगाच्या तालावर मन नाचते. यातच तिच्या अभंगाच्या यशाचे गमक आहे. सोयराला अजून आत्मस्थितीची प्राप्ती झालेली नाही. आमची दशा विपरीत झाली. देवा तुम्हीच आता जे काही उचित करणे आहे ते करा. हि शरणता तिने व्यक्त केली आहे. सर्व रंजले गांजलेले लोक देवा तुझा धावा करतात. (म्हणोनी कमळापती शरण आले || ) शरण येऊन ती काकुळतीला आली आहे. पांडुरंगाशिवाय तिचे दु:ख कोण हरण करणार ! कारण तोच तिचा आईबाप आहे हा वात्सल्य अपत्य भाव अनेक ठिकाणी प्रकट झाला आहे. असे नाते असल्याने बसले रात्र दिवस धरणे करी || अशी सोयरीची अवस्था झाली आहे. या सर्व ठिकाणी करून रस ओतप्रोत भरला आहे. अगतिक अवस्थेतील सोयरीने आपल्या अवस्थेचे चित्र पुढीलप्रमाणे रेखाटलेले आहे.

शिणल्या भागल्यांचा तू चि विसावा | धावे तू केशवा मायबापा ||
किती किती मन अवरोनी धरू | परी न सुचे विचारू काय करू ||

यातील उत्कटता आपल्या अंत:करणाचा ठाव घेते. निर्मळा आणि चोखोबा यांच्या जीवनातील काही प्रसंग तिने चित्रित केले आहेत.

सकळ समुदाव चोखीयाचे घरी | ऋदधी सिद्धीव्दारी तिष्ठताती ||
रंगमाळा झडे गुढिया तोरणे | आनंद कीर्तन वैष्णवाचे ||
असंख्य ब्राम्हण बैसल्या पंगती | विमानी पाहती सुखर ||
तो सुख सोहळा दिवाळी दसरा | वोवाळी सोयरा चोखी यासी ||

चोखोबाच्या घरच्या भोजन प्रसंगीचे हे सुंदर शब्दचित्र सोयराने रेखाटले आहे. भक्तीची उत्कटता तर सर्वत्र आहे. यामुळे तिच्या अभंगांना रसाळपणा आला आहे. सोयराबाई यांच्या अभंगातील दु:ख हे चोखामेळा यांच्या अभंगातील दु:खासी एकरूप होणारे आहे. ती म्हणते आम्ही हीन जातीत जन्माला आलो त्यामुळे आमची पदोपद हे टाळणी झाली. हिनतेचे दु:ख मरेपर्यंत चिकटून बसले. तरी माझा चोखा हा फार मोठा भक्त आहे. आमच्यावरचा अन्याय दूर झाला. याचा अर्थ आम्ही विट्ठल भक्तीत रममाण झाल्यामुळे हिनतेचे काहीच वाटेना. सोयराबाई म्हणते देवा आमची वासना कशात उरली नाही तुम्ही आम्हाला दर्शन दिलं. आता भेदा भेद नाही आमचे अंत:करण शुद्ध झाले.

नाही उरली वासना | तुम्हा नारायण पाहता ||
उरला नाही भेदाभेद | झाले शुद्ध अंत:करण ||
विटाळाचे होते जाळे | तुटले नामाच्या बळे ||
चौदेहांची सुटली दोरी | म्हणजे चोखाची महारी ||

देव, आमच्या स्पर्शाने विटाळ होतो आहे. परंतु तुमच्या नामस्मरणाने आमच्या जन्माचे सार्थक झाले. अशा प्रकारे परमेश्वर भेटीमुळे सुरुवातीला अस्पृश्यतेचे दु:ख जाणवले नाही. नंतर अस्पृश्यतेच्या दु:खाची झळ सोयराबाईला बसली आहे. त्यामुळे काही वेळेला ती अस्पृश्यता मानणाऱ्या कर्मठाची कानउघडणी करते. ती म्हणाले, ''विटाळ हा सर्वांच्या ठिकाणी असतो. मग आम्हालाय का दूर ठेवता.?''

देहासी विटाळ म्हणती सकळ | आत्मा निर्मल शुदध ||
देहाची विटाळ देहीच जन्माला, सोवळा तो झाला कवणा धर्मी ||
विटाळ वाचोनी उत्पत्तीचे स्थान | विटाळ देहांतरी वसतसे ||
देहांची विटाळ देहीच निधारी म्हणती महारी चोखियाची ||

सोयराबाईने माणसाच्या विटाळाचे विश्लेषण अगदी मार्मिकपणे करून तत्कालीन ब्राम्हणांना सडेतोड उत्तर दिले आहे.

'ऐसा आनंद सोहळा

ऐसा आनंद सोहळा | निर्मळा पाहे अपुले डोळा ||
आनंद न मे गगनी | वैष्णव नाचती रंगणी ||
जेथे नाही भेदाभेद | अवघा भरला गोविंद ||
तया सुखाची सुखराशी | वोळली ती निर्मळेसी ||
सोयरा देखोनी आनंदली | वेळोवेळा विठु न्याहाळी ||

प्रस्तुत अभंगाचे वेगळेपण असे कि या अभंगात संत सोयराबाईनी संत निर्मळा यांनी घेतलेल्या आनंद सोहळ्याच्या अनुभवाचा, जीवनमुक्तीचा अनुभव सांगितला आहे. एकंदरीत संत सोयराबाईना विठ्ठलभक्तीची उत्कटता चोखोबाचा सहवास विठ्ठलापाशी अनन्य श्रद्धा, मनावरचे भक्तीचे

संस्कारातील हिनतेचे दु:ख, संसाराबद्दलची घृणा, दारिद्र्याचे चटके, या सर्वांचा परिपाक म्हणजे तिचे काव्य.

तेराव्या शतकातील एक संत भागू महारीण ती जातीने महार होती तिच्या जन्मस्थानाचे त्याचप्रमाणे तिची जन्मतिथी व मृत्यूतिथी याची उपलब्ध माहिती नाही ती बहुधा एकटी असावी. मागे पुढे कोणी नाही अशी ती आपल्या अभंगात म्हणते संत ज्ञानदेव, नामदेव, चोखोबा त्यांच्या समकालीन असावी. जातीने महार असल्याने सामाजिक उपेक्षेचे जीवन तिच्या वाट्याला आलेले होते तिचे दैवत पंढरीचा पांडुरंग होता. आपल्या महार जातीमुळे तिला विट्ठल मंदिरात जाता आले नाही. चोखोबाप्रमाणेच तिने विठ्ठल मंदिराच्या महाद्वारातूनच विठ्ठल दर्शन घेण्याचा प्रयत्न केला. भक्ती केली

'सर्व संत हो राउळी मी दे एकटी तळमळी | हि तिच्या मनाची व्यथा तिने उत्कटतेने प्रकट केली आहे. भागू याती हीन आहे. त्यामुळे तिच्या काली अस्पृश्याना जे भोगावे लागत होते ते भागुच्या हि वाट्याला आले. लोक तिलाही दूर लोटीत असावेत. त्यामुळे सामाजिक उपेक्षाचे जीवन तिच्या वाट्याला आले. त्याची खंत आपल्या अभंगात व्यक्त केली आहे.

आलो तुझ्या दर्शनासी | भेट द्यावी ब आम्हासी ||
सर्व संत राउळी | मी रे एकटी तळमळी ||
करुणा आईक विठाई | मज बाला भेटी देई ||

अशी तिची अवस्था झाली होती. तिलाही महाव्दारात तिष्ठत बसावे लागले. सर्व संत मंदिरात जातात. पण आपण जाऊ शकत नाही याची तिला खंत आहे. तिला एका विठ्लावाचून कोणीही नाही विट्ठला बरोबर ती ज्ञानदेवानाही आळवते. त्यांना ती
'बा माझे ध्यान धारा' अशी विनंती करते. देवा तू इथे असताना लोक मला छळतात, त्रास देतात. मग तो अनाथांचा नाद कसला ? माझी तुला करूना का येत नाही.

तुज असता मज गांजती जन |
मग काय जिने देवा तुझे ||
अनाथांचा नाथ ऐसा म्हणविसी |
करुणा कैसी नाच तुज ||

असा तिचा रोकडा प्रश्न आहे. यातिहीनतेमुळे मी मोठी अपराधी आहे. पण माझे अपराध पोटात राहील. मी तुजी अज्ञानी तानुले आहे.

अवघ्या संता तू भेटसी | मी रे येकली परदेशी ||
भागू म्हणे विथोसी मज धरावे पोटीसी ||

अशा यातीहीनतेच्या यातना भागुलाही सहन कराव्या लागल्या. हे भोगलेले दु:ख हे तिने आपल्या अभंगातून मांडले. सकल संत गाथेत तिचे फक्त पाचच अभंग उपलब्ध आहेत. दलित स्त्री असूनही तिने अभंग लेखन केले. व आपल्या हीनतव्याची भावना प्रकट केली तेथे काळाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. एक यातीहीन स्त्री असूनही विट्ठल भक्तीत ती रमून गेली. आणि जीवन तिने कृतार्थ केले.

संदर्भ ग्रंथ

संत कवियित्री – इंदुमती शेवडे
संत चोखामेळा : चरित्र व अभंग – संपादक : स. भा. कदम
प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – प्रा. डॉ. जीवन पिंपळवाडकर
मराठी दलित कविता :- डॉ. सुनील चंदनशिवे
प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – ल. रा. नासिराबादकर फडके प्रकाशन कोल्हापूर
श्री सकल संतगाथा खंड - ११

◆◆◆

# 'सुऱ्हद्गाथा': नवीन स्त्री मिथकांचा शोध

**डॉ.एम.ए.कव्हळे**
सहयोगी प्राध्यापक
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

'सुऱ्हद्गाथा' हे गंगाधर पाटील यांचे संपादित पुस्तक पु. शि. रेगे यांच्या निवडक कवितांचा हा संग्रह आहे. १९७५ साली कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे यांनी हा ग्रंथ प्रकाशित केला. आधिबंधात्मक समीक्षा पद्धतीचे मराठीमध्ये उपयोजन करणाऱ्या मराठी समीक्षकांपैकी गंगाधर पाटील हे अग्रगण्य समीक्षक आहेत. सुऱ्हद्गाथा या ग्रंथात गंगाधर पाटील यांनी कवीवर्य पु. शि. रेगे यांच्या निवडक ७५ कवितांचे संपादन केले आहे. गंगाधर पाटलांनी या ७५ कवितांचा कवितासंग्रह तयार करत असतांना या काव्यसंग्रहाला दीर्घ प्रस्तावना दिली आहे, ज्याला त्यांनी 'हार्द' असे म्हटले आहे. ही ७४ पेजची दीर्घ प्रस्तावना म्हणजे पु. शि. रेगे यांच्या कविताचे आदिबंधात्मक दृष्टीने समीक्षण आहे. आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीचे पु. शि. रेंगे यांच्या कवितांचे मूल्यमापन करण्याचाच हा प्रयत्न आहे. त्यामुळे 'सुऱ्हद्गाथा' या काव्यसंग्रहाला समीक्षादृष्टीने वेगळे महत्त्व आहे.

सुऱ्हद्गाथेच्या प्रस्तावनेमध्ये गंगाधर पाटील यांनी पु. शि. रेगे यांच्या काव्यलेखनाची आणि एकूण साहित्य लेखनाची काही वैशिष्ट्ये आणि वेगळेपण सांगीतले आहेत. पु.शि. रेगे यांची कविता स्वतःचा वेगळेपणा राखत असून त्यांच्या एकूणच साहित्याचा काव्यात्मकता हा आत्मधर्म आहे असे त्यांना वाटते. हार्तच्या सुरुवातीलाच त्यांनी पु. शि. रेगे यांच्या अनुभवविश्वाचा विचार मांडला आहे. प्रत्येक कलावंत हा वेगळा असल्याने त्याचे व्यक्तिमत्व वेगळे असते. त्यामुळे त्याचे भावविश्व भिन्न असते यावरुनच त्याचे अनुभवविश्व ठरत असते. साहित्यामध्ये लेखकाचे अनुभवविश्व सामान्यतः दोन प्रकारचे असते. बहुकेंद्री आणि एककेंद्री अनुभवविश्व. जे कवी जीवनाच्या विविध अंगावर काव्यलेखन करतात त्याचे अनुभवविश्व बहुकेंद्री असते तर कवीच्या अनुभवाच्या केंद्रस्थानी एकच विषय असेल तर त्याचे अनुभवविश्व एककेंद्री असते. गंगाधर पाटलांना पु. शि. रेगे यांचे अनुभवविश्व एककेंद्री आहे असे वाटते. याबद्दल ते लिहितात, "पु. शि. रेगे यांच्या साहित्याकडे पाहता तीमधील अनुभवविश्व एककेंद्री दिसते. मानवी जीवनातील सृजनशक्ती ही त्यांच्या अनुभवविश्वाच्या केंद्रस्थानी आहे."[१]

स्वतः पु. शि. रेगे यांनीही आपल्या अनुभवविश्वाविषयी हेच मत प्रकट केले आहे. जीवनोत्सुकता ही पु. शि. रंगे यांच्या काव्याच्या केंद्रस्थानी आहे. याविषयी स्वतः पु. शि. रेगे म्हणतात, "वास्तविक पाहता कवितेचे मूख्य विषय दोनच संभवतात. पहिला सृजन यातच प्रेम, शृंगार, करुणा यांचा अंतर्भाव होतो दुसरा मरण. माझी प्रकृती सध्या तरी पहिल्या विषयाशी अधिक मिळती आहे."[२]

पु. शि. रेगे यांच्या काव्याच्या केंद्रस्थानी जीवनोत्सुकता असून ही जीवनोत्सुकता म्हणजेच स्त्रीरुप किंवा स्त्रीशक्ती आहे. हे स्पष्ट करताना गंगाधर पाटील म्हणतात,"ही सृजनशक्ती, ही जीवनोत्सुकता म्हणजे एक प्रकारे मानवी जीवनातील समग्र स्त्रीशक्तीच. ही स्त्रीशक्ती रेग्यांच्या कवितेची मूल प्रेरणा आहे. ही स्त्रीशक्ती म्हणजे त्यांच्या भावविश्वातील एक शांत, संतृप्त, पूर्ण, आनंदमय शक्तीकेंद्र. या स्त्रीस्वरुप

शक्तीकेंद्रातून अनेक स्त्रीप्रतिमा उद्‌भवतात.''[३]

पु. शि. रेगे यांच्या कवितेने स्त्रीच्या शरीर मनाची नानाविध गुण आणि रुपे वेचून एक कलापूर्ण स्त्री प्रतिमा म्हणजेच स्त्रीचे एक नवे मिथ निर्माण केले आहे असे त्यांना वाटते. रेग्याच्या कवितेमध्ये स्त्रीच्या विविध रुपाचा अनुभव प्रगट झाला आहे. हा अनुभव रेगे यांच्या कवितेतील मी घेत असतो. मी च्या दृष्टीकोनातून विविध स्त्रीयांचे रुप, गंध, गुण यांचे अनुभव वाचकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य रेगे करतात. रेगे यांच्या मीने घेतलेला स्त्रीच्या शरीराचा अनुभव हा शरीरपातळीवरचा अनुभव नसून कवीने शब्दतंद्रेमध्ये स्त्रीच्या शरीरसौंदर्याच्या कल्पकतेने, रसिकतेने घेतलेला तो अनुभव असतो. याबद्दल गंगाधर पाटील म्हणतात,''रेगे या स्त्रीकडे वासनापूर्तीचे साधन म्हणून अनैतिक दृष्टीने पाहत नाहीत. त्यांच्या कवीमनातील पुरुष स्त्रीकडे एक स्त्री म्हणून पाहतो. स्त्रीचा तिच्या शरीरमनाचा तो निकोप व नैतिक वृत्तीने अनुभव घेतो.''[४] त्यामुळेच रेगे यांच्या कवितेतील पुरुषमनाला एकीकडे स्त्रीची ओढ वाटते तर दुसरीकडे त्याला ती गुढ, अबोध वाटते.

पु. शि. रेगे यांच्या अनुभवविश्वाचा विचार केल्यानंतर गंगाधर पाटील त्यांच्या कवितेकडे वळतात तेव्हा त्यांना रेगे यांच्या कवितेमध्ये शब्दाला स्त्रीप्रतिमारुप मिळाल्याचे जाणवते. पु. शि. रेगे यांच्या 'पुष्कळा' आणि 'रेषा' या दोन कविता अशाच प्रकारच्या आहेत. 'पुष्कळा' कवितेमधील पुष्कळ हा शब्द अनेक वेळा जाणिवपुर्वक उपयोजिला आहे. 'पुष्कळा' या कवितेमधून कवी स्त्रीच्या शरीराचा तीन कडव्यातून अनुभव प्रगट करत आहे. यामध्ये पुष्कळ हा शब्द कवितेच्या सुरुवातीला विशेषण म्हणून येतो पण हा विशेषण असलेला पुष्कळ शब्द नंतर हळूहळू कवितेशी त्यातील वर्णनाशी इतका एकरुप होतो, की त्याचे विशेषणरुप निघून जाऊन तो नामरुप धारण करतो. आता ती स्त्री पुष्कळा झालेली दिसते. याचा अर्थ पुष्कळा हेच एक स्त्रीरुप बनते. एक नवीन स्त्रीप्रतिमा रेगे तयार करतात. अशाच प्रकारे 'रेषा' नावाची कविता आहे.

ज्या रेंषांमधून कवी स्त्रीप्रतिमा साकारण्याचा प्रयत्न करतो त्या रेषाच शेवटी स्त्रीअंग बनतात. याचाच अर्थ पु.शि. रेगे यांच्या कवितेतील शब्द हेच स्त्रीप्रतिमा बनून येतात. रेगे नवीन स्त्रीरुप प्रतिमा तयार करतात. रेगे कधी एखाद्या शब्दाद्वारे स्त्री शरीराचा अनुभव घेतात. अशावेळी तो शब्दच एका स्त्रीप्रतिमेचे रुप घेऊन साकार होतो. या अनुभवात तो शब्द स्त्रीरुप व काव्यरुप समकालच घेतो, असे गंगाधर पाटलांनी स्पष्ट केले आहे. पुष्कळा व रेषा यांचे सोदाहरण स्पष्टीकरण त्यांनी या प्रस्तावनेमध्ये केले आहे.

पु. शि. रेगे यांच्या संपूर्ण काव्यलेखनामध्ये राधेवरील कवितांची संख्या विलक्षण आहे. त्यामुळे राधेच्या कथेचा वापर पु. शि. रेगे एका वेगळया कलात्मक रितीने करताना दिसतात. गंगाधर पाटलांनी यावर प्रकाश टाकला आहे. मानवाच्या कलाव्यापारामध्ये प्रेमप्रवृत्तीचा आविष्कार नेहमीच होत आलेला आहे. प्रेमप्रवृत्ती या मानवाच्या सहज प्रवृत्तीच्या आविष्कारासाठी मानवाने अनेक नायक-नायिका यांचा वापर केला आहे. त्यातीलच एक म्हणजे राधा ही होय. राधा आणि कृष्ण यांच्या प्रेमाला मानवी समूहजीवनाने मान्यता दिली आहे. गंगाधर पाटलांच्या मते पु. शि. रेगे यांच्या कवितेमधून प्रकट होणारी राधा म्हणजे राधेची आदिप्रतिमा होय. राधा म्हणजे स्त्रीशक्ती, प्रेमवृत्ती म्हणजेच अनिमा होय आणि कृष्ण म्हणजे मानवाच्या पारमार्थिक व आंतरिक भावविश्वातील पूर्ण पुरुष पूर्णस्वरुप सत् तत्त्व होय. राधाकृष्ण यांच्या प्रेमाच्या

संकल्पनेला भारतीय भावविश्वामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. या प्रतिमाद्वारा मानव आपले प्रेमविश्व साकारतांना दिसतो. प्राचीन काळापासून ही प्रतिमा मानवी भावविश्वावर आधिराज्य गाजवत आहे. या प्रतिमेचे रुप मानवाच्या भावविश्वाप्रमाणेच त्याच्या सांस्कृतिक आणि व्यक्तीगत विश्वातही विकसित होत गेले आहे.

राधा- कृष्णाची प्रेमप्रतिमा हिला एक सुनिश्चित आकृतिबंध लाभलेला असून राधा-कृष्ण त्याचबरोबर गोकुळ, वृंदावन, यमुना, नंद, यशोदा, गोप-गोपीका, गुरे-गायी, बासरी या प्रधान आणि गौण अशा घटकामधून हा आकृतिबंध किंवा आदिबंध तयार झाला आहे. राधा-कृष्णाच्या या आदिबंधातून सर्जन, प्रेम, शृंगार, आनंद, करुणा आदी भाव प्रगट होताना दिसतात. या आदिप्रतिमेचा वापर साहित्यिक आपल्या कलाकृतीमध्ये करतात असे गंगाधर पाटील नमुद करतात. कवी जेव्हा राधा-कृष्णाच्या प्रतिमेचा वापर आपल्या साहित्यकृतीत करतो तेव्हा तो जशास तसा वापर न करता काही प्रधान व गौण घटक घेऊन कल्पकतापूर्ण मांडणी करून नवीन रचना निर्माण करत असतो. त्यामुळे राधेची प्रतिमा सनातन न राहता ती नावीन्यपूर्ण होते. यादृष्टीने पु. शि. रेगे यांनी राधेच्या प्रतिमेचा वापर कसा केला आहे? ते राधेला कोणता नवा अर्थ देतात? याचा विचार गंगाधर पाटलांनी प्रस्तावनेमध्ये केला आहे.

पु. शि. रेगे राधेच्या प्रतिमेचा नाविन्यपूर्ण वापर कसा करतात याविषयी गंगाधर पाटील लिहितात," कवी राधेच्या आदिप्रतिमेचा अर्थ विहित असा कोरा व्यूह, वा बंध घेतो आणि त्या प्रतिमेच्या भावविश्वाशी, आवश्यक ते कलात्म अंतर राखून त्या बंधात त्याला अभिप्रत असलेला नवा अर्थ भरतो (अर्थात हे सारे कवी जाणीवपूर्वक करत नाही ते काव्य तंद्रेत सहन अन नकळत घडत असते."[५]

याचाच अर्थ पु. शि. रेगे यांनी राधेच्या सनातन रुपातून त्यांना आवश्यक असणारा भाग घेऊन कलात्मक रितीने राधेची प्रतिमा उभी केली आहे. राधेच्या आदिप्रतिमेला नवे रुप देण्याचा हा प्रयत्न आहे, पण कवी तो जाणिवपूर्वक करत नाही. कवीच्या काव्यतंद्रेत नेणीवेतील ॲनिमा (राधा) जाणीवेच्या पातळीवर येऊन काव्यात अवतरते. त्यामुळे रेग्यांच्या कवितेतील राधा वेगवेगळ्या पातळ्यावर वेगवेगळी दिसायला लागते. गंगाधर पाटलांनी पु. शि. रेगे यांच्या 'द्वारकेत राधिका', 'राधा', 'त्रिधा राधा', 'बुंथी', 'चांपेयाची पिवळी पवळण' या कवितांतून प्रकट होणारी राधेची वेगवेगळी रुपे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. पु. शि. रेगे यांच्या काव्यात राधेची आदिप्रतिमा कशी येते हे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर रेगे यांची राधा इतर कवीच्या राधेपेक्षा वेगळी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. याविषयी त्यांचे उद्‌गार महत्त्वपूर्ण आहेत. ते म्हणतात,"राधेची आदिप्रतिमा तशी सार्वत्रिक व सार्वकालिक परंतु कवीप्रतिभेच्या स्पर्शामुळे त्याच्या स्वतंत्र काव्यदृष्टीमुळे ती अनन्यसाधारण व काव्यात्मक बनते. अशी काव्यात्मक बनताच तिला समकालच सार्वत्रिकता व विशिष्टता, स्वात्मता आणि स्वातीतता प्राप्त होते."[६]

सुऱ्हद्‌गाथेच्या प्रास्ताविकामध्ये गंगाधर पाटील पु. शि. रेगे यांच्या काव्याच्या आणखी एका महत्त्वाच्या विशेषावर भाष्य करतात. तो विशेष म्हणजे पु. शि. रेगे यांच्या काव्यातील आदिबंधरुप स्त्रीप्रतिमा हा होय. पु. शि. रेगे यांच्या 'चेतकीण तू', 'तू नाही मला पाहिले', 'पुनर्भेट', 'उर्वशी', 'मस्तानी', 'लवलव', 'शहनाज', 'साष्टांग', 'शार्लटकी', 'हिरन' आदी कवितांमधून आदिबंधरुप स्त्रीप्रतिमा प्रकट झाल्याचे ते सांगतात. पु. शि. रेगे यांच्या या कवितेतील आदिबंधाविषयी ते म्हणतात," 'चेटकीण तू', 'पुनर्भेट', 'शहनाज'

आदी कवितात कवी आपल्या प्रेयेच्या 'तू' च्या रुपात आदिस्त्रीचा आदिमातेचा आदिबंधरुप अनुभव घेत आहे. त्यामुळे अशाप्रकारच्या कवितात एक आदिबंधरुप ललित घटना (आर्किटायपल सिच्युएशन) निर्माण होते. या आदिंबधरुप काव्यात्मक घटनेत 'मी' एकाच वेळी प्रियकर व पुत्र या भूमिकेतून अनुभव घेताना दिसतो. त्यामुळे त्या कवितेतील मी - तू संबंधांना प्रियकर- प्रिया व माता - पुत्र असे द्विपरिमाण लाभते. मी कधी प्रियकाराच्या भूमिकेत 'तू' बरोबर बरोबरीच्या नात्याने वागतो. तर कधी तो पुत्राच्या भूमिकेत (प्रियेच्या रुपात) आदिमातेचा अनुभव घेतो. या सर्व गोष्टीचा कवितेच्या अनुभवविश्वावर आणि रचनाबंधावर फार मोठा परिणाम होतो. मात्र या पुत्राचा संबंध प्रत्यक्ष मातेशी नसतो. तो आदिमातेशी, आदिस्त्रीशी असतो. आणि आदिमातेचा संबध युगमनाशी असतो."[७] त्या आदिबंधरुप स्त्रीप्रतिमा स्पष्ट करताना गंगाधर पाटील 'चेटकीण तू' या कवितेतील मी ला प्रियेच्या रुपात कसा आदीमायेचा अनुभव येतो हे स्पष्ट करतात तसाच अनुभव 'पुनर्भेट' मध्येही चित्रित झाला आहे. यादोन्ही कवितेतून प्रिया प्रियकर संबंध आधिक व्यापक होऊन त्याचे माता - पुत्र संबंधात रुपांतरण झाले आहे. 'चेटकीण तू' आणि 'पुनर्भेट' मध्ये आदिमातेचा आदिबंध दिसतो त्याचप्रमाणे 'लवलव' आणि 'मस्तानी' या कवितेमध्ये कवीमनातील स्त्रीरुप अनिमा प्रकट झाल्याचे पाटील स्पष्ट करतात.

'लवलव' या कवितेचे विश्लेषण करताना गंगाधर पाटील म्हणतात,"लवलवमध्ये मनाच्या चार अवस्था संघटीत करुन सृजनशक्तीचा आविष्कार शब्दबद्ध केला आहे. 'मी' पणाची बाधा जडलेले अहंकारी मन, लवलवीच्या दर्शनाने मीपण फिटलेले मन नवसर्जन होताच नव्या, टवटवीत दृष्टीने सर्वत्र पाहणारे मन आणि तिच्या स्त्रीरुपाशी एकरुप होऊन नर्तनात नवनिर्मिती करणारे सर्जनशील मन या चार अवस्था विकासशील असून त्या मनाची उत्क्रमणे व्यक्त करतात. लवलव म्हणजे चराचराच्या अंगांगावर खुलणारी सतेज टवटवी, सर्जनशक्तीचेच एक मूर्त रुप. लवलव म्हणजे कवी मनातील स्त्रीरुप अनिमा."[८]

'शहनाज' ही पु. शि. रेगेची एक अपूर्व अशी दीर्घकविता आहे. पु. शि. रेगेच्या नेणिवेतील ही स्त्रीप्रतिमा त्यांना काव्यतंद्रेत भेटलेली एक सौदर्यसंपन्न व ऐश्वर्यसंपन्न रुपमत्त स्त्री आहे असे गंगाधर पाटलांना वाटते. या कवितेचे विश्लेषण गंगाधर पाटील यांनी आदिमातेच्या आदिबंधाच्या अंगाने केले आहे. शहनाज ही आपल्या प्रियकर - पुत्राला अनेक रुप दाखवित भूलविते. आपल्या प्रियकर - पुत्राला ती मोहिनी घालत असताना वाढविते आणि आपणही वाढते. पु. शि. रेगे यांच्या कवितेमधील स्त्रीच्या आदिबंधाविषयी गंगाधर पाटील लिहितात,"रेग्यांच्या कवितेत व्यक्त होणारा स्त्रीचा आदिबंध हा सांस्कृतिक भावविश्वातील आदिशक्तीच्या - आदिमातेच्या - आदिबंधाशी आपले नवेच नाते जोडतो. त्याच्या आदिबंधातील प्रतिमासृष्टी, भावविश्व व अर्थव्यूह ही सर्वसामान्य, पारंपरिक, सांकेतिक स्वरुपाची नाहीत. त्याचा प्रतिमाव्यापार हा नाविण्यपूर्ण व स्वतंत्र आहे. या आदिबंधाच्या केंद्रस्थानी त्यांच्या काव्याची मूलप्रेरणा जी जीवनोत्सुकता ती असून त्याची प्रतिमासृष्टी या प्रेरणेने भारावलेली, चेतलेली आहे."[९] याचाच अर्थ पु. शि. रेगे यांच्या कवितेतील स्त्रीचा आदिबंध हा आदिशक्तीच्या किंवा आदिमातेच्या आदिबंधाशी आपले नाते सांगणारा असला तरी त्याची मूलप्रेरणा, भावविश्व, प्रतिमासृष्टी ही पौराणिक नसून नाविण्यपूर्ण आहे, असेच गंगाधर पाटील यांना सांगावयचे आहे.

गंगाधर पाटलांनी पु. शि. रेगे यांच्या सर्व कवितांचा विचार केल्यानंतर त्यांना पु. शि. रेगे यांची

कविता आदिबंधाच्या जवळ जाणारी वाटते पण ती सनातन, पौराणिक आदिबंध स्त्रीप्रतिमा नाही. कारण रेग्यांच्या कवितेत समग्र प्रतिमासृष्टीतून कोणत्याही प्रकारचे दैवी, अतिंद्रिय भावविश्व सूचित होत नाही. त्याचप्रमाणे पारमार्थिक आणि पारंपरिक भानही त्यामागे नाही. त्यामुळे पु. शि. रेगे यांनी स्त्रीचे एक नवीनच मिथ मांडले आहे असे त्यांना वाटते. रेगे याची कविता आदिबंधाशी नाते जोडते पण ते पुरातन नाते नसून नवीन आहे. त्याबद्दल ते म्हणतात,"या सर्व स्त्री - रुपां मिळूनच रेग्यांच्या कवितेने मराठी कवितेत एक अभिनव, सौंदर्यपूर्ण व टवटवीत स्त्री - शिल्प कोरले आहे. त्यांच्या प्रतिभेने निर्मिलेले स्त्री - मिथ ते हेच."[१०]

एकूणच पु. शि. रेगे यांच्या निवडक कवितांचे संपादन करताना त्यांच्या कतितेमधील आदिबंध शोधत शोधत त्यांच्या काव्याची आदिबंधात्मक समीक्षा गंगाधर पाटलांनी केली आहे. पु. शि. रेगेच्या कवितेतील आदिप्रतिमा, स्त्रीप्रतिमा आणि स्त्री - मिथ याचा उलगडा या प्रस्तावनेमधून होताना दिसतो. त्यामुळे आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीचे मराठीमध्ये उपयोजन करण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे, असेच या सुऱ्हद्गाथेविषयी म्हणावे लागेल.

सुऱ्हद्गाथा हा ग्रंथ आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीने अभ्यास करणाऱ्यांना निश्चितच दिशा देणारा आहे. पण हा ग्रंथ आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीने विचार करणारा मूलभूत ग्रंथ होऊ शकत नाही. पु. शि. रेगे यांच्या काही निवडक कवितांचा हा संग्रह असल्याने आणि प्रास्ताविकामध्ये या कविताविषयी काही विवेचन केल्याचे आपणास दिसते. रेगे यांची लिखाणाची प्रेरणा जीवनोत्सुकतेची आहे हे मांडतानाच पु. शि. रेगे यांच्या संपूर्ण कवितांचा एक पद्धतशीर सुत्रबद्ध आदिबंधात्मक दृष्टीकोनातून विचार गंगाधर पाटलांना करता आला नाही असेच म्हणावे वाटते. पु. शि. रेगे यांच्या कवितेतील ॲनिमाच्या नोंदी त्यांनी केल्या, राधेची आदिप्रतिमा त्यांनी मांडली पण त्यावर विस्तृत भाष्य ते करत नाहीत. 'शहनाज' वरील भाष्य त्यांना इतर कवितेबाबत विस्ताराने करता आले नाही. त्यामुळे या प्रस्तावनेचे स्वरुप संकुचित झाले आहे. तरी मराठी आदिबंधात्मक समीक्षेला नवी गती देण्यासाठी हा ग्रंथ महत्वाचा वाटतो. गंगाधर पाटलांनी मराठी आदिबंधात्मक समीक्षेला दिलेले योगदान हे अमूल्य आहे हे कोणीही नाकारु शकत नाही.

**संदर्भ सूची :-**

१. संपा.गंगाधर पाटील, सुऱ्हद्गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, तृतीयावृत्ती १९९८, पृष्ठ. ०२
२. पु.शि.रेगे,छांदसी, मौज प्रकाशन, मुंबई, १९६८, पृष्ठ. १४०
३. संपा.गंगाधर पाटील, सुऱ्हद्गाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, तृतीयावृत्ती १९९८, पृष्ठ. ०३
४. तत्रैव, पृष्ठ. ०८
५. तत्रैव, पृष्ठ. २९
६. तत्रैव, पृष्ठ. ३४
७. तत्रैव, पृष्ठ. ३६
८. तत्रैव, पृष्ठ. ३९
९. तत्रैव, पृष्ठ. ४७
१०. तत्रैव, पृष्ठ. ७१

◆◆◆

# हुतात्म्यांना अर्पण केलेली 'सातबारा'याकवितेचे वेगळेपण

**प्रा.डॉ.गजानन जाधव**
सहा. प्राध्यापक
सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय, जाफ्राबाद

नारायण सुमंत यांच्या 'रानभैरी' आणि 'वृक्षवेद' या दोन संग्रहांच्या पुढे 'सातबारा'ने मजल मारली आहे. पहिल्यातील तारूण्यसुलभ प्रणयाच्या छटा आणि दुसऱ्यातील वृक्षवेलीचे माहात्म्य सांगून झाल्यावर कवीने आता शेतकऱ्याच्या दु:खांचा 'सातबारा' हाती घेतला आहे. शेतकऱ्यांचा कष्टांचा पाढा त्यांनी 'रानभैरी'तील काही कवितामध्ये वाचला आहे. 'सातबारा' हा शेतकरी जीवनाच्या ज्वलंत समस्या, त्याच्या दु:ख—कश्टांच्या व्यथा व्यापक संवेदनेच्या पातळीवर चित्रण करणारा संग्रह आहे.

नारायण सुमंत हा प्रत्यक्ष शेतात राबणारा हाडाचा शेतकरी आहे. शेतकऱ्यांचे पारंपरिक जीवन, त्याच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ, त्याचे पिढीजात अज्ञान, शासन दरबारी त्याची होणारी अडवणूक, विज्ञान युगाशी जुळवून घेताना त्याची होणारी घुसमट यासारखे विषय 'सातबारा'त आहेत. विज्ञान युगाशी जोडून घेण्याचे तो प्रयत्न करतो, त्यासाठी शेतीत विविध प्रयोग करतो, परंतु शेवटी निसर्गावर अवलंबून असणारा हा शेतकरी पराभूत होतो. त्यामुळे आता त्याने 'जागे' झाले पाहिजे, आपल्या मागण्यांसाठी 'पुढे' आले पाहिजे, हक्कासाठी—न्यायासाठी रस्त्यावर 'उतरले' पाहिजे हे आत्मभान, ही जाणीव जागृती, त्यातून अपेक्षित असलेली कृतिशीलता आणि पर्यायाने शिक्षणाच्या प्रकाशाने उजळलेल्या वाटेवर येणारी क्रांतिसन्मुखता कवीला हवी आहे. म्हणून कवीने हा संग्रह 'शेतकरी आंदोलनात हौतात्म्य पत्करलेल्या शेतकऱ्यांना' अर्पण केला आहे. तसेच संग्रहाचे नावही 'सातबारा' असे दिले आहे. 'सातबारा' ही शेतकऱ्यांच्या काळ्या आईची ओळख असते. त्याच्या शेतीचा तो आरसा असतो. त्यात नाव, गाव, जमिनीचा हक्क, त्याचा प्रकार, जमिनीचे क्षेत्र, तिच्यात पेरलेली पिके इत्यादी बाबींची नोंद असते. ही नोंद केवळ 'रेकॉर्ड'साठी नसते; तर ती आत्मपरीक्षण करायला प्रवृत्त करणारी असते. सुमंत यांनी केवळ एखाद—दुसऱ्या शेतकऱ्याचा सातबारा येथे सादर केला नाही; तर याउलट समस्त शेतकऱ्यांच्या एकूण जीवनाच्या सामूहिक सातबाऱ्याची प्रातिनिधिक पण प्रत्ययकारक ओळख करून दिली आहे. त्यातून शेतकऱ्यांची कश्टमय दु:खगाथा, त्याची संघर्षपूर्ण करूणकथा आणि त्यांचा क्रांतिसन्मुख उन्नत माथाही साकार झाला आहे.

शेतकऱ्याला आणि त्याच्या शेतकरी व्यवसायाला फार मोठी परंपरा आहे. प्रामाणिकपणे कश्ट करणे हा त्याचा वसा आहे. त्याच्या बळावर राजवटींनी गडावर विजयाच्या तोफा उडवल्या. पण त्याच्या नशिबातील सावकारी पाश कायमच राहिले, हे ऐतिहासिक भान आता या नवजागृत कास्तकारांनी बाळगलेच पाहिजे.

"... राजे जिंकले
गडावर तोफा उडाल्या विजयाच्या

तुझी सावकारी गहाणखते मात्र
शाबूतच... सत्तांतरातही
आता स्वत:लाच नांगरून घ्यावे म्हणतो मी
पुन्हा एकदा" (सातबारा, पृ. १)

"... आता पुन्हा एकदा शेवटचा प्रयत्न म्हणून 'स्वत:ला अंतर्बाह्य बदलल्याशिवाय' आणि अन्यायाविरूध्द उभे ठाकल्यशिवाय शेतकऱ्याचे पारंपरिक दारिद्रय आणि सावकारी पाश सुटणार नाही. म्हणून तो 'स्वत:ला नांगरून' घेण्याची निर्वाणीची भाषा करतो."

राजवटी बदलल्या, पण आणेवारी—टक्केवारीची पध्दत तीच राहिली आणि कास्तकारांच्या कष्टांची 'वारी' चुकली नाही. पिढ्यन्पिढ्य हे चालत राहिले आणि शेतकरी 'अळू—भेंडी' सारखा मवाळ व सहिष्णू राहिला. आता त्याने लढाऊ बनले पाहिजे, संघर्षशील पवित्रा घेतला पाहिजे. हा आशय व्यक्त करताना कवी म्हणतो—

"मालावर म्हणत म्हणत
तुझ्यावर बोली
लावली गेली आजवर
आता
तुझ्या एका तरी पिढीने
भाल्याच्या बाणावर
संशोधन करायला हवे
नवीन संघर्षशील
उपजाऊ वाणासाठी" (सातबारा, पृ. ६)

'अळू—भेंडी'ची सहनशीलता सोडून देऊन भाल्याच्या बाणावर संशोधन करून तयार केलेला उपजाऊ वाण संघर्षशीलतेला प्रेरणा देणारा आहे. 'डोई नांगरणे' म्हणजे डोक्याची मशागत करणे ही अर्थपूर्ण प्रतिमा घेऊन कवी सांगतो...

"जमीन वहिवाटण्याच्या नादात
पडीकच राहिली डोई
यंदा पडू दे उत्ताणी कणगी
प्रथम डोई नांगर
लाव मनगट पणाला
... डोई नांगरच तू यंदा" (सातबारा, पृ. ७)

हा कवीचा अभिनिवेश नव्या पिढीला संघर्षाची प्रेरणा देणारा आहे. ही प्रेरणा घेतली की, त्याला त्याच्या जगण्याची कळ सापडू शकते. 'नांगरणी' झाली की पुढचा टप्पा 'कळ' कवितेतून सांगितला आहे.

"नुसते भोपळेच आणलेस बाजारात
वेल राहिली शिवारातच,
रास दिसली जगाला
वेणा राहिला काळजाताच,

मालासोबत बाजारात
तुझी वेदनाही मांड
पिळणाऱ्या हर एक
चरकाशीभांड” (सातबारा, पृ. १०)

त्याच्याशिवाय समाजाचे लक्ष वेधून घेतले जाणार नाही. कारण समाज, सत्ता, शासन आणि प्रस्थापित फार संवेदनशून्य बनत चालले आहे. ही उदासीनता, बेफिकरी, निबर कातडी व्यक्त करताना कवी ‘लक्षवेधी’ कवितेमध्ये म्हणतो.

“अध्यक्ष महोदय,
हा तारांकित प्रश्न भरपूर विनोदी
आणि मनोरंजन करणारा वाटतो
अध्यक्ष महोदय, कृषिप्रधान राश्ट्रात
शेतकऱ्यांनी आत्महत्या करायची नाही
तर मग कुणी” (सातबारा, पृ. १४)

नारायण सुमंत यांनी शेतकऱ्यांचे दु:ख वेगवेगळ्या पातळ्यांवरून अनुभवले. शिक्षणाने शेतकऱ्यांची पुढची पिढी शिक्षित होईल, शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश येईल ही भाबडी आशा शेतकऱ्याला वाटते. पण अक्षरांच्या आगमनानेही शेतीत सुधारणा झाल्या नाहीत. अक्षरे आली, ‘अक्षरशेती’ आणि ‘पेरतेव्हा’ या कवितांतून कवीने शेतकऱ्यांच्या पोरांची शेतीविषयी असलेली अनास्था दिसून येते. वाङ्यवस्त्यावर शिक्षण पोहचले; पण सुशिक्षित शेतीपासून लांब गेले. कामाची लाज वाटू लागली, ‘रानोमाळ गायी बेवारस झाल्या’ पांढरपेशी जीवनाचे आकर्षण वाढू लागले. ‘अक्षरशेती’ मधून कवीने हे वास्तव चांगल्या पध्दतीने चित्रित केले आहे.

“...गुंतते आहे प्रत्येक पिढी
मशागतीत कागदाच्या
सुपीक होत आहेत कागद
आणि अक्षरांचा सुकाळ अर्थहीन
हात विसरू पाहत आहेत
ओळीत पेरणे बियाणांना
मुठीत पकडे अवजारांना
पिकणारी अक्षरे बेकार जळवा
वांझ बांडगुळे नापिकता वाढविणारी
जी हिरवीगार केवळ कागदावर” (सातबारा, पृ. ३४)

ही हिरवीगार सुशिक्षित तरूण पिढी चंगळवादी, भोगप्रधान बनली. ती केवळ कुटुंबालाच नव्हे तर समाजालाही खाणाऱ्या, त्रस्त करणाऱ्या जळवाप्रमाणे परोपजीवी बनली. ही पिढी कुटुंबाला बांडगुळाप्रमाणे पोसावी लागतात.

आजच्या शेतकऱ्यांचा जीवनसंघर्ष हा बहुआयामी आणि विविधांगी आहे. सुमंतांना ह्या समकालीन ग्रामीण वास्तवाच्या पोत आणि पदराचे भान आहे. ‘सातबारा’तून हे सर्व

घटक यथोचितपणे साकार झाले आहेत. आता शेतकरी जागृत होत आहेत. नांगराचे फाळ अंकुरू लागले आहेत, त्यांना लेखण्यांचे भरदार कोंभभफुटू लागले आहेत, कोसळते बाजारभाव, बनावटी औषधी, हरामखोरी आयात–निर्यात, भ्रश्टाचारी सिंचन, आश्वासनांचा सुकाळ, सबसिडीचा डंका, अनुदानाचे धुके यांच्या विरोधात आता जागृती निर्माण होत आहे.

‘रूंदावत आहे महानगरी कक्षा
लौकरच गरज वाढेल त्यांची
होईल तुझ्यासह तुझ्या जमिनीचाही
एन.ए.’ (सातबारा, पृ. ८)

‘येथे तुझ्यासह तुझ्या जमिनीचे एन. ए. होत असल्याचे शल्य कवी शेतकऱ्याच्या अधोगतीचे लक्षण सुचवित आहे.’ बदलत्या निसर्गामुळे पिके येण्याचा ‘भरवसा’ आता राहिला नाही. ‘ग्रीनहाऊस’ मधील शेतीही आता अत्यंत नि:सत्व आणि बेचव झाली आहे. अशा अनेक कारणांनी आज शेतीचे चित्र बदलले आहे. शेतीत काम करणाऱ्यांची मानसिकता बदलली आहे. त्यामुळे शेतीसंबंधीच्या समस्या वाढल्या आहेत. ह्या समस्यांचे, त्यामागील वृत्ती–प्रवृत्तींचे, विसंगतींचे, अंतर्विरोधांचे चित्रण नारायण सुमंत डोळसपणे पण कलात्मकतेने करतात. त्यामुळे कृषिवलांचा जीवनकलह नाना कळा आणि अवकळांनिशी अभिव्यक्त होतो.

अशा प्रकारे सुमंतांचा ‘सातबारा’ हे शेतकऱ्यांच्या संघर्षाचा ‘पारा’ दाखविणारे थर्मामीटर आहे. शेतकऱ्यांच्या वेदनांची आणि शेतीवरील जुलूम–जबरदस्तीची तपशीलवार नोंद या ‘सातबाऱ्या’त आहे. प्रस्तुत काव्यसंग्रह म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाचा वास्तव विचार, खुला उच्चार आणि कलात्मक आविष्कार आहे. त्याच्या अंतरंगाचे आणि अभिव्यक्तीचे प्रा. फ.मु. शिंदे यांनी आपल्या अभिप्रायातून नेमके, नेटके विवेचन केले आहे. ते म्हणतात, “आसुडाच्या महात्म्याची ज्योत आतल्या ठिणगीनं पेटती ठेवण्याचे प्रेरक आणि संघर्षशील बळ देणारी ही कविता आहे. शेतकऱ्यांच्या इतिहासाची ही पानं आहेत आणि पानोपानी दु:खाचा भोगवटा भुईला लागून आहे. वेदनाच नव्हे तर वेदनेचा व्यापार, वेदनेचा व्यवहार, वेदनेचा विनियोग, वेदनेची व्यवस्था मांडणारी, त्यासाठी भांडणारी अशी ही पिळणाऱ्या चरकाच्या विरोधात दंड थोपटून उभी राहणारी कविता आहे. शेतीचा हा वनवासी विद्रोह आहे.

◆◆◆

# संत नामदेवांचा शिष्य—परिसा भागवत याचे गर्व परिहरण

**सौ. हिरा वाघ**
संशोधक विद्यार्थी
के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक.

**प्रस्तावना :—**

मध्ययुगीन काळात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांच्या समकाळातील एक संत नामदेवांचे शिष्य म्हणजे परिसा भागवत. परिसा भागवत हे जातीने ब्राह्मण होते. रूक्मिणी देवींची उपासना ते करत. अनेक पारायणे, अनुष्ठाने करत, व देवीही त्यांच्यावर प्रसन्न होती. देवीने त्यांना प्रसन्न होऊन 'परिस' दिला होता. अशी आख्यायीका आहे. मंदिराच्या महाद्वारात रामायण वाचनाचे काम ते करत व ते ऐकण्यासाठी असंख्य भावीक येत. परिसा भागवताच्या अंगी खूप अहंकार भरलेला होता. आम्ही भूलोकीचे देव आहोत. तत्कालीन काळात उच्चवर्णीयांचे वर्चस्व खुप मोठ्या प्रमाणात असल्याने खालच्या जातीच्या लोकांकडे बघण्याचा त्यांचा दृश्टिकोन चांगला नव्हता व देवीचा मीच काय तो भक्त असा अहंकाराचा वारा त्यांना लागलेला होता व त्यामुळे ते इतरांचा अपमान करत असत. संत नामदेव महाराजही मंदिरात जात असत. ते शिंपी असल्याने परिसा भागवत त्यांना तुच्छ समजत व त्यांचा अपमान करीत असत.

''परसा वदे नामयासी । तुझे पूर्वज माझे चरणापाशी ।
जरी तू हरिदास जालाशी । तरी याती हीनची ।
तुवा कोठवरी काय देखिले । नाही वेदशास्त्र म्हणितले ।''[१]

संत नामवेदांचा ते यातून अपमान करताना दिसतात. त्यांची विठ्ठलभक्ती त्यांना जणु मान्य नाही. कारण त्याकाळी जप, तप, नेम, धर्म हे फक्त ब्राह्मणांनीच करावा असा जणु प्रघात होता. त्यात नामदेव महाराज विठ्ठलाशी अगदीच लीन झालेले होते. परिसा भागवत त्यांना म्हणतात, तू जरी विठ्ठलाचा दास झाला तरी तुझे पूर्वज माझ्याच चरणाशी लीन होते. तुझी हीन जात, फक्त देवाची भक्ती करून काही होत नाही. मला सर्व वेदशास्त्राचे ज्ञान आहे. तू कितीही भजन, कीर्तन केले तरी तुझी हीन जात मोठी होणार नाही. असा अपमान नामदेवांचा ते करतात. तरी नामदेव शांत राहतात व त्यांना म्हणतात, ''माझ्या पूर्वजांवर प्रसन्न होणारे तुम्ही माझ्यावरच वेगळी दृष्टी का ? तुमचे चरणतीर्थ आपण आम्हालाही द्या.'' असं शांतपणे ते बोलतात. त्यांच्या ठायी असणारा शांतपणादेखील परिसा भागवतांना जाणवत नाही. त्यांच्यातला लिनपणाही त्यांना समजत नाही. तरीही त्यांचा अहंकार काही कमी होत नाही. घरी आल्यावर परिसा भागवत घडलेला वृत्तांत पत्नीलाही सांगतात.

''खालील पायरी तयाची जाणा । तरी आम्हासी महिमान ।
धन्य धन्य माझे कुळगोत्र । नाम पावले भागवत ।
यति हीन विष्णुदास म्हणवितो । तेणे ते तर भय पावती।''[२]

माझे कुळ—गोत्र धन्य आहे. आज नामदेव आणि माझा विवाद झाला त्यात तो मला शरण आला. त्याला माझ्या कुळाचे महत्व पटले म्हणून असा अहंकार परिसाला झालेला असतो. यावर त्याची पत्नी त्याला खूप समजावते. तुम्ही रागावू नका पण तुमच्या ठायी असणारा अहंकार आपण सोडावा. तुम्ही खूप हुशार आहात, ज्ञानी आहात फक्त तुमचा अहंकार आपण कमी करा.

''तुम्ही ब्राह्मण पवित्र धन्य । मुखी वेद हरीचे नाम ।
वरी गर्व अवलक्षण । सकळही धर्म लोपले ।।
अमृत घातले पाशाणावरी । वरीवरी ओला कोरडा भीतरी ।
तैसा घात तुमच्या शरीरी । वर्गे हरि न भेटेची ।।
गाय ते सर्वा ठायी पवित्र । परि तिची वासना अपवित्र ।
तैसे तुमचे धन्य कुळगोत्र । गर्व अपवित्र सांडा जी ।।
तुम्हासी चाड जरी हरीसी । तरी मत्सरू नका नामदेवासी ।
ते आलीया घरासी । हरि तुम्हासी भेटेल ।।''[३]

आपल्या ठायी असणारा वर्ग, अहंकार यामुळे सर्व धर्म लोपवेल. तुम्ही कितीही पवित्र धर्मातील असाल पण गर्व, अहंकार असेल तर आपल्या महान धर्माला किंमत नाही. तुम्हाला खूप ज्ञान आहे पण तुमच्यातल्या अहंकारामुळे त्याची किंमत शुन्य आहे. एखाद्या दगडावर अमृताची धार पडली तरी त्याला जसा त्याचा फायदा होत नाही तसे तुमच्या ज्ञानाला गर्व—अहंकारामुळे काही किंमत नाही व त्या गर्वभरीत आत्म्याला ईश्वराची प्राप्ती होणे शक्य नाही. गाय सर्वांसाठी पवित्र आहे असे जरी असले तरी घाण खाण्याच तिची वासना होणं हे जितकं अपवित्र आहे तितकंच तुमच्या उच्च ज्ञानात तुमचा अहंकार आहे. म्हणून मी आपल्याला विनंती करते की, अहंकाराच्या आहारी जाऊन नामदेवांना कमी लेखू नका. त्यांच्याशी सख्यत्व कराल तर तुम्हाला निश्चित हरी भेटेल.

नामदेवांच्या भक्तीमुळे विठ्ठल त्यांना प्रसन्न आहे हे तिला ठाऊक असते. नामदेवांची कीर्ती ती ऐकुन असते. त्यांची उदाहरणंही ती त्यांना देते. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. परिसा रोज संतांना रामायण वाचून दाखवत असे. एक दिवस नामदेव भजन कीर्तन करून त्या ठिकाणी येतात. तिथं रामायणाचे निरूपण ते ऐकतात. त्यावेळी नामदेव त्यांना लंका कशी आहे ? कोण कोणत्या स्थानी राहते ? असे नामदेव त्यांना विचारतात. त्यावेळी

त्याला काही सांगता येत नाही. त्यावेळी ते रूक्मिणीकडे लंका दाखविण्याची विनंती करतात. त्यावेळी रूक्मिणी देवी त्यांना लंका दाखविण्यास घेवून जातात व त्यांची विनंती, त्याचा हट्ट पुरवितात. तिथे गेल्यावर परिसाच्या मनाला खूप आनंद होतो.

''घरोघरी होय वेदपारायण । राम नामी मन सर्वत्राचे ।''[४]

तिथे घरोघरी लोकं वेद, पारायणे म्हणत असतात. नंतर ते बिभिशणाच्या घरी येतात. तिथे आल्यावर त्यांना नामदेव कीर्तन करत असतांना दिसतात.

''पाहतो तो नामा उभा कीर्तनास । गुण गात असे देवाजीचे ।
शरण जे केले माझ्या पंढरीनाथा । नाही भय चिंता त्यास काही ।
विस्मय तो करी परसोबा अंतरी । फिरला माघारी तेथुनिया ।''[५]

नामदेवांना कीर्तन करताना पाहून परिसा लगेच तिथून माघारी फिरतात व त्यांना त्यांची चुक कळते. घरी आल्यावर लंका कशी होती ? असा प्रश्न विचारला जातो तेव्हा परिसा त्यांना सविस्तर सांगतात. नामदेव परिसांना विचारतात, ''तू तिथे गेला, तुला बिभिशण दिसले तर तु त्यांना नमन का केले नाही ?''

''अमृताचा घट हातासी लाधला । कैसा उलंडिला वेडिया तू ।
तैसा महाराज तोचि बिभीशण । का नाही नमन केले त्यासी ।''[६]

ज्याच्या हृदयात सदोदीत रामचंद्र वसतात अशा बिभीशणांना तू नमन करायला हवे होते. असे त्यांना सांगितले जाते.

परसोबांच्या ठायी असणा—या अहंकारामुळे त्यांना काही गोश्टी समजत नव्हत्या. नामदेवांना ते ओळखू शकत नव्हते. पण जेव्हा त्यांना ह्या सगळ्या गोश्टींची महती पटते तेव्हा ते नामदेवांना शरण जातात.

''गळोनिया गेला त्याचा अभिमान । जाला तेव्हा लीन संता पायी ।''[७]

रूक्मिणी माता ही त्यांना सांगते, समजावते व त्यांना नामदेवाच्या पायाशी स्थिर व्हावयास सांगते व परिसा भागवतही नामदेवांच्या चरणी स्थिरावतो व त्याचा शिष्य होण्यास पात्र ठरतो. तेव्हा त्यास पांडुरंगाची प्राप्ती होते. नामदेवांचा प्रभाव त्यांच्यावर पडल्यानंतर त्यांनी काही अभंगही रचले व त्या नामदेवांची स्तुती केलेली आपल्याला दिसते.

''कवित्वा परिस कवित्व आगळे पै आहे । परि ते न कळे सोय नाम्याची ।
नाम बरवे नामदेव बरवा । एकाच बरवा परमात्मा ।
दुधावरील साय ते मी वाणू काय । तैसे गाणे गाय नामदेव ।
नामा तोचि कुडी केशव तोचि देव । तेथील अनुभव परसा म्हणे ।''[८]

कालांतराने नामदेवांच्या भक्तीतच जणू परिसा बुडून जातात व नामदेवांच्या आयुष्यातील

महत्वाच्या घटनांचे ते साक्षीदार बनतात. नामदेवांच्या सहवासात ख—या अर्थाने परिस होण्याचं भाग्य परिसा भागवतांना लाभते.

**निष्कर्ष :—** आपल्याकडे कितीही ज्ञान असले, सर्व विद्या पारंगत आपण असलो, पण जर त्याचा आपल्याला गर्व झाला व त्यातून आपण इतरांना तुच्छ मानु लागलो तर आपले ज्ञान कवडीमोल ठरते. परिसा भागवत रामायणासारख्या महान ग्रंथाचे निरूपण लोकांना सांगतात. पण त्यांच्यातला गर्व, अहंकार ते कमी करू शकत नाहीत. याला ख—या अर्थाने काहीच अर्थ उरत नाही. श्लोका शिकवी ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाशाणश या उक्तीप्रमाणे आपण आत्मज्ञानाने आयुष्यभर कोरडेच राहू.

समाजात जगताना आपण गर्व, अहंकार दूर ठेऊन चांगल्या वाईटाची पारख करत माणसाने जगणे अपेक्षित असते. आपल्या हाती परिस लागतो पण जर आपल्याला त्याचे महत्त्व व ओळख पटली नाही तर त्याचा काही उपयोग नाही. त्यामुळे माणसांना ओळखता आले पाहिजे तर ख—या अर्थाने जीवन जगणे होईल.


१. श्री नामदेव गाथा — महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
प्रकाशन : ९ नोव्हेंबर १९७०. अ.क्र. ७ पृ.क्र. ८७७

२. तत्रैव, अ.क्र. १० पृ.क्र. ८७८

३. तत्रैव, अ.क्र. १० पृ.क्र. ८७८

४. तत्रैव, अ.क्र. ११ पृ.क्र. ८८०

५. तत्रैव, अ.क्र. ११ पृ.क्र. ८८०

६. तत्रैव, अ.क्र. ११ पृ.क्र. ८८०

७. तत्रैव, अ.क्र. ११ पृ.क्र. ८८०

८. तत्रैव, अ.क्र. १५ पृ.क्र. ८८२


◆◆◆

# सूची रचनेची तत्वे व स्वरुप

**प्रा.डॉ.हांडे मंगल नामदेव**

नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजापूर,

ता.संगमनेर जि.अहमदनगर

गरज ही शोधाची जननी आहे. जगात अनेक शोध हे गरजेपोटीच लागतात अभ्यासकांना वाचकांना संदर्भसेवा उपलब्ध करुन देताना ग्रथपालांना अनेक अडचणी जाणवू लागल्या त्यातूनच सूची व सूचीशास्त्राचा जन्म झाला. संशोधनात सुकरता यावी म्हणून सूचीशास्त्र जास्त उपयुक्त ठरु लागले. मुद्रणपूर्णकाळात सूची आढळत नाही. मुद्रणकलेल्या शोधानंतर ग्रंथसंख्या वाढली त्यामुळे त्यांची नोंद करुन त्यांची विषय विभागणी आवश्यक झाली त्यातूनच इंग्रजी भाषेत १५ व्या शतकात तर मराठीत १९ व्या शतकात प्रथमसूचीकार्य सुरु झालेले आढळते.

पहिली ग्रंथसूची तयार करण्याचा मान जोहान ट्रिथेम कडे जातो. त्याने तयार केलेली Liber de soriptoEital Ecclesisastieis ही ग्रंथ सूची इ.स.१९९४ मध्ये प्रसिध्द झाली. ग्रंथसुचीचा जनक फॉनरॅडगेम्बर या जर्मन सूचीकाराणे तयार केलेली Bibhfotoncca Universal ही ग्ंथसूची इ.स. १५४५ मध्ये प्रसिध्द झाली. त्यात लॅटिन, ग्रीक, हिंब्रु भाषेतील ३०० लेखकांनी लिहिलेला १५०० ग्रंथाची नोदं करण्यात आलेली आहे.

शंकर गणेश दाते यांनी तयार केलेली १९४३ मधील मराठी ग्रंथसुची ही महत्वाची मानली जाते१९४३ पूर्वीही मराठीत निरनिराळ्या स्वरूपात सूची करण्याचे प्रयत्न झाले . मराठीतील पहिली सूची म्हणून गो. का.चांदोरकरांचा 'महाराष्ट्रीय संत कावि काव्य सूचीचा उल्लेख करावा लागतो. ती १९१५ मध्ये तयार केली गेली. गणेश रंगनाथ दंडवते 'भारत नियतकालिक दिपिका १९१५ मध्ये त्यांनी ही सूची तयार केली. मराठी स्त्री लेखकाची सूची १९२१ इस.१९१९ मध्ये य.श दाते व रा.त्र्य देशमुख यांनी'महाराष्ट्रीय वाड्.मयाची सूची' च्याद्वारे साहित्यात महत्वाची भर घातली त्यांनंतर आजतागायत सूची कार्याचा आढावा डॉ.सु.रा.चुनेकरांना'सूचींची सूची' मध्ये घेतला आहे,

- सूची ह्या शब्दाचे निरनिराळे अर्थ – व्ही.एस. आपटे यांच्या practical sansloit English dictionary मध्ये 'सूची या शब्दाचा अर्थ
  (An Endex a table of contenst a list acataloguean contents an Index also a cateaogue or list ) असा दिलेला आहे.
  मोल्सवर्थच्या मराठी शब्दकोषात ' सूची अथवा सुधिका' म्हणजे
  बनहट्टी – धर्माधिकारी यांच्या 'सुगम मराठी शब्दकोशात'सूचीचा अर्थ अकारविल्हेने दिलेली विषयांची नावाची यादी असा आढळतो
- वा गो .आपटे यांच्या शब्दरत्नाकरात सूची म्हणजे अनुक्रमाणिका विषायांची यादी प्रस्तावना आसा आहे.
- 'महाराष्ट्र शब्दकोशात' ७ वा खंड त्यात सूचिका सूची म्हणजे अनुक्रमाणिका, विषयांची यादी, प्रस्तावना असे अर्थ दिले आहेत.
- महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय शास्त्र परिभाषा कोशात तालिका सूची म्हणजे catologue असा अर्थ दिला आहे.

वरील सर्व अर्थाचा विचार केला म्हणजे असे ध्यानात येते की सूची म्हणजे यादी या अर्थानेच वापरलेला आहे पण सूची म्हणजे यादी हा अर्थ मान्य केला तर कोणत्याही यादीला (वस्तुंच्या दैनंदिन कामकाजाच्या) सूची म्हणावे लागेल. परंतु प्रकाशित अथवा अप्रकाशित साहित्याची कोणत्यातरी स्वरुपात केलेली यादी जिच्या आधारे हवी असलेली माहिती, संदर्भ अचूक शोधता येते तिलाच सूची म्हणणे समर्थनीय ठरेल.

'सूची' याचा एक अर्थ 'सुई टोक' असाही आहे सुईच्या आग्राने जसा नेमका बिंदू दाखविला जातो, तसा सूचीने नेमका विशिष्ट संदर्भ दाखविला जातो याच बाबतीत सु.रा.सुनेकर पुढे म्हणतात ''सूचीकरणापासून

कोणत्याही अभ्यासाचा आरंभ होतो आणि थोड्या मर्यादित, लक्षणिक अर्थाने असेही म्हणता येईल की, सुची करणा मध्येच अभ्यासाची अखेर होते."१

सु.रा. चुनकरांचे हे म्हणणे संशोधकाला मान्य करावेच लागेल.

सूचीची गरज व महत्वः

मानवाची सांस्कृतिक प्रगती होऊ लागली तसा लेखनाचा प्रसार झाला तसतसशी साहित्यनिर्मितीत भर पडु लागली – लेखनकला अवगत झाल्यापासून मानवाने निर्माण केलेला सांस्कृतित वारसाचा झरा वानक्षाचा झरा शीलालेख ताम्रपट, भुर्जपत्रे, हस्तलिखिते पासून अलिकडच्या काळातील मुद्रित ग्रंथ या साधनांच्या द्वारे अखंडपणे वाहतच आहे दैनंदिन जीवनात बहुश्रृतपणाची राष्ट्रराष्ट्रामधील परस्पर सहकार्याची, वैचारिक देवघेवीची गरज वाढू लागली आणि सर्व गोष्टींची पूर्तता करण्यासाठी अनेक घटनांची विषयांची माहिती असणे तिचा संग्रह करणे ती शोधून काढणे याची माहिती पटू लागली.

दुसऱ्या महायुद्धानंतर ग्रंथनिर्मिती ( पुस्तके –नियतकालिके पुस्तिका अहवाल) व इतर लेखनाचा वेग इतक्या प्रचंडप्रमाणात वाढला. आणि त्यात इतक्या विविध प्रकारची माहिती प्रसिध्द होऊ लागली की तिचा शोध घेणे म्हणजे गवताच्या प्रंचड गंजीतून एखादी टाचणी शोधून काढण्याइते ते कर्मकठीण झाले या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी सूचीची गरज निर्माण झाली. सूची केवळ ज्ञानसंचय करीत नाही तर प्रचंड ज्ञान सागरातील नेमक्या थेंबाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते.

※ सूची वाडमयाचे स्वरप : मानवाला ज्ञात असलेले सर्व ज्ञान माहिती ग्रंथात साठविली आहे. असे मानले तर त्या विशाल व व्याप्त ज्ञानसग्रहात ज्ञानसंग्रहात वाचकाला इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी वाट दाखविणारी 'मार्गदर्शका' असाही एक अर्थ सूचीला जोडला आहे.

गुहेतील दगडी भिंतीवरील चित्रे ही मानवाचा प्राथमिक संप्रेषणाची भाषा होय मनात येणारे सर्व विचार वस्तूसंबधी नसतात. माणसालाहोणारा आनंद, दुःख, वेदना, वाटणारी सहानुभुती, विषण्णता, एकाकीपण, मानापमान यासरख्या भावना अधिक गुंतागुंतीच्या असतात. त्या व्यक्त करणे ही माणसाची शारीरीक व मानसिक गरज आहे. दुसऱ्याला काहीतरी सांगण्याच्या या प्रेरणेतूनच भाषा निर्माण झाली. वाड्.मयनिर्मिती होऊ लागली त्यातूनच ग्रंथ निर्मितीचा वेग वाढला निर्माण झालेले ज्ञान ग्रंथबध्द करुन ते अभ्यासकांना व नव्या पिढीला पोहचवण्याची व्यवस्था करणे त्यात नविन ज्ञानाची भर घालणे ही प्रक्रिया सतत सुरु आहे या मानवी प्रयत्नातूनच प्रचंड ग्रंथालये उभीरी राहिली. त्यात ज्ञानसंपत्तीची जोपासना, विषयावार विभागणी, अभ्यासकाला उपयुक्त ग्रंथ उपलब्ध करुन देणे या सर्व उपक्रमांना जोडणारा सेतू सूचीवाड्.मयाचा आहे.

ग्रंथप्रसार झपाट्याने होत असताना ग्रंथाचा तिटकारा करणारी माणसेही नित्य भेटत असतात. शासनातील काही अधिकाऱ्यांना ग्रंथनिर्मिती हे निरर्थक काम आहे अधिक अपव्यय करणारी बाब आहे असे वाटते. एखाद्या ग्रंथावर शासनाने लोकांच्या मागणीमुळे बंदी घातली तर त्याचे परिणामहोतात. याचे उदाहरण सदाशिव देवांनी पुढील प्रमाणे नमुद केले आहे ''सॅटॅनिक व्हर्सेस हे पुस्तक व त्याचा लेखक समलमान रशदी या ग्रंथातील काही विधानांमुळे इस्लामिक जगतात खुप मोठी खळबख गाजली. या पाप्याला शिक्षा देण्यासाठी इराणच्या राज्य शासनाने सलमान रशदी याला ठार करण्यासाठी फार मोठ्या रकमेचे आमिष जाहीर केले आहे त्याला आता कित्येक वर्षे लपून राहून जीवन जगावे लागत आहे. या पुस्तकावर अनेक देशातील शासनानी बंदी घातली आहे.

परिणामी हे पुस्तक मिळविण्याची किंवा वाचण्याची सामान्य जनतेत उत्सुकता वाढली. या ग्रंथावार बंदी न घातलेल्या पाश्चात्य जगात पुस्तकाचा खप प्रचंड वाढला, तर यापैकी बऱ्याच प्रती बंदी असलेल्या देशात चोरमार्गाने पोहोचल्या त्यातच भर म्हणून कोणीतरी हे पुस्तकच संगणक महाजालात टाकले व ही बातमी इराणमधील काही वाचकांना मिळाली, संगणकावर हजारो इराणी लोकांनी हे पुस्तक खुद्द इराणमध्ये वाचले आज या पुस्तकाच्या वाचकांची संख्या इराणमध्ये जास्त आहे असे सांगितले जाते." २

शासनानंतर पुस्तकावर सेंन्सार लावणारे ग्रंथपाल असतात. विद्यापीठ महाविद्यालये व ग्रंथालयाचे आधिकारी आपल्या आवडी निवडी ग्रंथनिवड करताना अमलात आणतात.

असे होऊ नये व ग्रंथलयाची निकोप वाढ व्हावी यासाठी सूची वाड्.मयाचा उपयोग होऊ शकतो कारण सूची वाड्.मयाचा अभ्यास हा समतोल ही प्रमाणबध्दता सांभाळीत असतो.

सूचीचे उद्दिष्ट : सूची प्रकार कोणताही असला तरी सूचीचे उद्दिष्ट एकच असते हवा असेलेला संदर्भ माहिती पुस्तक कमीत कमी वेळात अचूकपणे शोधण्यास मदत करणे. हे प्रत्येक सूचीचे प्रधान कार्य असते या कार्याची सफलता होण्यासाठी सूची बोधप्रद व शोधसुलभ असली पाहिजे आदर्श सूचीच्या संदर्भात कोणती लक्षणे आधारभूत मानावीत याबद्दल अनेक अभिप्राय व्यक्त केलेले आढळतात नोंदीमधील एकसुत्रता, सातत्य व अचूकपणा यावरुन सूचीची गुणवत्ता ठरविता येते रॉबर्ट एल कोलीसन म्हणतात.

‘ The best bibio graphies are table for their consistenct of puerpoes and qreatmetn their detail are given in the same crders and form thromgnou’

⁕ सुची संकल्पनेसंबधी युनोने ( UNO) स्वीकारलेली आधारभूत तत्वे

‘As with any state of standocls adherence of thom will ensane it nadhingmare a dearee of unito of unitarmity bath within a biliogruphy and between vareions biblinity both within a bibliaphies

नोदीविषयक माहिती तपशिलाच्या संदर्भात एकसुत्रता सातत्य केवळ एकाच सूची पूरती मर्यादित असता काम नये सर्व सूचीच्या तपशिलाच्या संदर्भात एकसुत्रता टिकविता आली. तर अभ्यासकांची सोय होण्याची शक्यता अधिकच असते.

“सूची ज्ञानसंचय करीत नाही परंतु ज्ञानाचा शोध घेण्यास मदत करते. सूचीचे महत्व केवढेही असले तरी तो अखेरचा आधार मात्र नव्हे’ या सूचीच्या आधाराने त्याची पूर्ण पूर्णता पारखीत स्वतंत्रपणे स्वतः शोध घेत रहायला हवे याचा विसर पडता कामा नये“३असे डॉ. सु.रा.चुनेकर सूची विषयी महत्व सांगतात. सूचीचे महत्व आणि मर्यादा स्पष्ट करतात.

⁕ सूची कार्यातील समस्या अडचणी : सूची प्रकल्पाच्या संदर्भात त्याचे स्थूलमानाने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१) आर्थिक

२) तांत्रिक

३) सामाजिक

जोपर्यंत प्रकाशित साहित्याची संख्या कमी होती. तो पर्यंत रा.ग.दाते, कॉमरेडगेस्बर सारख्यांनी व्यक्तिगत जबाबदारी वर सूची प्रकल्प यशस्वी केले आहेत. प्रचंड ग्रंथ निर्मितीमुळे परिस्थिती बदलली आहे. आता आर्थिक पाठबळाची विशेष गरज भासू लागली आहे. सूची प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मनूष्यबळ लागते. साधनसामग्री मोठ्या प्रमाणात लागते. छपाईसाठी प्रसिध्दीसाठी पैसा लागतो आणि हे सर्व नसेल तर सूचीप्रकल्पा हाती घेण्यास कोणीही धजावतनाही.

सूची कार्याचे तांत्रिक काम वाटते तेवढे सोपे नसते तंत्र पध्दतीनिष्ट असल्याने ते कुणालाही जमेलच असे नाही सूची मधील नोंदी करताना नावे विषय किंबहूना सर्व माहिती वृत्त शब्दरुपाने व्यक्त करावी लागते. सूचीच्या तांत्रिक कार्याच्या संदर्भात दोन महत्वाच्या अडचणींना तोंड द्यावे लागते.

१) विशेष नावे ( व्यक्तिंची, संस्थाची स्थलांची विषयांची इ. नावे कशी नोंदवयाची )

२) तयार झालेल्या नोंदी कोणत्या क्रमाने लावायच्या

पुस्तकाचा लेखाचा विषय सोपा असेल तर विषयनोंद करणे सोपे जाते. उदा. ‘सुलभ बिजगणित’

‘परंतु भारतीय स्त्री जीवन’ या विषयासंबधीच्या पुस्तकाची अथवा लेखांची विषय नोंद करताना प्रश्न निर्माण होतो ‘भारत स्त्री जीवन’ का ‘स्त्रीजीवन भारतीय’ अशी नोंद करावयाची असा प्रश्न निर्माण होतो ?

सूचीचा किंवा लेखाचा विषय जेवढा जास्त गुंतागुंतीचा तेवढी विषयनोंद करण्याच्या संदर्भातील डोकेदुखी अधिक

उदा. ‘आखाती राष्ट्रामधून येणाऱ्या आर्थिक ओघाची केरळमधील ग्रामीण कौटुंबिक जीवनावर होणारे परिणाम एक मूल्यमापन’ या लेखाचा नेमका विषय निश्चित करणे हे फार अवघड काम आहे. आखाती राष्ट्रे वा आर्थिक मदत किंवा कौटुबिक जीवन ग्रामीण जीवन, केरळ मधील जीवन अशा विविध पर्यायापैकी नेमक्या कोणत्या विषयनोंदी खाली हे योग्य होईल याचा अंदाज करणे कठीण असते.

विषयांच्या नावांप्रमाणेच स्थलांची संस्थाची व्यक्तिची नावे कशी नोंदवयाची हा निर्णय भेडसावतो वेगवेगळ्या नोंदी तयार झाल्यानंतर त्या कोणत्या क्रमाने लावून सूची प्रसिध्द करावयाची या बाबतचा निर्णय घेणे ही

एक नाजूक जबाबदारी असते जी सूची एकभाषिक असते तिच्या वर्णक्रम रचनेच्या संदर्भात निश्चित नियम उपलब्ध असतात. अशा प्रकारची सूची तयार करणे थोडे सोपे जाते. पंरतु बहुभाषिक सूचीच्या संदर्भात व निश्चित क्रमरचनेच्या नियमावलीच्या अभावी सूची प्रकल्पात अनेक समस्या निर्माण होतात.

सूची तयार करण्याची जबाबदारी घेतल्यानंतर सूचीमधील नोंदी कोणत्या क्रमाने लावाव्यात वर्णक्रमानुसार का वर्गवारीनुसार? कोणत्या वाचकाला अभ्यासकाला अथवा संशोधकाला कोणत्या क्रमाने नोंदी पाहणे सोयीचे होईल. याचा अंदाज घेऊन सूचीतील नोंदीचा क्रम ठरविणे अशक्य असते. अशा परिस्थितीत जास्तीत जास्त अभ्यासकांची सोय जमेस धरुनच सूचीमधील नोंदीचा क्रम निश्चित करावा लागतो.

सूचीप्रमुख : सूची प्रमुखाच्या अंगी कुशलता अनुभव मनाचा समातोल, तांत्रिक कार्यातील मुरब्बीपणा अपेक्षीत असतो तो विषयतज्ञही असावालागातो ह्या प्रकारची गुणवत्ता असलेले तज्ञ मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत ही सूचीकार्यातीस एक मोठी अडचण आहे

सूचीविज्ञान आणि सूची प्रकल्पांना पाश्चात्य देशात मान्यता स्थौर्य व चांगला दर्जा प्राप्त झालेला आढळून येतो. या कार्याविषयी आपल्या देशात, समाजात विशेष आस्था दिसून येते नाही. उदा भारतीय भाषातील पुस्तकांनाअजुनहीनिर्देशसूची सूची Index नसते.

डॉ. वसंत रा.जोशी म्हणतात ''सूचीमध्ये प्रत्यक्ष ज्ञानाचा संचय नसतो. परंतु अशा ज्ञानसंचयाच्या दिशा दाखवण्याचे महत्वाचे कार्य सूचीवाड्.मय करते. अभ्यासामध्ये सूची हे अतिषय महत्वाचे साधन आहे अभ्यासचा आरंभच मुळी सूचीच्या अवलोकनापासून व्हावयास पाहिजे पंरतु अजूनही सूचीचे महत्व जाणत्यांनी ओळखले आहे, मान्य केले आहे असे दिसत नाही सूचिकार्य ते दूय्यम आहे अशाच दृष्टीने सामान्यतः पाहिले जाताना दिसते या कामात काहीसा यांत्रिकपणा असला तरी ते परिश्रमाचे, चिकाटीचे आणि किचकट असे काम आहे या कामाच्याही निर्दोष पुर्णतेसाठी विशिष्ट दृष्टी असावी लागते. कमी श्रेय देणारे पण बहुत उपयुक्त असे हे कार्य आहे...''४

श्री.जोशी यांचे हे मत ग्रंथकाराला विचार करावणास लावणारे आहे असे वाटते.

सूचीप्रकार :सूची म्हणजे काय असा प्रश्न विचारला तर निश्चित व्याख्या देणे कठीण आहे कारण सूची या संज्ञेत आत अनेक उपविषयांचा अंतर्भाव करतात. सूची म्हणजे ग्रंथाची क्रमवारीने नोंद करणे असे समान्य वाचकांना वाटते तज्ञ अभ्यसाकांना या संज्ञेचा अर्थ आर्थिक व्यापक वाटतो. सूची शब्दाला ग्रंथाची समीक्षा व ग्रंथाचा इतिहास असाही अर्थ जोडला जातो.

छपाई कला प्रगत होत असताना ग्रंथनिर्मिती वाढत गेली१५ व्या १६ शतकात इंग्लडमध्ये सूचीचा अर्थ ''ग्रंथ- लेखक, मुद्रक, प्रकाशक'' या संबधी माहिती असा घेतला जात असे. १७ व्या शतकात 'ग्रंथविषयक माहिती' असा घेतला जाऊ लागला ही ग्रंथविषयक महिती परिपूर्ण असावी यासाठी सूचीचे काही प्रकार अस्तित्वात आले आता पाश्चात्य जगातील वाचनालयात तीन प्रकारच्या सूची अस्तित्वात आहेत त्यात

१) वर्णात्म सुची (Enumerative)
२) पृथक्करणात्मक सूची (Analytical)
३) ऐतिहासिक सूची (Historical)

हे प्रकार सामाविष्ट आहे या तीन प्रकारच्या प्रमुख सूचीग्रंथप्रवाहातून अनेक उपप्रवाह निर्माण झाले आहेत

१) वर्णात्मक सूची (Enumerative) ऐखादे पुस्तक लिहिताना त्याचा संबध लेखकाने इतर घेतलेल्या आधारविषयक ग्रंथाशी असतो हे ग्रंथ कोणते ते वाचकाला समजले पाहिजे अशा ग्रंथाचा उल्लेख तळटीप देऊन किंवा ग्रंथाच्या शेवटी यादी देऊन केला पाहिजे छापलेल्या पानावर तळटीपा देणे किंवा शेवटी त्याची यादी देणे हे आणखी एका कारणासाठी महत्वाचे आहे अभ्यासकला ग्रंथ वाचत असताना नवीन प्रश्न निर्माण होतात. त्याला नविन विचार सुचू शकतात. अशावेळी त्याला उपयुक्त ग्रंथाची सूची उपयोगी पडते ज्ञानवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा मानला आहे.

सूची देताना खालील क्रमाने माहिती द्यावी लागते. लेखकाचे नाव, ग्रंथाचे नाव, संपादकाचे नाव भाषांतरकाराचे नाव ही माहिती देताना सुसुत्रता यावी यासाठी काही निकष लक्षात घ्यावे लागतात. ग्रंथ लेखकाचे नाव लिहितांना जसे छापलेले नाव असेल तसेच द्यावे त्यात भार घालु नये किंवा त्यातील शब्द संक्षिप्त करुन लिहू नयेत लेखकांनी आपल्या पदव्या देऊन प्रा.डॉ. मेजर अशा नावाने सुरवात केली असेल तर त्या देऊ नयेत

एकाच ग्रंथाचे अनेक लेखक असतील तर त्यापैकी प्रथम नाव दयावे व त्यापुढे इत्यादी असे लिहावे याची उपयुक्तात लेखक वाचक, संशोधकांना असते.

पृथक्करणात्मक सूची : ग्रंथाच्या अंतरंगासंबधी माहिती वाचकाला ग्रंथपालांना मिळाली तर त्या ग्रंथाबद्दल आकर्षण किंवा अनाकर्षण निर्माण होते ग्रंथासाठी कागद कोणत्या प्रकारचा वापरला आहे हे ग्रंथ हाताळण्याच्या दृष्टीने तो टिकण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

मल्लपृष्ठ, मुखपृष्ठबांधणीचा विचार केला जातो. पुस्तकाची साईज, कागदाचा प्रकार अक्षराचा टाईप, त्याची बांधणी याची माहिती हा कोश देतो. पुस्तके हाताळणे सोपे जावे म्हणून स्टॅंडच्या साईजची माहिती यात मिळते. भारतात हा पृथक्करणात्मक सुची कोश उपलब्ध नाही पाश्चात्य देशात अशी पुस्तके आहेत.

* ऐतिहासिक सूची :- एखादे पुस्तक लिहिण्यास लेखक का प्रवृत्त झाला त्यावेळच्या राजकीय घडामोडी, ऐतिहासिक घडमोडी यांची माहिती मिळते.

ऐतिहासिक सूची या प्रकारच्या लेखनात एकूण ग्रंथ निर्मितीचा, त्यांच्या व्यापाचा दर्जाचानिमित्ताचा इतिहास येतो. तसेच ग्रंथाच्या लोखनाचा, अडचणीचासंदर्भ साहित्याचा इतिहासही त्यात समाविष्ट असतो.

उदा. रामायण, महाभारत या ग्रंथाचा प्रभाव अनेक शतके टिकून आहे. किंवा सुधाकर सिंधू ही पात्रे कोसला मधील पांडुरंग सांगवीकर असे कितीतरी नायक या लेखकांनी जिवंत केले आहे.

अशा ग्रंथाच्या निर्मितीचा इतिहास हा त्या त्या वेळचा समाजिक, सांस्कृतिक व राजकीय इतिहास असू शकतो. समीक्षक अशा ग्रंथाच्या निर्मितीची कारणपंरपरा शोधतात व त्या निर्मितीची ऐतिहासिकता लोकांच्या दृष्टीस आणून देतात.

'मराठी भाषेत ऐतिहासिक सूची' हा प्रकार त्या मनाने फारसा हाताळलेला नाही ग्रंथ प्रसिध्द झाल्यावर अशा ग्रंथाबद्दल समीक्षक वृत्तपत्रातून, मासिकातून, क्वचित स्वातंत्र लेख लिहून ऐतिहासिक स्वरुपाची माहिती देतात. पण या प्रकारच्या लेखनाला सूचीस्वरुप प्राप्त झालेले नाही.नवीन पिढीला ग्रंथाचा इतिहास माहित झाला तर त्यांना मार्गदशन व प्रेरणा मिळू शकते अशा स्वरुपाची माहिती इतस्ततः विखुरलेली असेल तर एक मार्गी अभ्यास करता येत नाही. खरे तर ' ऐतिहासिक सूची'हा अभ्यासचा स्वतंत्र विषय होऊ शकतो. असे डॉ.सदाशिव देव यांचे मत आहे. डॉ. सदाशिव देव यांचे हे मत सूची अभ्यास करण्यासाठी प्रेरणादायी आहे असे वाटते.

निर्देशन : (Indexing) मानव्य शास्त्रे, विज्ञान , व्यापार इत्यादी ज्ञान शाखांमध्ये ग्रंथ, नियतकालिके, शोधनिबंध, प्रबंध अशासारख्या माध्यमातून प्रकाशन होत असते या ज्ञानसंचयनाची विभागणी, उपविभागणी करुन जे ज्ञान वाचकांना गतीने उपलब्ध करुन देण्याचे काम सूचिकार, ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग करीत असतो. सर्व ज्ञानक्षेत्रांची विभागणी काटेकोरपणे करणे हे अतिशय अवघड काम आहे. याची माहिती या सूचित मोडते.

ग्रंथालय शास्त्रात अनेक ठिकाणी मेलविल ड्युई यांची दशांश वर्गीकरण पद्धत वापरली जाते या पद्धतीत सर्व ज्ञानविषयांचे १० मुख्य वर्ग मानले आहेत. त्याची पुढील विभागणी १०० उपवर्गात केली आहे ज्ञानविषयांच्या नैसर्गिक साखळी पध्दतीने विषयांना व नंतर उपविषयांना क्रमांक दिले जातात. दशांश वर्गीकरण पध्दती बरोबर कोलन वर्गीकरण पध्दती पण ग्रंथालयातून उपयोगात आणतात.

ग्रंथालयातील निर्देशनव्यवस्था हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आह ग्रंथालयमहर्षी एस.आर रंगनाथन यांनी या विषयाला मोठे योगदान केले आहे. याचा अनुभव पाश्चात्य ग्रंथपालांशी बोलतांना येतो.

हस्तलिखिते टंकलिखित सामग्री, मॅग्नेटिक टेप्स छायाचित्रे चित्रपट, कॅसेटस, मायक्रो फिल्मस, प्रमाणके, विवरणे वृत्तपत्रीय कात्रणे, सी.डी. रॉमस, संगणकातील महाजाल या या सर्व साधानांचा समावेश 'प्रलेखन'या सज्ञेत होतो प्रलेखनातील विषयाचा मागोवा घेऊन तो वर्णानुक्रमानुसार, अनुकालानुसार संख्याक्रमानुसार तयार करणे ही कार्ये निर्देशानाद्वारे (indexing) साधता येतात हे कार्य चार प्रकारांनी साधता येते लेखक – निर्देश, विषय निर्देश, टिप्पणवजा – निर्देश व सूची निर्देश असे हे निर्देशप्रकार आहेत.

* सूची आणि ग्रंथनिर्मिती : – लेखक ग्रंथ निर्माण करण्यासाठी सूचीचा उपयोग करीत असतो. ग्रंथाचा विषय निश्चित झाला की त्यावरील लेखन त्याचा काल , विषयाची मांडणी, त्यातील उपविषय, या प्रश्नांच्या उत्तरातून नवीन ग्रंथाचा आराखडा तयार होतो. ही संशोधित माहिती क्रमवार लिहिली जाते ग्रंथ प्रकाशनापुर्वी त्याला आवश्यक असणाऱ्या तीन प्रकारच्या सूची तयार कराव्या लागताता. १) अनुक्रमाणिका २) संदर्भ सुची ३ ) निर्देश उल्लेख सूची

१) अनुक्रमाणिका : प्रत्येक वैचारिक ग्रंथाला अनुक्रमाणिका असते. ( त्यात कांदबरी नाटक यांचा समावेश होत नाही.) सर्वसाधारणे ग्रंथात आलेल्या प्रकरणांची शीर्षके अनुक्रमाणिकेत येतात बऱ्याच वाचकांना संपर्ण ग्रंथ वाचायचा नसतो त्यांना अभिप्रेत असणारा विषय प्रकरणाच्या शीर्षकावरुन मिळवतात. त्यासाठी प्रकरणातील प्रतिपाद्य विषय शिर्षकाला पूरक असावा.

अनुक्रमाणिका बाबत डॉ.सदाशिव देव यांचे म्हणणे आहे ''अनुक्रमाणिका हा एक लहानसा पण उपयुक्त सूचिसंग्रह असतो तो काटेकोरपणाने केला तर ग्रंथ व वाचक यांचे नाते गतीने जोडले जाते. एखादा गुंडाळून ठेवलेला गालिचा जमिनीवर ठेवून तो उलगडत गेला की त्यावरील कलाकुसर , चित्रे जशी क्रमाने अनुभवाला येतात, त्याप्रमाणे अनुक्रमाणिकचे पान उलगडल्यावर ग्रंथातील प्रतिपाद्य विषय साखळी पध्दतीने उलगडत जातो. त्या ग्रंथाचे प्रथम दर्शन वाकचाला होते अनुक्रमाणिका हे एकूण ग्रथविषयाचे छायाचित्र आहे." ६ डॉ. सदाशिव देव यांनी अतिशय सुंदर विश्लेषण अनुक्रमाणिके चे मांडले आहे.

२) संदर्भसूची : संदर्भसूची ग्रंथलेखनाचा अविभाज्य भाग आहे. म्हणून ग्रंथाचा आराखडा तयार होत असताना सूची तयार करणे योग्य होईल. संदर्भासाठी लेखांची सूच करताना लेखकाचे शिर्षक, लेखकाचे नाव नियतकालिकाचे नाव प्रकाशन वर्ष अंक, क्रमांक दयावा, इसवी सन, महिना छापलेला पृष्ठांकही द्यावा. ग्रंथाची सूची करताना ही पध्दत आवश्यक ते बदल करुन पाळावी

सूचीसाठी लिहिलेली – ग्रंथ लेखांची यादी सूचीमध्ये रुपांतरीत करताना ती तीन प्रकारांनी करता येते १) वर्णानुक्रम २) विषयावर ३) कालानुक्रम

कालकमाने सूची तयार केली तर एखादा विषय कालपरिमितीत कसा उलगडत गेला याचा बोध होतो. विषयवार केली तर त्या त्या प्रकरणाला, उपविषयाला महत्व दिल्यासारखे होते. वर्णानुक्रम पध्दतीने केलेली सूची ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती लक्षात घेऊन केलेली असते.

या सूचीबाबत सु.रा.चुनेकर म्हणतात. ''सूचीमध्ये सुचीकर्त्याचा प्रयत्न उपलब्ध जास्तीत जास्त माहिती नोंदवून ठेवण्याचा असावा. अपुरे संदर्भ मिळाले तर तेही टिपून ठेवावेत मात्र तसे स्पष्ट करावे असे अपुरे संदर्भ आज टिपून ठेवले नाहीत तर पुढे आजीबातच नष्ट होऊन जाण्याचा धोका असतो. आज जसे ते उपलब्ध झाले तसे नोंदवून ठेवले तर पुढील शोधाचा मार्ग तरी खुला राहतो. आणि नंतरच्या अभ्यासकांना ते संदर्भ पुरे मिळण्याची शक्यता शिल्लक राहते''.

निर्देश उल्लेख सुची : ग्रंथ लेखनाचा शेवटच्या टप्पा निर्देशउल्लेख सूचीचा असतो.

ग्रंथलेखन चालू असताना ही सुची हळुहळू घडत जाते. ग्रंथलेखानात विविध व्याख्या, महत्वाचे संदर्भ, पारिभाषिक शब्द व्यक्तीची व स्थळांची नावे विषयासंबधी उल्लेख आलेले असतात. ग्रंथात तसेच हजारो शब्द लिहिलेले असतात. पण त्यातील काही शब्दांना विषयांच्या दृष्टीकोनातून महत्व आलेले असते. अशी शब्दाची सूची ही ग्रंथांच्या शेवटी दिलेली असते. ग्रंथाची उपयुक्ततात या सूचीने वाढते तसेच अभ्यासकाला ही सूची संपुर्ण ग्रंथ वाचण्यास प्रवृत्त करते.

सर्वसाधारणपणे निर्देश – सूची –ज्यात ग्रंथ व्यक्ती विषय यासंबधी शब्द असतात ते वर्णानुकमाने देण्याची पध्दत आहे. निर्देशसूची तयार करताना विषयाचा दृष्टीकोनातून कोणता शब्द महत्वाचा व कोणता कमी महत्वाचा याचे तारतम्य लेखकाला हवे.

निर्देश सूचीचे प्रकार : १) ग्रंथ निर्देश सुची २) नियतकालिकांची निर्देश सुची ३) वृत्तपत्रांची निर्देश सुची

१)ग्रंथ निर्देश सूची : साहित्य संशोधनासाठी उपयुक्त यात ग्रंथ सूची बरोबरच कवितेच्या पहिल्या ओळींची सूची, शब्दसुची, प्रथम चरणांची सूची, ज्ञानेश्वरीतील प्रथम चरणाची सूची अशी सूची सौ. कालिंदी जोशी यांनी केली आहे या याशिवाय व्यक्तिसूची/ ग्रंथ लेखसूची विषय सूची अशी विभागणी होते.

नियतकालिकांची निर्देश सूची : नियताकालिकाच्या निर्देश सुचीचे १) सर्वसाधारण व २) विषयनिष्ठ असे दोन प्रकार पडतात. पहिल्या प्रकारात एखादया राष्ट्रातील अथवा सर्व भाषातील नियत कालिकांचा समावेश होतो. उदा. विविध ज्ञान विस्तार लेख सूची ,

विषयनिष्ठ निर्देश सूची विशिष्ट विषयापुरतीच मर्यादित असते. उदाBritish Humarities index

※ वृत्तपत्र निर्देश सूची – वृत्तपत्रे ही अनेक प्रकारच्या माहितीची व वृत्ताची कोठारे असतात. वृत्तपत्र निर्देश सूचीचा प्रथम प्रयत्न लंडन मध्ये 'टाईम्स' ने इ.स. १७९० केला १८५१ मध्ये न्युर्याक टाईम्स व केसरी शताब्दी सूची खंड १ मध्ये १८८१ मध्ये केला.

संदर्भ निर्देश सूची : एखादया विशिष्ट विषया संबधी लेखाच्या द्वारे जर कोणी मुलभूत वचार मांडले असतील तर त्या संदर्भात इतर संशोधकांनी लेखांच्या द्वारे या उलट-सुलट प्रतिक्रिया व्यक्त केल्या असतील त्या एकत्र स्वरुपात प्रसिध्द करण्याचे कार्य संदर्भ निर्देशसूचीद्वारे होत असते. Science Citation Index

सूचीची सूची : मराठीत एकमेव प्रयत्न

१) मराठी संशोधन पत्रिका जुलै १९६९ (७१ सूची) २) मराठी संशोधन प्रत्रिका जुलै १९७१ (६१सूची)

३) महाराष्ट्र साहित्यपविका डिसेंबर १९७८ (१४०) या अंकामधून डॉ. सु.रा चुनेकर यांनी संकलित करुन प्रकाशित केल्या आहेत एकूण २७२ सूची आहेत.

संशोधनामध्ये ' सूची' हे महत्वाचे साधन आहे ती कोण कशी करतो व तिचा कोण कसा उपयोग करतो यावर तिची उपयुक्तता व महत्व अवलंबून असते. याबाबत सु.रा.चुनकरांचे मत आहे. ''सूची हे अभ्यासाचे शेवटचे साधन नाही. ती सुरुवात आहे. या प्रारंभिक साधनाच्या आधाराने, त्याची पूर्णापूर्णता पारखीत, स्वतंत्रपणे स्वतः शोध घेत भर घालित सुचिकाराने पुढे जावयाचे असते. सूचिकरण ही कधी व थांबवणारी सतत गतिमान असणारी क्रिया आहे"९ सु.रा. चुनेकरांची ही प्रतिक्रिया अतिशय बोलकी आहे खरोखर सूचीकरण ही कधी न थांबवणारी सतत गतिमान असणारी क्रिया आहे.

※ समारोप अभ्यासकांना, वाचकांना संदर्भ सेवा उपलब्ध करुन देताना जाणवणाऱ्या अडचणीमधून ' सूची वाङमयाचा' जन्म झाला सूची शात्रामुळे अनेक अवघड वाटणारी कामे सोपी झाली. महितीचा प्रचंड प्रवाह येत असताना तो मानवाच्या उपयुक्तेस सतत वापरला जावा या प्रेरणेने सूचिकार प्रकाशक प्रयत्नशिल आहेत या प्रवाहाचा काही भाग जरी विस्मरणात गेला तर ज्यांनी नविन विचार मांडले त्यांना त्यांचे श्रेय मिळणार नाही ही जाणीव काही विद्वान सतत बाळगतात त्यामुळे सुचीकोशाच्या निर्मितीत ते सतत मग्न असतात. सूचिकोश तयार करणे हे अतिषय गुंतागुतिचे वेळ खाणारे , दमवणूक करणारे काम आहे यात अर्थिक संकटे खूप तर मिळकत अगदीच सामान्य अशी स्थिती आहे तरी सुध्दा प्रत्येक शतकात काही विद्वान या जागात निर्माण झाले आहेत. त्यांनी या अडचणींना न जुमानता स्वतःला या कार्यात झोकून दिले आहे व मानवी जीवनाचा एक गरज भागविली आहे.

परंतु सूचिकरण ही कधी न थांबणारीगतिमान क्रिया आहे यात मानवाने सतत कार्यरत राहणे आवश्यक आहे एका आर्थाने असेही म्हणता येईल सूचिशास्त्र ज्ञानाच्या अफाट पसऱ्यात शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत असते. इलेक्ट्रॉनिक यंत्रणा व संगणकामुळे यात थोडी सुलभता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाचकाला माहिती पटकन उपलब्ध तर होतेच परंतु संशोधकासही संशोधनाच्या पायऱ्या अधिक सुलभ होतात. संशोधन करणे सोपे होते.

संदर्भ सूची

१) संशोधन स्वरुप आणि पध्दती - संपादक सु.रा.चुनेकर - सूचीशात्र व उपयोग पृष्ठ क्र -९०

२) कोशवाड्.मय - विचार आणि व्यवहार डॉ.सदाशिव देव -प्रकरण ५ पृष्ठ क्र २०४

३) सूचींची सूची - मराठी संशोधन पत्रिका जुलै १९६९

४) भाषा व साहित्य संशोधन खंड पहिला - संपादक डॉ. वसंत रा.जोशी सूची वाड्.मय पृष्ठ क्र. ४४७

५) कोशवाड्.मय -विचार आणि व्यवहार डॉ.सदाशिव देव प्र.५ पृष्ठ क्र २१७

६) उ.नि.पृष्ठ क्र २२४-२२५

७) संशोधन स्वरुप आणि पध्दती संपादक सु.रा.चुनेकर- सूची शास्त्र व उपयोग पृष्ठ क्र. १०३

८) उ.नि.पृष्ठ क्र.-९८ -९९

९) उ.नि.पृष्ठ क्र.१०६

संदर्भ ग्रंथ सूची

१) संशोधन स्वरुप आणि पध्दती - संपादक सु.रा.चुनेकर, रंगनाथ पठारे दिलीप धर्म

२) कोशवाड्.मय विचार आणि व्यवहार डॉ.सदाशिव देव

३) भाषा व साहित्य संशोधन खंड पहिला संपादक डॉ. वसंत जोशी

४) मराठी संशोधन - पत्रिका - ऑक्टोबर १९७१ ते जुलै पृष्ठ १९७१ संपादक सु.रा.चुनेकर प्रेषक

# ''नवोदत्तरी श्रमिक आत्मकथनांचे वेगळेपण''

**श्री. राजेंद्र शरद जोरवर**
संशोधक विद्यार्थी
स.म.भा.सं.थोरात महाविद्यालय संगमनेर

**डॉ. राहुल राजाराम हांडे**
संशोधन मार्गदर्शक
संगमनेर महाविद्यालय संगमनेर

**प्रास्ताविक :—**

माणसाला बोलता येऊ लागले तेव्हापासून माणसाला आपल्यासुख—दु:खात इतरांना सामावून घ्यावे असे तीव्रतेने वाटू लागले, आणि आपले अनुभव इतरांजवळ व्यक्त करावत, असे मनोमन वाटू लागले ख—या अर्थाने आत्मकथनांचा आरंभ तेव्हापासूनच मानयला पाहिजे आपला स्वत:चा अनुभव प्रथम माणसाने न राहून बोलून दाखवला आणि तो जर आत्मकथनाचा उगम मानला, तर तोच अनुभव त्या व्यक्तीने रंगून जर सांगितला तर ती कथेची जन्मदात्री मानायला पाहिजे, त्यामुळे कुठल्याही प्रकारची अतिशयोक्ती न करता भाषेबरोबरच जन्माला आलेला पहिला वाड्:मय प्रकार हा आत्मकथनं आहे. या निश्कर्शापर्यंत आपल्याला यावे लागते.

आत्मकथनाची सर्वसामान्य व्याख्या पुढीलप्रमणे केली जाते. ''स्वत: बद्दल केलेले कथन म्हणजेच आत्मकथन होय'' अशी सर्वश्रुत व्याख्या केलेली आपणस पहायला मिळते. 'आत्म'म्हणजे स्वत:चे आणि 'आत्मा' हे नाम संस्कृत भाषेतून मराठी मध्ये आलेले आहे. यामध्ये 'आत्मा' म्हणजेच स्वत: आणि स्वत: म्हणजेच मी आशा अर्थाने आत्मकथने लिहिली जातात. आत्मकथनाला 'स्वकथन' असेही म्हटले जाते.

याप्रकारे आत्मकथन शब्दबध्द होऊन ग्रंथबध्द कधी झाले याचा जर विचार केला तर असे लक्षात येते की,.ऋग्वेदाच्या दहाव्या मंडला मध्ये एक अक्षरदेवन सूक्त आहे. त्यामध ये एका जुगा—याची कैफियत मांडलेली आहे. कोणत्याही व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचे कफल्लक मनोदर्शन त्या सूक्तात धडते. यावरुन एक ल़क्षात येते की , आत्मकथनाचा ज्ञात आरंभ हा त्रग्वेदातील अक्षरदवेन सुक्ता पासून मानता येइल, म्हणजेच आत्ककथनांची बीजे ही .ऋगवेदामध्येच रुजलेली दिसतात.

नवोदत्तरी श्रमिक आत्मकथनांचा विचार करता काळानुरुप बदल होन गेला आणि माणूस स्वत: विशयी लिहहू लागला. सुरुवातीच्या काळात ठारविकच लोक लिहिण्याचे काम करीत असे, परंतु दिवसेदिंवस शिक्षणचा प्रसार आणि प्रचार होत गेला आणि प्रत्येकाच्या मनात स्वत: बद्दल लिहिण्याची महत्वकांक्षा जागृत होऊ लागली. मग या मध्ये श्रमिक वर्ग ही मागे राहिला नाही. अनेक श्रमिक कामगारांनी आत्मकथने लिहिलेली पहायला मिळतात. गेली पन्नास—साठ वर्शे किंबहुना त्याहून अधिक कालावधी पासून श्रमिकांचे व श्रमिकांबद्दल चे काम सुरु आहे. आता ते केवळ हमाल, मापाडी, कामगारांपुरते मर्यादित न राहता इतर असंघटीत मजुरांच्या .क्षेत्रात हळूहळू विस्तार पावले आहे. शहरातील मोलकरणी ,कागद,

काच पत्रा, गोळा करणार, बांधकाम मजूर, पथारी व्यावसायिक, खाण कामगार, अशा विविध घटक आपले आयुष्य जगात असतांना अनेक सुख—दुखाचें अनुभव हाच फार मोठा फरक दिसून येतो. ख—या अर्थाने तेच त्यांचे वेगळेपण आहे. हेच वेगळेपण लेखनाची प्रेरणा म्हणून पुढे येतांना दिसून येते. श्रमिक आत्मकथनकार कष्टकारी आहे. हे श्रमिक रात्रदिवस काबाड कष्ट करतात आणि त्यासाठी त्यांनाा अनेक वेळा आपल्या घरापासून दुसरीकडे कामासाठी जावे लागते.

श्रमिकांच्या जीवनाचा खोलवर जाऊन अभ्यास केला तर एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते, ती म्हणजे श्रम आणि जीवन यांचा अनन्य साधारण संबंध पाहायला मिळतो. कष्ट करण्यासाठी कायमच वणवण भटकावे लागते. दुसरी गोष्ट अशी की, त्यांचे वैयक्तिक आयुष्य ते कसे जगतात याचाही विचार कुठेतरी करणे गरजेचे आहे, कष्ट आणि भाकरी एवढेच त्यांचे आयुष्य होय. आपला जीवन प्रवास एक प्रेरणदायी जीवन प्रवास आहे आणि या पासून समाजाला किंवा सामाजातील घटकांना आपल्या जीवन प्रवासापूसन प्रेरणा मिळू शकते. याची जाणीव त्यांना होते तेव्हा मनात कधीतरी लिहीण्याचा विचार घर करु लागतो. आणि त्यातूनच श्रमिकांच्या आत्मकथनांची ख—या अर्थाने सुरुवात होते. आणि त्यामुळेच श्रमिक आत्मकथनांचे वेगळेपण दिसून येते. म्हणूनच इतरांना श्रमिकांच्या जीवन दर्शनातून प्रेरणा मिळते. यातील संघर्शमय कहाणी हीच प्रेरणा असते. श्रमिकांची आत्मकथने नाउमेद न होता संघर्श झेलीत नवयुगाची पहाट निर्माण करण्याचे काम सतत करत असतात. हे श्रमिक आत्मकथनांचे निश्चितपणे वेगळेपण म्हणावे लागेल. इतर आत्मकथाकार स्वत:चे जीवन श्रमिकांपेक्षा वेगळया प्रकारे जगलेला असतो. परंतु श्रमिक या शब्दातच सर्व काही सामवलेले आहे. श्रमिकांना जीवन जगत असतांना आर्थिक गोष्टीची हमी नसते. म्हणून म्हटले जाते ''रोजगार हमी आणि तिथे काय कमी'' अशा प्रकारचे शब्द वापरले जातात नवोदत्तरी श्रमिक आत्मककथनांमध्ये एक महत्वाचे उदाहरण आपल्याला देता येईल ते म्हणजे 'मी तो हमाल— आप्पा कोरपे, यांनी आपली हदयद्रावक कहाणी या आत्मकथना मध्ये मांडलेली आहे. ते पाहिल्या नंतर असे लक्षात येते की, भाषा—शैली ,मांडणी, इ. अनेक दृटीने नवोदत्तरी श्रमिक आत्मकथनांमध्ये वेगळेपण जाणवते.

श्रमिकांच्या अत्मकथनांमुळे मराठी साहित्याच्या वैभवात फार मोठी भर पडली असे म्हणावे लागेल. कारण श्रमिकांच्या आत्मकथनांमध्ये फक्त जीवनातील अनुभव दर्शनच होत नाही, तर या आत्मकथनामध्ये लेखक आपल्या आयुष्यातील सुखदु:ख, यश—अपयश व अविस्मरणीय अशा प्रसंगांची वर्णने करतो, तसेच लेखकाच्या जीवनाबद्दल स्वभाव, गुण—दोश, आवडी—निवडी, याच बरोबर लेखकाच्या जीवनातील ऐतिहासिक घटना यांच्या बद्दल सामान्य जनतेल कुतूहल असते. त्याच्या जीवनातीन घडून गेलेले पसंग इत्यादींचे कुतूहल काही प्रमाणात का होईना कमी होण्याची शक्यता असते. जीवनातील काही बाबी परिस्थितीमुळे किंवा आत्मसंयम यामुळे मूक राहिलेल्या असतात, परंतु काही कालांतराने मूक

राहिलेल्या घटना भावना प्रसंगांना वाच्यता मिळण्याची आशा असते. त्यामुळेच लेखक आत्मकथनामध्ये त्याला वाट मोकळी करुन देतो. यामुळे फक्त घटना, भावना, प्रसंग एवढ्याच गोष्टींचा उलगडा होत नाही, तर त्या काळातील इतिहास, संस्कृती, इत्यादी बाबींवर ही प्रकाश टाकला जातो. व त्याचेही काही प्रमाणात का होईना ज्ञान प्राप्त होते आणि मूल्यमापन करता येते . म्हणजेच साहित्याच्या दृष्टीकोनातून विचार केला असता वरील सर्वच गोष्टी साहित्याच्या वैभवात भर टाकणा—या आहेत. कारण १९९० नंतर समाजिक परिस्थिती अतिशय झपाटयाने बदलत गेलेली दिसते. त्यामुळे या श्रमिक आत्मकथनांची मार्गदर्शक म्हणून समाजाला गरज आहे.

१९९० च्या आगोदर जी आत्मकथने लिहिली गेली त्या आत्मकथनांची शैली, बाज आणि विशय वेगळे होते, कारण या आगोदर असणारी परिस्थिती वेगळी होती.परंतु १९९० नंतर सामाजिक, राजकीय तसेच शैक्षणिक जे बदल होत गेले त्यामुळे श्रमिकांना त्यांचे जीवन अनुभव लेखन रुपाने मांडण्यासाठी मोठे बळ मिळालेले आपल्याला पाहायला मिळते. कारण या काळात श्रमिकांच्या अनेक चळवळी उदयास आल्या तसेच दलित साहित्याने खूप मोठे बळ देण्याचे काम या कालखंडात झालेले दिसून येते. या सर्व परिस्थितीचा प्रभाव श्रमिक आत्मकथनांवर पडलेला दिसून येतो. नुसतेच लिहीहुन चालत तर त्या साठी वाचक वर्ग ही महत्वाचा घटक विचारात घेणे महत्वाचे असते, कारण लेखन हे वाचकांसाठी असते आणि त्यातूनच प्रेरणा घेतल्या जातात त्यामुळे प्रत्येक घटकांचा विचार करणे गरजेचे आहे.

एकीकडे सरकर सर्व शिक्षा अभियान राबवत असते, परंतु अनेकजण पोटाची खळगी भरण्यासाठी स्थलांतर करतांना दिसून येतात. मग खरच शिक्षण आणि श्रमिक यांचा किती निकटचा संबंध येतो. कधी कधी पोटाची खळगी भरण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडावे लागते, कारण त्यांच्या पुढे महत्वाचा प्रश्न असतो तो पोटाचा म्हणून त्याला पोटाची खळगी भरण्याला प्राधान्य द्यावे लागते. श्रम करतांना जेमतेम शिक्षण घेऊन जीवन जगावे लागते. आपण पहतो श्रमिकांना कुटुंब, शिक्षण, समाज अष्या अनेक गोष्टीन पासून दूर रहावे लागते. ‘असेल पोटात तर येईल ओठात’ या म्हणी प्रमाणे जीवन जगतात म्हणूनच हलाखीचे जीवन दर्शन त्यांच्या लेखनामध्ये पहायला मिळते. म्हणजेच शिक्षण जेमतेम झालेली माणसे सुध्दा समाजाला एक वेगळी दिशा देऊ शकतात हे वेगळेपण येथे जाणवते. १९९० नंतर ची जी श्रमिकांची आत्मकथने आहे. त्या मध्ये प्रामुख्याने एक वेगळया विचारांचे प्रवाह पहायला मिळतात. नवे विचार, नवी शैली, नवा बाज, नवे प्रवाह इ. चा श्रमिक आत्मकथनांवर प्रभाव दिसून येतो आणि पर्यायाने या सर्व गोष्टी साहित्यामध्ये ही नावीन्य निर्माण करीत असतात. साहित्याच्या दृष्टीने विचार केला असता फार मोठे योगदान श्रमिकांचे आणि त्यांच्या साहित्यांचे आहे. हे नाकारुन चालनार नाही. कारण या आत्मकथनांनी समाजापुढे आदर्श निर्माण करुन प्रेरणा देण्याचे काम नेहमी केलेले आहे. या श्रमिक वर्गाला प्रामुख्याने म.फुले, शाहू महारज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारांचे अधिश्ठान आहे. त्या विचारांचा

फायदा समाजाला आणि श्रमिकांना होतो आहे. १९९० नंतर चा विचार करता असे दिसून येते की, श्रमिकांच्या आत्मकथानाची वाटचाल ही समाजाला एक प्रकारे दिशा देणारी आहे असे म्हणावे लागेल, कारण श्रमिकांच्या लेखणीतून उमटणारे शब्द समाजाला एक वेगळया प्रगतीच्या दिशेने घेऊन जाताना पहायला मिळतात. समाजातील आजची परिस्थिती पाहता खरोखरच सत्य मार्गदर्शनाची गरज आहे. कारण समाजासमोर खरी उदाहरणे मांडणे गरजेचे आहे. या आत्मकथनांतून जीवनात घडलेले प्रसंग आणि अनुभव हे आपले वाटू लागतात. त्यामुळे ते विचार प्रेरणादायी होतात. कष्टक—यांच्या जीवनाचा अभ्यास करणारी संशोधन करुन उपाययोजना करणा—या शिक्षण संस्था उभारणीचा संकल्प केला आहे. पुण्यातील हमाल भवनात ही योजना सुरु व्हावी असे प्रयत्न सुरु आहेत, परंतु एवढ्याने भागणर नाही मुळात तळापासून संघटनबांधणी व्हावीत यासाठी शोशित कष्टक—यांची गाठभेट संपर्क त्यांच्याशी संवाद प्रश्न समजून घेणे, मार्गदर्शन संघटन संघर्श या मार्गानी उभारणी करावीच लागेल असे डॉक्टर बाबा आढाव यांचे मत आहे. या विचारांचा मराठी साहित्यालाही मोठा उपयोग होऊ शकतो. तसेच यामुळे अनेक उपेक्षितांचे जीवनदर्शन समाजाला घडलेले आहे. या सर्व गोष्टीमुळे मराठी भाषेची व साहित्याची संपन्नता वाढलेली आहे.

म्हणूनच नवोदत्तरी श्रमिकाची आत्मकथने ही इतर आत्मकथनांपेक्षा निश्चित पणे प्रेरणादायी, सामाजिक जाणीव असलेली आणि आपले वेगळेपण सिध्द करणारी आहे. त्यामुळे मराठी साहित्यासाठी ते एक वेगळया प्रकारे वरदानच ठरते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आणि या श्रमिक आत्मकथनाचे वेगळेपण नेहमीच जाणवत राहील हेही तितकेच सत्य आहे.

**संदर्भग्रंथ —**

१. मराठी आत्मचरित्रपर लेखन — उशा हस्तक

२. पुरोगामी सत्यशोधक अंक — ४ ऑक्टो —नोव्हें—डिसें—२०१७

३. मी तो हमाल — अप्पा कोरपे

◆◆◆

*Power of Knowledge Peer Review Journal, Volume I, Issue:IV Jan to March 2021 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# महिला सबलीकरण आणि स्त्रीलेखिका

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

स्त्रीयांच्या विकासासाठी आधुनिक कालखंडामध्ये प्रयत्न व्हायला सुरूवात झाली. प्रारंभी स्त्रीयांच्याविषयी लेखन करणाऱ्या संत कवयित्रींचे योगदान विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. अगदी अकराव्या शतकामध्ये महानुभाव संप्रदायामधील कवयित्री महदंबा यांचे वाङ्मय महत्त्वाचे आहे. त्यांनी वरविषयक लग्न समारंभामध्ये म्हणावयाची गाणी लिहिलेली आहेत. त्यानंतर पुढील कालौघामध्ये संत जनाबाई यांचे अभंगलेखन स्त्रीच्या अबलात्त्वाला वाचा फोडताना दिसते. 'डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी...' या रीतीने संत वाङ्मयामध्ये एका स्त्रीचा हुंकार पहायला मिळतो. पुढीलच्या वाटचालीमध्ये संत वेणाबाईचे कार्य कर्तुत्त्व आपणास विचारात घेता येते. समर्थ संप्रदायामध्ये संत वेणाबाईचे कार्य विशेष महत्त्वाचे ठरते. महिलांच्या सबलीकरणासंदर्भात या सर्व स्त्री कवयित्रींचे कार्य स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही समाजातील विविध घटक महत्त्वाचे आहे. आपल्या अस्तित्त्वासाठी, हक्कांसाठी झगडताना दिसतात. महिला आणि सामान्य माणसांच्या संदर्भात विचार केला असता हे दोनही समाजातील घटक अतृप्त आणि अस्वस्थ आहेत. किंबहुना त्यांना मुक्तपणाने, स्वच्छंदीपणाने जीवन जगता येते असे नाही. या दोनही समाजातील घटकांचा आक्रोश पाहयला मिळतो.

आज स्वातं;य प्राप्तीनंतरच्या कालखंडात महिलांचे जीवन पाहिले तर महिला वेदना सोबत घेवून जगताना दिसतात. स्त्रीला माणूस म्हणून तिचे हक्क मिळाले आहेत का? याचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. आजच्या दृष्टीने स्त्रीयांचा विचार करता असे लक्षात येते. स्त्रीयांना माणूस म्हणून समाजव्यवस्थेने स्वीकारलेले आहे हे स्पष्टपणाने आपण म्हणू शकत नाही. कारण आज स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार खूप मोठ्या प्रमाणात होता आहेत. स्त्रीयांना समूह व्यवस्थेने ठरविलेल्या अग्नीपरीक्षांना सामोरे जावे लागते. उदा. भटक्या विमुक्त समाजातील जात पंचायती ज्या शिक्षा महिलांना देतात याचा सद्य:स्थिती आपण दररोज दूरदर्शन आणि वर्तमानपत्रांतून पाहत आहोत. यासंबंधी ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या स्तबकात प्रत्येकजन या ना त्या कारणाने शापित अश्वत्थाम्यासारखा वेदना उरी घेवून जगत आहे. तिच्या वाट्याला दु:ख, दास्य, छळ, अवहेलना आपलीकडे काहीच आले नाही त्या 'स्त्री'ला भारतीय राज्यघटनेने स्वातंश्य दिले, समानता दिली. भारतीय घटनेचे पंधरावे कलम सांगते की, स्त्री व पुरूष असा कोणताही भेद भारत राष्ट्र करणार नाही. स्त्रीला विकासासाठी दाही दिशा मोकळ्या झाल्या पण तरीही लक्ष्मण—रेशा आहेतच. कारण सामाजिक व आर्थिक विषमतेने ग्रासलेल्या या समाजाचे स्वरूप एकसंध नाही, एकात्म नाही. जात—पात, वर्ण, वर्ग इ. चे अधिष्ठान असलेल्या या समाजव्यवस्थेत कुठल्याही स्तरातील स्त्री अद्याप गुलामीचे जिणेच जगत आहे. चूल, मूल, घर यांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे घेवून जगत असलेली स्त्री अजून एका कोंडलेल्या जगातच आहे. तिचा गतकाळ अनंत अनंत यातनांनी भरलेला तर तिचा वर्तमानकाळ अशांतीचा, अपेक्षाभंगाचा, असमाधानाचा आणि असुरक्षिततेचा

आहे. मात्र याच वर्तमानात समाजपरिवर्तनाच्या, मानवमुक्तीच्या लढ्याला गती येत चालली आहे. याचे भान तिला आहे. अगदी खालच्या थरापासून ते वरच्या थरापर्यंत शिक्षण, अर्थाजन, संतति—नियमन इ. अनेक कारणांमुळे स्त्रीजीवनाचे रूप बदलत चालले आहे.''[१] महिला वर्ग सतत कोंडलेल्या पध्दतीने जीवन जगतना दिसतात. स्त्री वर्गाला आपल्या बुध्दीची आणि मनाची शक्ती किती मोठी आहे. यासंबंधी तिला जाणीव नाही. स्त्री आज बंदिस्त जीवन जगणारी राहिली नाही. ती बहुतांशी बंधने झुगारून मुक्तपणे बाहेर येवू पाहते आहे. ती पत्नी, माता आणि दूहिता अशा भूमिका पार पाडताना दिसते आहे. समाजव्यवस्थेतील पुरूशाच्या बरोबरीचा घटक स्त्री आहे. स्त्रीला देहाबरोबरच मनही आहे याची जाणीव तिला झालेली आहे. समाजसुधारक आगरकर ज्या भूमिकेतून स्त्रीचा विकास होवू पाहत होते. त्या पध्दतीने ती परिस्थिती निर्माण होईल.

या परिस्थितीत महिलासंबंधी स्पष्टपणे भूमिका घेणाऱ्या लेखिका ताराबाई शिंदे या आहेत. ताराबाई शिंदे यांनी या दीर्घ निबंधातून स्त्रीयांच्या विकासासंबंधीचा, मानवी हक्कांच्या दृष्टिकोणातून विचार व्यक्त केलेले आहे. त्यातून आपल्याला मानवीय दृष्टिकोनातून स्त्री—जीवनाचा विचार अगदी परखडपणे ताराबाई शिंदे स्पष्टपणे मांडतात. ताराबाई शिंदे आपल्या विचारातून स्त्री—पुरूष अशी तुलना करतात. या निबंधातून त्यांनी स्त्री—पुरूष तुलना यांतून स्त्रीयांवरील अन्याय—अत्याचाराला वाचा फोडू पाहतात. व्यवस्थेने स्त्रीयांना कोणकोणत्या भूमिकेतन पाहतात हे सांगताना म्हणतात, ''स्त्रीया कपटी, असतात असे तुम्हाला वाटते, मग तुम्ही कपटयुक्त लीला पात्रे नाहीत नाहीत का? तुमच्या सारखे कपटी तर या पृथ्वीवर कोणी सापडणार नाही. स्त्री तुमच्यावर प्राणाहून जास्त प्रेम करते यात काही शंकाच नाही. स्त्रीचे मन फक्त एकावरच बसते. तुम्ही मात्र भ्रमरासारखे या फुलावरून त्या फुलावर उडत राहता, परंतु स्त्री जाती तशी नसते.''[२] स्त्री जीवनाविषयी ताराबाई शिंदे स्त्री—मनातील विचार सांगतात. ह्या विचारातून त्या स्त्रीमनातील एकनिश्ठत्त्व व्यक्त करतात. परंतु पुरूश मात्र या स्त्रीयांना फसवतात. प्रामाणिक पणे स्त्रीयांचे प्रेम असले तरी पुरूष केवळ त्या प्रेमाचा उपयोग मन—मानेल त्या रीतीने करवून घेतात. स्त्रीयांचे चारिश्य व पुरूषाचे भाग्य ब्रह्मदेवासही कळाले नाही. स्त्री ही पुरूषासारखी एकाला हाय व दुसऱ्याला बाय ह्या पध्दतीने कधीही जीवन जगत नाही अथवा तिच्या मनात हा विचार कधीही येत नाही. परंतु पुरूषी वृत्ती'' अरे जो मित्र तुमच्याशी उघडपणे निष्कपटाने वागतो त्याच्या तोंडावर गोड—गोड बोलून त्याच्या घरची प्रत्यक्ष लक्ष्मी, त्याच्या अब्रुची रक्षण करणारी जणू तलवार, त्याच्या सर्व सुख दु:खाची वाटेकरीण, त्याच्या सर्व ऐश्वर्याची स्वामिनी असलेल्या स्त्रीला देखील तुम्ही मित्राकडन हिसकावून घ्यायला कमी करत नाहीत.''[३] पुरूषाच्या मनाच्या सुप्त हेतू त्या स्पष्टपणे सांगतात. स्त्रीयांच्या संबंधी पुरूशाच्या मनातील हा विचार दूर व्हावा असा विचार त्या सांगतात. पुरूशी मानसिकता राजगादी, राज्यपद हस्तगत करण्याविशयी एकमेकांच्या जीववार उठतात. केवळ सत्तेकरीता एकमेकांचे जीव घेतात. वतन, पाटीलकी, देशमुखी साठीही एकमेकांचे प्राण घेता असे पुरूशांसंबंधी त्या विचार व्यक्त करतात. सादारपणे १८८२ मध्ये समाजमन व सद्य:स्थिती या प्रसंगी महिलांकडे पाहण्याची दृष्टी कशी होती याचा बोध आपणास होतो. त्यावेळी ताराबाई शिंदे ह्या निबंधाच्या माध्यमातून स्त्रीयांच्या हक्कांविशयी, अधिकाराविशयी, तिच्या समाज जीवनातील स्थानासंबंधी विचार व्यक्त करतात. त्या विचार

व्यक्त करताना कुणाचीही भीड–भाड ठेवत नाहीत. स्त्रीयांना त्यांचे हक्क व अधिकार मिळविण्यासाठी देव आणि पुरूष वर्ग याबरोबरच धर्मव्यवस्थेने स्त्रियांना गुलामीत कसे बंदिस्त केले आहे यासंबंधी त्या स्पष्टपणे विचार व्यक्त करताना भूमिका घेताना दिसतात. पुरूषी मानसिकता, भावना आणि सांस्कृतीक साम्य भेदांमधून त्या परिस्थितीचे अचूक वेध घेताना दिसतात. पुरूषप्रधान संस्कृतित स्त्रीयांच्या उपेक्षेला न्याय मिळावा. स्त्रीयांना पुरूशांसारखी सामाजिक समानता मिळावी ह्या करीता ताराबाई शिंदे यांची धडपड या माध्यमातून निर्भिडपणे पहायला मिळते.

सामाजिक परिवर्तनाचा वेग मंद असतो. मूल्यात्मक बदलाची गती संथ असते. घटनेने अस्पृश्यता नष्ठ केली आहे. तसे स्त्रीयांना त्यांच्या विकासासाठी स्त्री–पुरूष समानता, हक्क व अधिकार दिलेले आहेत. १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहिरनामा पाहता, ''संयुक्त राष्ट्रसंघातील जनतेने जाहिरनाम्याच्याद्वारे मानवाच्या मूलभूत हक्कांवरील आपल्या श्रध्देस मानव म्हणून त्यांचे हक्क व योग्यता यांना व स्त्री–पुरूशांच्या समान हक्कांना मान्यता व्यक्त केली आहे आणि सामाजिक प्रगती व व्यापक स्वातंश्याचे जीवनमान अधिकाधिक प्राप्त करण्यास चालना दिली आहे.''[४] स्वातंश्यानंतर स्त्रीयांना सर्व क्षेत्रे खुली झाली. स्त्री–दास्य विमोचन यांचे एक पर्व संपले. राजकीय, शैक्षणिक व सामाजिक हक्क तिला मिळाले आणि आज ती अर्थाजनासाठी बाहेर पडू लागली आहे. ''ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशात लोकांची स्थिती फार वाईट असते. हिंदू लोकांत फारच मूर्खपणा आहे यास्तव स्त्रियांची दूर्दशा फार आहे.''[५] स्त्रीयांच्या स्थानाविशयी भूमिका घटनेने स्पष्ट केलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी हक्क जाहिरनामा यांतून मिळालेले हक्क आणि अधिकारांच्या साहाय्याने जगभरातील महिला स्वतंत्रपणे जीवन जगण्याच्या विचार करताना माणून म्हणून जीवन जगण्याचा विचार त्यांना प्रेरणा देतानाच माणूस म्हणून जगण्यास प्रवृत्त करत आहे. मराठी साहित्य व्यवहारामध्ये वेगवेगळ्या स्त्रीवादी जाणीवा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून मार्ग बदलले आहेत. लेखिका आत्मशोध घेता घेता इतर अनेक विषयांच्या अभ्यासाकडे वळताना दिसतात. मानवी हक्कांच्या उपयोगामुळे स्त्रीया अधिकाधिक स्वत:चा विकास करवून समाजव्यवस्थे पुरूशांच्या बरोबरीने कर्तुत्व सिध्द करताहेत. आज स्त्री–पुरूषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात नावलौकिक मिळविते आहे. कर्तुत्व सिध्द करून दाखविते आहे. ह्या सर्व बदलांची सुरूवात आधुनिक काळात झाली असे म्हणता येते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. फडके भालचंद्र, मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, पृष्ठ. क्र. ०९
२. स्त्री–पुरूष तुलना, (संपा.) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, पृष्ठ. क्र. ३१
३. स्त्री–पुरूष तुलना, (संपा.) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, पृष्ठ. क्र. ३२
४. ऊ.नि., फडके भालचंद्र, पृश्ठ. क्र. ११

◆◆◆

# प्रा. दिलीप परदेशी यांच्या 'निष्पाप' नाटकातील शोकांतिका

**प्रा.डॉ.सौ.मंगल एकनाथ डोंगरे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव,
ता.जुन्नर, जि. – पुणे.

**प्रस्तावना:**

प्रा. दिलीप परदेशी लिखित आणि सदाशिव अमरापूरकर दिग्दर्शित 'निष्पाप' हे नाटक १९८३ मध्ये रंगभूमीवर आले. व्यावसायिक रंगभूमीवर त्याचे सुमारे पाचशे प्रयोग झाले. निर्माते – प्रभाकर पणशीकर होते. अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेतर्फे 'निष्पाप'ला १९८३ ची 'सर्वोत्कृष्ट' नाट्यनिर्मिती हे पारितोषिक मिळाले. हे नाटक 'ऑल इंडिया रेडिओ' मुंबई केंद्रावर सादर झाले. या नाटकात सविता प्रभूणे यांनी 'गौरी' या नायिकेची भूमिका केली. नायक मेजर विश्वनाथची भूमिका अनिल क्षिरसागर यांनी केली.

३५ वर्षापूर्वीचे हे नाटक आहे, पण त्यातील वातावरण, विषय, आशय आणि प्रसंग, पात्रांचे स्वभाव हे कालबाह्य होणारे नसून नाटकातील प्रश्न वास्तव आणि चिरंजीव आहे. निसर्गतः स्त्री ही समर्पित आणि पुरुष अधिकार गाजवण्याच्या प्रवृत्तीचा, स्त्री–पुरुषांची ही जोडी रूप, गुण, वय व स्वभावाने विसंगत असूनही उभयतांमध्ये विलक्षण उत्कट प्रेम आणि या प्रेमात संशयाचे बीजवृक्ष फोफावला.

'निष्पाप' हे नाटक कोसळलेली शोकांतिका आहे. हा नियतीचा आघात नसून स्वभावदोषाचा घात आहे. नाटकाची रचना, संवाद, शैली मनाची पकड घेणारे आहेत. कलाकारांनी प्रयोगाचे सोने केले आहे. मनोवेधक प्रभावी कथानकाने प्रेक्षकांना खिळवुन ठेवले आहे. हे एक भीषण संशय नाट्य असुन संशयाच्या बीजातून थरारता संघर्ष उभा राहतो.

**अंक पहिला:**

रंगमंचावर गौरी आणि मेजर विश्वनाथ यांच्या बंगल्याचा श्रीमंती हॉल आहे. त्यांचा मित्र कक्कड हा मिलीट्रीमधून त्यांना भेटण्यासाठी आला आहे. मिलीट्री सोडून गुलाबाची शेती करणारे ४४ वर्षाचे मेजर विश्वनाथ व त्यांच्यापेक्षा २३ वर्षांनी लहान असलेल्या गौरीने त्यांच्याशी प्रेमविवाह केला होता. काळे कुरूप असलेल्या मेजरच्या प्रेमात गौरी कशी काय पडली, याचे आश्चर्य कक्कडला वाटते. ७१ सालच्या पाकिस्तान युद्धात त्यांना तीन गोळ्या लागल्या होत्या. पण जबरदस्त इच्छाशक्तीमुळे ते जिवंत राहिले होते. गौरीच्या प्रेमपत्रामुळे मृत्युचे तांडव चालू असताना गौरीचा निष्पाप चेहरा त्यांना दिसत होता. घरात नोकर, बाहेर वॉचमन आहे. त्यांना शिकारीचा शौक आहे.

मेजर विश्वनाथ हा त्याच्या कक्कड या मिलीट्रीतील मित्राबरोबर, त्याची बायको गौरीसाठी साडी घेण्यासाठी बाहेर गेला आहे. त्याचवेळी त्यांच्या घरी खंगलेल्या देहाचा भिकाऱ्याप्रमाणे दिसणारा, मळक्या, फाटक्या कपड्यातील तरुण चिंतामणी चोरासारखा प्रवेश करतो. तो मेजर विश्वनाथ यांचा पूर्वीचा स्कॉलर, जिवलग वर्गमित्र असतो पण त्याची दशा झाली आहे. कित्येक दिवस त्याला पोटभर अन्न मिळालेले नाही. स्कॉलर असूनही त्याला योग्य नोकरी मिळाली नाही, वडिलांचे कर्ज, मुलाच्या आजारपणात कर्ज काढलं, मुलगा वाचला नाही. उलट घरदार गेले. आता मला नोकरीची गरज आहे. मी पाहिजे ते काम करेल अशी तो विश्वनाथकडे विनवणी करतो. विश्वनाथला हुशार व विश्वासू माणसाची गरज असल्यामुळे ३५ एकर गुलाबाच्या बागेची देखभाल करण्यासाठी १००० रु. ची नोकरी मेजर

त्याला देतात.

गौरी घरी परत आल्यानंतर आपण डॉक्टरकडे गेलो होतो, तुम्हाला गुड न्युज देणार आहे असे म्हणत असतानाच तिचे लक्ष चिंतामणीकडे जाते आणि तिची गुड न्युज सांगायची राहून जाते. तेवढ्यात त्यांच्या घरी डणैब्य झालेला शेखर मेजर यांनी दिलेल्या जाहिरातीनुसार आलेला असतो. योगायोगाने तो गौरीचा वर्गमित्र असतो. गौरीचे वडील त्यांना शिकवायला होते. सोनेरी ठिपक्यांचा काळा गुलाब तयार करण्याचे शेखरचे स्वप्न आहे. ते स्वप्न तुम्ही आमच्या लॅबमध्ये पूर्ण करा, असे मेजर त्याला म्हणतात व त्याची नोकरी पक्की करतात. चिंतामणीला तुझी बायको घेऊन ये आणि गेस्ट हाऊसमध्ये संसार थाट असा सल्ला देतात. गौरीवर त्यांचे अतिशय प्रेम आहे. ती त्यांना आपल्याला बाळ होणार आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करते, पण ते त्यांच्या लक्षात येत नाही.

दुसऱ्या प्रवेशात मेजरने व्यवस्थित कपडे करण्यासाठी चिंतामणीला पैसे दिल्यामुळे तो रुबाबदार वेषात त्याची पत्नी सुमतीसह प्रवेश करतो. ''माकडाच्या गळ्यात तन्मणी'' असा उल्लेख विश्वनाथ व गौरीविषयी करतो. तेव्हा त्याची बायको म्हणते, ज्यांनी अन्नाला लावलं, त्यांना हबशी म्हणता, मिळालेली नोकरी टिकवा. शहाच्या येथे आग लावली, एका ठिकाणी चोरी केली, सिमेंटमध्ये राख कालवली, यामुळे शाळा कोसळून सात चिमणी पोरं मेली. त्यामुळे देवानं आपलं पोर उचललं.

विश्वनाथ आणि शेखर गल्फचं कॉन्ट्रॅक्ट मिळवून मुंबईहून परत येतात. तेव्हा मेजर विश्वनाथ चिंतामणीच्या पत्नीला सांगतात, वहिनी आपले घर समजून राहायचं. परकेपणा बाळगायचा नाही. चिंतामणी शेखरला लग्न करण्याचा सल्ला देतो. गौरी त्याच्या कॉलेजमध्ये होती. तिच्यावर शेखरच्या मित्राने कविताही केली होती. त्याचे प्रेमही होते. त्यावर विश्वनाथ म्हणतात, अखेर मीच भाग्यवान ठरलो ! प्रोफेसर बापाच्या विरोधाला न जुमानता या आई वेगळ्या पोरीने माझ्यावर प्रेम केलं, एकदा गौरीच्या वडिलांनी मेजर विश्वनाथांना कॉलेजमध्ये बोलावले होते. तेव्हा गौरीला ते आवडले. मी तिच्या वडिलांनी नकार दिला, तेव्हा तिचे प्रेमपत्र दाखवून विश्वनाथ गौरीच्या वडिलांना म्हणाले, 'पत्रिका जुळो नाहीतर नाही जुळो, पण आमची मने जुळली आहेत'. अशा गप्पाच्या ओघातच शेखर घरी जातो. पण चिंतामणी विश्वनाथला सांगतो, ''तुम्ही सरळ मनाचे म्हणून तुमच्या ध्यानात आलं नसेल, पण शेखरची नजर बाईसाहेबांवरून ढळत नव्हती.'' तुमची आणि बाईसाहेबांची भेट होण्यापूर्वी शेखरने प्रपोज केलं असेल. असे संशयाचे बिज टाकतो.

**प्रवेश १**

दुसऱ्या अंकात गौरीचे वडील जायला निघालेत, पण त्यांना एक खंत आहे. गौरीच्या वेळी बाळंतपणात तिची आई वारली होती. तशीच ग्रहमान स्थिती आताही आहे. बाळबाळंतिणीची शाश्वती नाही. त्यावेळी त्यांचा गौरीच्या लग्नाला विरोध होता. पण मेजर विश्वनाथ यांचा सत्यावर विश्वास आहे. पण श्रद्धेशिवाय माणसाला जगता येत नाही. तुमच्या घरात काव्य येणार आहे, असे गौरीचे वडील त्यांना सांगतात. पण त्याचा अर्थ त्यांना कळत नाही.

परवा त्यांच्या लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे विश्वनाथ आणि गौरी हिऱ्याची अंगठी आणण्यासाठी जव्हेरीभाईकडे जायला निघतात. पण त्याचवेळी पुण्याच्या ॲग्रीकल्चर कॉलेजचा १३ लोकांचा ग्रुप फार्महाऊस पाहण्यासाठी आला असल्याचे मेजरला गौरी सांगते, तुम्ही

तिकडे जा, मी चिंतामणीला घेऊन जव्हेरीकडे जाते. पण चिंतामणी ही जबाबदारी जाणीवपूर्वक शेखरवर सोपवतो. शेखर तशी कल्पना साहेबांना देऊ पाहतो. पण चिंतामणी त्याला सांगतो, तशी काही गरज नाही. त्यांच्या मिलिट्री शिस्तीमुळे तुम्ही तोंडघशी पडाल. डिलरला भेटा आणि बाईसाहेबांबरोबर खरेदीला जा. साहेबांना सर्व मी व्यवस्थित सांगतो. त्याच्या मनातील क्रूर विचार शेखरला समजत नाही. मेजर विश्वनाथला गौरीसारखी सात्विक, सुंदर, पतिव्रता पत्नी लाभली. पण ते सुख त्यांना मी लाभू देणार नाही, शेखर आणि गौरी गेल्यानंतर तो विश्वनाथला फोन करून सांगतो, ''बाईसाहेब शेखरबरोबर गेल्या, आणि ते दोघेही खुष होते''

**दुसऱ्या प्रवेशात —**

रात्रीची वेळ ढगांचा गडगडाट, वीज चमकते, वादळी पावसाला सुरुवात होते. विश्वनाथ विस्की घेत आहे. त्यांच्या हातात रिव्हाल्वर आहे. शेखर आणि गौरी आले नाहीत. म्हणून विश्वनाथ काळजीत आहे. त्याचे चित्त थाऱ्यावर नाही. चिंतामणी म्हणतो, ''या वादळी पावसाने सुखी संसारासारख्या फुललेल्या आपल्या बागेचे काय होणार? बाहेरच्या वादळापेक्षा मनातील वादळ भयंकर असतं, पावसाने सर्वनाश होणार, आकाशात लखलखणारी वीज किती देखणी दिसते, पण ती कोसळली की जीवघेणी भयंकर होते. टांग्याच्या घोड्याप्रमाणे झापडं लावली की, आजूबाजूचं दिसत नाही, सरळमार्गी माणसाने इतरही सरळमार्गी असतील, असे ठामपणे समजणे, म्हणजे आत्मघाताइतकाच भयंकर गुन्हा आहे.'' अशा संवादातून चिंतामणी मेजर विश्वनाथ यांच्या मनात गौरीविषयी संशय निर्माण करण्यात यशस्वी होतो. तेवढ्यात चिंब भिजून शेखर आणि गौरी प्रवेश करतात. गाडी बंद पडल्यामुळे त्यांनी वर्षाविहार केला. दोघे आनंदात आहेत. गौरीला पाहून विश्वनाथ तिला कपडे बदलायला सांगतात. शेखरही निघून जातो. परंतु चिंतामणी ''प्रत्यक्ष प्रमाणा''वर आपण विश्वास ठेवावा. (माझ्या बोलण्यावर विश्वास न ठेवता.)

गौरी शेखरसाठी चहा घेऊन येते. पण तो निघून गेलेला होता. तो स्पेशल शेखरसाठी आहे. विश्वनाथला ती दिवसभरातील शेखर आणि तिच्यातील संवाद सांगते. त्या प्रितम हॉटेलमध्ये, कॉलेजमध्ये तिच्यावर कविता करणारा चंद्रहास भेटला. त्याने तिला ओळखले. व्यसनाधीन झालेल्या चंद्रहासची तिला भीती वाटली, म्हणून तिने शेखरचा हात घट्ट पकडला, शेखरला अंगठीचे डिझाईन नाही आवडलं. त्यांनी खूप गमतीजमती सांगितल्या. शेखरने एक नाजुक मंगळसूत्र दाखवले. शेखर असे म्हणाला, तसे म्हणाला. हे ऐकून मेजर विश्वनाथ खूप चिडतात. विश्वनाथ तिला आपण सैन्यातील नोकरी का सोडली ते सांगतात. ''त्या वादळी रात्री त्याला एक गोष्ट कळली की, सैन्यातील गुप्त गोष्टी लिक होत आहेत. ते तडक रात्री दोन वाजता कर्नलसिंगकडे गेले. तेव्हा एका निष्पाप तरुणीशी त्यांच्या प्रणयलीला चालल्या होत्या. तिच्यामार्फत गुप्त बातम्या बाहेर पोहचत होत्या. फितुरी, विश्वासघात करणाऱ्या कर्नलसिंगवर गोळ्या झाडून मी शांत झालो. मला मृत्युदंड होणार, कारण तसा पुरावा माझ्याकडे नव्हता. पण ती हेर तरुणी सापडली, कर्नलसिंगची फितुरी सिद्ध झाली आणि माझी निर्दोष सुटका झाली. कायदा हातात घेतल्याबद्दल नोकरी सोडण्याचा आदेश मिळाला.'' ''हे सगळं ऐकून तुमच्याबद्दलचा आदर आणि प्रेम शतपटीने वाढले, तुमची पत्नी असण्याचा मला अभिमान वाटतो.'' असे गौरी म्हणते.

**अंक ३ रा**

**प्रवेश पहिला**

फार्म हाऊसमधील गुलाबाच्या रोपांचे पुष्कळ नुकसान झाले आहे, पण स्मशानातही नंदनवन फुलवायला मी समर्थ आहे, असे ते चिंतामणीला सुनावतात. त्यावर चिंतामणी म्हणतो, आपल्याला पुणे, डहाणूच्या नर्सरीवरून रोपे आणावी लागतील. त्यासाठी शेखरला पाठवतो. पण त्याचे दर्शन झाले नाही. बहुतेक बाईसाहेबांना माहित असेल, असे चिंतामणी विश्वनाथला सुचवतो. रागाने ते रामुला बोलावतात व गौरी कुठे आहे ? ''शेखरची चिठ्ठी आल्यामुळे बाईसाहेब त्यांच्या घरी गेल्या आहेत, हे रामू त्यांना सांगतो. यावर चिंतामणी आश्चर्य व्यक्त करतो, बाईसाहेबांना मर्यादेचे भान राहिले नाही.'' शेखरने ती चिठ्ठी साहेबांसाठी दिली होती पण ते नसल्यामुळे त्याने गौरीकडे दिली. शेखर तापाने फणफणलेत म्हणून सुमाताई बरोबर त्या गेल्यात असे तो स्पष्ट करतो. पण चिंतामणी त्याला 'प्रेमज्वर' झाला असे म्हणून आगीत तेल ओततो.

तेवढ्यात गौरी येते आणि म्हणते मी तुम्हाला फार्महाऊसवर शोधायला गेली होते. शेखरला तुम्ही भेटून या. त्यावर ''मी काय डॉक्टर आहे का? मी आता पुण्याला निघालोय. शेखरच्या काळजीने फार्मची काय दशा झालीय पाहिली नाहीस तू ?'' तू डोळेझाक कर, असे ते तुसडेपणाने बोलतात. तिला हुंदका येतो. ''पण मी तुम्हाला आनंदाची गोड बातमी सांगणार आहे. तुझ्या आनंदात नाचायला मला वेळ नाही.'' असे तिरसटपणे मेजर म्हणतात, त्यावर गौरी म्हणते, परवा परत या. तेव्हा मी माझे गुपित आपल्या लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी सांगेन, त्यांना 'गुपित' शब्दाविषयी उत्कंठा लागते. पण गौरी आता सांगायला तयार नाही. त्यामुळे ते तिला 'मर' म्हणतात.

आपल्या नवऱ्याच्या मनात संशयाचा नाग शिरला आहे, याची जाणीव गौरीला नसते. विश्वनाथचे बोलणे तिला जिव्हारी लागते. हुंदका देत ती बेडरूमकडे पळते. नाटकी, नादान, नीच, गद्दार अशा संतापाने ते शिव्या देत असताना त्यांचा मित्र कक्कड येतो.

तुझी बायको कुठे आहे. तू एकटाच. असा प्रश्न, विश्वनाथ त्याला विचारतात तेव्हा तो सांगतो. मी लग्नासाठी गेलो, तेव्हा नवरी अगोदरच गायब झाली होती, तिच्या प्रियकराबरोबर. हे फार वाईट झाले. असे विश्वनाथ म्हणतो, तेव्हा कक्कड म्हणतो, 'हे बरं झाले, शादीनंतर पळाली असती, किंवा लग्नानंतर तिने तिच्या प्रियकराबरोबर संबंध ठेवले असते तर तिला मी गोळी घातली असती.' ''मेजर विश्वनाथच्या संशयात आणि संतापात आगीत तेल पडावे, अशी भर पडते. ते तंद्रीत पुण्याला कक्कडला घेऊन जातात. रंगमंचावर सर्वत्र काळोख.

**प्रवेश दुसरा**

रात्री सुमती गौरीला जेवणाचा आग्रह करते. मी साहेबांना सांगते, बाईसाहेब स्वत: उपाशी राहतात आणि पोटच्या गोळ्यालाही उपाशी ठेवतात. तेव्हा गौरी म्हणते ''त्यांना अजून ठाऊक नाही. मी त्यांना कितीवेळा सांगण्याचा प्रयत्न केला पण त्यांना उमजतच नाही'', पण परवा लग्नाच्या वाढदिवशी ही बातमी सांगून त्यांना आश्चर्यचकित करणार आहे. गौरी चिंतामणीला विचारते, साहेबांची मन:स्थिती अशी विचित्र का झाली आहे अलीकडे? पावसानं फार्मची बरबादी झाल्यामुळे त्यांचे डोके ठिकाणावर नसावं. असे तो उत्तर देतो.

तिकडे शेखरची तब्येत ठीक नाही. दुपारचा जेवणाचा डबा तसाच पडून आहे, तुम्ही

जरा त्याच्याकडे जाऊन या, असे तो कुटीलपणे गौरीला सुचवतो. गौरीही निष्पापपणे शेखरकडे जाते. त्यावेळी पुण्याहून विश्वनाथचा फोन येतो. तो चिंतामणी घेतो आणि गौरी घरात नसून तुम्ही गेल्यापासून त्या तिकडेच आहेत, तुम्ही लवकर या, लक्षणं ठिक दिसत नाही. डोकं शांत ठेवा. फोनवर सगळं सांगता येत नाही. सुमती फोनवरील संवाद ऐकते. चिंतामणीला सुनावते, 'साहेबांच्या सुखी संसाराशी भयंकर खेळ करू नका, तुमचा नीच स्वभाव मला माहित आहे. माझ्या बहिणीचे लग्न मोडले. तिने आत्महत्या केली.' त्यांचे भांडण चालू असताना गौरी आणि शेखर येतात. गौरी त्याला काहीतरी खाण्याविषयी विनवणी करते. पण आपल्याला काही खावसं वाटत नाही.

गौरी शेखरला सांगते, विश्वनाथ हा माझ्या आयुष्यातील पहिला आणि अखेरचा पुरुष. माझी त्यांच्यावर परमेश्वरापलीकडे निष्ठा आहे. ते माझे आदर्श पुरुष आहेत. मी विश्वनाथच्या बाळाची आई होणार आहे. असे म्हणून गौरी शेखरसाठी दूध आणायला जाते. तेव्हा फोनची रिंग वाजते. शेखर फोन घेतो. फोन कट होतो. पुन्हा फोन वाजतो. पण पलीकडून कोणी बोलत नाही. पुन्हा फोन वाजतो. गौरी फोन घेते, पण कोणी बोलत नाही. त्यानंतर शेखर त्याच्या घरी निघून जातो.

**प्रवेश तिसरा**

वेळ रात्री दोनची. विश्वनाथ वेगाने गाडीचे ब्रेक लावतो. घराची बेल वाजवतो. धाडकन दरवाजा उघडल्याचा आवाज येतो. विश्वनाथ चवताळलेल्या वाघाप्रमाणे प्रवेश करतो. संशयाने लाईट लावून इकडे तिकडे पाहतो. रामूला शेखर कुठे आहे? असे रागाने विचारतो. तेवढ्यात चिंतामणी येऊन सांगतो, तुम्हाला यायला थोडा उशीर झाला. शेखरला जाऊन दहा मिनिटेपण झाली नाहीत. अन्यथा मी प्रत्यक्ष प्रमाण दिलं असतं. गौरी आता तृप्त झोपली असेल किंवा झोपेचे सोंग घेतले असेल. तुम्ही संताप आवरा. असलं भयंकर पाप करताना ''कामातुराणाम् न भयं ना लज्जा.'' तुमच्या निष्ठेची सहस्त्र शकलं पायाखाली तुडविली. हे प्रेमप्रकरण कॉलेजमध्ये आसल्यापासून चालू आहे. बाईसाहेबांना शेखरपासून दिवस गेले आहेत. विश्वनाथ भयंकर अस्वस्थ होतो. दु:खी होतो. खचून जातो.

गौरी हे काय केलस. तुला निष्पाप समजलो. पण तू मला फसवलं. माझा विश्वासघात केलास. प्रेम या शब्दावरचा माझा विश्वास उडाला. तुझ्याबद्दलचं सारं प्रेम मी भिरकाऊन दिलं. तेवढ्यात शेखर येतो. साहेब तुम्ही मला बोलवले ? म्हणून विचारतो. तेव्हा मेजर त्याला म्हणतात, या क्षणापासून तुझी नोकरी संपली. त्यांचा आवाज ऐकून गौरी येते आणि विचारते, असं काय झालं की शेखरला नोकरीवरून काढत आहात? ''तुम्ही अनर्थ करत आहात. असे पाप करू नका'' पण विश्वनाथ खाडकन तिच्या श्रीमुखात देतो. हे इतके का संतापले? हे तिला कळत नाही. सोनेरी ठिपक्यांच्या काळ्या गुलाबाला कळी आली, ही गोष्ट त्यांच्यापासून लपवून ठेवली म्हणून ते चिडले असावेत. असे शेखर गौरीला सांगतो. आपल्या हातून असं घडायला नको होतं. कोसळलेल्या गौरीला सोयावर बसवून तो निघून जातो.

विश्वनाथ गौरीला म्हणतात, तू माझ्या प्रेमाची थट्टा केलीस. मी तुला ठार मारणार. तुम्ही असे विचित्र काय बोलतायं. मी तुमच्या बाळाची आई होणार आहे. तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. अशी गौरी विनवणी करते, पण मी तुझ्या निष्पापणाच्या नाटकाला

आजवर फसलो. मारण्यापूर्वी मी तुला तुझे पाप सांगतो, 'तू माझ्याशी गद्दारी करून शेखरची शय्या सजवली. ''तुमच्या अनैतिक संबंधातून तुला शेखरपासून दिवस गेले.'' नाही हे सर्व खोटं आहे. गौरी जिवाच्या आकांताने विश्वनाथला सांगू पाहते. पण संतप्त विश्वनाथला एकही शब्द ऐकू येत नाही. तो पिस्तुल ठेऊन तिचा गळा दाबतो. मरता—मरता गौरी म्हणते, ''तुमची गौरी व्यभिचारी नव्हती हो.'' आणि गतप्राण होते. गौरीची किंकाळी ऐकून सुमती व शेखर येतात. नादान माणसा, भयंकर पाप केलं. तुमच्या पत्नीच्या पतिव्रत्याची ग्वाही एका तिऱ्हाईत माणसाला द्यावी लागते, तुमच्या शुद्ध बुद्धीला विनाशाचे ग्रहण कसं आणि का लागलं? तिचे आणि माझे संबंध शुद्ध मैत्रीचे होते. चिंतामणी हा माझा नालायक नवरा आहे. त्याने अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले. असे संतापाने सुमती विश्वनाथला म्हणते. विश्वनाथला पश्चाताप होतो. शेखर विश्वनाथला म्हणाला, ''तुम्ही पतिव्रता गौरीच्या चारिष्यावर संशय घेतलात. तुमच्या मुलाची जन्मापूर्वीच हत्या केली. तुमच्या मुलाच्या निष्पाप आईचा वध केलात. प्रत्येक क्षणाला शंभर मरण मरत तुम्ही असेच जिवंत राहा.'' विश्वनाथ गौरीच्या प्रेतापुढे गुडघे टेकतो. आपण गुरफटत गेलो संशयाच्या जाळ्यात. मला क्षमा कर गौरी. आणि शांतपणे रिव्हाल्वरने मस्तकात गोळी झाडून घेतात. पडदा पडतो.

**सारांश:**

प्रा. दिलीप परदेशी लिखित आणि सदाशिव अमरापुरकर दिग्दर्शित 'निष्पाप' हे नाटक मनाला चटका लावून जाते. या नाटकाचा विषय, आशय, प्रसंग आणि पात्र कालबाह्य होणारे नाही. ते चिरंजीव आणि वास्तव आहे. पती—पत्नीमध्ये उत्कट प्रेम असूनही गैरसमज करून देणारी माणसे जवळपास असतील आणि पत्नीच्या चारिष्यावर विश्वास नसेल तर पती कोणत्याही थराला जाऊ शकतो. आपला आपल्या प्रेमावर विश्वास नसेल तर माणसे हिंस्र होतात. हे नाटक कोसळलेली शोकांतिका आहे. संशयाचे बीज रुजत जाते. त्याचा विषवृक्ष इतका फोफावतो की सर्व उद्ध्वस्त होते. असे व्हायला नको होते अशी हळहळ सतत वाटत असते. हा स्वभाव दोषाचा घात आहे. दुसऱ्यांचे सुख न रूचवणाऱ्या नोकरांवर किती विश्वास ठेवायचा? लग्नानंतर मैत्रीला किती स्थान द्यावं? असे प्रश्न उपस्थित होतात.

**संदर्भग्रंथ :—**

निष्पाप (नाटक) प्रा. दिलीप परदेशी — मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८४

◆◆◆

# श्री.तोताराम महाराज यांचे काव्य

**प्रा.मंगला सखाराम चौधरी**
सिनियर आटर्स महिला महाविद्यालय, शहादा जि.नंदुरबार

महाराष्ट्र ही संताची आणि त्याचबरोबर वीरांची भूमी आहे वैराग्याची आणि वीरत्वाची परंपरा येथे एकत्र नांदले आहे. मध्ययुगीन काळात मराठीमध्ये जे साहित्य निर्माण झाले ते बहुअंशी धर्मपंथाच्या प्रेरणेतून आपल्या धर्मपंथाची विचारसरणी समाजाला पटवून देणे ही त्या काळातील संताची मुलभूत बैठक होती. संत परंपरेने निर्माण केलेले साहित्य हा मराठी साहित्याचा मौलिक ठेवा आहे. आजही महाराष्ट्राच्या खेड्याखेड्यातून नगरानगरातून संतवाणीचा प्रवाह सतत गतिमान झालेला दिसतो तो अभंगाच्या रूपाने ओवीच्या रूपाने किंवा भारुडाच्या रूपाने हे भक्तीसाहित्य ज्या माध्यमातून अभिव्यक्त झाले ते लोक्भाषेचे होते. धर्मप्रभोधनाचे कार्य गीर्वाणवाणीतून चालले होते ते लोकवाणी तून व्हावे म्हणून ज्ञानेश्वर चक्रधरांनी परिश्रम घेतले. संत परंपरेचे साहित्य आत्मोद्धार आणि लोकोद्धाराच्या तळमळीतून निर्माण झाले संताची दृष्टी पारमार्थिक असली तरी बहुजन समाजाच्या दुखाचा त्यांनी सहानुभूतीने विचार केला होता समाजाचा सर्व स्तरापर्यंत विचार पोहचावेत ही त्यांची कळकळ होती. संस्कृत भाषेचे वर्चस्व झुगारून लोकभाषेचा केलेला पुरस्कार आणि दिनदुबल्याविषयी करून हे तत्कालीन संप्रदायाचे विशेष आजही सामाजिक जीवनात उपयुक्त आहेत. संतानी आपल्या भक्तिमार्गाने सामान्यातील सामान्यांना व स्त्री शूद्रादिकांना जीवन जगण्याची दिशा दिली.

त्यातीलच गुर्जर समाजातील जळगाव जिल्ह्यातील संत श्री गोविंद महाराज हे होते, त्यांचे पुत्र व शिष्य श्री सद्गुरू तोताराम महाराज होय. सद्गुरू तोताराम महाराज यांनी आपले पिता व गुरु श्री गोविंद महाराज यांच्या जीवनावर आधारीत 'श्री गोविंद चरित्र' पासष्ट अध्यायाचा ९००० ओव्यांचा चरित्र ग्रंथ लिहला. एका पुत्राने पित्याचे लिहलेले असे चरित्र मराठी साहित्यातील पहिलेच चरित्र म्हणून मान्यता पावले असते परंतु आजतागायत हा चरित्रग्रंथ अप्रकाशित म्हणजे हस्तलिखित स्वरुपात आहे. श्री गोविंद महाराज जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात असलेल्या उत्राण या गावी श्री झेंडूल पाटील व काशीबाई यांच्या पोटी जन्माला आले त्यांना लहानपणापासूनच 'वेडा' म्हणून संबोधले जाई. त्यांना संत तुकारामांचे अवतार म्हणूनही म्हटले जाते.

नामा, तुका वेडा | नाहीतरे भिन्न |
जना लागी दिसती दोन |

अशा श्री गोविंद महाराज व लक्ष्मी आई यांचा पोटी सद्गुरू श्री तोताराम महाराजांचा जल्म श.१७३५ मध्ये झाला अशा मातृपितृ भक्तीत लीन झालेल्या श्री तोतारामानी पित्यालाच गुरु

मानले व श्री गोविंद चरित्र 'हा ग्रंथ लिहून वारसदार वआणि शिष्य या नात्याने ३७ वर्ष भजन कीर्तन करून गाडी चालविली अभंग रचना केली.

संत तोताराम महाराज यांचे अभंग वाचताना संत श्री तुकाराम महाराज यांचे अभंग वाचल्याची अनुभूती येते ओवी व अभंग युक्त असलेला श्री गोविंद चरित्र ग्रंथात विविध विषयावर लेखन ओघाने आले त्यात संत महात्म्य पंढरी महात्म्य नाम महात्म्य तत्वज्ञानपर उपदेशपर इ ओवी अभंगाचा रूपाने आले आहे अहिराणी हिंदी आणि तुरळक गुजर भाषेतील गरबा हे लोकगीत पदे गौळणी रूपकात्मक अभंग इ चे लेखन त्यांनी केले आहे.

महाराष्ट्रातल्या सर्व संतांचे मुख्य दैवत श्री विठ्ठल याची आराधना मुखी नाम गळ्यात माळ हि वारकरी संप्रदायाची परंपरा पिता व गुरु यांच्या कडून तोतारामांकडे आलेली होतीच कर्म मार्ग ज्ञानमार्ग योगमार्ग भक्ती मार्ग यातील भक्ती मार्गाचा अवलंब करून अभंग् निर्मातीतून ते मानवी जीवनात नैतिक मूल्य द्रिष्टी रुजविण्याचा प्रयत्न करतात नाम भक्तीचा सोपा मार्ग जनतेला दाखविला नामदेवांनी सुद्धा नाम हेची कर्म नाम हेची ब्रम्ह असे म्हटले आहे .

''विठ्ठल नाम अक्षरे तीन|तीही लोकी वंद्य जाण |
ऐसे नाम फुकाचे |कहो तुम्ही घ्या न वाचे |
धारा याची प्रेमे गोडी |वरकड सांगा परवडी |
वरदाती गोविंदाचा |सुत यासी गायी वाचा ||"

विठ्ठल नाम तीन अक्षरी आहे त्याचे नाम घेताना काही सायास लागत नाही असे फुकाचे नाम तुम्ही घ्या पंढरपूरचे दैवत श्री विठ्ठल सर्व संतांचे सुखाचे आगर आहे

काळ वेळ न लगे आठविता |जैसी करिसी संसार चिंता |
तैसी नामे धरी आस्था |विकल्प चित्त ठेऊ नको ||

श्री विठ्ठलाचे नाम घ्यायला काही काळवेळ लागत नाही संसाराची चिंता जशी मनात कायम राहते तसे नामस्मरण कायम मनात राहू द्यावे

भक्ती वीण जळो ज्ञान | ज्ञानाने जळो अभिमान |
जळे तेथे वैराग्य जाण |भक्ती हे कारण सर्थाकासी ||
भक्तिमार्ग बहुत चांगला | भक्ती करिता वाया गेला |
ऐसा पुराणी नाही ऐकला | परी अभाविकला संदेह नाही ||

असा भक्तीचा महिमा श्रीतोताराम महाराज वर्णन करतात भक्ती शिवायचे ज्ञान काहीच कामाचे नाही ज्ञानाने अभिमान जळतो परमार्थाचा मार्गावर भक्तीनेच पुढे जाता येते .वेद शास्त्र पुराणांचा दाखला देऊन श्री तोताराम महाराज समजा प्रबोधन करतात कीभाती वाचू काही मार्ग नाही या भारत खंडात श्री हरीचे नाव घेणे नरदेहासी आल्यावर सगळ्यात सोपे आहे म्हणून पांडुरंगाची भक्ती करा आणि भवसागर तरुण जावे

येथे न लगे शुद्ध यातीचे |येथे पाहिजे प्रेम शुद्ध भावाचे | 3
येथे निव ही होती सकळांचे |निर्मल वाचे राम कृष्ण |

जातीभेदावर बोलताना श्री तोताराम महाराज म्हणतात नाम भक्ती साठी जातीचा उच्च नीच नाही तर शुद्ध भावनेचा पाहिजे म्हणजे श्री विठ्ठलाला सर्व तळागाळातील कोणत्याही जातीतील मनुष्याला नाममार्ग सोपा आहे

वरी असावे क्रूर | परी कोमल असावे अन्तर |
एक दाचे गेले समग्र | तरी धैर्य साडू नये ||
एकदाच संपत्ती वाढली |गर्वस न चढावे खाली | कैसी जरी वेळ पडली |
तरी विठ्ठलासी न सोडी ||

उपदेश करताना तोताराम महाराज म्हणतात वरून कठोर असावे परंतु अंतरी कमाल प्रमाल असावे सर्व काही गेले तरी धैर्य सोडू नये समपट्टी आल्यावर गर्व होऊ देऊ नये आणि वेळ कशीही आली तरी विठ्ठलाशी असलेला भाव सोडू नये एखाद्या माउली प्रमाणे तोताराम महाराज आपल्या भक्तांना समाजाला उपदेश करताना दिसतात यातून त्यांची सामाजिक तळमळ दिसते समाजातील मानसील प्रवृत्तींना लगाम गळण्याचे काम अभंगातून केले आहे आणि शेवटी वेळ कशीही आली तरी विठ्ठलाला विसरू नये असा बोध केला आहे

सर्व सुखाचे आगर विठ्ठल | नाम गोड स्मरणे भय हाटेल |
नामरूपी सत्य लक्ष लागेल | गोविंदाची झाले विठ्ठल पै |
ऐसा आवडी जीवी जीवा | कै बा पुरविसी वासुदेवा ||
माझ्या गोविंदाच्या प्रेम भावा | येथे जडावा चित्त वृत्ती माझी ||

विठ्ठलाचे नामस्मरण करताना श्री तोताराम महाराज सद्गातिक होतात सर्व सुखाचे आगर हे सावळे परब्रम्ह पंदारीचे दैवत त्याचे गोड नाम घेतल्याने भय दूर पळेल .नामरूपी सत्य गोष्ट आहे आणि श्री गोविंद स्वयं विठ्ठल झाला आहे .अशा जीवी ला आवडणाऱ्या जिवी चा जिवलग वासुदेवा केव्हा पुरवील माझी इच्छा कारण माझी इच्छा एकाच गोविंदाच्या प्रेमात त्याच्या पायाशी माझी चित्त वृत्ती राहो असे श्री गोविंद चरित्रात श्री तोताराम महाराज म्हणतात आपल्या भक्तांना श्रद्धाळूना नाम मार्ग भक्ती मार्ग दाखवतात .

नाम मार्ग भक्ती मार्ग दाखविताना पंढरीच्या पांडुरंगाचे सुंदर वर्णन अभंगातून श्री तोताराम महाराज करतात

विठ्ठल उभा विटेवरी | अतिसौम्या हि मूर्ती गोजिरी |
दृष्टी हे नासाग्री | अति सुकुमार सुखकर |१ ||
मस्तकी मुकुट जडावाचा | कारणी कुंडल किरीताचा |
बारावा टीला केशराचा |वारी बुक्का उधळीला||2||
गळा माल नवरत्नानाची |घालू नाविधा भक्तीची |
वारी पांघुरला भरगच्ची |सेला सुंदर झळकतो ||3||

विटेवर उभ्या असलेल्या श्री विठ्ठल मूर्तीचे अतन्त्य मनोहारी असे वर्णन श्री तोताराम महाराजांनी केले आहे डोक्यापासून तर पायापर्यंत नख शिखांत वर्णन सावल्या पर ब्रम्हाचे

वर्णन केले आहे आणि त्या वर्णनाची मूर्ती माझ्या नेत्रात साठवली जावो अशी प्रार्थना ते करतात अभंगाचे वर्णन ऐकताच वाचकाचा सुद्धा डोळ्यासमोर मूर्ती उभी राहावी असे साक्षात वर्णन अभंग द्वारे केलेले आहे वारकरी संप्रदायाची लोकप्रियता आजही टिकून आहे. कर्मकांड टाळून तो बहुजन समाजापर्यंत पोहचून वैश्विक एकात्मतेचा दृष्टीनेही फार महत्वाचा ठरेल. अठरा पगड जातीतील संतांना अध्यात्मिक समता प्राप्त झाली मुक्या मनाला पाझर फुटेल, भक्तीच्या माध्यमातून अभंग निर्मिती झाली. वारकरी संप्रदायात एकादशी व्रताला खूप महत्व आहे. पंढरीचा वास चंद्रभागेत स्नान, आणिक दर्शन विठोबाचे या बरोबर मुखी नाम, हाती टाळ, आणि एकादशीचा उपवास, आषाढी कार्तिकीला पायी जाणारे आज हि कमी नाही वारी करणारा तो वारकरी,

अहो एकादशी आली | आम्ही दुबळ्यांची माउली ||१||
करू भजन जागरण | विठ्ठल नामाचा गजर ||२||
व्रत नाही ऐसे दुजे | सांगितले केशवराजे ||३||

आजही महाराजांचे मंदिर उत्राण,पाळधी,पिंपळगाव,जामनेर,प्रकाशा येथे प्रत्येक एकादशीला भजन,कीर्तन,जागरण,खिरापत,प्रसाद हा सोहळा नित्यनेमाने सुरु आहे आणि विशेष म्हणजे तरुण पिढी यात सहभागी होते. धार्मिक,सांस्कृतिक परंपरा एका पिढीपासून दुसरया पिढीपर्यंत अव्याहतपणे चालत आहे.सर्व संतांप्रमाणे रूपकात्मक अभंगातूनही समाज मनापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. उदा: विटीदांडू, जोशी.

विटीदांडू खेळी गाड्या | सांडी मिथ्या भुली |
राम्कृष्णाहरी | सर्वकाळ हेची बोलो ||१||
प्राक्तन तुझे विटी गड्या | कर्म तुझे दांडू |
घडी घडी मारी टोल | खेळ तुझा गांडू ||२||

खेळाच्या रूपकातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचा हा प्रयत्न रुपकात्मक अभंगातून दिसून येतो आहे. खेळ खेळताना मिथ्या सोडून खेळ खेळा. घडी घडी टोल मारल्याने तुझा खेळ बिघडला आहे. परत तोच खेळ खेळताना त्रास होतो म्हणून एकाच टोल्यात खेळ संपवू म्हणजे नरदेह मिळाला आहे तर जन्माचे सार्थक करून घे.

भक्ती, नादमाधुर्यता, लयबद्धता,या सर्वांचा श्री तोताराम महाराजांच्या अभंगांतून आपल्याला जाणवतात. सुलभ,सोपी सर्वांना समजणारी सहजता असलेली भाषाशैली हे त्यांच्या अभंगांचे वैशिष्ट्यच म्हणता येयील. बहुजन समाजाला जवळची वाटणारी, आपलीशी वाटणारी नादमाधुर्यता,रूपकात्म अभंग अहिराणी,हिंदी भाषेतील अब्गंग यावरून श्री महाराजांनी प्रवास केला असावा. कारण, साधू रमता भला या उक्ती नुसार वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन समाजाला कीर्तनाद्वारे समाज प्रभोधन करणे हे संतांनी आपले कर्तव्य समजले आहे.

एका बहुजन समाजातील संतांचे साहित्य एव्हडे तोलामोलाचे आहे की त्याने संत साहित्यात मोलाची भर घातली असती, परंतु अप्रकाशित असल्याने अभ्यासाकांपर्यंत पोहचले

नाही. आणि संत साहित्याचा हा अमोल ठेवा सर्वापर्यंत पोहचवावा हाच शोधनिबंध लिहिण्यामागचा हेतू होय .एव्हडीच आंतरिक तळमळ आहे

निष्कर्ष:

१) मराठी संत साहित्यात एका पुत्राने पित्याचे लिहिलेले हे पहिलेच चरित्र आहे

2) मराठी संत साहित्यातील चरित्र ग्रंथात संत श्री तोताराम महाराज यांचे योगदान लक्षणीय आहे.

3) संत श्री तोताराम महाराज यांचे वां:गमय अप्रकाशित आणि हस्तलिखित स्वरुपात असून वां:गमय गुणांनी समृद्ध आहे.

4) श्री संत तोताराम महाराज यांनी लिहिलेल्या चरित्र ग्रंथात पांडुरंग प्रीती,गुरुभक्ती प्रकट झाली आहे.

५) संत श्री तोताराम महाराज यांनी लिहिलेल्या चरित्र ग्रंथात तत्कालीन जीवनशैलीचे प्रतिबिंब दिसून येते.

6) श्री तोताराम महाराजांच्या वां:गमयात हरिभक्ती,परमार्थ व कलात्मकता यांचा संगम दिसू येतो.

संदर्भग्रंथ

१) ह.भ.प. रामकृष्ण महाराज, संपा, श्री तोताराम महाराज कृत अभंग, अभंग क्र. ४७ पृ.क्र. १४०

2) श्री तोताराम महाराज कृत, हस्तलिखित श्री गोविंद चरित्र, अध्याय १६ ओवी 4, पृ.क्र. १४०

3) तत्रैव. अध्याय २८, ओवी क्र.११६ पृ.क्र.२२८

4) तत्रैव. अध्याय ३५, ओवी क्र.८८,८९ पृ.क्र.२७३

५) तत्रैव. अध्याय ५१, ओवी १८,३१ पृ.क्र. ३८५,३८६

6) ह.भ.प. रामकृष्ण महाराज, संपा, श्री तोताराम महाराज कृत अभंग. अभंग क्रमांक १ पृ क्र. १

7) तत्रैव अभंग ८ वा पृ. ४ थे

८) तत्रैव अभंग १२० पृ.क्र. ४२ वे.

◆◆◆

# शंकर पाटील यांच्या कथेतील ग्रामीण कष्टकरी स्त्री

**डॉ.मानसी दशरथ जगदाळे**
मराठी विभाग प्रमुख
आदर्श कॉलेज, विटा

**प्रस्तावना:**

ग्रामीण ही संकल्पना समजून घेताना आपणास ग्रामीण संस्कृती लक्षात घ्यावी लागेल. शेती हा ग्रामीण संस्कृतीचा मुख्य गाभा आहे.शेतीवर त्यांची जीवनपद्धती आणि आर्थिक प्रगती अवलंबून असते.शेतीमध्ये एकमेकांना एकमेकांची मदत लागते.शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण माणसाला निसर्गाला देव मानण्याशिवाय पर्याय नसतो.ग्रामीण माणसांची जीवनपद्धती आणि वेशभूषा ही कृषीसंस्कृतीशी नाते सांगणारे असते.ग्रामीण संवेदनशीलता ही नागरसंवेदनशीलतेपेक्षा भिन्न असते. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे साहित्य मराठी परंपरेत प्राचीन आणि मध्ययुगीन काळापासून चालत आलेले आहे.म.फुले यांच्या 'शेतकर्यांचा असूड'व 'तृतीय रत्न' या लेखनातून आणि ह.न.आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेतून ग्रामीण भागाचे चित्रण केले आहे.संपूर्ण गावगाडा,शेती आणि निसर्ग यांच्यातील संबंध चित्रित करून शोषणाला नकार देवून शोषणविरहीत समाज रचनेचे उद्दिष्ट ठेवणे हीच ग्रामीण साहित्याची मुख्य प्रेरणा म्हणता येईल.

**ग्रामीण कथा: प्रेरणा व वाटचाल:-**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या रुपाने ग्रामीण साहित्याची सुरुवात झाली.१९२० मध्ये गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असा मूलमंत्र दिल्यामुळे ग्रामीण साहित्याने पुन्हा जोर धरला . यामध्ये श्री. म. माटे, र. वा. दिघे,ग. ल. ठोकळ यांच्या ग्रामीण साहित्याने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण साहित्यिकांनी कथेचे स्वरूप बदलून टाकले. या पिढीतील साहित्यिकांनी १९६०-६५ पर्यंत कथालेखन दमदारपणेकेले. त्याचबरोबर विनोदी कथाकथनाचे अनेक कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर सादर केले.१९७५ च्या आसपास ग्रामीण कथा म्हणजे विनोदी स्वरूपाची अशी धारणा झालेली असली तरी, वामन चोरघडे यांच्या कथेतून उपेक्षितांच्या बद्दलची सहानुभूती दिसते. त्यांनी आपल्या कथेतून मानवी जीवनाचे चिंतन, विषयांचे वैचित्र्य, मानवी स्वभाव, सामाजिक जाणीव इ. विषयांचे चित्रण केले आहे. बी. रघुनाथ यांनी आपल्या कथेतून मराठवाड्यातील प्रादेशिकतेचे चित्रण केले आहे. ग.दि. माडगूळकरांनी आपल्या कथेतून माणदेश प्रदेश चित्रित केला आहे. त्यांच्या कथेत काव्यात्मता आणि ग्रामीण जीवनातील नाट्यरंग यांचे दर्शन घडते. तर द. मा. मिरासदारांनी आपल्या विनोदी लेखन वैशिष्ट्यांनी ग्रामीण कथा समृद्ध केली आहे . अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य म्हणजे साक्षात डोळ्याने पाहिले, तेच शब्दबद्ध केले. अशा धाटणीचे आहे. तर आनंद यादवाने आपल्या ग्रामीण कथेतून सुजाण सखोलता आणि कलात्मकता दिली आहे. रा. रं. बोराडे यांनी मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त परिसर चित्रित केलाआहे. प्रा. चंद्रकुमार नलगे म्हणतात "खेड्यातील स्त्रीयांची होणारी कुचंबणा, ओढाताण,मुस्कटदाबी, सोशिकता आणि दुःखाचं रिंगणच रिंगण यांचे चित्रण बोराडे यांनी मोठ्या आत्मीयतेने चित्रित केले आहे."[१] खेड्यातील कुटुंबव्यवस्था, नातेसंबंध, निसर्ग, रूढी-परंपरा यांचेही चित्रण बोराडे यांनी केले आहे. चंद्रकुमार नलगे यांच्या ग्रामीण कथेतून खेड्यातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलांचे अत्यंत वेधक चित्रण येते. त्यांच्या कथेतून विशेषत: काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रियांची दुःखे येतात. उपेक्षित दरिद्री, श्रमिक, दुर्दैवी, स्त्री जीवनासंबंधी करुणा त्यांच्याकथेमधून दिसते. रंगराव बापू पाटील यांच्या कथासंग्रहातून ग्रामीण कष्टकरी स्त्री जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे सखा कलाल यांच्या कथासंग्रहातून खेड्यातील स्त्रीयांच्या स्वभावातून व परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या दुःखाचे चित्रण केले आहे. तर

द. ता. भोसले यांच्या कथेतून स्त्रीयांच्या वाट्याला आलेले भोग,गावातील राजकारण इत्यादींचे चित्रण येते. भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील ग्रामीण स्त्रीदारिद्र्याचे चटके सोसत काबाडकष्ट उपसताना दिसते .

**शंकर पाटील यांच्या कथेतील ग्रामीण कष्टकरी स्त्री**

१९६० नंतर स्त्रीदर्शनाच्या दृष्टीने ग्रामीण साहित्यात झालेल्या बदलाचे श्रेय शंकर पाटील यांना द्यावे लागेल.डॉ. आनंद यादव म्हणतात 'ऊन' या कथासंग्रहातील ग्रामीण स्त्रीमनाचे अनेक पापुद्रे उकलून दाखवण्यात पाटील यशस्वी झाले आहेत. स्त्रीमनाला पुरुषमन समजून घेऊच शकत नाही,स्त्रीशिवाय पुरुष कसा पोरका होऊन जीवनातील उत्साह गमावून बसतो, आई नसेल तर पुरुषाला म्हणजे बापाला मुले सांभाळणे आणि त्यांचे नीट पालन पोषण करणे कसे अशक्य असते, घरातील स्त्रीचे केवळ अस्तित्वच पुरुषाला आणि संबंधित कुटुंबाला किती मोठा मानसिक आधार देते . लग्न होऊन सासरी गेलेली स्त्री कशी दोन्हीही घरांना मानसिक दृष्ट्या गमावून बसते. स्त्रीही फक्त श्रमाची धनीणच कशी शेवटी ठरते, याचे अत्यंत मर्मस्पर्शी, मानसशास्त्रीय, कौटुंबिक स्त्री-दर्शन शंकर पाटील यांनी आपल्या कथांतून घडविले आहे.

शंकर पाटील यांच्या 'वळीव','आभाळ','घालमेल','ऊन' इ. ग्रामीण कथासंग्रहातून ग्रामीण कष्टकरी स्त्रीची व्यथा मोठ्या ताकतीने मांडली आहे. शंकर पाटलांची कथा ही मराठी कथेचे एक लेणे आहे. त्यांचे लेखन विलक्षण पारदर्शक आहे. त्यांच्या कथेमध्ये सामाजिक जाणीव आहे. कथेमध्ये ग्रामीण स्त्रीयांच्या कष्टाचे चित्रण येते. खेडेगावातील स्त्रिया त्यांच्यातील परस्परसंबंध हे त्यांच्या कथांचे विषय आहेत ग्रामीण स्त्री, तिची भाषा, तिचे कष्ट यांचा विचार शंकर पाटलांच्या कथेत येतो. त्यांच्या'घालमेल' कथासंग्रहातील 'सारवण' या कथेतील हिराचे कष्ट किती क्लेशदायक आहेत हे पुढील दृश्यातून दिसते. दसऱ्याचे सारवण काढायचे असते. परंतु गरोदर असलेल्या हिराचीतब्येत ठीक नव्हती. तिला मळमळतय,एकाकी खुबा दुखायला लागलेला. पण, नवऱ्याला तिचे दुःख कळत नाही, उलट तो तिची चेष्टाच करतो. काम करावे लागते म्हणून ती नाटक करते असेच तिच्या नवऱ्याला वाटते तो म्हणतो-

" तुझं चिन्न मी वळीकलंयग ! वळकूनचहाय बग सगळं ! "

रागच आला, फटक्यान मान फिरवून तिनं विचारलं,

" काय वळीकलायसा? "

" सकाळधरनं तू काय काय सोंग काढलंयस आनि कशापायी असं कराय लागलीयास ते मला वळकतन्हाई? सारं पाक मला ठाऊक हाय बग !"

" काय ठावुक हाय? काय सोंग काडलंय"?

"हेयच की ! आता धाला उठलीस ! उठल्याबरोबर तुझा खुबा धरला. लोटाय ईना झालं. आनि बसून च्या केलीस, तर त्यो नरड्यातनं खाली उतरेना झालाय...."

डोळ्यात पाणी आलं. भडभडून येऊ लागलं. गळा भरून आल्यागत झाला आणि डोळयाला पदर लावून ती बोलली,

" मळमळायला लागलंय तर मी काय करू?"

तो तावानं बोलू लागला, "अगं,तुला आज मळमळायचंच ग ! आज तुझा खूबा धरायचाच ! तुझ्या हातानं आज काय व्हायचं न्हाई बग ! का..? तर आज दसऱ्याचं सारवान काडलंय ! तुझ्या मनात न्हाई तर तू का करशील बाई?"२

अशा पद्धतीने नवऱ्याला हिराचे दुःख समजत नाही. त्याला फक्त तिने काम केले पाहिजे, असेच वाटते. बरं उभं घर सारवायचे म्हणजे काय एक काम असते. घरभर सारा पसारा पसरलेला, एकट्या बाईनं कसा आवरायचा ? पण, तिला काम केल्याशिवाय पर्याय नव्हता. तिचे पाय भेंडाळून गेले." पण आपले दुःख कुणाला

सांगायचे नाही. आपले आपण सोसायचं, आतल्या आत गिळायचं आणि होतंयतवर करायचं. खुटलं की गप बसायचं."३ असा तिने मनाशी निश्चय करून ती सारवून घेते. शंकर पाटलांची 'घालमेल' ही कथा ग्रामीण स्त्रीच्या कष्टाची,श्रमाची जाणीव करून देते. या कथेतील हिरा ही ग्रामीण स्त्रीचे प्रतिनिधित्व करताना दिसते. अनेक ग्रामीण स्त्रियांना हिरासारखे श्रम करावे लागते.हिराने दिवसभर सारं घर आतनं आणि बाहेरनंसारवून घेतलं. सगळा पसारा आवरला. दिवसभराच्या कामाने तिचा जीव मेटाकुटीला आलेला असतो, पण दिवस वाया गेला नाही,सत्कारणी लागल्यामुळे नवऱ्याला आनंद होतो. तो हिराला म्हणतो-" बग बगू आता कसं घर दिसतंय ! कशी सोबा आली !" तो जवळ येऊन म्हणतो " दमनुक झाली असंल ग जीवाची तुझ्या. अंग सारं ताटकळलंअसंल... पाय तरी देऊ का जरा? जरा तुडीवलं म्हंजे सलाम पडंल."" व्हय हो. अंग सारं मोडून आलंय, जरा पाय देऊन तुडीवतासा?""तुडवीतोस तर तुडीब बाबा!... जीवच नकोसा झाला. काय करायचं जगून?" ४ हिराच्या वेदना लेखकाने नेमक्या शब्दात चित्रित केल्या आहेत.जमिनीला आई मानणाऱ्या, बैलाला देव समजून त्याची पूजा करणाऱ्या,मातीत राब-राबून हाडाची काडे करणाऱ्याशेतकरी स्त्रियांच्या कष्टाला तोड नाही. पहाटे चारपासून ते रात्री अकरा-बारा वाजेपर्यंत किती कष्ट करते.पण तिच्या कष्टाची कुणालाच पर्वा नाही,हेच वरील प्रसंगातून दिसते.

मराठी ग्रामीण कथेत स्त्रियांच्या कष्टाला वाचा फोडण्याचे काम खऱ्या अर्थाने शंकर पाटील यांनी केले आहे. ग्रामीण जीवनातील 'स्त्री'ही ग्रामीण मानसिकतेतून, संवेदनशीलतेतूनचित्रित झालेली आहे. ही स्त्री शेतात राबराबते, संपूर्ण आयुष्य गुरा-ढोरात, शेतीत, कष्टात घालविते गुरा-ढोरांच्या गोतावळयात,पै-पाहुण्यांच्या गोतावळ्यात रमते. ही स्त्री मोठया कष्टाने, जिद्दीने, बिकट परिस्थितीतही स्वतःचा संसार उभा करते. याचे वास्तव चित्रण शंकर पाटील यांनी 'भुजंग' कथेतील 'जनाईच्या' माध्यमातून केले आहे.'भुजंग' कथेतील जनाई सभोवतालच्या परिस्थितीचा खंबीरपणे स्वीकार करते. सर्व बाजूंनी येणाऱ्या संकटाशी ती सामना करते.'आभाळच फाटले आहे, तर ठिगळ कुठे कुठेजोडणार' अशी अवस्था जनाईची झाली आहे. त्यातच तिला ढोरावानी कष्ट करावे लागते. तरीही ती सर्व परिस्थितीशी टक्कर देऊन एक प्रेमळ पतिव्रता ही तिची प्रतिमा आपणासमोर येते. एका साध्या सरळमार्गी आणि गरीब कष्टकरी शेतकरी स्त्रीचे व्यक्तिमत्व जनाईच्या माध्यमातून दिसते. नवऱ्याच्या ना कर्तृत्वपणामुळे संपूर्ण कुटुंबाची, शेताची आणि नवऱ्याची जबाबदारी स्वतःकडे घेते. तिचे व्यक्तिमत्व कष्टाळू आहे.'जनाई' जितकी सहनशील आहे, प्रसंगी तितकीच कठोर, कणखर आहे. नवऱ्याबद्दल तिच्या मनात राग असला तरी, त्याच्याबद्दल तिच्या मनात प्रेमाची भावना ही आहे. ती म्हणते "कसा का असंना! त्याच्या नावानं कुकू तर लावून घ्यायला येतोय. त्यो हाय म्हणून कुंकवाला तरी सोबा हाय का न्हाई." यातून भारतीय स्त्रीची आपल्या पतीप्रेमाची साक्ष पटते. तिच्यावर झालेल्या संस्काराचे दर्शन घडते. जनाईच्या कष्टाला तोड नाही. उदा. " आज जोंधळा कापायचा म्हणून जनाई येरवाळी उठली, भराभर काम आवरू लागली.शेणघाण काढून झाली.दावण सारी झाडून स्वच्छ केली. जनावरांना पाणी दाखवलं, वैरण घातली, धारा काढल्या, लगालगा जावून धरलेली दोन रतींब घालून आली. मग चगाळ गोळा करून धबाधबा शेणी थापल्या. शेणी लाऊन झाल्या. पाणी भरलं... कामच आटपत नव्हतं. एक संपलं की दुसरं उगवत होतं. जनाईचे हात डोंगर उपस्थित होते, काय करायचं? कुणाला सांगायचं? ज्याला सांगावं तोइमानपट्टीत जाऊन बसलाय! तिथं बसायचं ते खळयावर बसला असता तर राखण तरी झाली असती. आता एकटीनं किती ठिकाणी मरावं ?कापणी, खुडणी, मळणी कशी करावी, करायलाच पायजे... कसं होईल तसं करायचं!"५ जनाबाईला परिस्थितीमुळे 'स्त्री' असूनही पुरुषाप्रमाणे कर्तृत्व करावे लागते. तिला कशाची भीती वाटत नाही कारण कष्टाशिवाय पर्याय नाही, हे तिला माहीत आहे त्यामुळेच ती आपल्या शेतात राबते. पदरी असणाऱ्या चार मुलांना ती जगविते परंतु अघोरी वृत्तीचा नवरा त्यांना सुखा समाधानाने जगू देत नाही.

**निष्कर्ष:**

१) विशेषत: शंकर पाटील यांच्या कथेतील मांडणी वैशिष्ट्यपूर्ण असून कथेतील स्त्री चित्रणे वेधक आहेत

२)त्यांच्या कथेतील स्त्रियां जिवंत अनुभव देतात. त्यांचे सोसणे, भोगणे, दारिद्र्य यांची मांडणी करताना शंकर पाटलांची लेखणी कमालीची संवेदनशील बनते.

३) शंकर पाटलांच्या कथेतील स्त्रियांचे जसे जगणे आहे तसे त्या व्यक्त होतात.'जनाईच्या' आयुष्यातील संघर्ष ती स्वतःच्या हिमतीवर, ताकतीवर सहन करते.

४) शंकर पाटलांच्या कथेतील स्त्रीया समाज, कुटुंब, रूढी, परंपरा यांचे संदर्भ जपणाऱ्या आहेत.

५) त्यांच्या कथेतील स्त्रीयां अनेक नातेसंबंधाने वाचकासमोर येतात स्त्री जणू काही कष्ट करण्यासाठी जन्माला आली आहे. तिचे सुख-दुःख, आशा-आकांक्षा ह्या तिच्या कुटुंबासाठी आहेत कुटुंब हेच तिचे सर्वस्व आहे. काबाडकष्ट, आत्मसमर्पण, दुसऱ्याकरिता झिजणे हा तिचा स्वभावधर्म आहे. कोणतीही तक्रार न करता त्या कष्ट करत असतात.

**समारोप:**

ग्रामीण माणसांच्या भावस्थिती चे यथार्थ चित्रण करणाऱ्या शंकर पाटील यांनी ग्रामीण जनतेच्या विकासात लक्षणीय भर घातली आहे. त्यांच्या अनेक कथांमधून येणाऱ्या ग्रामीण स्त्रीची अनेक रुपे दिसतात. चंद्रकुमार नलगे म्हणतात- " स्त्रीची अनेक रूपावस्थेतील नाती यांची विलक्षण भावनिकता, त्या नात्यांमधील पावित्र्य जपत असताना तिच्या अंतकरणात निर्माण झालेली वनवे यांचे सूक्ष्म चित्रण अत्यंत हळुवारपणे पाटील चितारतात. स्त्रीचित्रणातील आतील भावोत्कटता त्यांच्या अनेक कथांतून प्रत्ययाला येते त्यांच्या ग्रामीण जीवनातील स्त्री ही ग्रामीण विशिष्ट मानसिकतेतून अत्यंत संवेदनशीलतेने चित्रित झाली आहे. त्या स्त्रीचा त्याग, कष्ट, सोशिकपणा,भाबडेपणा, तिची निष्ठा, मायाममता, वासल्य,तिचे हळवेपण,भावुकत इ. गुणवैशिष्ट्ये यांनी चित्रित केली आहे.मराठी ग्रामीण कथेत स्त्रीचे हे अंतरंग खुले करणारे मर्मबंध शंकर पाटील यांच्या कथेत प्रथमत प्रकट झालेले दिसते."६

अशा पद्धतीने शंकर पाटील यांच्या कथेतील ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे चित्रण आपणास पहावयास मिळते

**संदर्भ ग्रंथ:**

१ ) चंद्रकुमार नलगे-ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास-पृष्ठ १२३

२ ) आनंद यादव-सामाजिक स्थिती आणि नवे प्रवाह -पृष्ठ ५५

३ )शंकर पाटील-घालमेल -पृष्ठ ३७

४ ) तत्रैव - पृष्ठ ३८

५ )शंकर पाटील- भुजंग

६ ) चंद्रकुमार नलगे-ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास-पृष्ठ ११४

◆◆◆

# 'फेसाटी' कादंबरीतून चित्रित झालेले बेरोजगारीचे चित्रण

**मिनाक्षी मोतीराम इंगळे**
मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रास्ताविक :**

साधारणपणे १९६० च्या नंतर ठाामीण भागात शिक्षणाच्या सोई-सुविधा पोहचण्यास सुरुवात झाली. कायद्याने बहुजनांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. तरीही बहुजनांच्या कोणत्याही कुटुंबातील पहिल्या पिढीचे शिक्षण घेणे तसे सोपे नव्हते. अनेक समस्या सातत्याने रस्ता अडवून उभ्या असत. त्यातून मार्ग काढणे आणि संबंध कुटुंबाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे अत्यंत जीवघेणे होते. याचा अनुभव पहिल्या पिढीच्या असंख्य शिलेदारांनी घेतला आहे. म्हणूनच ही कादंबरी पहिल्या पिढीच्या एकूणच धडपडीची साक्षीदार ठरते. प्रत्यक्षात नवनाथ गोरे ही याला अपवाद नाहीत. धनगराच्या दहा-बारा घरांची वस्ती असलेल्या एका छोट्याशा गावात जन्मलेला नवनाथ उच्चशिक्षित होतात, लिखाण करतात, परंतु आजपर्यंत सुशिक्षित बेरोजगारच होते. बेकारीच्या कालखंडात दुसऱ्याच्या शेतावर औषध फवारणीची कामे केली. पिकांना खत टाकायची कामे केली. याच विषयाच्या अनुषंगाने 'फेसाटी' कादंबरीतील बेरोजगारीचे चित्रण इत्यादी काही मुद्यांचा आधार घेऊन चर्चा करताना शेवटी काही निष्कर्ष हाती लागतात. त्याची मांडणी या कादंबरीत केलेली आढळून येते.

नवनाथ गोरे यांचा शिक्षणाचा प्रवास :

अंगणवाडी पासून ते दहावीपर्यंत लेखकाने ज्या-ज्या वेळी वर्गशिक्षकांचा कुठल्या न कुठल्या कारणामुळे मार खाललेला आहे. त्या-त्या वेळी त्यांच्या आई-वडिलांनी व भावाने नवनाथ गोरेंची शिफारस शिक्षकाकडे केल्यानंतरच वर्गात पाऊल ठेवल्याचे आढळून येते. अनवाणी पायाने, डोक्याला तेल नसताना, फाटलेले कपडेच अंगावर घालून, पोटात भूकेचा मोठा भडका घेऊन संपूर्ण शिक्षण लेखकाने पूर्ण केले आहे. क्षणातच त्यांना शाळा शिकाविशी तर दुसऱ्याच क्षणी त्यांना शाळा नाकोशी वाटे. अशा द्विधा मनस्थितीतही लेखकाने कसेबसे शिक्षण पूर्ण केले. गणित आणि इंठाजी विषयाची भिती वाटत असतानादेखील या दोन्ही विषयात मेहनत करून मोठ्या कष्टाने पास होऊन यश मिळविले. लहानपणापासूनच घरची व बाहेरची कामे करून प्रसंगी इतरांच्या शेतावर मोलमजूरी करून लेखकाने शिक्षण पूर्ण केलेले आहे. लेखक ज्या दिवशी शाळेत जात नसत त्या दिवशी शेतावर मोलमजूरी करण्यासाठी जात असत. तेव्हा शिक्षणाचे महत्त्व सांगताना त्यांची आई त्यांना समजावून सांगताना म्हणायची ''बाळा तसं करुनिरं. बक्कळ शाळा शिकावं, पुलिस व्हावं, मग शाळा नाय शिकलं म्हणजी आमच्या वाणी तुला रानात काम करायला लागतया बाबा.''१ लेखकाचे प्राथमिक शिक्षण माने वस्तीवरच्या शाळेत होते. चौथीच्या वर्गात खंड पडल्यामुळे दोनदा चौथीत नापास होतात. राबराब राबण्यापेक्षा शाळा शिकणे हे कधीही चांगले याची जाणीव झाल्यावर सातवीची परिक्षा देखील पास होतात. पुढे आठवी ते दहावीचे शिक्षण नवनाथ गोरे बोर्डिंगमध्ये राहूनच पूर्ण करतात. तिथेही झाडलोट, पाणी भरणे इ. कामे करावी लागतात. दहावीच्या वर्गात लेखकाला जेव्हा गणिताची अडचण येते, तेव्हा मित्राच्या मदतीने ते गणित शिकतात. लेखकांना त्यांच्या जातीयतेबद्दल ही हिणविले जाते.

परंतु तेही ते निमूटपणे सहन करून आपले शिक्षण पूर्ण करतात. अकरावी कसीबशी पास झाल्यावर बारावीच्या वर्गात अभ्यास न करता वर्गात न जाता मित्राच्या सानिध्याने दारु पिऊन पेपर सोडवितात आणि शेवटी नापास होतात. परंतु नंतर त्यांना पश्चताप झाल्यामुळे पुन्हा नव्याने शिकवणी लावून इंठाजी विषयात पास होतात. बी.ए.च्या तिन्ही वर्षात सवड मिळेल तसे लेखक कॉलेज करतात. 'माणसं जोडावी कशी' हे लेखकाच्या आयुष्यातील पहिले पुस्तक त्यांच्या वाचण्यात येऊन त्यांना तेथून वाचनाची गोडी निर्माण होते. एकूणच महाविद्यालयीन काळापासून नवनाथ गोरेंना शिक्षणाची आवड निर्माण होते व पुढे ते एम.ए. पर्यंतचा आपल्या शिक्षणाचा प्रवास अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही पूर्ण करताना दिसून येतात. शेतीवर काम करून आपले शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यास ठेवणे हा प्रवास खरोखरच इतरांना शिकण्यासाठी प्रेरणादायी ठरेल असाच आहे.

'फेसाटी' मधील नवनाथ गोरे यांचा परिस्थितीशी संघर्ष :

आर्थिक विषमता हीच सामाजिक विषमतेला जन्म देते. आर्थिक स्थिती भक्कम असेल तरच सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते, परंतु ठाामीण भागात विशेषत: दुष्काळी भागात वेळेवर पाणी नाही, वीज नाही, जनावरांना चारा नाही, त्यामुळे दोन वेळेचे पोट भरण्यासाठी कुटुंबेच्या कुटुंब ऊस तोडणीसाठी सहा-सहा महिने स्थलांतरीत होतात. दोन वेळेचे जेवणसुद्धा त्यांना पोटभर मिळत नाही. त्यामुळे नवनाथ गोरेंना शहराकडे धाव घ्यावी लागली. आजही अशाी अनेक तरुण शहराकडे पोटापाण्याची गरज भागविण्याकरीता गेलेली दिसतात. त्यामुळे संसाराचा गाडा चालविण्यासाठी गरीबीच्या संसारामध्ये कर्जे घेऊन त्या कर्जाचे व्याज फेडण्यासाठी संबंध आयुष्य घालवणारी अनेक कुटुंब पहावयास मिळतात. त्याचेच प्रतिनिधित्व म्हणून नवनाथ गोरेंचे कुटुंबाकडे पाहता येईल अशा दुर्दैवी दशावताराचे 'फेसाटी' मधील चित्रण हे अत्यंत अस्वस्थ करून सोडते. याविषयी लेखकाच्या आईच्या तोंडचे वाक्य महत्त्वाचे वाटते. ''फुटकं गाडगं घिवून घराची वाट चालत हुतो. फुटकी घागर, फुटकं गाडगं आणि फाटका संसार या तिन्हीची टक्कर लागली होती. कुठवर असचं राहणार हा मलाबी माहित नव्हते.''[२] आयुष्याची टक्कर चालू होती. दारिद्र्याला अंत नाही अशी नाथाच्या कुटुंबाची अवस्था आहे. कोणताच प्रश्न सुटत नाही. मग तो कर्जाचा असो की भूकेचा, वस्त्राचा असो की निवाऱ्याचा सगळ्याच समस्या सदासर्वकाळ हात जोडून उभ्या. पावसाची झड लागली की घरात कुठे बसावे हा प्रश्न, भाकरी करायच्या तर चूल पेटत नाही. अंगावर घालायला कपडे नाहीत, चड्डी आहे तर शर्ट नाही, कुणाच्याही अंगावर अंगभरून कपडा नाही, रहायला निटनेटके घर नाही. पोटभर अन्न नाही. अशा दारिद्र्यात नाथाचे कुटुंब आलेला दिवस मागे टाकीत दिवस काढताना दिसतात. सणाच्या दिवशीही या कुटुंबाला गोडधोड खायला मिळत नाही. पोळ्यासुद्धा डोळ्याने पहावयास मिळत नाहीत. यासारखे दुसरे दु:ख नाही. नवनाथ गोरेंचे शिक्षण काबाडकष्ट करून झाले. शिकण्याची इच्छा नसूनही कधी सुबाक्काच्या आठाहाने तर कधी स्वत:ला वाटले म्हणून तर कधी मित्रांनी आठाह केला म्हणून प्रवेश घेतला. असे करत-करत त्यांनी बी.ए.ची डिठाी पूर्ण केली. परंतु तरीही नवनाथांच्या कुटुंबाचा भूकेचा प्रश्न कायमच राहिला. प्रकाशाचा अंधुकसा किरण कुठून तरी येईल याची आशा नव्हती. नाथांच्या आयुष्यात प्रेमाची सुद्धा बिजांकुरे फुटलेली आढळून येतात. परंतु जीवनातील हालपेष्टामुळे त्यांचे त्या गोष्टीकडे लक्षच जात नाही. कारण तशी परिस्थितीही नव्हती व वयही नव्हते. तरी आपले स्वानुभव सांगताना नाथांनी

मर्यादा सोडली नाही. नाथांच्या जीवनात येणाऱ्या दु:खाचे स्वरूप अनेक पदरी, अनेक स्तरीय असलेले आहेत. कुठेही सुखाचा कवडसा नाही. सगळीकडे अंधार पसरलेला, खाच खळग्यांनी भरलेल्या डोंगरवाटा तुडवित दिशाहिन जगणे. कोणत्याच गोष्टीसाठी अनुकूलता नाही. सगळ्याच समस्या, सगळीकडे संकटे एक संकट आहे, तोवचर दुसरं समोर हात जोडून उभे राहते. अशी संकटांची मालिकाच आहे. झोपडी जळाल्यावर संपूर्ण कुटुंब सात आठ महिने अक्षरश: उघड्यावर राहत होते. एकदा त्यांच्या शेताला आग लागली होती. त्यामुळे त्यांना प्रचंड नुकसान सोसावे लागले होते. नवनाथ तसे लहानपणापासूनच कुपोषित बालकाप्रमाणे होते. त्यामुळे ते वारंवार आजारी पडायचे. त्यातच बाराही महिने पोटमारा झाल्यामुळे कायम अशक्तपणा असे. अशाप्रकारे नवनाथ गोरेंचा जीवनाविषयीचा संघर्ष म्हणजे आयुष्याची झालेली 'फेसाटी' होय. नवनाथ गोरेंनी याच हृदयात दबलेल्या भावना सुंबरान गीताद्वारे किंवा सुंबराख्यानातून काव्यात्मक स्वरूपात 'स्व'च्या जीवनातील भावविश्वाला अधोरेखित केले आहे. फेसाटी या कादंबरीची सुरुवातच सुंबरान या ओवीने होते. सुंबरान म्हणजे आपल्या जीवनातील गतकालीन आठवणीचे स्मरण होय. यामध्ये त्यांनी त्यांच्या जीवनातील येणाऱ्या सर्व समस्या त्याचबरोबर मुलीच्या जन्माचे वेळी मनात येणाऱ्या भावना किंवा मुलीच्या जन्माबद्दलच्या सामाजिक विचारांचे दर्शन धनगरी ओवी गीतामधून मांडताना दिसून येते. नवनाथ गोरेंनी जीवनातील बाल्यावस्थेपासून ते महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंतचा जीवनप्रवास, धगधगता भेदक संघर्ष फेसाटीतून मांडला आहे. थोडक्यात बारोमास राबराब राबूनही नवनाथ गोरेंच्या कुटुंबाचा दु:खाचा डोंगर कमी होत नव्हता. मुलींचे विवाहसाठी खर्च, काकांचे आजारपण, नाथाचे शिक्षण त्यामुळे आर्थिक उत्पन्नापेक्षा खर्च मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कुटुंबाचा डोलारा सांभाळणे अतिशय जिकीरीचे होते. याचे चित्रण फेसाटीतून आले आहे. परंतु नव्या उमेदीने कुटुंबातील प्रत्येक सदस्य समोर-समोर चालतच आहे आणि शेवटी कसेबसे नाथांनी एवढे शिक्षण करुनही बेरोजगारच रहावे लागते.

'फेसाटी'मधील बेरोजगारीचा प्रश्न :

आपल्या कष्टांचा भोगवटा मुलाच्या नशिबी येऊ नये, यासाठी नवनाथ गोरेंनी शाळा शिकावी, पोलिस बनावे अशी त्यांच्या आईवडिलांची किमान अपेक्षा होती. परंतु लेखकाचा कल शिक्षणाकडे नव्हतात. त्यामुळे आई ज्या शेतात मजूरीला जाईल तिथे लेखक त्यांच्या आईसोबत जायचे आणि खेळायचे, झाडावरच्या चिंचा पाडायच्या, भुईमूगाची वेल उपटून शेंगा खायच्या आणि मनसोक्त भटकायचे हा नाथांचा आवडता कार्यक्रम होता. नाथांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी लेखकाच्या आवडीची 'शिंगरी' नावाची गाय विकून टाकली आणि नवनाथ गोरेंना ड्रेस विकत घेतला. आपली आवडती गाय विकल्याबद्दल नवनाथाला खूप वाईट वाटले होते, परंतु पर्यायच नव्हता. त्यामुळे परिस्थितीची जाणीव ठेवून ते शाळेत जायला तयार झाले. परंतु शाळेच्या पहिल्याच दिवशी नाथाला शिक्षकांनी नाव विचारले, परंतु भितीमुळे नाथाच्या तोंडून शब्द निघत नव्हते. त्यामुळे त्यांना शिक्षकांचा मार खावा लागला. याचा उलट परिणाम म्हणजे त्यांना शाळेत जावेसेचे वाटत नव्हते. एकीकडे भूक आणि दुसरीकडे शाळा नाथाची सत्वपरिक्षाच पाहत असते. आपल्या शिक्षणाकरीता गाईला विकून कपडे आणल्याचा विचार नाथाला अस्वस्थ करीत असे त्यामुळे पुन्हा कसेबसे शाळेत जाण्यास नाथा तयार होतात. शिक्षणाच्या अशा या बिकट प्रवासात नवनाथ गोरेंना शिक्षकांची साथ ही बहुदा मिळत नाही. त्यामुळे सतत कौतूक होण्यापेक्षा शिक्षकांकडून अपमान व मारच सहन करावा

लागतो. त्यामुळे शाळेत जाण्याची मनस्थिती ही बहुतेकदा नसतेच. परंतु कुटुंबियांच्या आठाहाने किंवा त्यांच्या मदतीने नवनाथ गोरे पुढचा एक-एक वर्ग चढत जातात व आपले शिक्षण एम.ए. पर्यंत पूर्णत्वास नेतात. नवनाथांच्या शिक्षणाच्या प्रवासात त्यांना त्यांच्या सारखेच आणखी काही मित्र भेटतात. भटकंती केल्यामुळे त्यांच्या सारख्याच दुसऱ्या मित्रांचीही आयुष्याची परवड ही चालूच असते. सततच्या भटकंतीमुळे मिळेल ते अन्न खाणे आणि मिळेल तिथे रोजगारासाठी रहावे लागते. भटकंती करणाऱ्या कुटुंबियासमोर अशी अनेक प्रश्न समोर उभे राहतात. भूक, गरीबी, दारिद्र्य, अज्ञान, सुविधाचा अभाव, सामाजिक प्रश्न, आरोग्य समस्या या सर्वच समस्यांना तोंड द्यावे लागत असे. परंतु त्याचबरोबर मुख्य समस्या म्हणजे बेरोजगाराची असते. फेसाटी या कादंबरीत पशुपालक, अल्पभूधारक समाजातील तरुणाची कथा व्यक्तीमनाबरोबरच समूहाचे किंवा समूहमनाचे चित्रण करते. त्यातून समाजाचे दु:ख, दारिद्र्य वेदना प्रकट होतात. आजही २१ व्या शतकात सुद्धा ठामवास्तव अत्यंत भयानक असून ठामजीवनात प्रचंड अंतर्बाह्य बदल होत आहे. जागतिकीकरण, बाजारू अर्थव्यवस्था, वस्तू सेवा कर, वाढती महागाई, शेतकऱ्यांच्या मालाला कमी किंमत, राजकारण, सावकारी, कारखानदारी कंपन्याचा वाढता प्रभाव, सतत दुष्काळ, नापिकी, पर्यावरणाचा ऱ्हास, आरक्षणासंदर्भातील मोर्चे, आंदोलने, जातीला आलेले महत्त्व यांचा ठामीण जीवनावर सर्वस्तरीय व खोलवर परिणाम होत असल्यामुळे कृषीसंस्कृतीची जीवनमूल्ये नष्ट होत आहेत. शिक्षण घेऊन हात, हृदय, डोके याला काम नाही. त्यातून आलेले नैराश्य, नव्या अंधश्रद्धा, बुवाबाजी यांचे भयावह आक्राळ-विक्राळ रूप धारण करत आहे. या सर्व बदलत्या परिस्थितीचा विविध अंगोपांगाचा वेध घेण्याचा प्रयत्न 'फेसाटी' कादंबरीत करण्यात आला आहे.

जागतिकीकरण, बाजारु व्यवस्थापन यामुळे आजचा प्रत्येक वर्गातील किंवा समाजातील तरुण हा होरपळून निघाला आहे. असंख्य तरुण वर्ग व्यसनाच्या विळख्यात अडकली आहे. नुकतीच वयात येणारी मुले ही नको त्या मार्गी लागली आहेत. आईवडिलांच्या कष्टांची जाणीव देखील आजच्या तरुणवर्गाला दिसत नसल्याचे आढळून येते. सर्वच नवीन पिढीला बहुदा झटकन निर्णय हवा असतो. शिक्षणाचा बाजार झाला आहे. पूर्वीच्या काळात बोटावर मोजण्याइतकीच लोकं शिक्षित होत असत. त्यामुळे त्यांना खूप महत्त्व प्राप्त होत असे. त्यांच्या काळात गुरुजी हाच त्यांचा तारणहार, देव असे. त्यावेळेचे दुर्दैव असे की, पंतोजी वळणाच्या गुरुजीचाच त्याकाळी प्रामुख्याने भरणा असल्यामुळे बहुजनांच्या मुलांच्या शिक्षणाची अतिशय हेळसांड झाल्याचे दिसून येते. त्याबद्दल दगड्या म्हणजे नाथाचा मित्र म्हणतो, 'अरे ये नात्या, लगा मी कवा वाचतुया का? कसा मज्यात हाय, सराला स्टारच्या पुड्या दिलं म्हणजी सर पास करत्याती. म्या परवादिशी तंबाक पुडीबी दिली. सर म्हणालं, अहो दगडूशेट तू पास झालचं म्हणून समज.' म्हणजे यावरून शिक्षकांचा नेमका दृष्टीकोन काय होता हे सहज लक्षात येते. यावरून शिक्षणाचा दर्जा लक्षात येतो. त्यामुळे बेरोजगारी वाढण्यास हे एक महत्त्वाचे काण ही लक्षात येते.

**वर्तमानस्थितीतील बेरोजगारी एक समस्या :**

बेकार म्हणजे ज्याला काम मिळालेले नाही असा व्यक्ती होय. प्रथम बेकारी म्हणजे नेमके काय हे जाणून घेणे गरजेचे ठरते. तर 'बेकारी म्हणजे अशी स्थिती होय की, जिथे व्यक्ती प्रचलित मजूरीच्या

दरावर काम करायला तयार असतो, परंतु त्याला काम मिळत नसते.' त्यामुळे बेरोजगारीमुळे देशासमोरील अनेक समस्यामध्ये वाढ होते. बेकारीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. बेकारी किंवा बेरोजगार यामध्ये एक अवस्था अशी आहे की, यामध्ये पात्रता असते तसेच काम करायला सुद्धा तयार असतात. परंतु काम मिळत नही. दुसरी बाब म्हणजे जिथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते. परंतु तिची काम करण्याची इच्छा नसते. काही वेळा की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही. किंवा तिला कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते. चौथा मुद्दा म्हणजे व्यक्तिकडे पात्रता, कौशल्य इच्छाशक्ती असूनही कोणत्याच किठकाणी काम प्राप्त होत नाही. याला बेरोजगारी म्हणतात. भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कामगारांना इच्छेविरुद्ध बेकार रहावे लागते. हे निर्विवाद सत्य आहे. नेमके किती लोक बेरोजगार आहे याचा अंदाज घेणे कठीण आहे. बरोजगारी वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकसंख्या वाढीची जास्त गती हे होय. यामुळे श्रमशक्ती वाढत गेली. अपुऱ्या आर्थिक विकासामुळे या अतिरिक्त श्रमशक्तीला द्वितीय व तृतीय क्षेत्रात सामावून घेता आले नाही. त्यामुळे बेकारी वेगाने वाढत गेली. त्याचबरोबर शेतीमशागतीचे मागासलेले स्वरूप यामुळे अज्ञान व निरक्षरतेमुळे भारतातील शेतकरी शेतीमध्ये परंपरागत पद्धतीचा वापर करतात त्यामुळे भूमीची उत्पादकता कमी राहणे आणि रोजगार वाढत नाही परिणामी बेकारी वढते.

**निष्कर्ष :**

१) 'फेसाटी' ही नवनाथ गोरे यांची एका सुशिक्षित बेरोजगार पिढीची घुसमट व्यक्त करणारी कादंबरी आहे.

२) कितीही संकटे आले तरी त्यांना तोंड देण्यची मनोवृत्ती दिसून येते.

३) शिक्षणासोबतच पोटाची खळगी भरण्याकरीता केलेला संघर्ष यामध्ये आहे.

४) २१ व्या शतकातही बेरोजगारीची स्थिती ही अत्यंत विदारक परिस्थितीत असल्याचे आढळून येते.

५) शिक्षण घेवून सुद्धा मोलमजूरी शिवाय पर्याय नाही याची प्रचिती येते.

६) शिक्षणाचा होत असलेला बाजारु व्यवहार निर्देशनास येतो.

**संदर्भ :**

१) गोरे नवनाथ, 'फेसाटी', अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, ९ सप्टेंबर २०१०

२) तत्रैव, पृ. २३

३) तत्रैव, पृ. १३६

४) परिमल ढवळेकर, 'संचार इंद्रधनू', सोलापूर रविवार ५ ऑगस्ट २०१८, पृ. ७

५) तत्रैव, पृ. ८०

६) स्नेहल साळे, 'फेसाटी' एक ग्रामीण वास्तवचित्रण, राजे रामराव महाविद्यालय, जत

◆◆◆

# संत कवयित्रींच्या काव्यातील स्त्री जाणिवा

**प्रा.मोहन बाबुराव चव्हाण**
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात स्त्री अभिव्यक्तीला विशेष महत्त्व आहे. स्त्रीच्या मौखिक अभिव्यक्तीला प्रदीर्घ परंपरा आहे. या अभिव्यक्तीतून तिच्या भावना, श्रद्धा व्यक्त झाल्या आहेत. लिखित परंपरेचा विचार केला, तर महदंबेपासून विचार करावा लागतो. महानुभाव संप्रदायात स्त्रियांना प्रवेश देण्यात आला. या संप्रदायातील स्त्री एवढी स्वतंत्र वाटत नाही. कारण महानुभाव संप्रदायातील दिक्षा घेतलेल्या पुरुषांने चित्रातील स्त्री पाहू नये असा दंडक होता. यावरून सामाजिक जीवनात स्त्री—पुरुष समानतेचे तत्त्व या संप्रदयात संकुचित राहिले आहे. याउलट वारकरी संप्रदायात स्त्री—पुरुष समानतेचा पुरस्कार केलेला आहे. स्त्रियांना वारकरी संप्रदयात मुक्तपणे संचार करता आला. तिला प्रतिष्ठा मिळाली. अनेक स्त्रियांचा उद्धार झाला. वारकरी संप्रदयात स्त्री—पुरुष भेदाला स्थान दिले नाही. यामुळे या संप्रदायातील स्त्री काव्यातून मुक्तपणे व्यक्त झाली आहे. तिच्यातील स्त्री जाणिवांचा विचार करणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**भूमिका :**

वारकरी संप्रदायाने स्त्री उद्धाराचे कार्य केले. या संप्रदायात पुरुषाबरोबरीने स्त्रिया देखील होत्या. या काळात बहुसंख्य स्त्रियांनी अभंगरचना केली आहे. आध्यात्म ही रचनेची मूळ प्रवृत्ती असली, तरी तिच्यातील स्त्रीतत्त्वाच्या जाणिवा यातून व्यक्त झाल्या आहेत. या जाणिवांचा विचार येथे करण्यात येणार आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. संत परंपरेची पार्श्वभूमी समजून घेणे.
२. संत कवयित्रीच्या वाङ्मय निर्मितीची भूमिका जाणून घेणे.
३. संत कवयित्रीच्या रचनेतील स्त्री जाणिवा समजून घेणे.
४. स्त्री जाणिवांची आविष्कारशैली समजून घेणे.

**विषय विवेचन :**

महाराष्ट्राच्या भूमीत अनेक संप्रदायांचा उदय झाला. या संप्रदायाची मूळ प्रेरणा अध्यात्म हीच होती. वारकरी संप्रदायाने कोणत्याही भेदांना स्थान दिले नाही. यातील महत्त्वाचा स्त्री—पुरुष भेद या संप्रदायाने नाकारला. यामुळे या संप्रदयात बहुसंख्य स्त्रियांनी सहभाग घेतला. संतांच्या सहवासात असणाऱ्या स्त्रियांवर त्यांच्या काव्यरचनेचा प्रभाव पडणे स्वभाविक होते. अनेक स्त्रियांनी स्वतंत्र काव्यरचना केली. या रचनेचा मूळ हेतू अध्यात्म असला तरी तिच्या स्त्री सुलभ भावनांचे आणि जाणिवांचे प्रकटीकरण झाले आहे. या जाणिवांचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात करणे महत्त्वाचे वाटते.

वारकरी संप्रदायातील पहिली कवयित्री म्हणून संत मुक्ताबाईंचा उल्लेख करावा लागतो. समाजाच्या बहिष्काराचे चटके तिला लहानपणीच सहन करावे लागले होते. याचबरोबर लहान वयातच कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर पडलेली होती. मुक्ताबाईंनी अभंगरचेत आपल्या खाजगी भावानांची व कौटुंबिक नात्याची कोठेही वाच्यता केली नाही. परंतु तिच्या अभंगातून प्रौढत्व, प्रबळ आत्मविश्वास, लडिवाळपणा, निरागसता, मातृमन, स्त्री सुलभ भावना आणि फटकाळपणाचे दर्शन घडते. 'ताटी' च्या अभंगातून तिच्यातील बालसुलभ निरागसता आणि प्रौढत्वातील विचारगांभीर्याचे दर्शन घडते. ज्ञानदेव आणि मुक्ताबाई समदु:खी आहेत. पण दु:ख झेलण्याचे बाळकडू तिला लहानपणीच मिळाले होते. ती ज्ञानदेवांची समजूत काढण्याचा प्रयत्न करते आहे. नामदेवांने आपल्या भावंडांना प्रतिनमस्कार केला नाही. याचा तिला राग येतो. ''अखंड जयाला देवाचा शेजार। कां रे अहंकार नाही गेला।।'' (नामदेव महाराजांच्या अभगांची गाथा, अ. क्र. १३३७) अशी नामदेवांची कानउघडणी करते. हटयोगी चांगदेवाचा गर्वहरण करून त्याला गुरुउपदेश करते. या उपदेशात तिचे मातृमन प्रकटले आहे. मुक्ताबाई आपल्या अनुभूतींच्या अभिव्यक्तीसंबंधी उदासीन आहेत. तिच्या काव्यरचनेत स्त्री जाणिवांचे अत्याल्प दर्शन घडते.

संत जनाबाईंच्या जीवनात दासीपणाचे जगणे आले होते. 'नामयाची दासी जनी' असा नामोल्लेख त्या सतत करताना दिसून येते. स्वत:चे प्रापंचिक जीवन नसणाऱ्या जनाबाई संत नामदेवांचा गोतवळ्यात समरस झाल्या आहेत. त्यांची सुख दु:खे त्यांना आपलीच वाटतात. तिच्या अभंगरचनेतून स्त्री मनाच्या जाणिवा अभिव्यक्त झाल्या आहेत. आपल्या अपेक्षित, एकाकी, दासापणातून त्यांना पोरकेपणाची जाणीव होते. 'राजाई गोणाई। अखंडित तुझें पायीं।। मज ठेवियले द्वारीं। नीच म्हणोनि बाहेरी।। (जनाबाई, अ. क्र. ६७) या अभंगातून जनाबाई आपल्या वाट्यला आलेले जगणे स्पष्ट करते. जनाबाईंचे जगणेच परावलंबी होते. दळण, कांडन, झाडलोट, सडासारवण, धुणे, शेणी वेचणे, पाणी भरणे यासारखी कामे त्यांना करावी लागत होती, हे त्यांच्या अभंगरचनेतून आविष्कृत होते. हळूवार असलेली जनाबाई दाहक जाणिवा व्यक्त करण्यासाठी आकांड तांडव, शिव्याशाप, त्राग्याच्या भाशेचा वापर आपल्या अभंगात करते. जनाबाईंच्या रचनेवरून या कालखंडातील स्त्री दास्यत्वाच्या प्रथेवर प्रकाश पडला आहे. जनाबाईंच्या अभंगरचनेतून या कालखंडातील स्त्री जाणिवा अधोरेखित झाल्या आहेत. मध्ययुगीन साहित्यात स्त्री जाणिवा आणि बंडाची भाशा करणारी पहिली कवयित्री संत जनाबाई ठरते.

सोयराबाई संत चोखोबांच्या पत्नी होत्या. सोयराबाईंच्या कविता एका कष्टकरी, कामकरी संत कवयित्रीच्या कविता आहे. हीन जातीत जन्म झाल्यामुळे त्यांना हीन कामे करत अपमान आणि अवहेलना सहन करावी लागली. अस्पृश्यता आणि विटाळ पाळणाऱ्या समाजात त्यांना अनंत यातना भोगाव्या लागल्या. आपल्या अभंगरचनेत स्वत:चा उल्ले 'चोख्याची महारी' असा करतात. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना कोणत्या यातना भोगाव्या

लागतात याचे वास्तव सोयराबाईंच्या कवितेत पहिल्यांदा आवतरते. चोखोबांची बहीण निर्मळा यांच्या अभंगरचनेतून अस्पृश्य स्त्री जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. संसारीक दु:खाची भावना त्यांच्या मनात दाटून आल्यावर मुक्तीसाठी विठ्ठलाकडे धावा करतात. सोयराबाई आणि निर्मळा यांच्या अभंगातून दलित स्त्री जाणिवांचे दर्शन घडते.

कान्होपात्रा यांची कर्मकहाणी मनाला हेलावून टाकणारी आहे. एका वेश्याच्या पोटी जन्माला आल्यामुळे देहविक्रय व्यवसाय त्यांच्या जीवनात आला होता. या स्त्रियांना समाज कसलेच स्वातंष्य आणि अधिकार नव्हते. कान्होपात्रा यांची कविता असाह्य झालेल्या दु:खी स्त्रीची आहे. ''चूल आणि मूल हे स्त्रीचे प्रारब्ध त्यांनी नाकारले. संसारसुखला नाकरून त्या अविवाहित राहिल्या तशाच एकट्या राहिल्या. आपल्या हीन जीवनाची जाणीव त्याना सतत टोचत राहिली आणि त्याच्या खुणा त्यांच्या कवितेत सर्वत्र दिसतात.'' (संतकविता : एक दृष्टिकोन, पृ. १८६) सामाजिक अत्याचारी व्यवस्थेला आव्हान देते. आपले मन विठ्ठल भक्तीमध्ये गुंतवून घेते. वेश्या व्यवसाय आणि विवाहबंधनाला त्यांनी नकार दिला. कामवेड्य व नवऱ्याच्या दास्यत्वाला त्यांनी विरोध केला आहे. पुरुशी वासनेच्या विरोधात जावून स्त्री मुक्तीचा उजगार कान्होपात्रांच्या काव्यातून होतो.

संत बहिणाबाईंचा जीवन प्रवास खडतर होता. वयाच्या तिसऱ्या वर्शी तीस वर्शाच्या पुरुशाबरोबर त्यांचा विवाह झाला होता. वयाच्या आठव्या वर्शी वडिलांबरोबर त्यांना परागंदा व्हावे लागले होते. प्रपंच लाभूनही त्या मुक्त राहिल्या आहेत. वैवाहिक जीवन स्त्रियांना जाचक कसे असते आणि पतिविरहित स्त्रियांचे जीवन कसे निरर्थक असते याची जाणीव त्यांच्या कवितेत व्यक्त झाली. यावरून या काळातील परंपरावादी स्त्रीचे दर्शन घडते. ''स्त्रियेचें शरीर पराधीन देह। न चाले उपाव विरक्तीचा।। शरीराचे भोग वाटताती वैरी। माझी कोण करी चिंता आतां।। (बहिणाबाईंची गाथा, अ. क्र. ६७) त्यांच्या आत्मचरित्रपर रचनेतून त्यांच्या जीवनाची परवड पाहावयास मिळते. स्त्रियांचा जन्म पराधीन आहे याची त्यांना खंत सतत वाटते. बहिणाबाईंच्या अभंगात स्त्री जीवनातील असंख्य समस्यांची जाणीव होते. सामाजिक रूढी, परंपरा, पुरुशसत्ताक समाज व्यवस्थेचा स्वीकार करणाऱ्या परंपरावादी स्त्रीची व्यथा बहिणाबाईंच्या कवितेत प्रकट झाली आहे.

**समारोप :**

साहित्य आणि समाज जीवन समप्रवाहात वाहत असते. त्या—त्या काळातील सामाजिक जाणिवा साहित्यातून अधोरेखित झालेल्या आहेत. वारकरी संप्रदायाच्या उदयापासून आज अखेर अनेक संत कवयित्रींनी काव्यरचना केली आहे. मध्ययुगीन कालखंडातील संत कवयित्रींच्या रचनेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, त्यांच्या काव्यरचनेची प्रवृत्ती आध्यात्म हीच आहे. काव्याचा विशय कोणताही असो, त्यात वैयक्तिक जाणिवांचे दर्शन होतच राहते. संत मुक्ताबाईंच्या काव्यातून वैयक्तिक जीवनाचे संदर्भ आले नाहीत. संत जनाबाई (दासी), संत सोयराबाई, संत निर्मळा (अस्पृश्यता), संत कान्होपात्रा (वेश्या), संत

बहिणाबाई (परागंदा) या वेगवेगळ्या सामाजिक घटकातून येणाऱ्या स्त्रिया आहेत. त्यांच्या काव्यातून व्यथा—वेदनांचे दर्शन घडले आहे. यातून मुक्त होण्यासाठी त्या विठ्ठलाचा धावा करताना दिसून येतात. वारकरी संप्रदायातील कवयित्रींच्या काव्यरचनेतून समाजातील विविध स्तरातील स्त्री जाणिवा अधोरेखित झाल्या आहेत.

**निष्कर्ष :**

१. संत कवयित्रींच्या काव्यलेखनाची मुख्य प्रेरणा आध्यात्मीक असली तरी त्यांच्या वैयक्तिक जाणिवांचे प्रकटीकरण झाले आहे.

२. संत कवयित्रींच्या जीवनाला समाजातील वेगवेगळ्य स्तराचे संदर्भ लाभले आहेत. यामुळे त्यांच्या काव्यात स्त्री जाणिवांचे वैविध्यपूर्ण दर्शन घडते.

३. मध्ययुगीन काळातील एकाकी, पोरकी, दासी, वेश्या, अस्पृश्य, बहिष्कृत समजल्या जाणाऱ्या तळागाळातील स्त्री जाणिवा या काव्यातून अधोरेखित झाल्या आहेत.

४. संत कवयित्रींच्या काव्यात त्या—त्या समाज घटकाचे संदर्भ आणि भाशा आली आहे. उदा. नामयाची दासी जनी, चोख्याची महारी.

५. स्त्री जाणिवांचा आविश्कार संत कवयित्रींच्या काव्यात प्रथम उमटला आहे. या अर्थाने ही कविता महत्त्वाची ठरते.

**संदर्भ :**

१. डॉ. सुहासिनी इर्लेकर, 'संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, संस्कारित आवृत्ती, २००६.

२. डॉ. प्रकाश देशपांडे केजकर, 'संत कविता एक दृश्टिकोन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००६.

३. ल. रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी आवृत्ती, २००६.

◆◆◆

# नामदेव ढसाळ यांच्या साहित्यलेखनातील सभोवतालचे वातावरण

**डॉ. प्रभाकर घोडके**
एच.व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे

नामदेव ढसाळ हे १९६० नंतरच्या मराठी कवितेतील उत्तुंग प्रतिभेचे कवी ठरले. दलित कवितेत प्रामुख्याने दलित जीवनातील दु:खाचा काव्यात्मपूर्ण स्वर निनादतो आहे. त्यामध्येच संयत स्वरूपात विद्रोहदेखील आहे. परंतु सर्वस्पर्शित्वाचे मूलगामी विद्रोहरूप कवितेला पहिल्यांदा कुणी दिले असेल तर ते नामदेव ढसाळांनी. कवीचे व्यक्तीगत आयुष्य, त्यांनी स्विकारलेली प्रखर राजकीय निष्ठा, त्यांची कमिटेड भाषिकवृत्ती, यांच्यातल्या भिन्न अशा परस्पर संबंधाच्या नैतिक नात्याला सातत्याने अधोरेखित करणाऱ्यांना नामदेव ढसाळांचा हा काव्यप्रवास आधुनिक मराठी कवितेला दुर्मिळ असा आहे. १९७२ मध्ये नामदेव ढसाळांचा 'गोलपिठा' प्रसिद्ध झाला. त्यानंतर खऱ्या अर्थाने भारतीय संरचनेतील गुंतागुंतीच्या व्यामिश्र वास्तवातून प्रतित होणारी भाषिक निर्मिती किती सर्वकष असू शकते, याची जाणीव वाङ्. मयीन पातळीवर होवू लागली.

एकूण मराठी काव्यजगतात खळबळ उडवून देणारा, अत्यंत सामर्थ्यवान, विद्रोही व बंडखोर कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचे नाव मान्यता पावले आहे. नामदेव ढसाळ 'दलित पँथर' या संघटनेचे कार्यकते व नेते होते. नाकारलेल्या समाजाला परिपूर्ण न्याय मिळावा म्हणून ते विविध लढे संघटित करत असत. नामदेव ढसाळांपासून विद्रोही दलित कवितेचे बदललेले रूप दिसते. नामदेव ढसाळांच्या कवितेनं कवितेविषयी असलेली पारंपरिक समजूत बाजूला ठेवली आणि कवितेला एक नवीन चेहरा आणि आयाम दिला.

नामदेव ढसाळ तरूण कवींना लाजवीत होते. नव्या नव्या निर्मितीत गुंतले होते. मराठी कवितेत काय काय चाललेय याची बारीक माहिती ते ठेवत. कवितेच्या परिघात सभोवतालच्या वातावरणात त्यांचा मुक्त संचार असल्याने ते पुर्वानुभवाने हवामानाचा अंदाज घेत आणि आपली कविता सादर करत. 'या सत्तेत जीव रमत नाही'चा प्रकाशनकाळ हे त्याचे एक उदाहरण आहे. नामदेव ढसाळ राजकारणात जसा कवितेचा वापर करत. तसे कवितेचेही राजकारण खेळत असेही म्हणता येईल. ते चौफेर वाचन करणारे कवी असल्याने, समकालीन कवितेत आजूबाजूच्या पर्यावरणाचे संदर्भ देत. साठीच्याच दशकात नारायण सुर्वे यांची कविता येते. त्यानंतर लगेच, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम यांची दलित कविताही स्वत:चे एक स्थान निर्माण करते. नामदेव ढसाळ यांच्या कवितेविषयी मल्लिका अमर शेख म्हणतात, ''हजार लढाया लढलेल्या, जिंकलेल्या न हरलेल्या सेनापतीच्या व्यक्तिमत्त्वात जे शांत सामंजस्य, बहुविध, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे किंवा प्रगाढ अनुभवाची, ज्ञानाची, दु:खाची व क्वचित जंगली रासवट दु:ख हिंस्त्रभाव असतो. तशा त्यातल्या कविता जाणवतात.'' हे त्यांचे म्हणणे योग्य वाटते. ढसाळांची कविता कसदार आहे. ढसाळ हे प्रतिभावंत अस्सल दर्जाचे कवी आहेत, हे निर्विवाद सत्य आहे. नामदेव ढसाळ म्हणजे, मानवी आकांताचाशोध घेणारा कलावंतच! नामदेव ढसाळ कवी म्हणून मोठे आहेत आणि माणूस म्हणूनही त्यांनी कवीचा पायघोळ झगाा अंगावर कध

ाीच मिरवला नाही. राजकारणात तडजोड करणारे नामदेव ढसाळ नावाचा नेता वेगळा आहे. परंतु समाजाला आणि माणसांच्या गर्दीत हरवणारा, स्वत:चं अस्तित्व विसरून जाणारा नामदेव ढसाळ वेगळा आहे. लोकोत्तर कवी हे अस्सल प्रतिभावंत, पहिल्या दर्जाचे समकालीनांची अभिरूची बदलणारे आणि नंतरच्या अनेक पिढयांना प्रभावीत करून कवितेच्या प्रवाहाचं वळण बदलून टाकणारे कवी असतात. या लोकोत्तर परंपरेतच नामदेव ढसाळांचा समावेश करता येतो.

नामदेव ढसाळ ज्या कुटुंबात जन्माला आले, त्या कुटुंबावर नाथ संप्रदायाचे व वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले. तसेच लहानपणाचे काही दिवस खेडयात गेल्यामुळे गावाकडील बोली भाषा, मुंबईत आल्यानंतर तेथील भाषा, गावाकडच्या संस्कारातून परिचित झालेली लोकगीते, घरातील धार्मिक वातावरणामुळे संत साहित्याचा परिचय अशा विविध संस्कारातून ढसाळांची भाषा तयार झाली. हीच भाषा कवितेच्या अभिव्यक्तीच्या गरजेतून जशीच्या तशी त्यांनी वापरली. त्याचबरोबर खास महारी बोलीतील असणारे अनेक शब्दही त्यांच्या कवितेतून येतात. मुंबईत आल्यानंतर महानगराची भाषा तसेच लघुनियतकालिकाच्या चळवळीचे संस्कार, याच माध्यमातून युरोपियन साहित्याचा झालेला संस्कार यातून अनेकविध नव्या संकल्पना मांडताना वापरलेले हिंदी, इंग्रजी, उर्दू अशा अनेकविध भाषेतीलशब्द येतात. प्रमाण मराठीतील व बोलीभाषेतील शब्दाची विविध रूपेही त्यांच्या कवितेतून आढळतात. नामदेव ढसाळांची काव्यभाषा अशाप्रकारे विविध संस्कारातून आलेली आढळते. शिवाय प्रत्येक काव्यसंग्रहात तिची स्वतंत्र वैशिष्टये ही आढळतात.

कविता हा लेखन प्रकार कवीच्या संवेदनशीलतेशी निगडित असतो. कविता हा कवीचा जीवनानुभव असतो व त्या अनुभवाला एक अंतर्गत लय असते. कवीच्या आत्मानुभवाचा लयबद्ध आविष्कार म्हणजे कविता, अशी व्याख्या समोर ठेवून कवितेच्या सौंदर्याचे, कलात्मकतेचे अनुभवाच्या आशयाचे आणि कवितेमधून व्यक्त होणाऱ्या विचारांचे स्वरूप या अनुषंगाने समजून घेतल्यास आपण त्या कवितेच्या अधिक जवळ जावू शकतो, असेही कवितेबाबत बोलले जाते. यासदर्भात प्रा. तु. श. कुलकर्णी म्हणतात, ''साठोत्तरी कविता, बालगीते, विरूपिका, पुरोगामी विचार, औद्योगिकरण यांसारख्या प्रयोगात अडकवून पडली नाही. कलावाद, जीवनवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, अस्तित्ववाद, मार्क्सवाद यापैकी एकच एक दृष्टीकोन साठोत्तरी कवितेने स्विकारला नाही. स्वातंष्य म्हणजे जबाबदारी व कठोर परिश्रम हा विचार रूजण्याऐवजी जात, धर्म, पंथ, भाषा या बाबी प्रबळ झाल्या. व्यवस्थेत वरील प्रबळ झालेल्या बाबींबाबत साठोत्तरी कवितेने द्रोह (विद्रोह) करून यातून निर्माण झालेल्या प्रश्नावर आवाज उठविला.यावरून साठोत्तरी कवितेने विद्रोहाचे रूप धारण करून जगामध्ये चाललेल्या रूढी—परंपरेला छेद देण्याचे काम केले.

नामदेव ढसाळांचा अभ्यास करताना वारंवार वाटते की, नामदेव ढसाळ विद्रोही लिखाण का करत होते? तो साधरणपणे १९५३—५४ चा काळ असावा. जातीयवादी परिस्थिती आजूबाजूला होती. हॉटेलमध्ये सुद्धा बसू दिले जायचे नाही. बाहेरूनच पाणी दिले जायचे. तुच्छतेची अपमानास्पद वागणूक दिली जायची. भाकरी मागायला गेल्यावर 'जोहार मायबाप' असे

बोलावे लागायचे. परिस्थिती फारच भयंकर होती. अशा परिस्थितीमध्ये ढसाळ लहानाचे मोठे होत होते. त्यांना हा अन्याय वाटत होता. मात्र नामदेव ढसाळ लहानपणापासून बंडखोर होते. या परिस्थितीमधूनच ढसाळ विद्रोही झाले असावेत. कारण 'विद्रोह' हा अचानक येत नसतो. माणसाच्या वाटयाला जी परिस्थिती येते त्यातून माणूस घडत असतो. नामदेव ढसाळांविषयी सांगायचे म्हटले तर ढसाळ लहानपणापासूनच विद्रोही होते. ते कोणालाही घाबरत नव्हते. ते ज्या वातावरणात राहत होते. किंबहुना त्यांचे जे गुरू होते पूरकर बुवा तेच विद्रोही होते. त्यांना अन्याय सहन होत नव्हता. त्याचपमाणे त्यांचे मामा सुद्धा विद्रोहीच होते. ढसाळांचा मित्र परिवार भिमराव सोनवणे, कारभारी हिरामण सोनवणे, राजाराम हिरामण सोनवणे, सदाशिव जयराम ढसाळ, प्रल्हाद लक्ष्मण सोनावणे इत्यादी ही गॅगच म्हणावी लागेल. हा ढसाळांचा मित्रपरिवारदेखील विद्रोहीच होता.

१९७०—७५ च्या काळात दलित कविता आवेगााने पुढे आली. त्यामुळे केवळ मराठी कवितेतले नव्हे तर एकूणच मराठी साहित्य क्षेत्रातले वातावरण ढवळून निघाले. दलित आत्मकथनांच्या आधी दलित कवितेतूनच दलित मन प्रकट होण्यास प्रारंभ झालेला होता. सुरूवातीला ढसाळ—ढाले यांचा लघुनियतकालिकांच्या चळवळीशी जवळचा संबंध होता. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेला सर्वकष नकार आणि तिच्याविरूद्धचा जहाल विद्रोह हे दलित कवितेचे वैशिष्टय आहे. सामाजिक बांधिलकी हा तिचा स्वभाव आहे. विद्रोही जाणिवेचा हा पहिला वहिला स्फोट अत्यंत जोरकस शब्दात नामदेव ढसाळ यांच्या कवितेत समर्थपणे प्रकट झाला.

''सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला
आता अंधारयात्री व्हायचे नाकालेच पाहिजे''

(गोलपिठा, पृ. १२)

पूर्व पिढयांनी केलेली शतकांची अंधारयात्रा, त्यांचे दु:ख, अंधारयात्रिक होण्याचे नाकारण्याची कवी मनाची जिद्द त्यासाठी त्याला सूर्यफुले हाती ठेवणाऱ्या फकिराकडून मिळालेले मनोबल इत्यादी गोष्टी या ओळींतून कवी सुचवून जातो.

नामदेव ढसाळ हे बंडखोर कवी होते. त्यांनी त्यांच्या गावी म्हणजेच कनेरसर या गावचे एक न्यायाधीश यशवंत चंद्रचूर हे होते. त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वाडयात जागा दिली होती. त्या वाडयाला 'सुतारांचा वाडा' म्हणून होळखले जायचे. त्यावेळी हे न्यायाधीश उच्चवर्णीय लोकांना म्हणायचे, 'अरे! शिकू द्या त्या मुलांना (महारांच्या मुलांना) मात्र जो शिकवणारा मास्तर होता तोच जातीयवादी होता. त्याला म्हाराची पोरं शाळेत आलेली पटतच नव्हते. त्यांना हा मास्तर शिकवतच नसायचा. एकदा ढसाळांनी त्याला धडा शिकवायचा असे ठरवले. गुरूजी मराठा समाजाचा असल्याने या महारांच्या मुलांना मारायचा. त्यांचा द्वेष करायचा. याचा बदला घ्यायचे ढसाळांनी ठरविले. ज्या खुर्चीवर गुरूजी बसायचे त्या खुर्चीच्या खाली ढसाळांनी 'बोंडे' लावले होते. त्याचा परिणाम गुरूजींना खूपच त्रास झाला. त्याचा जाब विचारायला ते ढसाळांच्या घरी गेले. तेव्हा ढसाळ आणि त्यांचा आत्तेभाऊ भिमराव दगडू सोनावणे हे शाळेतून घरी गेलेच नाही. रात्री झोपायलाच गेले. त्यांच्या मामांनी ढसाळांना गुरूजींबरोबर काय केले असे विचारल्यावर गुरूजी आमच्याबरोबर

कसे वागतात सगळा तपशील ढसाळांनी मामाला दिला. उलट चुलते आणि मामा चिडले आणि चौताळून गुरूजींना जाब विचारायला गेले. तू आमच्या मुलांना का शिकवत नाहीस. हा प्रतिकार त्यांच्या रक्तामध्येच सळसळ करताना आपल्याला दिसतो. नामदेव ढसाळ त्यांच्या 'गोलपिठा' या काव्यसंग्रहात म्हणतात—

''रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी?
मरेपर्यंत राहायचे का असेच युद्धकैदी?''
(गोलपिठा, पृ. १३)

नामदेव ढसाळांसारखा कवी जो विद्रोहाची, बंडाची भाषा बोलतो कारण त्यांच्या डोळ्यापुढे समाज परिवर्तनाचे स्वप्न आहे आणि मूल्येदेखील आहेत, म्हणून तो कवी बोलतो आहे.

सामान्य वाचकाला हादरे देण्यासाठी नाही तर स्वातंष्य प्राप्त होवून अनेक वर्षे लोटली तरी वर्णव्यवस्थेच्या व समाज व्यवस्थेच्या रचनेमुळे ज्याला या देशाने स्वातंष्याने, काहीच दिले नाही. उलट सतत नैराश्य, लाचारी, दैन्य, अन्याय हेच दिले. त्यांच्यातलाच प्रक्षुब्ध झालेला कवी म्हणतो इथे दयावान कुणीच नाही. लाचारीतून लाचारीकडे जावे लागते. इथे सुधारक येतात आणि निघून जातात म्हणून ते म्हणतात—

''त्यांची सनातन दया फॉकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही
खरंच त्यांनी आपल्यासाठी आभाळात मांडव घातला नाही''
(गोलपिठा, पृ. १)

नामदेव ढसाळांची दृष्टी अशी भौतिकवादी असली तरी ती स्वार्थी नाही. एका विशिष्ट समाजाचे भले न होता संबंध मानवजात गुण्यागोविंदाने नांदावी असे मानणारी आहे. परंतु तसे काही घडत नाही. त्यांच्या ह्यदयात प्रचंड खळबळ माजते. काय करावे हे त्यांना सूचत नाही. त्यांची कोंडी होते. शेवटी ते यातून मार्ग काढतात. तो म्हणजे संपूर्ण अराजकाचा पुरस्कार करतात. परंतु अराजकाचा पुरस्कार करणारा हा कवी कोणी माथेफिरू नाही. पण अंध ाराने सूर्य पाहिला आहे. तेव्हा अगतिक किडयांसारखे जीवन आता नको हा विश्वास कवी व्यक्त करतो. यातनामय भूतकाळ आणि वेदनामय वर्तमानकाळ याविशवाय समोर काहीच दिसत नाही. म्हणूनच

काय काय लिहू
कस्सं कस्सं लिहू

अशी अगतिकता व्यक्त होते. मनाची तडफड, तगमग या शब्दांतून साकार होते. अन्याय, वर्णव्यवस्थेबरोबरच कवी दारिद्रय, अन्याय, अत्याचार यावर ही तेवढयाच त्वेषाने तुटून पडतो. फुटपाथवरच्या उपाशी पोराचे दु:ख कवीला अस्वस्थ करते. नामदेव ढसाळांच्या कवितेला चिंतनाची ठाम बैठक आहे. भाषा आक्रमक व जहाल असली तरी तिच्यामागे सच्ची तळमळ आणि विद्रोहाची तीव्र जाणीव आहे. कवीच्याविचारसरणीत मार्क्सवादी जाणिवा डोकावत असल्या तरी त्या येथे दोषरूप होत नाहीत. नामदेव ढसाळ यांच्या

काव्यसंग्रहामध्ये वारंवार प्रत्येक कवितेमध्ये म्हटलं तरी चुकीचे ठरणार नाही. शिव्यांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात पाहायला, वाचायला मिळतो. प्रश्न निर्माण होतो की, ढसाळ विद्रोही, आक्रमक, बंडखोर, जहालवादी आहेतच मग ते शिव्यांची भाषा का वापरतात? ज्याठिकाणी कनेरसर गावी राहत होते, त्या ठिकाणी सर्रास बोलण्यामध्ये शिव्यांचा वापर केला जायचा. त्यामुळे नामदेव ढसाळांच्या बोलणीत व लेखणीत बोली भाषेच्या शिव्यांचा जास्त प्रमाणात वापर येत असावा.

नामदेव ढसाळ 'मुक्ती' या कवितेत म्हणतात,

''रंडीबाज ईश्वराच्या आई
बघ तुझ्या व्याभिचाराचं अंतरंग
तुझ्या अनौरसपणाच्या वेलीला
कुठल्या अमानुषपणाचं फूल आलं आहे ते''
(गांडू बगीचा, पृ. ३७)

या कवितेत कवीने ईश्वराला अनौरस ठरवून त्याच्या देवपणाच्या रंगाला खरडून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वराच्या सभेतून मुक्त होण्यासाठी हेशुभकारक मानलेले आहे. शोषणाधिष्ठित समाजव्यवस्था जीवनातल्या सर्वच क्षेत्रांना आपल्या पंजाखाली दाबून टाकत असते. धर्म, कला, राजकारण, अर्थ यासारख्या सर्व क्षेत्रावरही सर्वकष वरंवटा ध ुडकावून देण्यासाठी पावला—पावलावर संघर्ष दिला पाहिजे ही जाणीव नामदेव ढसाळ या कवितेमध्ये फार समर्थपणे व्यक्त करतात. नामदेव ढसाळ यांना एवढा राग, द्वेष, मत्सर आहे की, ते आपल्या शिव्या संस्कृतीला सुद्धा देतात. ते कोणालाच सोडत नाहीत. ते पुढे म्हणतात—

''मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो,
तुझ्या संस्कृतीलाशिव्या देतो.
तुझ्या पाखंडीपणाला शिव्या देतो. ''
(गोलपिठा, पृ. ११)

नामदेव ढसाळ कोणालाही जुमानत नाहीत. सगळ्यांवर ताशेरे ओढतात. तिथेमाणूस असो किंवा संस्कृती. आई—बाप कोणालाही ते सोडत नाहीत.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेने येथील जीवन पाहिले आहे. मनुष्य जीवन सुंदर असूशकते. याची कल्पना या मनाला आहे म्हणून ते 'रस्त्याच्या कडेकडेने' या कवितेत म्हणतात,

''आपण इदीच्या बकऱ्याप्रमाणे बळी जायचे गुपचूप
तरीसुद्धा आत्म्याचे उदात्तीकरण करायचे का?''
(गोलपिठा, पृ. १४)

नामदेव ढसाळांनी इतरांप्रामणे मिळमिळीत जगणे नाकारले, म्हणून प्रस्थापितांच्या विरोधी जगणे स्विकारल्यानंतर त्यांच्या अनेकशक्तीकेंद्राला नकार देणे भागच पडते. कवी येथील सामाजिक स्थिती पाहतो आणि मनातून पेटून उठतो. नामदेव ढसाळ यांनी ''त्यांनी ईश्वराला हाकारले'' या कवितेत म्हणतात,

''थू: त्या ईश्वराच्या मायला!
एकदा तरी भडव्याने मुंगसासारखे तोंड दाखवायला हवेहोते!''
(तुही इयत्ता कंची, पृ. ५८)

नामदेव ढसाळांचा 'परमेश्वर' या गोष्टीवर विश्वासच बसत नाही. परमेश्वरच अस्तित्वात नाही असे त्यांना वाटते. ती भ्रामक कल्पना आहे. म्हणून देवाच्या भानगडीत मी पडत नाही. आपल्याला जेव्हापासून समजायला लागले तेव्हापासून ढसाळ देवाविषयीच्या भानगडीपासून अलिप्त राहिले. नामदेव ढसाळांची ही खरीखुरी सामाजिक बंडखोरी आहे. म.सु.पाटील म्हणतात की, ''ढसाळांना काहीनी तिसरा केशवसुत म्हणून गौरविले आहे. खरे तर त्यांना दुसरे केशवसुत म्हणायला हवे. मर्ढेकरांचे कविमन प्रतिनायकाचे आहे. त्यामुळे त्यांना दुसरे केशवसुत म्हणण्यापेक्षा त्यांची तुलना केशवसुतांशी न करणे बरे मात्र ढसाळांचा उपरोक्त गौरव रास्त म्हणावा लागेल.'' नामदेव ढसाळांनी वारंवार आपल्याकवितेतून बंडखोरी केलेली आपणास दिसून येते.

ढसाळांनी आपलं गाऱ्हाणे साहेबांना सांगितले की, माझ्या गावाला पाणी मिळत नाही. म्हणून गावातील मंडळी तुम्हांला भेटण्यासठी आले आहेत. त्यानंतर साहेब (पीए) तिसऱ्या दिवशी गावात आले. ढसाळांनी साहेबांना घरासमोर दीड ताास बसविले आणि पाण्याविषयी चर्चा केली. आज गावाला ढसाळांमुळे पाणी प्यायला मिळत आहे. ही सर्व कृपा ढसाळांचीच आहे. 'पाणी' या कवितेत ते म्हणतात,

''आम्ही जिथं जिथं पाय टाकू तिथं तिथं फुटतील उपाळ
निवाळचंग पाण्याचे
आणि मग आमच्यासकट कुणीच राहणार नाही तहानेला
आणि भाजणार नाही हीर पाण्याचा''
(गोलपिठा, पृ. ६५)

माणसाला जिवंत राहण्यासाठी पाणी किती आवश्यक आहे. त्याचप्रमाणे देवाला न मानता पाण्याला जास्त महत्त्व ढसाळ देतात. पाण्याला ढसाळ संजीवनी मानून समाजकंटकांना दोष देतात. आपल्या आत्मचरित्राचा चेहरा हरवू न देता ढसाळ जे जे जगणं जसं वाटयाला आलं तसं मांडत राहतात. नामदेव ढसाळ स्वत:च आपल्या अस्तित्वाच्या मुळांकडे ज्या घुसमटीतून प्रवास करतात, ती सर्व घुसमट आहे तरी आपल्या कमावलेल्या भाषेतून, शैलीतून वाचकांकडे कशी संक्रात करतात ते बघण्यासाठी आहे, म्हणून 'आत्मचरित्र' या कवितेतत ढसाळ स्वत:चे प्रतिबिंब रेखाटण्याचा प्रयत्न करतात.

''पाण्याच्या दर्पणात विचलित होणारे चित्र माझेच आहे
लाटांच्या मस्तकावरलाशुभ्र फेनील संभार,
अवकाश आणि वेळ यामधल्या अस्मितेला स्पर्शून जातो.
नरक यातनांचे बुरूज हळूहळू कोसळू लागतात.''
(या सत्तेत जीव रमत नाही, पृ. १०४)

या कवितेतून व्यक्त झालेला आत्मशोध म्हणजे 'जीवनाबरोबर हलवणारे, विचलित होणारे 'मी'चे चित्र आहे. हे चित्र आखीव, रेखीव नाही, तरीही त्या प्रतिबिंबाला एक अस्थिर

का होईना पण एक चेहरा आहे. याची कवीला जाणीव आहे. या चेहऱ्याची ओढाताण करू नये अशी कवीची स्वाभाविक इच्छा आहे. आपल्या कवितेच्या भूमिकेविषयी ढसाळ लिहितात, ‘‘...माझी कविता खेडयापाडयातील वैराण दारिद्रयाचा, अज्ञानाचा, दुःखाचा वेध घेते, तिरस्कार करते, त्यांच्या मुळावर घाव घालते. हे होत असताना माझ्या कवितेला पिळदार कलात्मक घाट येतो. माझी कविता वर्गशत्रूंशी हाडवैराचा खेळ करते....माझी कविता वाचून सर्वहारा वर्ग त्वेषाने जागून उठेल ही इच्छा मी का बाळगू नये?’’ म्हणजे आपली कविता हा सर्वहारा शोषित वर्गाचा महाउद्‌गार आहे. याची सार्थ जाणीव कवीला आहे. त्याचबरोबर आपल्या कवितेला पिळदार कलात्मक घाट आहे याची ही जाणीव कवीने व्यक्त केली आहे. नामदेव ढसाळ यांच्या कवितांचा अभ्यास करताना असे लक्षात आले की, त्यांच्या काव्यविश्वावर त्यांच्या सभोवतालच्या वातावरणाचा, परिस्थितीचा, बदलणाऱ्या जीवनशैलीचा, शिव्यांचा, अन्याय—अत्याचारांचा, प्रतिकांचा, विद्रोहाचा उद्रेक मोठया प्रमाणावर त्यांच्या लेखण्यीवर झालेला दिसून येतो. नामदेव ढसाळांनी समाजामध्ये चालणाऱ्या विचारसरणीचा बारकाईने अभ्यास करतात. त्याची चिकित्सा करतात. त्याचा प्रस्थापित घडणाऱ्या घटनांशी संबंध लावतात आणि या चिंतनातून त्यांची कविता तयार होते. म्हणून ढसाळांची स्वतःची अशी काव्यप्रतिभा निर्माण झाली आहे. आणि तिने मराठी कवितेच्या आधुनिक कालखंडात स्वतःचे स्थान प्राप्त केले आहे.

**संदर्भ**


१. कुलकर्णी तु. श., ‘स्वातंत्र्योत्तर मराठी कविता १९६१—८०, साहित्य अकादमी’, मुंबई, दु.आ. २००८, प्रस्तावना.

२. ढसाळ नामदेव, ‘गोलपिठा’, लोकवाङ्‌मय गृह, बारावी आवृत्ती, जानेवारी २०१५.

३. ढसाळ नामदेव, ‘गांडू बगीचा’, शब्द पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती, १५ फेब्रुवारी २०१४.

४. ढसाळ नामदेव, ‘तुही यत्ता कंची? तुही यत्ता’, शब्द पब्लिकेशन, पाचवी आवृत्ती, डिसेंबर २०१७.

५. ढसाळ नामदेव, ‘या सत्तेत जीव रमत नाही’, शब्द पब्लिकेशन, चौथी आवृत्ती, डिसेंबर २०१५.

६. ढसाळ नामदेव, ‘पुन्हा एकदा कविता’, (संपा. ना.धों. महानोर, चंद्रकांत पाटील), नीलकंठ प्रकाशन, पुणे आवृत्ती पहिली १९८२.

७. पाटील म.सु., ‘दलित कविता’, लोकवाङ्‌मयगृह, बारावी आवृत्ती, जानेवारी २०१५.


◆◆◆

# पारधी समाज

**डॉ. प्रतीक्षा गायकवाड**
मराठी विभागप्रमुख,
पेमराज सारडा महाविदयालय, अहमदनगर

पारधी म्हणजे पारध करणे अर्थात शिकार करणे या शब्दावरून पारधी या जातीचे नाव आलेले आहे. याच जातीसाठी शिकारी, बहेलिया, मोधिया आणि टाकणकार /टाकणकार हे तत्सम शब्द म्हणून वापरण्यात येतात. वास्तविक पाहता रूढार्थाने पारधी शिकारी नाहीत. कारण शिकारी बंदुकीचा वापर करतात. मात्र पारधी करीत नाहीत. पारध्यांचाच कथेनुसार पारध्यांचा पूर्वज गोंड होता. त्याला महादेवाने फासे टाकण्याची कला शिकविल्यामुळे तो गोळी मारून (बंदुकीने) प्राणी मारण्याच्या पापापासून वाचू शकेल. तेव्हापासून ते केवळ फासे, जाळे आणि सापळे लावूनच शिकार करू लागले.

महाराष्ट्राच्या सोलापूर, सांगली, कोल्हापूर जिल्हयात तसेच विदर्भात आणि खानदेश भागात विपुल प्रमाणात आढळणारी ही जात आहे.

विमुक्तपणे भटकंती करणारी ही जमात विदर्भातल्या चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, अमरावती इ. जिल्हयात अजूनही भटक्या स्वरूपात पारधी दिसतात. खानदेशात बहुसंख्येने असलेले पारधी हे फार पूर्वी गुजराथ मधून आले असून त्यांच्या बोलीत गुजराथीचे मिश्रण आढळते. मानवशास्त्रांच्या मते राजपुतांमधील निष्काषित बावरीया तसेच गोंडामधील तळागाळातले एकत्रित येऊन ही भटकणारी जमात बनली असावी.

## गुन्हेगार जमात–

इंग्रजांच्या काळात या लोकांची गुन्हेगार म्हणून नोंद झाली होती. त्याकाळात ज्या पारध्यांना इंग्रजांनी बंदिस्त केले होते. ते आजही त्याच ठिकाणी स्थिर झालेले आढळतात. नंतरच्या काळात गावगाडयाशी ज्या पारधी जमातींचा संबंध आला किंवा गावाशेजारीच ज्यांनी

आपली वस्ती कायम केली, ते गावपारधी म्हणूनच स्वतःची ओळख सांगताना दिसतात. पुणे येथील मुंढवा येथे राहणारी पारधी समाजातील लोक स्वतःची ओळख गावपारधी म्हणून करून देतात. ते मूळचे विजापूर जिल्हयातील 'इंडी' आणि 'होडगी' या गावाचे होय. इंग्रजांनी भटक्या विमुक्तांसाठी दिलेली 227 एकर माळरान जमीन मुंढवा येथे असून त्यातील काही भाग मुंढव्याचे गावपारधी स्वतः कसत असून त्यावर उपजीविका करतात.

**'पारधी' समाजाच्या पोटजाती:**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये हा समाज मोठया प्रमाणात विखुरलेला आहे. अर्थातच फासेपारधी या नावाने तो सर्वपरिचित आहे. परंतु फासेपारधी ही पारधी समाजातील एक पोटजात असून गावपारधी, भिल्लपारधी, हरणपारधी, पालपारधी व चित्तपारधी हे रानोमाळ भटकंती करून मिळेल, त्यामार्गाने आपली उपजीविका करतांना दिसतात. ते एकाठिकाणी दीर्घकाळ वास्तव्य करीत नाहीत.

1) गावपारधी – हे गावाच्या आश्रयाने राहतात.

2) भिल्लपारधी –हे जंगलाच्या आश्रयाने राहतात. शिकार करणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असून गुन्हेगारीत हे लोक अत्यंत तरबेज आहेत. त्यांना चोरशा किंवा 'पठाणपारधी' असेही म्हटले जाते. हल्ली हे लोक स्वतःला 'धनगरपारधी' म्हणवून घेतात.

3) पालपारधी – यवतमाळ व चंद्रपूर जिल्हयात तंबू म्हणजे पाल टाकून राहणारे ते 'पालपारधी' असे मानले जाते.

**'पालपारध्यां'च्या पोटजाती–**

1) शिकारी किंवा भिल्ल पारधी – हे पारधी बंदुकीने शिकार करतात.

2) फासेपारधी – हे फासे टाकून व सापळे लावून शिकार पकडतात.

3) लंगोटी पारधी – हे केवळ लंगोटी लावूनच वावरतात.

4) टाकणकार – हे दगडाचे पाटे व जाते टाकविण्याचे (टकटक असे त्यावर हत्याराने मारून त्याला खरबरीत कडून देण्याचे काम ते करतात.

या सर्वांमध्ये लंगोटी पारधी आणि टाकणकर पारधी हे 'गुन्हेगारी प्रवृत्तीचे' मानले जातात.

**आणखी इतर जमाती** – याशिवाय विविध भागांमध्ये जिल्हयांमध्ये पारध्यांचे आणखी काही प्रकार आढळतात.

1) चित्तेवाले पारधी – हे पारधी चित्त्याची शिकार करतात ते

2) गायकी पारधी – हे पारधी गायी, बैल हे सावज म्हणून बांधून शिकार करतात ते हा समाज स्वताची ओळख राजपारधी म्हणूनही करून देतो, हे लोक गाईला अतिशय पवित्र मानतात. गाय हे त्यांचे वाहन असून गाईच्या साथीने हे लोक ससे, तरस, चित्तर, पारा, होला यांची शिकार करताना दिसतात? गावाच्या बाहेर पाले ठोकून हे लोक तात्पुरत्या स्वरूपात निवा–याला राहतात.

3) गोसावी पारधी – हे पारधी गोसाव्यासारखा ( धार्मिक भिक्षेकरीसारखा भगवा ) पोषाख करतात आणि हरी मारत नाहीत तर फक्त कोल्हे व सशांचीच शिकार करतात.

4) शिशी के तेलवाले पारधी – हे पारधी मगरीचे तेल काढून विकतात.

5) बंदरवाला /माकडवाले पारधी – हे पारधी माकडांचे खेळ करीत फिरतात. त्याच्यावरच उदरनिर्वाह करतात.

उत्तर हिंदूस्थानात याच जातीला बेहोलया ना असून विदर्भ भागात बहोलेया आणि पारधी मिसळून गेलेले असून ते ओळखता येत नाहीत. त्यांच्या भाषेमध्ये मारवाडी आणि हिन्दीचे संमिश्रण आढळते. खानदेशातल्या पारध्यांच्या भाषेत गुजराथीचे मिश्रण आढळते. बहोलियांमध्ये कारजात नावाची पोटजात आढळते ते मराठीत बोलत असले तरी उर्दू व फारशी बोलणारे पण पारधी काही भागात आढळतात.

**'पारध्यां'च्या रूढी परंपरा** –

1) **'पारध्या'ची जातपंचायत** – इतर भटक्या विमुकत्याप्रमाणे पारधी समाजात जातपंचायतीला मान्यता आहे पारध्यांच्या वेगवेगळया पोटजातीत जातपंचायतीचें स्वरूप, संकेत नियम आणि शिक्षांचे प्रकार निरनिराळे आहेत 'गावपारध्यां'मध्ये 'पवार' आडनावाचे घराणे प्रमुख असुन पंचायतीचे प्रमुख पद परंपरेने पवारांच्याकडे असते तर फासेपारध्यांमध्ये पंचप्रमुख म्हणून तखालेदार पाटील असतो जातीअंतर्गत अनैतिक संबंध ठेवण त्या पुरूष किंवा स्त्रीस जातीतून बहिष्यकृत करण्याची शिक्षा दिली जाते किंवा हजार ते बाराशे रूपयांचा दंडलेला जातो.

'गावपारध्यां'च्या कवडीचा दंड हा नामुश्कीचा समजला जातो. स्त्रीने व्यभिचार केला असता उकळया तेलातून पैसा काढण्याची शिक्षा तिला देतात किंवा खरे – खोटे करण्यासाठी तापलेली कु–हाड हातांत घ्यायला लावतात. पूर्वी नाक, कान कापून धिंड काढण्याची शिक्षा दिली जात असे.

गुन्हाच्या स्वरूपावरून संबंधीत व्यक्तीस शिक्षा 500 रूपये दंड, जोडा मारल्यास 10रू दंड, तर लाथ मारल्यास 600 रूपयांचा पर्यंत दंड केला जातो.

2) '**पारध्यां'ची दैवते आणि उत्सव** – पारधी समाजाने आपल्या पोटजातीत निरनिराळया कुळांच्या नावाने देवतांची विभागणी केलेली आहे. पवार, भोसले, शिंदे, काळे ही या समाजातील चार प्रमुख कुळे मानली गेली असून , पवार, शिंदयांनी महालक्ष्मी, भोसल्यांनी भवानी तर काळयांनी काळूबाई आणि दुर्गादेवी कुलदैवते म्हणून स्वीकारली आहेत.

**जत्रेचे स्वरूप – भवानी मातेची जत्रा –**

पारधी समाजात दस—याला भवानीमातेची जत्रा मोठया प्रमाणात साजरी केली जाते ही जत्रा 3 दिवस चालत असूनया जत्रेत 4 कुळांतले लोक एकत्र येत नाहीत. या जत्रेमध्ये प्रत्येक कुळासाठी ठराविक दिशा वाटून देण्यात आलेली आहे. त्या त्या दिशेप्रमाणे कुळातले लोक जाऊन देवीची यात्रा करून येतात. या जत्रेत स्त्रीला अस्पृश्य मानत असल्यामुळे जत्रेच्या वेळची स्वयंपाकाची सर्व कामे पुरूषच करतात.

जत्रेच्यावेळी दस—यापूर्वी 9 दिवस उपवास केले जातात. 10 व्या दिवशी रात्री वारा वाजता होम पेटविला जातो त्यांनतर भक्ताच्या अंगात देवी येते, असा समज आहे. रात्रभर हे लोक पूजापाठ करतात. सूर्योदयापूर्वी होमाजवळ रेडा आणतात. देवीचा भक्त रेडयाच्या अंगावर पाणी टाकतो. पाणी अंगावर टाकताच रेडयाने अंग झाडले, तर त्याचे पाय बांधून त्याच्या मानेवर धारदार हत्याराने मारले जाते. मानेतील मांसाचा तुकडा काढून पेटत्या होमात. देवीला नैवेद्य टाकला जातो . नंतर रेडयाच्या मानेला ज्या ठिकाणी कापलेल असतो तेथून वाहणार रक्त देवाचा भक्त त्या जखमेला तोंड लावून पितो. यात्रेकरूसुध्दा देवीचा प्रसाद म्हणून ते रक्त पितात. नंतर रेडयांला होमाजवळ आणून ठार मारतात आणि देवीचा प्रसाद म्हणून मांसाची वाटणी केली जाते, याला 'टोणगा मारणे' असे म्हटले जाते, अशा प्रकारचा विधी या समाजात अत्यंत पवित्र मानला जातो. दस—याच्या दिवशी कर्ज काढून का होईना टोणग्याचा बळी दिला जातो बळी दिलेला ठिकाण हे समाजात देवीची ठाणे किंवा पवित्र ठिकाण म्हणून जाहीर केले जाते अशा ठाण्यात किंवा पवित्र ठिकाणी लोकांना वस्ती करण्यास मनाई आहे.

### 3) विवाह प्रथा –

पारधी समाजातील पोटजातींमध्ये विवाहाचे प्रकार आणि नियम वेगवेगळे असल्याचे दिसून येते. फासे पारध्यांमध्ये मुलगी उपवर झाल्यानंतर लग्न केले जाते तर 'गावपारधी, भिल्लपारधी' यांच्यात बालविवाहाची प्रथा रूढ असल्याचे समजते

या समाजात विवाहाप्रसंगी मुलाने मुलीला मागणी घालावयाची असते. यावेळी मुलीकडून मुली 4 ते 5 हजार रूपये 'दयाज' देण्याची पध्दत आहे. या पध्दतीने जर एखाद्या मुलीचा विवाह झाला आणि विवाहानंतर काही दिवसांनी ती मुलगी जमातीतल्या अन्य पुरूषाला आवडली आणि तिच्या पहिल्या नव–याला तिला सोडण्याची इच्छा असेल तर विवाहाच्या वेळी त्या बाईच्या नव–याने 'दयाज' म्हणून घेतलेले पैसे ती बाई पत्नी म्हणून घेऊन जाते. त्या बाईला मुले असतील तर तिच्या पहिल्या पतीकडे ती ठेवली जातात. याशिवाय पतीने ठरल्याप्रमाणे मुलीच्या वडिलांना व्याज दिले नाही तरी लग्नानंतर मुलीचा बाप दुस–याकडून पैसे घेऊन तिचे दुसरे लग्न लावून देतो. इतकेच नाहीतर स्त्रीला गहाण ठेवण्याची किंवा उसने ठेवण्याची पध्दत किंवा कर्जाच्या मोबदल्यात कर्ज फिटेपर्यंत कर्ज देणा–या इसमास मुलगी वापरण्यास देण्याची पध्दत या समाजात होती.

कर्जापायी मुलगी किंवा पत्नीला गहाण ठेवले असेल तर आणि कर्ज फिटेपर्यंत त्या स्त्रीला मुलबाळ झाले तर कर्ज पूर्णपणे फिटल्यानंतर मुले त्या इसमाकडे ठेवून ती बाई आपल्या बापाच्या किंवा नव–याच्या घरी येत असे.

पारधी समाजात जशी बहुपन्तीकत्वाची चाल आहे, तसेच बायका सोडण्याचे प्रमाणही गोठया प्रमाणात आहे.

### 4) मर्तिका प्रथा –

पारधी समाजात मयत करण्याच्या दोन पध्दती आहेत. 'गावपारधी' मृताचे दफन करतात. त्यावेळी खोल खडड्यात प्रेताला बसण्यासाठी छोटी देवळी केली जाते. त्यावेळी देवळीत प्रेताला बसवूनच मग अंत्यविधी होतो. दहाव्या दिवशी मृत व्यक्तीच्या आवडीचे पदार्थ आणि दारू ठेवली जाते. तर त्याचठिकाणी पुढे प्रेताच्या नावाने थडगे बांधले जाते.

तर 'फासेपारधी' या पोटजातीत प्रेताचे दफन होते. परंतु प्रेत वाहून नेण्याची पध्दत थोडी विचित्र आहे. हे लोक प्रेत मोठया काठीला अडकविलेल्या झोळीत नेतात. कुटुंबातील

जवळची माणसंच प्रेताचे खांदेकरी असतात. या समाजात प्रेतयात्रेस येण्यास स्त्रियांना बंदी असते. तेराव्याला बोकड कापून मृत आत्म्यास शांती देण्याची रीत यांच्यात आहे.

'प्रेत जाळणे' यांच्या समाजात चांगले मानले जात नाही. या समाजाच्या रीतीनुसार प्रेत जाळणे म्हणजे वंश जाळण्यासारखेच होय. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी मयत होते, त्या ठिकाणी या समाजातील लोक राहत नाही, तर दुस—या ठिकाणी वास्तव्य करू लागतात.

**5) स्त्रीचे बाळंतपण**—

या समाजात स्त्रियांचे बाळंतपण पुरूष करताना दिसतात. बाळंतपणासाठी यांच्या स्त्रिया दवाखान्यात जात नाहीत. राहत्या घरी किंवा उघडयावर पारधी स्त्री बाळंत होते. त्याप्रसंगी संबंधित महिलेचा पती असावाच लागतो. जर एखादी स्त्री लवकर बाळंत होत नसेल तर पतीने किंवा बापाने तिच्या पोटावर पाय देण्याची रीत या समाजात आहे— (जाती आणि जमाती)

**उतरती कळा** —

गेल्या अनेक वर्षापासून हा पारधी समाज महाराष्ट्रात भटकंती करून ऊदरनिर्वाह करीत आहे. अनेक वाईट रूढी—परंपरा, चालीरीतींना तो बळी पडलेला आहे. सातत्याने हा समाज भटकंती करीत असल्यामुळे पारधी समाज शिक्षणापासून वंचित राहिला. आणि पराकोटीचे दारिद्रय आणि मागासलेपण घेऊनच तो जगत राहिला.

**सद्यःस्थिती** —

पुण्यातील मुंढवा येथे गावपारध्यांचे वास्तव्य असून त्यांची थोडीफार शेती असल्याने शेतीवरच उदरनिर्वाह करतात. मात्र फासेपारधी, गायपारधी किंवा थोडयाफार प्रमाणात असलेले भिल्लपारधी हे शेतीव्यतिरिक्त अन्य मार्गानी उपजीविका करतात. भीक मागून पोट भरणा—या फासे पारध्यांची अवस्था फारच विचित्र आहे. भीक मागून पोतभर भाकरी ते गोळा करतात. पण भाकरीबरोबर खायला त्यांना चटणीदेखील मिळत नाही.

गेल्या काही वर्षापासून शहराच्या जवळ राहणा—या पारधी समाजातील काही लोकांमध्ये सामाजिक जाणीव दिसून येते. मात्र बहुसंख्य प्रमाणात पारधी समाज शैक्षणिकदृष्टया आणि आर्थिकदृष्टया मागासलेला दिसतो आहे. महाराष्ट्र शासनाने भटक्या विमुक्तांची जी यादी केली, त्यामध्ये 'पारधी', 'फासेपारधी', 'लंगोटपारधी', 'बहेलिया पारधी', 'चित्तापारधी', 'शिकारपारधी',

'टाकणकार', 'तकिया' आणि 'पालपारधी' या पोटजातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये केलेला आढळतो. मात्र 'गावपारधी' आणि 'हरणपारधी' या तत्सम जातींचा समावेश विमुक्त जमातीत करण्यात आलेला आहे.

सरकारने दिलेल्या सवलती, योजना या पारधी समाजापर्यंत पोहोचलेल्या नाहीत. घटनेने दिलेल्या न्याय हक्कांची त्यांना जाणीव नाही. हा समाज इंग्रजांच्या काळात गुन्हेगार म्हणून परिचित असला तरी स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याच देशवासियांकडून तो उपेक्षित राहिलेला दिसून येतो. आजही गुन्हेगार म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. तर बहुजन समाजाच्या नजरेत त्यांच्याविषयी तुच्छतेची आणि संशयाची भावना कायम राहिली. गाव नसल्यामुळे कायमच्या नोंदी नाहीत. तसेच जातींचे दाखलेही नाहीत आणि जातीचे दाखले नसल्यामुळे सरकारी दरबारी कोणतेही प्रकरण होत नाही. ही मुख्य अडचण या समाजाची आहे.

आज हा पारधी समाज थोडयाफार प्रमाणात जागृत होऊ पाहतो आहे. त्यांना जीवनात स्थैर्य हवे आहे. गुन्हेगारी वृत्ती, वाईट रूढी, परंपरा मोडण्याच्या ते प्रयत्नात आहेत. इतर पुढारलेल्या समाजाने त्यांना समजावून घेऊन सहकार्य करायला हवे. असे झाले तरच या समाजातील लोकांना भटकेपण, दारिद्रयमय जीवन संपण्यास काही प्रमाणात साहाय्य होऊ शकेल असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ –**

1) जाती आणि जमाती – श्री. रंगनाथ चव्हाण

2) महाराष्ट्रातील जाती आणि जमाती – श्री. देवळगांवकर

3) Mr. m.Wvikipedia.org

◆◆◆

# संत साहित्यातील पर्यावरणाचा विवेचक अभ्यास

**श्री.हनुमान भरत सांगळे**
एम.ए., नेट (मराठी), डी.एड., बी.एड.

**प्रस्तावना :-**

सध्या सर्वांना भेडसावणारा ज्वलंत प्रश्न म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास होय. एवढया मोठ्या महाभयंकर प्रश्नाचा भविष्य कालीन व कलयुगातील मानव जातीचा गुणधर्म लक्षात घेऊन मध्ययुगीन संतानी ७०० वर्षापूर्वी त्यांच्या साहित्यातून पर्यावरणाचे विशेष महत्व समाजिक प्रबोधनाद्वारे पटवून दिले. उदा. ओव्या, अभंग, गवळणी, भारुडे, ई. कारण त्यांनी त्याच वळेस जाणले होते कि, काल्युगाटला अधुनिक माणूस हा स्वतःच स्वतःचा शिल्पकार होणार परंतु त्याच्या अतिरिक्त प्रगतीमुळे आणि हव्यासापोटी माणूस स्वतःच स्वतःचा आणि जगाचा विध्वंसक बनणार हे मात्र निश्चित असल्याने संतानी संत साहित्यामध्ये मानवाच्या काल्यानासाठी पर्यावरणाचे प्रबोधनात्मक साहित्य निर्माण करून ठेवलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर , संत नामदेव, संत सावतामाळी, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास आदि संतांच्या नावाचा उल्लेख करता येईल. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वरील संतांच्या साहित्याचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :-**

१) संत साहित्याचे अध्ययन करणे.
२) संत साहित्यातील पर्यावरणवादी विचारांचे अध्ययन करणे.
३) पर्यावरण संवर्धनासाठी संत साहित्याची आवश्यकता तपासून पाहणे.
४) संत साहित्यातील पर्यावरणवादी विचारांचा शोध घेऊन प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून नव्याने मांडणी करणे.
५) पर्यावरणाचे महत्व व उपयोगिता पटवून सांगणे.

**गृहीतके :-**

१) संत साहित्य हे प्रबोधनात्मक साहित्य आहे.
२) संत साहित्यामध्ये जन जीवनाच्या संरक्षणार्थ पर्यावरण संवर्धनाचे विचार मांडलेले दिसून येतात.
३) जन जीवनाच्या सुरक्षिततेसाठी पर्यावरणाचे संवर्धन आणि यासाठी संत साहित्याची आवश्यकता असल्याचे पहावयास मिळते.

**संत साहित्यातील पर्यावरणवादी विचार :-**

ई.स. ११ व्या शतकापासून पातशाही, सरंजामशाही, गुलामगिरी, सावकारी, अंधश्रद्धा, भूतबाधा, करणी, तोटगे, मानवाला अ मानवी वागणूक, ई. समस्यांवर व परिस्थितीवर मात करून समाजाची घडी बसवण्यासाठी महाराष्ट्रातील संतांनी मानवी जीवनासाठी व जन

कल्याणासाठी समाज प्रबोधनाबरोबरच पर्यावरण संरक्षणाचा विचार समाजाच्या मानावर नुसता बींबवलाच नाही तर तो संत साहित्यामध्ये लिहून सुद्धा ठेवलेला आहे.

११ व्या सत्कात मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांनी त्यांच्या विवेकसिंधू या ग्रंथात तर दासोपंत यांनी त्यांच्या पासोडी या ग्रंथात अध्यात्म व समाज प्रबोधनाबरोबर पर्यावरणावर देखील लिखाण केलेले आहे. तसेच १२ व्या शतकात आद्य शंकराचार्य यांनी अध्यात्म बरोबर पर्यावरणावर लिखाण केलेले आहे. १३ व्या शतकाच्या सुरुवातीस महानुभाव पंथातील श्री.चक्रधर स्वामी व माहीभट यांनीहि अध्यात्म नि समाजप्रबोधनाबरोबरच पर्यावरणावर लिखाण केलेले अहहे.

**संत ज्ञानेश्वर :-**

मध्ययुगीन संतानी त्यांच्या संत साहित्यात पर्यावरणावर विशेष भर दिलेला आढळून येतो. उदा.संत ज्ञानेश्वर यांनी त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथातून तसेच इतर अभंग गवळणी चन्गदेव पासष्टी अमृतानुभव इत्यादी मधून पर्यावरण विषयक माहिती सांगितलेली आहे. ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायातील २३५ व्या ओवीमध्ये ज्ञानेश्वर म्हणतात कि,

**कल्प द्रम हन पारिजातु गुणे चंदनु हि वाढ विख्यातु**

**तरी यया वृक्ष जाता आतु अश्वथु तो मी**

म्हणजे पारिजात चंदन सुव्सिक वेळी फुले परिमळ व रसाळ फळांची झाडे यामध्ये तर मी असतोच परंतु पिंपळाच्या झाडात मी विशेष करून असतो असे भगवान श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात असा उल्लेख संत ज्ञानेश्वारांनी केलेला आहे. त्यानंतर १३ व्या अध्यायातील १७९ व्या ओवीमध्ये ज्ञानेश्वर म्हणतात कि,

**अगा वृक्षासि पाताळी जळ सापडे मुळी ते शाखांचीये भाळी बाहेर दिसे**

**१८० व्या ओवीमध्ये का भूमीचे मार्धव सांगे कोंबाची लवलव**

यामध्ये संत ज्ञानेश्वरांनी जमिनीचा प्रकार कसा ओळखावा, झाडाची लागवण करून टी कशी जोपासावीत यचे मार्मिक प्रबोधन केलेले आहे. १४ व्या अध्यायामध्ये २३३ व्या ओवीमध्ये नागरेचि रचावि जलाशये निर्मावी महावने लावावी नानाविध वरील ओव्यांमधून संत ज्ञानेश्वर जमिनीचा प्रकार ओळखण्यायापासून, बी पेरण्यापासून झाडे लावण्य्यापासून टी कशी सांभाळावीत याचे मूल्यवर्धित मार्दर्शन करत आहेत तसेच पर्यावरणाचा ऱ्हास न करता त्यावरील उपाय म्हणून पर्यावरण संवर्धन कसे करावे याचे मार्गदर्शन करतात.

**संत नामदेव :-**

संत नामदेवांनी त्यांच्या अभंगवाणी मधून पर्यावरणविषयी मार्गदर्शन केलेले आहे. त्यामाध्ये

**वन वृक्ष वल्ली ईश्वरा समान ऋषी मुनी जन राहते जेथे १**

**होऊनिया पक्षी कमोड कोकिळा वेष्टिले स्थळा ब्रम्हाबोधे २**

**मायुरादी पक्षी नृत्य करिताती नद्या वाहताती दोही थड्या १ भूमीवरी सडे केशर कस्तुरी आनंद अंतरी सकळांच्या २ विमानांची दाटी सुरवर येती गंधर्व गट्टी सप्त स्वरे ३ मंद मंद**

**मेघ गर्जना करिती वाड्या वाजताती नानापरी ४ नामा म्हणे स्वर्गी नगरर वाजती पसारा नाचती आनंदाने ५**

वरील अभंगातून संत नामदेव सांगतात कि, जर वृक्ष वल्ली नद्या विहिरी तलाव इत्यादी सर्व पर्यावरण व्यवस्थित असेल तर सर्व सामान्य जनता व तिचे आरोग्य चांगले राहील परंतु त्या ठिकाणी ऋषी मुनी स्वर वार गंधर्व स्वतः देव देवता आनंदाने गावून नाचून रममाण होतील व सर्व श्रुष्टीचे कल्याण होयील असा संदेश देतात.

**संत सावतामाळी :-**

**संत सावता माली म्हणतात आमुची माळीयाची जात शेत लाऊ बगाईत १ आम्हा हाती मोट नाडा पाणी जाते फुल झाडा २ शांती शेवंती फुलली प्रेमे जाई जुई व्याली ३ सावत्याने केला मळा विठ्ठल पायी देखियेला डोळा ४**

**कांदा मुळा आणि भाजी अवघी विठाबाई माझी १ लसूण मिरची कोथिंबिरी अवघा झाला माझा हरी २ ऊस गजर रताळू अवघा झालासे गोपाळू ३ मोठ नाडा विहीर दोरी अवघी व्यापिली पंढरी ४ सावता म्हणे केला मळा विठ्ठल पायी गोविला गळा ५**

वरील अभंगातून संत सावतामाळी यांनी स्वतः शेती करून, जीरायीत शेती, बागायीत शेती, भाजीपाला फळबाग, फुलझाडे व वृक्ष यांची लागवड कशी करावी त्यांना कसे जोपासावे व सांभाळावे याचे मार्मिक मार्गदर्शन केलेले आहे.त्यांच्या स्वतःच्या शेत मळ्यामध्ये सर्व प्रकारच्य आवृक्ष वेळीमध्ये प्रत्यक्ष पांडुरंग पाहून त्यामधून पर्यावरण संवर्धन कसे करावे याचे मार्गदर्शन केलेले आहे.

**संत तुकाराम :-**

संत तुकाराम हे संत रामदास स्वामी व छ.शिवाजी महाराज यांचे समकालीन असून छ. शिवाजी महाराज हे त्यांचे परम भक्त होते. संत तुकारामांनी स्वतः शेती करून व भंडाऱ्या डोंगरावर जावून तपश्चर्या करून विठ्ठल नामामध्ये दंग राहून शेतीतून व आरण्यातून आलेल्या अनुभूतीचा उपयोग करून जन कल्याणासाठी पर्यावरणाविषयी मार्गदर्शन केलेले आहे ते अभंग गाथेतील अभंगामध्ये म्हणतात कि,

**बीज पेरी शेती मग गाडे वारी वाहती १ वाया गेले ऐसे दिसे लाभ त्याचे अंगी वसे २ पाल्याची जतन तरी प्रत्यय येती कण ३ तुका म्हणे आळा उदक देता लाभे फळा ४**

त्यानंतर

**वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती**

**बीज तो अंकुर पत्र शाखा फळ प्राप्त बीज मूळ अवघे नासे**

**शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी**

**सिंचन करिता मूळ वृक्ष ओलावे सकळ**

याप्रमाणे संत तुकारामांनी शेतीमध्ये बीज पेरण्यापासून ते त्याचे पूर्णपणे संवर्धन करून त्याचा उपयोग मानव जातीस कसा होतो हे तर दाखवून दिलेच आहे परंतु त्याच बोबर पशु

पालन करून त्यांचा उपयोग कसा करावा हे सांगितलेले आहे. यामधून त्यांनी पर्यावरणाबाबत मार्गादाशान्न केलेले आहे.

**उपसंहार**

उपरोक्त नमुनादाखल संत साहित्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि, संतांनी केवळ सामाजिक प्रबोधनच केले नाही तर मानव , पशु,पक्षी व सर्व श्रुष्टीच्या कल्याणासाठी पर्यावरणाचा ऱ्हास का करू नये व त्याचे संवर्धन कसे करावे हे पटवून दिलेले आहे. एकंदरीत संत साहित्याचा अभ्यास केला असता संतांनी आहे त्या परिस्थितीवर मात करून स्वतः त्या परिस्थितीमध्ये राहून अनुभवाचे चटके खावून इतरांना हा त्रास होऊ नये म्हणून एक मानवी धर्म या सद्गुणाचे पालन करून मानवाचे अर्थात स्वतः संतांचे एक परम कर्तव्य म्हणून आपल्या साहित्यातून धार्मिक,अध्यात्मिक,सामाजिक,समानतेचे आणि पर्यावरण तत्वाचे संवर्धन कसे करावे इतरांना आपल्यापासून त्रास का व कसा होऊ देऊ नये याचे मामिक प्रबोधन केलेले आहे. यावरून त्याकालीन संत साहित्य हे किती दूरदर्शी होते हे आपणास दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूचि :-**

१) संपा. शंकर वामन दांडेकर, सार्थ ज्ञानेश्वरी, वारकरी शिक्षण संस्था आळंदी, पुणे, १९९७.

२) श्री.संत तुकाराम गाथा, संपा. शिवशंकर सुखदेव पाटील, गजानन महारज संस्थान, शेगाव, १९८९.

३) संपा.ह.भ.प.रंगनाथ महाराज खरात, श्री.गुरु बंकट स्वामी महाराज प्रासादिक वारकरी सांप्रदायिक भजनी मालिका, राहुल धार्मिक वाड्मय प्रकाशन, आळंदी, २०१४.

◆◆◆

# "अण्णाभाऊ साठे यांच्या कांदबरीतील स्त्री पात्र"

**प्रा.डॉ.रंदिल गजेंद्र साहेबराव**

शि.गु.रा.गे.शिंदे महाविद्यालय, परंडा,

ता.परंडा जि.उस्मानाबाद

अण्णाभाऊ साठेंच्या कादंब-या तरुण मनात रुंजी घालणा-या आहेत. तसेच प्रेम भावनांचे विलोभनीय स्वरुप रेखाटणा-या, सर्वसामान्यांचे वास्तव जीवन चित्रित करणा-या आहेत. कथानकातील घटनानुरुप येणा-या व्यक्तिरेखा हुबेहुब वाचकांसमोर उभे करण्याचे कसब त्यांच्या लेखनशैलीत आहे. लेखनशैली चित्रदर्शी असल्याकारणाने सर्वच स्वभावचित्रे जिवंत वाटतात. त्यांनी व्यक्तिचित्रणाला महत्व दिलेले आहे. कारण त्यांच्या प्रत्येक कादंबरीचे कथाबीज त्यांनी पाहिलेल्या जिवंत व्यक्तीतुन रुजलेले आहे. हे त्यांनी वेगवेगळया प्रस्तावनेतून पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी साकार केलेली माणसं ही त्यांच्या रक्तामासांची माणसं असल्यामुळे त्याला सहानुभूतीची जोड आहे. त्यांनी आपल्या कादंबरीमध्ये आपल्याच जाती-जमातीच्या लोकांनाच नायकत्व दिले असे नाही. तर बहुजन समाजातील माणसांना सुध्दा नायक म्हणून उभे केले आहे. त्यांच्या जवळ-जवळ सर्वच कादंब-या व्यक्तिचित्रणपर आहेत.

अण्णाभाऊंचा पिंड संघर्षशील असल्यामुळे त्यांच्या वृत्तीत कुढत बसणे नसून त्यांच्या व्यक्तिरेखा हया स्वाभिमानी आहेत. म्हणुन आचार्य अत्रे म्हणतात, " अण्णाभाऊ साठयांची माणसे जगण्यासाठी लढणारी आहेत. ती परिस्थितीने गरीब असली तरी लढवय्ये व स्वाभिमानी वृत्तीची आहेत.त्या परंपरेविरूध्द आक्रोश करीत नाही. तसेच परिस्थितीला शरणही जात नाही. तर प्रतिकूल परिस्थिती बदलण्यासाठी धडपडताना दिसतात. अन्यायाविरूध्द पेटून उठतात. त्यांच्या साहित्यातील नायक बंडखोर तर आहेत. पण त्यांच्या विचारांना क्रांतीची धार आहे."

अण्णाभाऊंच्या कादंबरी विश्वातील व्यक्तिरेखा हया कुठलाही भेदभाव मानीत नाही. जात, धर्म, वर्ण, पंथ यांच्या मोहजाळात त्या अडकताना दिसत नाही. गावगाडयात जगणारी ही माणसं एकमेकांशी प्रेमभावनेने, सलोख्याने, बंधुभावाने प्रसंगी वैरत्व पत्करून वागतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यासाठी ते लढतात. अन्यायविरूध्द न्याय देण्यासाठी ते सातत्याने झटताना दिसून येतात. कारण अण्णाभाऊंनी एका विशिष्ट जीवन दृष्टीतून आपले लेखन केले आहे. म्हणून "त्यांच्या लेखनातील व्यक्तीरेखा रूढ आणि चाकोरीबध्द जीवन नेहमीसाठीच जगत नाहीत. विद्रोह, बंड, नकार घेऊनच त्या जगतात."

अण्णाभाऊंचे नायक हे पराक्रमी आहेत. ते देशासाठी आणि समाजपरिवर्तनासाठी सातत्याने लढतात. त्यांच्या कादंब-यातील माणसं झुंझार वृत्तीची आहेत. बहुदा तीन गोष्टीसाठी ती पेटून उठताना दिसतात. त्या म्हणजे पुरुषांचा स्वाभिमान, स्त्रीचे शील आणि देशाचे स्वातंत्र्य हया आहेत. त्यासाठी ते प्राणपणाने लढताना दिसतात. पराक्रमाची पूजा बांधणारे ते नायक असले तरी विनाकारण इतरांवर अन्याय- अत्याचार करीत नाही आणि होवू सुध्दा देत नाहीत. अण्णाभाऊंनी आपली स्वभावचित्रे टणक, शुरवीर, प्रसंगी दगडालाही पाझर फोडणारी आणि वेळप्रसंगी लोण्यापेक्षाही मऊ रेखाटली आहेत. तसेच त्यांच्या नायिका सुध्दा धाडशी, करारी आणि स्त्री-सुलभ स्वभावाच्या, सोशिकमनोवृत्तीच्या असून प्रियकराच्या प्रेमासाठी झुरणा-या नीतिसंपन्न, शीलवती स्त्रिया आहेत. त्या मर्यादाशील असल्या तरी फार काळ जुलूम सहन न करता अन्यायविरूध्द बंड पुकारणा-या आहेत. त्या कोमल

स्वभावाच्या, हळव्या मनाच्या प्रेमासाठी आतुर झालेल्या, तसेच शीलरक्षण करणा-या, प्रखर व्यक्तिमत्वाच्या स्त्रिया आहेत. साठे निर्मित व्यक्तिरेखांच्या स्वरूपाविषयी डॉ. बाबुराव गुरव यांचे विचार निश्चितच चिंतनीय आहे. ते म्हणतात, "अण्णाभाऊंच्या नायिका वाचकांचे आदर्श ठराव्यात. म्हणूनच समाजातील सर्वभक्षी प्रतिगामितेशी, पारतंत्र्याशी त्यांनी समूहशक्तीनिशी उभा दावा मांडला आहे. जीवनसंगर उभे केले आहे. क्रांतीकुंड आपल्या आहुतीने प्रज्वलित केले आहे."

**<u>* मंगला:-</u>** कृष्णाजी पाटलाची एकुलती एक मुलगी मंगला ही असुन कादंबरीची ती नायिका आहे. ती शंभर मुलीतून सुंदर म्हणून निवडावी अशी लावण्यवती तरूणी आहे. डोकीच्या केसांपासून ते पायाच्या नखापर्यंत मंगलाच्या देहात कसलीच उणीव नाही. गव्हाळ वर्ण, रेखीव चेहरा, सुंदर डोळे, नोकदार नाक असलेली सौंदर्यवती मंगला कोणालाही पाहता क्षणीच आवडावी अशीच आहे. जेवढी लावण्यावती तेवढीच सोशिक सुध्दा होती. घरंदाज असलेली मंगला सतशीलल व नीतिसंपन्न होती. सुरूवातीपासून शेवटपर्यंत मंगालाच्या आयुष्यात दु:खदायक अशाच घटना घडतात. सुरूवातीला तिचे लग्न पांडू पाटलाच्या राजाराम नावाच्या मुलाशी ठरते. तिला हळद लागते नवरी होवून सजविलेल्या गाडीत बसते आणि त्याचवेळी नवरदेवाची आई मरण पावल्याची बातमी येते. त्यामुळे तिचे लग्न तीन वर्ष लांबणीवर पडते. क्षणात आनंदाने मोहरून गेलेल्या मंगलाचं ह्दय दु:खानं हरपून जाते. हिरव्यागार चुडयाकडे बघून ती रडू लागते. आणि एक-एक दिवस मोजत राहते. मधल्या काळात तिला मातब्बर लोक मागणी घालतात, परंतु कृष्णाजी पांडू पाटलाला दिलेला शब्द पाळतात.

ज्या राजारामसाठी तीन वर्षे ती काढते तो एकाकी परागंदा होतो. हे कळल्यानंतर ती पुन्हा दु:खी होते भाउ हंबीर तिचे लग्न नागोजी सोबत लावण्यास उत्सुक असतो. पण मंगला त्याला विरोध करते अणि अशातच हिंदुराव नावाच्या बंडखोर, क्रांतीकारी तरूणाशी तिची ओळख होते. दोघेही एकमेकांवर प्रेम करतात. त्यांचे पर्यवसान लग्नात होते. हिंदुराव हाच राजाराम पाटील आहे हे समजल्यावर ह्दयात आनंद न मावणा-या मंगलाचा संसार दुस-याच क्षणी स्वतःच्या भावामुळे व नागोजीमुळे उद्ध्वस्त होतो. अण्णाभाऊंनी मंगलाला जेवढी कुलीन, नीतिमान सोशिकवृत्तीची रेखाटली तेवढीच करारी नि प्रसंगी हातात बंदुक घेउन लढणारी रणमर्दानी क्रांतीकारक सुध्दा साकारलेली आहे.

**चित्रा** ही नायिका असलेली मुळात 'चित्रा' नावानेच प्रकाशित झालेली नायिका प्रधान कादंबरी आहे. जन्मतःच देखणी असणारी ही चित्रा दिव्याच्या ज्योतीला देखील लाजवणारी अशी सुंदर तरूणी आहे. बाप मेला तेव्हा आईच्या पोटात वाढत असलेली ही चित्रा लहानपणापासून अगतिकतेचे आणि अतोनात कष्टाचे जीवन जगते. वयात आल्यावर मामा-कृष्णा तिचे लग्न करून देतो. परंतु नशीबाचे भोग असे काही असतात की, अंगाची हळद निघायच्या आधीच तिचा नवरा चंदू कानात गोम शिरल्यामुळे पाण्याबाहेरील माशा प्रमाणे डोकं आपटीत तडफडत तिच्या डोळया देखत मरतो. चित्रा आक्रोशाच्या डोहात बुडते जणू काही तिच्याभोवती दु:खाचा वणवाच पेटतो. जन्मापासुन दु:ख आणि संसारात पाय ठेवल्यापासुन आक्रोश हेच तिच्या संदर्भात नियतीला मान्य असते.

चित्राला फसवून मुंबईत वेश्या व्यवसाय करण्यासाठी आणलेली सुशील मुलगी मुंबई सारख्या महानगरात पोटनाळण्यासाठी व फसवणूकीमुळे वेश्या व्यवसाय करण्यासाठी ग्रामीण भागातील ब-याच मुली असतील. चित्रालाही तिचा मामा कृष्णा वेश्या व्यवसायात आणून सोडतो. परंतू तिच्या आईने दिलेली शिकवण ती अशी 'जिवाच्या मोलानं अब्रू जप' शीलभ्रश्ट न होऊ देता या नरकातून पळून जाते. आणि कष्ट करून प्रतिष्ठेचे जीवन जगते. पुढे तिचा लहानपणीचा मित्र जय या कामगार चळवळीतील कार्यकर्त्यांशी तिचे नव्याने संबंध जुळले व पुढे

त्याचे रूपांतर संसारात होते. वेश्या व्यवसायातील धन, दौलत अव्हेरून एक सामान्य कष्टकरी स्त्रीचे जीवन जगण्यासाठी सिध्द झालेली शीलवान नायिका अण्णाभाऊंनी ''चित्रा'' च्या रूपाने रेखाटली आहे.

**<u>* राधा:-</u>** राधा ही 'फकिरा' कांदबरीतील महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा म्हणून पहावे लागते. राधा ही कांदबरीच्या नायकाची फकिराची आई आणि गावासाठी माळावर कढून मरणा-या शुरवीर राणोजीची पत्नी असते. पूर्ण कांदबरीमध्ये तिच्या आयुष्यात सुखापेक्षा दु:खच अधिक कथानकामध्ये फार कमी प्रसंगातून ती वाचकांना भेटते. तरी सुध्दा ती वाचकांच्या मनावर आपली छाप सोडून जाते. मुलं लहान असतानाच तिला वैधव्य येते ती मुलांसाठी जगते. राणोजी गावात जोगणीची जत्रा भरावी म्हणून माळावर कढून मरतो. तेव्हा तिच्यापुढे दु:खाचा डोंगरच उभा राहतो. परंतु मुलांकडे पाहून ती स्वत:च्या डोळयाने ती आपल्या पत्नीचा मृत्यु आणि मुलाच्या जीवनाची व संसाराची वाताहत पाहते. आयुष्यभर ती दु:ख भोगते. ज्यावेळी दौलती खिन्न होऊन म्हणतो, ''आता बाबू परत येणार न्हाय'' त्यावेळी राधाच्या काळजात कळ उठते आणि ती दाटल्या आवाजात म्हणते, काय पाप केलं होतं म्हणून हे सारं मी बघतेय ! म्हणूनच राधाविषयी वि.स. खांडेकर म्हणतात, ''राधा कादंबरीत फार थोडा वेळ आपणाला भेटते. शूर नव-याची बायको होणं आणि शूर मुलाची आई होणं याचं सुख काय आहे दु:ख काय आहे, हे तिला पुरेपुर अनुभवावं लागतं. तिच्या पत्नी ह्दयाच्या आणि मातृह्दयाच्या अंतरीच्या वेदना लेखकान जाता-जाता नुसत्या सुचित केल्या असल्या तरी त्या वाचकांच्या ह्दयात जाऊन भिडतात''.

**<u>*वैजयंता:-</u>** ही कादंबरी नायिकाप्रधा असून ती वैजयंता या तमाशा कलावंत स्त्रीच्या जीवनाचेच नव्हे तर सर्वच तमासगिरांच्या जीवनाचे, त्यांना भोगाव्या लागणा-या दु:खाचे, अडीअडचणींचे चित्रण करणारी कादंबरी होय. कादंबरीची नायिका वैजयंता, साठेंच्या इतर नायिकाप्रमाणे अप्रतिम सौंदर्यवती स्त्री, बावीस वर्ष वय असलेली ही हुशार आणि तेजस्वी व्यक्तिमत्वाची आहे. बारा दिवसांची असल्यापासून ती आईच्या पायातील घुंगूरांचा ताल, ठेका तुणं- तुण्याच्या नादावर खेळत असते. सातव्या वर्षापर्यंत वैजयंता घुंगरं, ताल, सुर, डफ, तुणतुणं याच्या नादावर खेळत असते. त्याबरोबर तिचे नृत्याचे शास्त्रीय पाठ सुरू असतात. आपला बाप कोण आहे हे तिला माहीत नसते. परंतु नियती असा काय डाव टाकते की, तिला शेवटी तमासगिरणीचे आयुष्य जगावे लागते.

**<u>*चंपा:-</u>** आई-बाप लहानपणीच वारल्यामुळे एका बाईने तिला वाढवलं आणि वयात येताच एका माणसाच्या हवाली केलं त्या माणसाने तिला वेश्यचं आयुष्य जगायला भाग पाडलं. पण सुदैवाने तिला रंग्या भेटला आणि तिचं वेश्येचं जीवन संपल. तिने त्याच्या नावानं कुंकू लावलं व कामगार स्त्री म्हणून ती जगू लागली. अशी ही दुर्दैवी नशीबाची चंपा चंदनला मात्र सातत्याने मदत करते. या जगात एकटी बाई अब्रुचं जिणं जगू शकत नाही. एकाच रात्रीत ती कसबीण होउु शकते. मनात नसतानाही वेश्या व्हावं लागणा-या स्त्रियांचे दु:ख अण्णाभाऊंनी चंपाच्या व्यक्तिरेखेतून मांडले आहे.

***समारोप**:- अण्णाभाऊंनी आपल्या सर्वच कादंब-यातून गावाकुसाबाहेरील महार-मांग वाडयाचे चित्रण केले आहे. विशेष म्हणजे या जाती-जमातींचे गावगाडयाशी अतिशय जिव्हाळयाचे संबंध असल्याचे दाखविले आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक कादंबरीमध्ये चित्रित केलेल्या व्यक्तिचित्रणातून या उपेक्षित लोकांमधील शूरत्वाचा वेध घेतला. अण्णाभाऊंनी लिहिलेल्या कादंब-यांच्या कथानकांमध्ये त्यातील व्यक्तिरेखांमध्ये निवेदन वर्णन शैलीमध्ये वातारण व निसर्ग चित्रणामध्ये घटना प्रसंगांमध्ये भौगोलिक पार्श्वभूमीमध्ये साम्यच जास्त आहे. हे सुक्ष्मनिरीक्षकांना सहज लक्षात येते.

**संदर्भ:-**


1) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे:- निवडक वाड्मय- संपादक अर्जुन डांगळे व इतर, पृष्ठ -1161 व 1162 प्रकाशक – म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आवृत्ती दि. 01 ऑगस्ट 1998.

2) शाहीर अण्णाभाऊ साठे :- संपादक प्रा. नागोराव कुंभार, प्रबोधन प्रकाशन, लातूर, प्र. आवृत्ती जानेवारी 1993.

3) 'फकिरा'-अण्णाभाऊ साठे :- सुरेश एजन्सी, पुणे 15वी आवृत्ती 15 ऑगस्ट 1994

4) 'आवडी' - अण्णाभाऊ साठे :- सुरेश एजन्सी, पुणे 7वी आवृत्ती 2002.

5) 'लोकराज्य' :- लोकशाहीर अण्णाभाऊसाठे, विषेशांक 1993 प्रकाशक-माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

6) 'दलित कथाःउगम आणि विकास':- डॉ. प्रकाश खरात, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमा आवृत्ती - 1992


◆◆◆

# स्त्रीवादी साहित्य प्रवाह

**डॉ. वडीतके गंगाराम कोंडीराम**
मराठी विभाग प्रमुख
कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ, ता.राहुरी, जि. अहमदनगर.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ब्रिटिश राजवटीने आणलेल्या नव्या शिक्षण व्यवस्थेचा झालेला प्रसार, प्रबोधन काळात घडलेली विचारमंथने, औद्यागिक क्रांतीने बदलेली समाज घडी, लोकशाही व्यवस्था, पंचवार्षिक योजना अशा काही कारणांमुळे भारतीय समाज जीवनात स्वत्वाची जाणीव होऊन आतापर्यंत अपेक्षित राहिलेल्या , दडपल्या गेलेल्या समाज अस्तरात मुक्तीची भावना बळावली. नव्या समाजरचनेची परिवर्तनाची गरज वाटू लागली, यातूनच स्त्रीमुक्तीची चळवळ, दलित चळवळ इत्यादी चळवळी उभ्या राहिल्यात. परिवर्तनाच्या आकांक्षेने उभ्या ठाकलेल्या या चळवळीने साहित्यालाही प्रेरित, प्रभावित व प्रवाहित केले. साहित्याचे रूप बदलून टाकले, बदलत्या समाजाची वास्तवता अभिव्यक्त करायला त्या लक्ष विधी राहिल्याने साहित्याला स्वतंत्रपणे मानावे लागते. साहित्याचे व्यवस्थापन करतांना भिन्न वैशिष्ट्ये लक्षात घेऊन दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य असे नामकरण होऊन साठोत्तरी साहित्यातील प्रवाह म्हणून अस्तित्वात आला.

जुन्याला नाकारून नवे घडवताना जीवनाला नवा अन्वयार्थ प्राप्त करून देताना काही विचार प्रवाह निर्माण होतात, या विचार प्रवाहांना निश्चित अशा दृष्टीकोनाचे रूप प्राप्त झाले की चळवळ आकाराला येते. समाजजीवनातील या चळवळीची त्यांनी निर्माण केलेल्या जाणिवांची अभिव्यक्ती साहित्यातून होताना त्यांच्या प्रेरणा, साहित्याचे स्वरूप बदलताना दिसते. अशा साहित्याचा स्वतंत्र प्रवाह मानावा लागतो.

इ.स.वी. सन १८४८ मध्ये अमेरिकेतील गुलामगिरी विरुध्दच्या लढ्यात सहभागी झालेल्या एलिजाबेध कॅंडी , मेरी आन इत्यादींनी भरगच्च अधिवेशन भरविले, सिनेका फॉल्स हा स्त्री स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिध्द केला. मालमत्तेत समान वाटा, शिक्षण व रोजगाराच्या समान संधी, निवडणूक लढविण्याचा व मतदानाचा हक्क यांची मागणी केली.

१९२० पर्यत काळ हा स्त्री जीवनाच्या दृष्टीने अत्यंत संघर्षमय दिसून येतो. तरीही यानंतर म्हणजेच १९२० ते १९४० या काळात स्त्रीयांच्या कथालेखनात मोठी भर पडलेली दिसून येते. यानंतर येणाऱ्या कथेचा विषय हा स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य या सामाजिक सुधारणांकडे जाणारा होता. समाज उद्बोधनाबरोबर करमणूकही या काळात अपेक्षिली गेली होती. या कालखंडात रंजनवादी प्रेमकथांचा प्रवाह यामध्ये मिसळला होता. एखादी कॉलेजात जाणारी किंवा मॅट्रीकपर्यंत पोहोचलेली मुलगी सुशिक्षित समजली जात होती. समाजात तो कुतूहल विषय ठरत होता.

१९२० नंतर शिक्षण घेण्याचा स्त्रीयांच्या संख्येत लक्षणिय वाढ झालेली दिसून येते आणि याच काळात कथालेखन निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध होत होती. नंतर तर कथांचे संग्रह काढण्याकडे स्त्रीयांनी पुढाकार घेतला होता. आनंदीबाई शिर्के, काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर यांच्या नंतर व १९९० नंतर स्त्रीयांचा लेखनात कमलाबाई टिळक, कुसुमावती देशपांडे व विभावरी शिरूरकर यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. एकाच काळात लिहिण्याचा या स्त्री लेखिकांची वृत्ती मात्र अतिशय भिन्न प्रकारची होती. स्त्रीयांची दुःखे अथवा प्रश्न जाणून घेणारी 'स्त्री' व 'गृहलक्ष्मी' सारखी मासिके याच कालखंडात सुरू झाली होती. याशिवाय या नियतकालिकांतून लिखाण करणाऱ्या बहुतेक स्त्रीया पदवीधर होत्या. वेगवेगळ्या स्वरूपाची काम करताना एक माणूस म्हणून स्त्रीचा विचार व्हावा अशीही त्या काळातील स्त्री लेखिकांची अपेक्षा होती व त्यामधून त्यांचे लेखन साकार होत होती. हौस म्हणून या कालखंडात लेखन होत नव्हते तर विविध प्रश्नांना स्त्रीयांना सामोरे जात असताना अनेक अडचणी त्यांनी गंभीरपणे मांडल्या आहेत. याबाबत भाष्य नोंदवताना भालचंद्र फडके म्हणतात, "पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री अपेक्षिली जाते याची त्यांना (त्या कालखंडातील स्त्रीयांना) खंत वाटत होती. 'स्त्री' हा त्यांच्या चिंतनाचा विषय होता, त्यामुळे या कालखंडातील कमलाबाई टिळक, कृष्णाबाई, विभावरी शिरुरकर, गीता साने, कुसुमावती देशपांडे इत्यादी लेखकांनी स्त्रीमनाचा शोध जाणीवपूर्वक घेतला आहे. कथेतील घटना प्राधान्याऐवजी कथेत व्यक्तीचित्रणाला महत्त्व आले. त्यामुळे स्त्रीमनाचे विविध पातळ्यांवर चित्रण कथांतून होऊ लागले"[१] या काळातील लेखिकांनी कोणत्याही पुरुष लेखकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला नव्हता. फडके-खांडेकरांपेक्षा वेगळेपण जपणारी कथा या काळात लिहिली जाऊ लागली. कमलाबाई टिळकांसारख्या लेखिकेने स्वाभिमानी स्त्रीचे चित्रण केले. स्त्री-पुरुषांमधील नाते समानतेच्या पातळीवर येऊन ते व्यक्तीस्वातंत्र्यासाठी पोषक असावे. ही त्या कालखंडातील लेखिकांच्या लेखनामागील हेतू होता. त्या कालखंडातील कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान होते. त्यामुळेच त्या काळातील स्त्री कथालेखनात स्त्रीमनाचा विद्रोह प्रामुख्याने दिसून येतो.

१९३३ साली विभावरी शिरुरकर 'कळ्यांचे निःश्वास' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. आजपर्यंत जे स्त्री लिहित होती त्यापेक्षा वेगळे प्रक्षेपण लेखन त्यांनी केले. विभावरीबाईंना (शिवाय त्या कालखंडातील समाजमनाचा) अंदाज असल्याने त्यांनी टोपण नाव घेऊन लेखन केले. स्त्रीशिक्षणाबरोबरच स्त्री अर्थार्जनही करू लागली होती. गो.ब देवलांच्या 'शारदा' नाटकातील लोभी पित्याची येथे आधुनिक पित्याच्या रुपाने पुनरावृत्ती झाली होती. मुलीचा पैसा घरात आल्यावर बाप तिच्या लग्नासाठी वर बघेना व त्यामधून प्रौढ कुमारिकांचे प्रश्न समोर आले. या प्रौढ कुमारिकांची समाजामध्ये किती हेटाळणी होते, याचे चित्रण 'कळ्यांचे निःश्वास' मधून विभावरी शिरूरकर यांनी केले आहे. प्रौढ कुमारिकांच्या मनाचा शोध घेण्याचा त्यांचा प्रयत्न नवा होता, ते पहावयास मिळते स्त्रीमन समजून घेण्यासाठी असे एका स्त्रीने केलेले लेखन यामुळे प्रभावी ठरले आहे. स्त्रीसुलभ प्रवृत्ती दडपून जगण्याचा प्रौढ कुमारिका शिरूरकरांचा प्रथम दिसल्या असाव्यात. याशिवाय विषयांमध्ये महत्त्वाची बाब म्हणजे विभावरी शिरुरकर केवळ स्त्रीयांचे प्रश्न, समस्या मांडून थांबत नाहीत तर ते प्रश्न, समस्यांची चर्चा करतात. त्यामधून मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतात. बापाचा संसार करत प्रौढ कुमारिकेने मन मारून कशासाठी जगायचे स्त्री-पुरुष संबंध कोणत्या पातळीवर असायला पाहिजे. अशा विषयातून त्यांची मन दिसून येते. प्रेम लग्न, घटस्फोट इत्यादी विषयांकडे स्त्री विशेष दृष्टिकोनातून पाहत असते. त्यामुळेच या कथा इतर कथांपेक्षा वेगळ्या असल्याचे जाणवते. एक स्त्री म्हणून समान धर्मामुळे स्त्रीनिष्ठ अनुभवविश्वातील बारकाव्यांची लेखिकेला अधिक जवळून माहिती होती, म्हणूनच स्त्री जीवनाविषयी लिहिलेली पहिली मनोविश्लेषणात्मक कथा विभावरी शिरुरकरांनी लिहिली असे म्हणावयास हरकत नाही.

कमलाबाई टिळक यांनी देखिल 'सुक्ष्म मनोविश्लेषण' वैशिष्ट्ये आहे. १९३२ मध्ये 'हृदयशारदा' व १९४४ मध्ये 'आकाशगंगा' हे त्यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. कमलाबाईच्या स्त्रीयांना दुःख तर आहे शिवाय त्या वेगवेगळ्या प्रश्नांमध्ये अडकलेल्या पहावयास मिळतात. बाह्य घटनातील तरल भावनांना टिळकांच्या कथांमध्ये अधिक प्रधान असलेले दिसून येते. विशिष्ट प्रश्न सोडविण्यासाठी कथेतील नायिका सामोरे जाते त्यावेळी नायिकांची कुचंबणा झालेली कमलाबाई रंगवितात.

यानंतर म्हणजेच १९३९ ते १९४२ काळात कथालेखन करणाऱ्या लेखिका म्हणजे कुसुमावती देशपांडे या आहेत. कुसुमावती देशपांडे यांनी आपल्या कथालेखनामध्ये प्रामुख्याने समाजातील विषमता याकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. 'दीपदान' 'दीपकली' व 'मोळी' या तीन कथासंग्रहामध्ये एकूण पस्तीस कथा समाविष्ट केलेल्या आहेत. चिंतनशीलतेबरोबर त्यांच्या कथेमध्ये कथात्मकता असलेली दिसून येते. घटनेला महत्त्व न देता पात्रांच्या मनातील द्वंद्वे त्यांना महत्वाचे वाटतात. कुसुमावतींच्या कथेमधून पारंपारिक कथांमधून येणारे पात्रांचे चित्रण वेगळेपण सांगणारे आहे. उदा. त्यांच्या कथांतून कुटुंबव्यवस्थेतील बायकोला त्रास देणारे नवरे, माणसांची स्वार्थी वृत्ती इत्यादी विषयही काही प्रमाणात आढळतात. कारण या लेखिकेची वृत्ती कथाकारापेक्षा चिंतनशीलतेकडे अधिक झुकलेली आहे त्यामुळे 'अंतर्मुखता व मनोविश्लेषण करणारी कथा' अशी त्यांच्या कथेची दोन वैशिष्ट्ये सांगता येतात. कुसुमावती यांच्या कथेची संख्या जरी कमी असली तरी त्यांच्या कथा नवकथेच्या सीमेशी जाऊन पोहोचणा-या आहेत.

**१९४५ ते १९६० काळातील स्त्रीयांचे कथालेखन –**

'१९४५ नंतरचे कथा वाड्मय' असा स्वतंत्र विषय व्हावा एवढे सांस्कृतिक व इतर अमुलाग्र स्थित्यंतरे या कालखंडात वाड्मयाच्या क्षेत्रांमध्ये दिसून येतात. यामध्ये स्त्रीयांनी लिहिलेल्या कथाही अपवाद राहिलेल्या नाहीत. दुसरे महायुद्ध, सिग्मंड फ्रॉईड यांच्या मानसशास्त्रांच्या संशोधनाचा परिणाम या बाबींचा प्रामुख्याने १९४५ नंतरच्या कथेत बदल घडवून आणलेला दिसतो. माणसांचे अंतर्मन याविषयी प्रथमच वेगवेगळ्या स्वरूपाच्या चर्चा प्रथमच होण्यास सुरुवात झाली. कामवासना व भूक या समाजातील संस्कारामुळे दडपल्या जातात परंतु त्या पूर्णपणे नाहीशा होत नाहीत. या वासना अत्यंत तीव्र असू शकतात. त्या व्यक्तीजीवनाला निराशही करू शकतात. अर्थातच याचे परिणाम समाज जीवनामध्ये दिसू लागतात. अशा प्रकारे निष्कर्ष फ्राईडने संशोधन करून नोंदविले आहे. तत्कालीन परिस्थितीही या गोष्टीला अधिकच कारणीभूत आहे. दुस-या महायुद्धाच्या दरम्यान अशी विचारसरणी रूढ होत होती. माणूस पाप करतो, कशामुळे तर त्याच्या भूकेमुळेच घडते. त्याला जर पोटभर खायला मिळाले तो चोरी करणार नाही अशा प्रकारची एक विचारसरणी या काळात पुढे येऊ पाहत होती. या प्रकारचा विचार जोर धरू लागला होता. विचारांबरोबरच त्याने अबोध मनालाही दिलेले महत्त्व पुढील काळातील वाड्मयनिर्मितीला कारणीभूत ठरत आहे. मानवी मनाचा बराच मोठा भाग जाणिवेच्या पलिकडे आहे, असा सिद्धांत फ्राईडने प्रथम मांडलेला दिसून येतो. फ्राईडच्या मतानुसार मनाचा बराच भाग अबोध मनाने व्यापलेला आहे. निरोगी माणसाच्या बोलण्यात आणि वागण्यात हे माणसाचे अबोध मन वारंवार व्यक्त होते. दैनंदिन जीवनातील चुका, स्वप्नांची दुनिया, मनोविकार, लैंगिकतेची नवी व्याख्या, कामप्रेरणेच स्वरुप, मानसिकता व शिक्षण. ज्या घरात तो व्यक्ती जन्माला आला आहे, ज्या समाजामध्ये वेगवेगळ्या संस्कारांमध्ये वावरत आहे इत्यादी सर्व बाबींचे माणसाच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत, यानुसार काळातील कथांमध्ये एकेका विषयाची एखादी बाजू घेऊनच कथालेखन होऊ लागले. या कथांतील विविधतेबद्दल गंगाधर गाडगीळ म्हणतात, "या काळातील 'मनोविश्लेषणात्मक कथा' अगर 'वास्तववादी कथा' असे म्हणण्यापेक्षा 'नवकथा' म्हणणे अर्थपूर्ण वाटते. कारण तिथे स्वरूप लवचिक आहे. तिच्यातील अनुभवांची गुंफणच निराळी आहे. मानवी मनाच्या दर्शनी भागाच्या पलिकडे त्यांचे स्वरुप दृष्यमान करणारे क्ष-किरण तिच्या निर्मितीत वापरले जातात. ह्यात तिचे नाविन्य आहे."[२]

नवकथेची काही ठळक विशेष म्हणून सांगता येतील त्यापैकी एक म्हणजे नवककथेला विशिष्ट कथानक असेलच असे नाही म्हणजेच याचा अर्थ असा सांगता येईल की, अर्थ नवकथेने कथानकाचा टाळळे असा नाही तर ते आवश्यकही नाही असे मानले. जुन्या कथेतील कथानकाचा बंदिस्तपणाही तिने टाकून देऊन त्यामध्ये नवकथेने अधिक लवचिकपणा आणला होता. आपण वरवर पाहिले तर किरकोळ अर्थहीन वाटणारे अनुभव स्वीकारले आहे. माणसाच्या अंतर्मनात तिने प्रवेश केला. जीवनातील कोणत्याही घटनेभोवती फिरू लागते. शैली व प्रतिमा याबाबतीत संकेतही मोडले आहेत. परंपरेने चालत आलेली कथा उदा. बालविवाह, विधवा विवाह, स्त्रीशिक्षण, सणवार, वृत्तवैकल्प इत्यादी विषयांना बाजूला सारले. भावप्रधानतेचे तत्व सोडून दिले. हे सर्व बाजूला सारीत असताना समोर आला तो माणसाचा एकाकीपणा नव्याने कथेमध्ये अवतिर्ण होऊ लागला.

व्यक्तिचित्रणातील गुंतागुंत माणसामाणसातील विसंगती या बाबी कथेमध्ये प्राधान्याने येऊ लागल्या.

दुस-या महायुद्धाने मानवतेच्या उद्‌ध्वस्त झालेल्या विटंबनेचे दर्शन घडवू लागली. त्यासाठी मनोविश्लेषणाच्या तंत्राचा वापर होऊ लागला. आशयाबरोबरच बाह्य आकाराने कथा बदलू लागली आणि दुस-या महायुद्धाचा वणवा दूर कुठेतरी पेटला होता पण संपूर्ण जगालाच त्याची धग पोहोचत होती. त्या वणव्यामध्ये मानवी जीवन होरपळत होती. अशा या स्थितीमध्ये कुणाला कुचंबणारी स्त्री दिसली तर कुणाला संपूर्ण समाजालाच कीड लागली आहे असे वाटत होते. या सर्व वाटण्यातून मराठी वाङ्‌मयाचा इतिहासात नवकथेचा जन्म झाला.

१९४५ ते १९६० पर्यंतचा कालखंड म्हणजे नवकथा ऐन भरात आल्याचा काळ होय. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे व व्यंकटेश माडगूळकर यांच्या पुढील वाटचालीमध्ये के. ज. पुरोहित (शांताराम), सदानंद रेगे, दि.बा. मोकाशी, श्री.ज.जोशी, पं. महादेवशास्त्री जोशी यांचा सहभाग आहे. त्याचबरोबर या काळात लेखिकांचेही काम मोठे मोलाचे आहे. विशेष उल्लेख करण्यासारख्या लेखिका म्हणजे वसुंधरा पटवर्धन ('शोध', 'अंतरपाट', 'अद्भुत', 'भाग्य', 'प्रतिबिंब'), सरिता पत्की ('बारा रामाचं देऊळ'), इंदिरा संत ('शामली', 'कदली'), कमला फडके, सरोजनी बाबर, स्नेहलता दसनूरकर ('कळप', 'मायावी', 'अंधारातील व्यथा'), शांता शेळके, गिरीष पै., योगिनी जोगळेकर, दुर्गा भागवत, इंदू साक्रीकर, इंद्रायणी सावकार, सुधा नरवणे, सुमती क्षेत्रमाडे या कथालेखिका उदयास आल्या.

१९४५ ते १९६० या काळातील स्त्री लेखकांविषयी म. ला. अदवंत म्हणतात, ''मराठीतील अपौरूषेय कथा पण या काळात खूपच बहरली. नव्या-नव्या कथा लेखिका या काळात उत्साहाने कथालेखन करू लागल्या. पण १९४५ ते १९६० या काळात मराठी कथेने जे नवे वळण घेतले होते त्याची दखल १९६० पर्यंत अपौरूषेय कथेने कधीच घेतली नाही. ती जुन्या-रुळलेल्या मार्गानेच जात होती. स्त्री जीवनातील विविध समस्यांचे व त्यांच्या व्यथांचे वरवरचे पापुद्रे उकलून दाखविण्यात ती समाधान मानू लागली होती. क्वचित प्रसंगी स्वप्नरंजनात गुरफटून जात होती. पण व्यक्तीमनात या लेखिका खोलवर शिरू शकल्या नाहीत व या काळात पुरुष लेखकांनी स्त्रीमनाचा इतका खोलवर वेध घेतला तितका स्त्री लेखिकांना घेता आला नाही.''[3] याचा अर्थ असा होतो की १९६० पर्यंत स्त्री लेखिकांनी कथालेखन केलेले असले तरी कसदारपणा त्यांच्या कथालेखनात येत नव्हता असे अदवंत यांना अधोरेखित करायचे आहे.

विजय राजाध्यक्ष यांच्या कथेमधून सूक्ष्मता व्यक्त होत होती. 'अंतराळ', 'माती', 'अंधाराचा अर्थ', 'आवर्त', 'सतरा डिसेंबर', 'जन्म' या त्यांच्या काही कथांची नावे होत. कथांमधून रचनांचे विविध प्रयोग राजाध्यक्षबाईंनी केले आहेत. सूक्ष्मता, तरलता व सूचकता यांचाही वेध त्या घेतात.

याच कालखंडातील कुसुमावती देशपांडे स्त्री लेखिका म्हणून कथालेखन नजरेस भरत असले तरी कमल देसाई यांच्या 'बांधू चिमणे खोपटकी', 'ही पूर्णतः', 'रंग', 'तिळा बंद', 'महादेववाडी' अशा काही कथा लिहून विलक्षण आत्मकेंद्रितता स्पष्ट केलेली आहे.

तारा वनारसे यांचा 'पश्चिमकडा' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. 'अस्मिता', 'पशू', 'सारंग', 'सहस्त्राक्ष', 'पुढ्याचा समुद्र' अशा काही कथांचा या संग्रहात समावेश आहे. या काळातील कथालेखिकांचा कथा वाड्मयास योगदान दिलेले दिसून येते.

१९५० ते १९६० दरम्यान लेखिकांच्या लिखाणाच्या दृष्टीने अनुभव घेण्याच्या दृष्टीने प्रारंभीचा काळ हा कलाकुसर असला पाहिजे. त्यामुळेच मराठी कथेच्या अंतरंगात किंवा बहिरंगात बदल होत गेलेले दिसून येतात. प्रामुख्याने १९६० नंतर स्त्रीयांचे कथालेखन अधिकच बहरत गेले आणि कथेच्या प्रांतातही स्त्रीया मागे नाहीत याचे प्रत्यंतर येऊ लागले.

**निष्कर्ष –**

१. हरिभाऊ आपटे यांच्या प्रेरणेने काशिबाई कानिटकर, आनंदीबाई शिर्के लक्ष्मीबाई टिळक व इतर स्त्रीया प्रथमच कथालेखन करु लागल्या.
२. १९२० ते १९४० या काळात स्त्रीयांच्या कथालेखनाला वेग आलेला पहावयास मिळतो. तसेच स्त्री शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, वैवाहिक जीवन व कौटुंबिक समस्या, व्यक्तीस्वातंत्र्य, स्त्रीयांचे प्रश्न असे विषय कथेत येऊ लागले.
३. १९४५ नंतर नवकथा आली, या नवकथेमध्ये स्त्री लेखिका कुसुमावती देशपांडे यांनी उल्लेखनिय कथालेखन करुन नवकथेला बळ दिले.
४. या कालखंडातील स्त्री कथा लेखिकांनी सामाजिक जोखडांची बंधने तोडून स्त्री वेदना प्रकट करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच सांस्कृतिक दृष्ट्या एक परिवर्तनाची दृष्टी स्त्रीयांना मिळाली.
५. १९४५ ते १९६० या कालखंडातील स्त्री कथा लेखिकांनी कथालेखनास नवे विषय दिले. मानसिकतेला महत्त्व असणारे मनोविश्लेषणवादी कथालेखन होऊ लागले.
६. १९४५ ते १९६० या कालखंडात अनेक स्त्रीया कथा लेखन करु लागल्या त्यामुळे मराठी कथा या काळात सांस्कृतिक व वाड्मयीनदृष्ट्या समृध्द झालेली दिसते.

**संदर्भ –**

१. 'मराठी लेखिका:चिंता आणि चिंतन', - भालचंद्र फडके, श्री विद्या, १९८०, पृ.४३.
२. 'खडक आणि पाणी' - गंगाधर गाडगीळ, उत्कर्ष, १९६०, पृ.१७७.
३. 'प्रदक्षिणा-खंड पहिला' - म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पहिली आ.- १९४१, पृ. १९२.
४. 'मराठी कथा उगम आणि विकास' – इंदुमती शेवडे, सोमैय्या, १९७३.
५. 'मराठी कथा-रूप आणि परिसर', म.द.हातकणंगलेकर सुपर्ण, १९८६.

◆◆◆

# इतिहासाचा अभ्यास आणि विकासाच्या संधी

**कैलास रघुनाथ करांडे**
मु.पो. तुक्कडओढा, दरेवाडी, सोलापुर रोड
ता. नगर, जि. अहमदनगर.

**गोषवारा :-**

इतिहासात मानवाच्या जीवनात घडून गेलेल्या गोष्टी, त्यांची क्रमबद्ध मांडणी, झालेला विकास, केलेल्या चुका, केलेल्या चांगल्या गोष्टी या सर्वांचा एक दस्त ऐवज असतो. इतिहासाकडे सामान्यत: लोकांचा कल निरुपयोगी विषय म्हणुन पाहण्याचा असतो परंतु इतिहास हा भुतकाळातील चुका टाळुन भविष्यकाळात विकासाकडे घेऊन जाणारे शास्त्र आहे. असे म्हटले जाते जो इतिहास वाचतो तोच इतिहास घडवु शकतो. एका सर्वेक्षणानुसार हे सिद्ध झाले की, इतिहासाचा अभ्यास करणारे राजकीय, सामाजिक किंवा प्रशासकिय काममध्ये अत्यंत कुशल बनतात. आणि यशस्वी बनतात. इतिहास हा फक्त कुजलेलं किंवा उंदरांनी खालेलं कागदावरील नोंद नसुन अखिल मानव जातीच्या प्रगतीचा लेखा- जोखा असतो. इतिहासाकडे फक्त राजे- राजवाडे, युद्ध या दृष्टीनेच पाहिले जाते. परंतु मानवी जीवनात असलेली प्रत्येक गोष्ट वस्तु, खेळ, व्यवसाय, इ.या सर्वांचा इतिहास असतो. आणि हा इतिहास समजुन घेतल्या शिवाय मानवी जीवन समजणे अशक्य असते समाजावर ज्या गोष्टींचा पगडा असतो.त्यामध्ये धर्म,पंथ, प्रांत , भाषा यांचा पगडा असतो. त्याला सुध्दा एक समृद्ध इतिहास साक्ष असतो. प्रत्येक संपणारा दिवस हा इतिहासात एका नव्या प्रकरणाची भर घालत असतो. इतिहास म्हणजे इतिहासाच्या पुस्तकात दिलेल्या प्रकरणापुरता मर्यादीत नसतो. प्रत्येक जाणारा दिवस कालपर्यंतच्या बातम्या वर्तमानपत्रे, राजकीय घटना, सर्वसामान्य जीवनातील विषय सर्व, इतिहासाच्या क्षितीजावर प्रत्येक क्षणी एक नविन प्रकरण कोरत असते.

**प्रस्तावना :-**

इतिहास हा मानवाच्या उत्क्रांती पासुन सावली पासुन माणसाचा पिच्छा पुरवतो. अगदी पुर्वीच्याकाळी लेखनकला अवगत नव्हती तेव्हा- सुद्धा लोक भिंती चित्रांच्या माध्यमातुन लोककथा, लोकगीते अशा तोंडी माध्यमातुन, चित्राच्या माध्यमातुन दुस-या पिढीकडे हस्तांतरित केला जात होता. अशा प्रकारची भिंतीचित्रे जगभरात अनेक ठिकाणी आढळतात. म्हणजेच माणसाची घडुन गेलेला इतिहास सांगण्याची एक परंपराच आहे. जगभरात वेगवेगळया ठिकाणी झालेली उत्खनने आणि त्यात सापडलेली लिखित इतिहासाची साधने यावरुन हे ज्ञात होते की, वेगवेगळया समाजामध्ये इतिहास जतन करुन ठेवण्याची प्रेरणा प्रबळ आहे, आता प्रश्न असा पडतो की, इतिहासात गाडलेली मढी उकारण्याचा फायदा काय ? इतिहासाचा अभ्यास संशोधक या नात्याने करणे म्हणजेच मानवी समाज, मानवी जीवन समजुन घेणे आणि त्याचा उपयोग भविष्यातील नोकरीच्या संधी, जीवन समृद्ध करण्याच्या संधी शोधणे होय. आज प्रत्येक शास्त्रात मग ती विज्ञान शाखा असेल वाणिज्य शाखा असेल कला असेल प्रत्येक घटनेचा किंवा वैज्ञानिक शोधांचा इतिहास अगोदर शिकवला जातो जसे की संगणक शिकवताना अगोदर संगणकाचा इतिहास शिकवला जातो विज्ञान विषयाची छोटया छोटया वर्गात शिकवण्याची जी सुरुवात होते तीच मुळात वैज्ञानिक आणि त्यांनी लावलेल्या शोधातुनच भाषा विषयांचे व्याकरण म्हणजेच भाषेचा जन्म आणि त्याच्या इतिहास जाणून घेणे गणित शिकत असतांनाही सुरुवात ही गणितज्ञ संख्येचा इतिहास या पासूनच होत असतो म्हणजे इतिहास हाच सर्व शास्त्राचां विषयांचा पाया आहे. प्रत्येक शास्त्र त्याचा इतिहास अभ्यास केल्याशिवाय तो पूर्ण होऊच शकत नाही.

**इतिहास आणि विकासाच्या संधी**

इतिहासाचे अभ्यासक आणि संशोधक यांच्याकडे पाहण्याची दृष्टी जरा वेगळी असली तरी इतिहासाच्या अभ्यासकांना वेगवेगळया विकासाच्या संधी खुणावतात आणि त्या फक्त इतिहासाच्या अभ्यासकांनाच दिल्या जातात. विकासाच्या संधी पुढीलप्रमाणे :-

**१) पर्यटन आणि ऐतिहासिक ठिकाणे :-**

प्रत्येक ऐतिहासिक वस्तु, वास्तु आणि ठिकाणांवर केंद्रीय शासना अंतर्गत असलेल्या पुरातत्वीय खात्यामार्फत लाखो लोकांची नियुक्ती ऐतिहासिक वास्तुचे जतन करण्यासाठी केली जाते या साठी फक्त इतिहासाचा चिकित्सक अभ्यास केलेल्या लाकांनाच संधी असते

**२) मार्गदर्शन :-**

मानवी जीवन अत्यंत धकाधकीचे झाले असून माणुस हा यंत्राचा एक भाग बनुनु राहिला आहे अशा या धकाधकीतुन त्याला सुटका हवी असते आणि यातच जन्म होतो पर्यटनाचा पर्यटन फक्त जिल्हया परुते राज्यापुरते देशापुरते मर्यादीत नसुन ते आंर्तराष्ट्रीय स्तरापर्यंत जाऊन पोहचले आहे प्रत्येक आठवडयाचा शेवट मानवाला कुठे तरी विरंगुळा म्हणुन जाण्याची इच्छा असते अशा ऐतिहासिक आणि निसर्ग रम्य स्थळांवर एक मार्गदर्शक शासकीय व अशासकीय स्तरावर मार्गदर्शक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध आहे.

**३) वस्तुसंग्रहालयामंध्ये काम करण्याची संधी :-**

ऐतिहासिक वस्तुंचे संग्रहालये ही पर्यटनाचा अत्यंत गर्दी खेचणारा असा महत्त्वाचा दुवा आहे तसेच इतिहास संशोधक व अभ्यासकलाही वस्तु संग्रहालयाची मदत होत असते. अशा वस्तु संग्रहालयांमध्ये अनेक प्रकारची कामे करण्यासाठी कुशल कौशल्य असणा-या लोकांची गरज असते

**४) दस्ताऐवज :-**

ऐतिहासिक दस्ताऐवज संभाळणे, त्यावर प्रक्रिया करणे, प्रदर्शन भरवणे, संशोधनकला पहिजे त्या वेळी उपलब्ध करुन देणे, वेगवेगळया भाषेतील दस्तऐवज वाचणे अशा प्रकाची अनेक दस्ताऐवज संग्रहालयात, पुणे दिल्ली, मुंबई, कोलकता येथील संग्रहालयात आहेत या मध्ये शिवाजी महाराजांच्या काळापासुन ते ब्रिटीशांच्या राजवटीची दस्ताऐवज जतन करुन ठेवली आहेत या साठी बराच मोठा कुशल कर्मचारी वर्ग आवश्यक असतो यांच्या नियुक्त्या भारतीय पुरातत्व खात्यामार्फत केल्या जातात.

**५) वर्तमानपत्रे :-**

वर्तमानपत्रांमध्ये दररोजच्या बातम्यांमध्ये राजकीय व सामाजिक बातम्याना ऐतिहासिक संदर्भ देण्याची व लोकांना त्या वर्तमानपत्रांकडे आकर्षित करण्याची एक स्पर्धाच चालु असल्याचे जाणवते त्याच बरोबर दररोजचा दिनविशेष ऐतिहासिक घटना समाज सुधारक राष्ट्रीय पुरुषांच्या पुण्यातिथी जयंती या दिवशी काढलेल्या पुरवण्या त्यासाठी इतिहास अभ्यासकाची गरज भासत असते म्हणजेच इतिहास अभ्यासकला या ठिकाणी काम करण्याची संधी उपलब्ध होत असते.

**६) खेळ समालोचक :-**

खेळाच्या सामन्यामध्ये समालोचकाची भूमिका महत्त्वाची असते समालोचन करण्यासाठी त्या खेळाचा इतिहास समालोचकाला माहिती असणे गरजेचे आहे .

उदा. क्रिकेट, हॉकी, या खेळांच्या सामान्याचे समालोचन करताना समालोचकाला क्रिकेटचा इतिहास, तसेच त्याची सुरुवात कधी झाली. कोणी केली या अगोदर कुणी किती धावा केल्या शतके किती व कुणी केली तसेच त्या खेळाडू बद्दल माहिती असणे आवश्यक आहे. म्हणजेच ज्याला खेळाचा इतिहास माहिती आहे अशाच व्यक्तीला समालोचक म्हणुन काम करण्याची संधी मिळते.

**७) ऐतिहासिक चित्रपट :-**

ऐतिहासीक चित्रपटाचे दिगदर्शन करत असताना वेशभुषेपासुन तर भाषा, केशभुषा, वस्तु, वास्तु यांची पुरेपुर अभ्यास असणा-या लोकांची गरज असते. वेगवेगळे ऐतिहासिक धार्मिक मालिकांचे दिगदर्शन करतांना ऐतिहासिक वातावरण निर्माण करावे लागते. या कामासाठी इतिहासाची पुर्ण माहिती असणा-या लोकांची आवश्यकता असते. अन्यथा अशा चित्रपट व मालिकांमध्ये चुका राहुन जातात.

उदा. मालिका श्रीकृष्णाची असते आणि चुकुन जर्सी आणि होलस्टेन गाया मागे पार्श्वभुमीवर दिसतात. किंवा खंडोबा मालिकामध्ये भाषा जी वापरली गेली ती आधुनिक पुणेरी भाषा वाटते.मुळात पुणे हे शहर छत्रपती शिवाजी महाराजांनी वसवले होते आणि खंडोबाचा काळ त्याही आधीचा आहे.

**८) भाषा ज्ञान -**

ऐतिहासीक दस्तऐवजांचे वाचन करण्यासाठी, ब्राम्ही, मोडी संस्कृत या भाषांवर प्रभुत्व असणारे इतिहासकार यांना तर फारच मागणी असते. कारण मध्ययुगीन आणि त्या अगोदरचे जे लिखित साहित्य सापडते त्यामध्ये ब्राम्ही, मोडी, पाली संस्कृत, अर्धमाग्धी इ. भाषांचा समावेश दिसतो. अशा विविध ऐतिहासिक भाषांचे ज्ञान असणा-या लोकांना खुप मोठया प्रमाणावर वाव आहे.

**९) नाणकशास्त्र-**

विविध काळातील चलनात असणारी नाणी ही इतिहासामध्ये अत्यंत महत्तवाचे साधन आहे. नाण्यांचा इतिहास व नाण्यांमधुन येणारा इतिहास हे समजुन घेण्यासाठी इतिहासकाराची गरज असते. अशा इतिहासकारास पुरातन भाषांचे ज्ञान असणे आवश्यक असते. याच बरोबर धातू शास्त्राचेही ज्ञान असणे आवश्यक आहे. अशा लोकांना भारतीय पुरातत्त्व खात्यामध्ये संधी निर्माण होतात.

**१०) संस्कृती जतन व संवर्धन-**

इतिहासाच्या अभ्यासाच्या माध्यमातुन पुरातन प्राचीन संस्कृती तसेच उत्खननात सापडलेल्या विविध खेळण्या, मुर्ती, मातीची भांडी, स्नानगृहे, गृहरचना, सांडपाण्याची व्यवस्था अशा समृद्ध संस्कृतीचे दर्शन आपणाला घडत असते. यातुन आजची संस्कृती व प्राचीन संस्कृती याची जेव्हा तुलना होत असते तेव्हा संस्कृतीचे जतन होत असते. तोंडी, ओव्या, जात्यावरची गाणी, नाटक, भजन, किर्तन, गवळणी, भारूडे, लोककथा, लोकगीते या सर्वांना एक विशिष्ट इतिहास आहे. आणि यातुनच भारताची समृद्ध संस्कृतीचे जतन व संवर्धन झालेले दिसते.

**समारोप -**

प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातुन असे निष्कर्ष निघतो की,इतिहासाचे ज्ञान असणा-या लोकांना विविध क्षेत्रामध्ये अत्यंत उपयुक्त अशा संधी अस्तित्वात आहेतच परंतु इतिहास हा विषय मानवी समाजाच्या उन्नतीचा आलेख, दाखवणारे शास्त्र असल्याने त्याच बरोबर इतर सामाजिक शास्त्रांची जननी असल्याने या विषयांचा अभ्यास करणारे आयुष्यात यशस्वीच होतांना दिसतात . आज पर्यंत ज्यांनी ज्यांनी ऐतिहासिक पुस्तके लिहिली ते लोकही अजरामर

झाले. म्हणजेच इतिहासाचा अभ्यास हा भूतकाळात मेलेली मुडदी उकरणे नसून मानवाच्या स्वत:च्याच जीवनाचा अभ्यास आहे. इतिहास ज्याला समाजला ज्याने अंगीकारला तो समाजामध्ये अत्यंत शीलवान मनुष्य म्हणून जगण्यास लायक ठरतो. आणि हाच समाज नैतिक बनवण्याचा एक मार्ग आहे. कारण भूतकाळात कोणाला कशी शिक्षा झाली. पुढच्याला ठेस मागचा शहाणा या नितीने समाज ही निती पूर्ण वागण्यास सज्ज होतो.

ज्या चुका भूतकाळात किंवा पूर्वाजांनी केल्या त्या चुका पुन्हा करण्याच धाडस मानव आज करतांना दिसत नाही. दुस-या महायुध्दाचे विनाशकारक परिणाम पहाता आज जग हे अणुबॉम्बचे कोठार असताना कुणीही आज ते वापरण्याचे हिम्मत करतांना दिसत नाही. म्हणजेच इतिहास हा मानव वंशाशी व त्याच्या विकासाशी जोडलेला असल्याने आधुनिक काळातही प्रत्येक व्यक्तीने इतिहासाचा अभ्यास करणे व त्यातुन जीवन जगण्यासाठी उपयुक्त संधी शोधणे अत्यंत गरजेचे ठरते. मुळात या संधी इतिहासाचा जाणीवपुर्वक तसेच काळजीपुर्वक अभ्यास करणा-याच्या ऐतिहासिक दृष्टिकोनावरच अवलंबुन असतो.

**संदर्भ सूची :-**

१. उपयोजित इतिहास - डॉ. सुलोचना पाटील (२०१५)

२. इतिहास - तंत्र आणि तत्त्वज्ञान - शांता कोठेकर (२००६)

◆◆◆

# प्रभावी शेती प्रकल्प - 'वाडी' या विषयावरील संशोधन पेपर

**सौ.अनुप्रिता प्रसाद भोर**
श्री.शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती पुणे

**डॉ.बोत्रे जी.एस.**
मार्गदर्शक
श्री.शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती पुणे

**गोषवारा** :प्रस्तावना, भारतीय कृषी उद्योग फाउंडेशन (बीएआयएफ), 'वाडी' कार्यक्रम, 'वाडी' कार्यक्रमाचा प्रभाव.

**मुख्य मुद्दे**:

आदिवासींच्या विकासाचे मॉडेल म्हणून 'वाडी' ओळखले जाते. पडीक जमीन  विकास कार्यक्रमात हाती घेतलेल्या धोरणात्मक सुधारणांमध्ये भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान संस्था - तत्त्वज्ञान आणि दृष्टिकोन प्रतिबिंबित झाले.स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, प्रशिक्षणात सामील होणे व समुदाय कल्याणकारी उपायांमुळे आदिवासींच्या आरोग्यावर आणि स्वच्छतेच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यास मदत करते. भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान आणि स्थानिक आदिवासींच्या बांधिलकीच्या दशकाहून अधिक काळ पालन केल्याने हे यश शक्य झाले. छोट्या व सीमान्त भूजलधारकांना सुधारित भूमी वापराखाली आणले गेले आणि गरीब कुटुंबांना आंबा आणि काजूच्या झाडाची लागवड करण्यास प्रशिक्षण देतेआहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान सहाय्यक आणि मार्गदर्शन, आणि उचित किंमत निश्चित करणे आणि विपणन मूल्य वाढीद्वारे लाभ निर्माण करण्यात सहकार्य करते.

भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानचे तत्वज्ञान आणि दृष्टिकोन जिथे सर्वोत्तम वनस्पती विकास कार्यक्रमात राबविण्यात आलेल्या धोरणात्मक सुधारणांचे प्रतिबिंब दिसते जे 'वाडी' म्हणून ओळखले जाऊ लागले

वाडी हे आदिवासींच्या विकासाचेटिकाऊ मॉडेल आहे. याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ते सरकारी कार्यक्रमातून लागू न करता तसेच कोणत्याही अनुदानाची ऑफर न घेता लाभार्थ्यांच्या ऐच्छिक सहभागाने विकसित झाले आहे.जमिनीची गुणवत्ता कमी असल्याने 'वाडी' हा कोरडवाहू शेतातील लहान शेतकऱ्यासाठी एक आदर्श उपक्रम आहे.

हा पेपर वाडी कार्यक्रम आदिवासींचा आणित्यांच्याभागाचा कसा विकास करीत आहे यावर प्रकाश टाकतो.

**उद्देश:**

१. 'वाडी प्रकल्प' संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. 'वाडी'प्रकल्पांतर्गत भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

३. भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानद्वारे 'वाडी' कार्यक्रमाची अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

४. इतर आदिवासी क्षेत्रासाठी माहिती प्रदान करणे.

**प्रस्तावना:**

दक्षिण गुजरातमधील वंसदा जिल्ह्यातभारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानचा प्रवेश नाट्यमय ठरला. १९८२ मध्ये मफतलाल यांनी स्थापन केलेल्या सद्गुरू सेवा संघाने त्यांचे कौटुंबिक मित्र डॉ. मणिभाई देसाई यांना वासंदा येथे ५ दशलक्ष रुपयांचा प्रकल्प ताब्यात घेण्यास आमंत्रित केले.त्या ठिकाणी प्रचंड दारिद्र्यहोते.आदिवासींची अत्यंत निराशेची स्थिती होती आणि आत्मविश्वासाच्या अभावामुळे ते पूर्णपणे ग्रासले होते. त्यांच्या नैराश्याची ही मर्यादा होती आणि म्हणूनच नेहमीचा मद्यपान नित्यनेमाने होऊन आदिवासीमध्ये त्यायोगे दारूचे व्यसन पूर्णपणे वाढलेले होते.आदिवासी दारू पिऊन दारिद्र्य, उपासमार आणि स्वत: चा पराभव आणि विकास यांचा नाश करणाऱ्या गोष्टीना बळी ठरले.

**भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान:**१ एप्रिल १९४६ साली महात्मा गांधी यांनी उरुळी कांचन येथे निसर्गोपचार आश्रमाची स्थापना केली.डॉ. मणिभाई देसाई यांवर त्याची जबाबदारी सोपवली. पुढील४७ वर्षे त्यांनी निसर्गोपचार आश्रमाच्या सामुदायिक आरोग्यासाठी प्रचार केला, त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या जवळून पाहिल्या व या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी विविध संस्थांची स्थापना केली. त्यातीलच एक 'भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान' ही संस्था आहे. या संस्थेची स्थापना २४ ऑगस्ट १९६७ केली गेली. ही संस्था ग्रामीण भागातील कुटुंब स्वावलंबी बनवण्यासाठी त्याचबरोबर पर्यावरणाचे संवर्धन व जतन करावे यासाठी मार्गदर्शन करते. जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांनी मानवी मूल्यांचा विकास केला. स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा परिणामकारक उपयोग करून विकास संशोधन करून त्यांनी तंत्रज्ञानाचाही विकास आणि विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित केले. ही संस्था शाश्वत ग्रामीण विकासासाठी कटिबद्ध आहे. पर्यावरणातील नैसर्गिक संसाधनांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे व तो पुढील पिढीकडे हस्तांतरित केला पाहिजे, ही आपल्या प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे हे ध्येय समोर ठेवूनच भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान या संस्थेने आपल्या कार्याचे स्वरूप निश्चित केले आहे.

ग्रामीण व आदिवासी भागातील लोकांचे सामाजिक व आर्थिक पुनर्वसन करणे व त्यासाठी उपलब्ध साधन सामग्रीचा योग्य प्रकारे उपयोग करणे हे या संस्थेचे ध्येय आहे. भारतीय कृषी प्रतिष्ठान ही संस्था भारतात १६ राज्यातील ६० हजार खेड्यांमध्ये ४५ लाखाहून अधिक कुटुंबास पशुधन विकास, जलस्रोत विकास, भूमिहीन विकास कार्यक्रम, पडीक जमिनी वरील वृक्ष आधारित शेती पद्धती म्हणजेच 'वाडी', महिला सक्षमीकरण सामुदायिक आरोग्य यासारख्या कार्यक्रमाद्वारे ग्रामीण भागातील लोकांना चांगले जीवन जगता यावे यासाठी ही संस्था सतत कार्यरत आहे.

भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान प्रतिष्ठान आतील विविध कार्यक्रमांचा महाराष्ट्रातील ३१ जिल्हे १८८ तालुके ५६१२ खेडी आणि २ लाख ७९ हजार४५९ कुटुंबांना लाभ मिळत आहे. भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानला नाबार्ड, राज्य सरकार, केंद्र सरकार आणि स्वयंसेवी संस्था अर्थसाहाय्य करीत आहे.

**'वाडी' कार्यक्रम:**

भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठाने कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी तिथे सरकारच्या 'कामासाठी अन्न' कार्यक्रमाच्या मदतीने स्थानिक जमातींचा समावेश असलेल्या परिसरातील जंगले आणि पडीक जमीन विकसित करण्याचा कार्यक्रम सुरु होता. म्हणूनच त्यांनी भौतिकशास्त्रीय क्रियाकलाप चालू ठेवले कारण त्यांना आढळले की दारिद्र्य निर्मूलनासाठी हा सर्वात कौतुकास्पद आणि प्रभावी दृष्टीकोन होता.

भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठाचे तत्वज्ञान आणि दृष्टिकोन जिथे सर्वोत्तम वनस्पती विकास कार्यक्रमात राबविण्यात आलेल्या धोरणात्मक सुधारणांचे प्रतिबिंब दिसते जे 'वाडी' म्हणून ओळखले जाऊ लागले

**'वाडी' कार्यक्रमाची संकल्पना:**

'वाडी' हे आदिवासींच्या विकासाचेटिकाऊ मॉडेल आहे. याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ते सरकारी कार्यक्रमातून लागू न करता तसेच कोणत्याही अनुदानाची ऑफर न घेता लाभार्थ्यांच्या ऐच्छिक सहभागाने विकसित झाले आहे.जमिनीची गुणवत्ता कमी असल्याने वाडी हा कोरडवाहू शेतातील लहान शेतकऱ्यासाठी एक आदर्श उपक्रम आहे

कमी पाऊस पडलेल्या भागातील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळवून देण्यासाठी वृक्ष आधारित शेती यशस्वी झाली आहे. या मॉडेलमुळे महाराष्ट्राच्या काहीआदिवासी भागातील कुटूंबांच्या पडीक असलेल्या जागेचे रुपांतर उत्पादनक्षम जमिनीमध्ये करण्यात मदत झाली आहे.आंबा, काजू, आवळा लिंबू अश्या फळझाडे पिकविणाऱ्या जमिनीमध्ये रुपांतर करण्यात

मदत झाली आहे. छोट्या आणि आदिवासी भागातील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळवून देण्यासाठी मदत करणे हे भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानचे ध्येय आहे. या कार्यक्रमासाठी भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानचे डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन पुणे द्वारा प्रोत्साहित ग्रामीण क्षेत्रातील महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफर (MITRA) हि संस्था कार्यरत आहे . 'वाडी' म्हणजेगुजराती भाषेमध्ये '**छोट्या फळबागासाठी**'असा आहे .वाडी प्रकल्प सर्वप्रथम गुजरात राज्यतील वांसदा जिल्ह्यात १९८२ साली सद्गुरू सेवा संघातर्फे राबविण्यात आला. मणिभाई देसाई यानाआमंत्रित केले होते. उत्पादक थेट-हेजद्वारे जमीन धरणाऱ्या जमिनीच्या परिघावर वनक्षेत्रातील प्रजातींसह काजू आंबा, आवळा अशासाठी आहे. 'वाडी' कार्यक्रम महाराष्ट्रात मे १९९३ मध्ये सुरू करण्यात आला.

**'वाडी' मॉडेलचे प्रासंगिकता**:

भारतात एकूण लोकसंखेच्या ८.६% संख्या अनुसूचित जमातींची आहे, म्हणजे 104 दशलक्ष लोक (२०११ जनगणना). ही घरं परंपरागतपणे वनीकरण, शिकार आणि आदिम शेती पद्धतींद्वारे निर्वाह करतात. तथापि, नैसर्गिक स्त्रोत आणि काम न मिळाल्यामुळे जवळपासच्या शहरांमध्ये हंगामी स्थलांतरहोते.

'वाडी' मॉडेलमध्ये १ एकर जागेवर आलेख पद्धतीने ५० ते६० वनस्पतींचे वृक्षारोपण असते. 'वाडी' कार्यक्रमाचा लाभ घेतलेले शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.त्यांना खड्डा खोदण्यासाठी आलेख निवड,वृक्षारोपण,वृक्षाची काळजी घेणे उपक्रम, ज्यात शेती व भाजीपाला सुधारित लागवड समाविष्ट आहे. त्याबाबत त्यांना तांत्रिक सहाय्य देखील पुरवले जाते.'वाडी' प्रकल्पाच्या गुजरातमधील यशानंतरमहाराष्टात अनेक कुटुंबे या प्रकल्पात सामील झाली. महाराष्ट्रात सप्टेंबर २०११ पर्यंत ३४९३६ पेक्षा जास्त हेक्टर जमीन या प्रकल्पाअंतर्गत विकसित केली गेली. आंबा, काजू, आवळा, पेरू, लिंबू, लिंबूवर्गीय फळे पिकतात. या कार्यक्रमाचे यश हे जर्मन डेव्हलपमेंट बँक व नाबार्ड युरोपियन युनियन सारख्या बाह्यसंस्था कडून 'आदिवासी विकास कार्यक्रम'या अंतर्गत प्राप्त झालेला आर्थिक निधी मुळे मिळाले आहे. पट्टे कार्यक्रमाचा व्यापक प्रतिकृतीवर सकारात्मक परिणाम म्हणजे भारतातील १५ राज्यांतील सुमारे २ लाख कुटुंबांचे आर्थिक स्वावलंबन झाले आहे. भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठानने 'वाडी' प्रकल्प महारष्ट्रात यशस्वी केला आहे.

'वाडी' प्रकल्पाचा परिणाम:

१. 'वाडी' कार्यक्रमांतर्गत आदिवासी व ग्रामीण भागातील कुटुंबांचा आत्मविश्वास वाढला.
२. आदिवासी व ग्रामीण भागातील व्यक्तींच्या कौशल्याचा विकास झाला
३. आदिवासी भागातील कुटुंबाना आर्थिक स्वावलंबन मिळाले.
४. त्यांना मानसिक, सामाजिक, भावनिक स्वातंत्र्य मिळाले.
५. उद्योजक भावना विकसित झाली.
६. आरोग्य सेवा, शिक्षण, पोषक आहार याविषयी जागृती झाली.

निष्कर्ष:

१. विकास संस्था, आदिवासी, कॉर्पोरेट , वित्तीय संस्था, विकासक संस्था विविध भागधारकांच्या सक्रिय सहभाग यामुळे'वाडी' कार्यक्रमला मोठे यश प्राप्त होत आहे.
२. जमीन धारण करण्याच्या प्रयत्नांचे एकत्रिकरण केल्याने उत्पादन खर्चाची किंमत कमी होते आणि चाचण्यांमध्ये नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्यांचे पालनपोषण करणाऱ्या उत्पादकांची कार्य क्षमता कमी असते, हे सिद्ध करणारे उत्कृष्ट नेते सहभागी पद्धतीने विकसित होऊ शकतात हे सिद्ध करते.
३. वाडी मॉडेलने यशस्वी कार्य केलेकारण त्यात तंत्रज्ञानाचा समावेश आहे.

**References**:


1. Horticulture for tribal development by Dr. R.N. Hegde &Dr.S.D.Suryavanshi .
2. BAIF: History and heritage by BAIF Research Foundation.
3. The milky way - by Ranjnekar D.V, Joshi A.L.
4. BAIF AnnualReport2016- 2017.
5. BAIF Annual Report 2017 – 2018.
6. BAIF- Annual Report 2018- 2019.
7. Annual Report of MIITRA (Nashik)2016-17.
8. www.baif.org
9. https://www.baifwadi.org


◆◆◆

# भारतातील शेतमजूरांच्या समस्या व उपाय

**डुकरे गजानन निवृत्ती**
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**गोषवारा :**

वाढती लोकसंख्या, जमीनीचे तुकडीकरण आणि शेतीचे हंगामी स्वरुप यामुळे शेतमजूरांच्या समस्यात वाढ झाली आहे. भारतीय शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे, त्यामुळे शेतमजूरांना फक्त हंगामाच्या काळातच काम मिळते हंगाम संपल्यानंतर मात्र जवळपास ४ ते ६ महिने बेरोजगार राहावे लागते. १९४८ चा किमान वेतन कायदा शेतीलाही लागू करण्यात आला आहे, परंतू भारतातील अनेक राज्य अशी आहेत की तेथे या कायद्याची अमंलबजावनी अद्याप केली जात नाही. तसेच समान कामामध्ये सुध्दा स्त्री व पुरुष यांच्या वेतनामध्ये फरक केला जातो.

**Keyword :** १९४८ चा किमान वेतन कायदा, हंगाम, शेतमजूर, समस्या, उपाय.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारताची सुमारे ७० टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागत आहे. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती व्यवसाय आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार पुरविणारे शेती हे प्रमुख क्षेत्र आहे. शेतीमधील विविध प्रकारची कामे श्रमींकाच्या साहाय्याने केली जातात. शेतीमध्ये काम करण्यासाठी ज्या व्यक्तीची मदत घेतली जाते त्या व्यक्तीला शेतमजूर असे म्हणतात.

कृषीचे उत्पादन हे शेतमजूरांच्या कष्टावर अवलंबून असल्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये शेतमजूर हा घटक महत्त्वाचा आहे.

**भारतातील शेतमजूरांचे वर्गीकरण :**

**शेतमजूरांचे वर्गीकरण साधारणपणे दोन प्रकारात केले जाते.**

अ. १. अल्पभूधारक शेतमजूर २. भूमिहीन शेतमजूर

**१. अल्पभूधारक शेतमजूर :** ज्यांच्याजवळ थोडी जमिन आहे पण त्या जमिनीतून त्यांचा उदरनिर्वाह भागत नाही म्हणून त्यांना इतरांच्या जमिनीवर काम करावे लागते अशा शेतमजूरांना अल्पभूधारक शेतमजूर असे म्हणतात.

**२. भूमिहीन शेतमजूर :** ज्यांच्याकडे थोडीसुध्दा जमीन नाही श्रम हेच त्यांचे उपजिविकेचे साधन आहे अशा शेतमजूरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

**ब. शेतमजूर चौकशी समितीने केलेले वर्गीकरण :** शेतमजूर चौकशी समितीने शेतमजूरांचे वर्गीकरण दोन प्रकारात केले आहे. १. नियमित किंवा संलग्न शेतमजूर २. नैमित्तिक शेतमजूर

**१. नियमित किंवा संलग्न शेतमजूर :** नियमित मजूरांचा जमिन मालकांशी तोंडी किंवा लेखी करार झालेला असतो. पूर्वी हे करार तोंडीच होत होते. पण वर्तमानकाळात हे करार साधारणपणे लेखी केले जातात हे करार तीन महिने ते एक वर्षाच्या कालावधीसाठी असतात. भारताच्या ग्रामीण भागात सालदारांचे वेतन वर्षाचे ठरविले जाते. वेतनाबरोबरच त्याला देण्यात येणारे धान्य, कपडा हे सुध्दा ठरविले जाते. सालदार वर्षभर या वेतनावर शेतकऱ्याच्या शेतावर काम करण्यास बांधील असतो.

**२. नैमित्तिक शेतमजूर :** जे शेतमजूर नियमित नसून जसे काम पडेल तसे रोजंदारीवर घेतले जातात त्यांना नैमित्तिक शेतमजूर असे म्हणतात. त्यांना दररोज आणि पूर्ण वेळ काम मिळेल याची शाश्वती नसते. एकाच ठिकाणी त्यांना काम मिळत नाही. जिथे कामाचा होका आला तिथे त्यांना काम करण्यास जावे लागते. त्यांचे वेतन तत्त्कालीन परिस्थितीनुसार व कामाच्या स्वरुपानुसार ठरते.

**भारतातील शेतमजूरांची वैशिष्टये :**

१. शेतमजूरांना पूर्ण वेळ व रोज काम मिळतेच असे नाही त्यामुळे त्यांना अनेक दिवस बेरोजगार राहावे लागते.

२. शेतमजूरांचे वेतन हे निश्चित नसते तर कामाच्या स्वरुपानुसार त्यात बदल होतो. लहान मुले व स्त्रिया यांना पुरुषांच्या तुलनेने कमी वेतन दिले जाते.

३. शेतमजूरांना मिळणारी मजूरी काही प्रमाणात धान्याच्या स्वरुपात तर काही प्रमाणात पैशाच्या स्वरुपात दिली जाते.

४. शेतमजूरांना मिळणारे वेतन कमी असल्यामुळे त्यांना निकृष्ट प्रतीचे जीवनमान जगावे लागते.

५. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती असल्याने शेतमजूर ग्रामीण भागात केंद्रीत झाले आहे.

६. शेतमजूर हे विखूरलेले असतात, ते असंघटीत आहेत, त्यांच्या संघटना नाहीत त्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमी आहे.

७. भारतीय शेतमजूरांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. शेतीकाम करण्यासाठी विशेष असे शिक्षण किंवा प्रशिक्षणाची गरज नसते त्यामुळे निरक्षर व्यक्ती शेतमजूर म्हणून काम करतात.

**कृषी वेतन :**

१९४८ चा किमान वेतन कायदा शेतीलाही लागू करण्यात आला आहे परंतू भारतातील अनेक राज्य अशी आहेत की तेथे या कायद्याची अमंलबजावनी केली जात नाही. ज्या राज्यांमध्ये या कायद्याचे पालन केले जाते तेथेही याची योग्य रितीने अमंलबजावनी होत नाही. मजूरीचे दर राज्यपरत्वे व कालपरत्वे बदलतात. तसेच हंगामाच्या दिवसात किमान वेतनापेक्षाही जास्त वेतन किंवा मजूरी शेतमजूरांना दिली जाते आणि हंगामेतर काळात

किमान वेतनापेक्षाही कमी वेतन शेतमजूरांना दिले जाते. हा कायदा लागू करण्यात अनेक अडचणी येतात. कायद्यासंबंधीचे अज्ञान, निरक्षरता, असंघटीतपणा, शेतमजूरांचे दारिद्रय, रोजगाराची अनियमितता इ. कारणांमुळे हा कायदा लागू करण्यात अनेक अडचणी येतात. विविध राज्यात स्त्री, पुरुष आणि लहान मुले यांना देण्यात येणाऱ्या मजूरीत खूप भिन्नता दिसून येते. मे १९८७ मध्ये कामगार मंष्यांच्या संमेलनात शेतमजूरांची किमान मजूरी प्रतिदिन १५ रु. ठरविण्यात आली होती. राष्ट्रीय आयोगाने ती प्रतिदिन २० रु. केली. श्रम मंत्रालयाने फेब्रुवारी २००४ मध्ये सर्व राज्यांना सूचना दिली की प्रत्येक राज्याने किमान मजूरी दर प्रतिदिन ६६ रु. निश्चित करावा. त्यापेक्षा कमी मजूरी दर निश्चित करु नये. त्यानुसार वेगवेगळया राज्यात वेगवेगळे मजूरी दर निश्चित करण्यात आले. खालील तक्त्यात भारतातील प्रमुख राज्यातील प्रतिदिन किमान आणि कमाल मजूरी दर दर्शविण्यात आहे आहे.

**तक्ता क्र. १**

**विविध राज्यातील प्रतिदिन किमान व कमाल मजूरी दर**

**(मजूरी प्रतिदिन रु. मध्ये)**

| वर्ष<br>राज्याचे नाव | २००८–०९ | | २०१०–११ | |
|---|---|---|---|---|
| | किमान मजूरी | कमाल मजूरी | किमान मजूरी | कमाल मजूरी |
| केरळ | ७२.०० | ३२८.०० | ११०.० | ३२२.१० |
| **महाराष्ट्र** | **४६.१३** | **२०१.३०** | **९५.६५** | **२४८.१५** |
| कर्नाटक | ७६.९६ | १३२.१० | ८२.५७ | २२७.८१ |
| तामिळनाडू | ५७.९४ | १५८.७० | ८१.९१ | २२२.३५ |
| हरियाणा | १३८.०० | १३८.०० | १७३.१९ | १७३.१९ |
| मध्य प्रदेश | ७६.३१ | ११५.२७ | ११९.० | १६९.०३ |
| गुजरात | ५५.०० | ११५.८० | १००.० | १६९.०० |
| उत्तर प्रदेश | ७६.३१ | ११५.२७ | १००.० | १६०.१५ |
| छत्तीसगड | ६९.०० | १०३.२८ | १०४.६ | १५१.०४ |
| पंजाब | १०२.६० | १०४.३१ | १४७.७३ | १४७.७३ |
| पश्चिम बंगाल | ५७.०१ | १२६.४२ | ११२.५० | १४६.५३ |
| बिहार | ७५.०० | ८९.०० | १३८.० | १४४.० |
| जम्मू काश्मिर | ६६.०० | ६६.०० | ११०.० | ११०.० |
| आसाम | ५४.८० | ७६.६० | ६६.५ | १००.० |
| उडीसा | ७०.०० | ७०.०० | ९०.० | ९०.० |
| **भारत** | **७८.००** | **१८६.००** | **१५६.०** | २५६.० |

(Source : Ministry of Labour, Annual Report, 2011-12)

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की वेगवेगळया राज्यातील मजूरीचे दर वेगवेगळे आहेत. किमान वेतन दर हे हरियाणा आणि पंजाब या राज्यामध्ये जास्त आहेत. तर आसाम, कर्नाटक, ओडिसा, महाराष्ट्र, इ. राज्यात कमी आहेत.

**तक्ता क्र.२**

**शेतमजूरांची संख्या (दश लक्षात)**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | वाढीचा दर (टक्के) | ग्रामीण लोकसंख्या | शेतकरी | शेतमजूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५१ | ३६१.१ | १.२५ | २९८.५ | ६९.९ | २७.३ | ९७.२ |
| १९६१ | ४३९.२ | १.९६ | ३६०.१ | ९९.५ | ३१.५ | १३१.५ |
| १९७१ | ५४८.२ | २.२० | ४३९.० | ७८.२ | ४७.५ | १२५.७ |
| १९८१ | ६८३.३ | २.२२ | ५२५.५ | ९२.५ | ५५.५ | १४८.० |
| १९९१ | ८४६.४ | २.१६ | ६२८.७ | ११०.७ | ७४.६ | १८५.३ |
| २००१ | १०२८.७ | १.९७ | ७४२.५ | १२७.३ | १०६.८ | २३४.१ |
| २०११ | १२१.०९ | १.५० | ८३३.७ | ११८.८ | १४४.३ | २६३.१ |

(Source : Agricultural Statistics At a Glance-2019)

तक्ता क्र. २ मध्ये भारतातील एकूण लोकसंख्या, शेतकरी, आणि शेतमजूर यांची आकडेवारी विविध जनगणनेनुसार दर्शविण्यात आली आहे. १९५१ मध्ये भारतातील एकूण लोकसंख्या ३६१.१ दशलक्ष होती ती २०११ मध्ये १२१.०९ दशलक्ष झाली. या लोकसंख्येत ग्रामीण लोकसंख्या १९५१ मध्ये २९८.५ दशलक्ष होती. २०११ मध्ये ८३३.७ दशलक्ष झाली यावरुन ग्रामीण लोकसंख्येत वाढ झाल्याचे दिसून येते. या लोकसंख्येत १९५१ मध्ये ६९.९ दशलक्ष शेतकरी होते. तर २७.३ दशलक्ष शेतमजूर होते. २०११ मध्ये ११८.८ दशलक्ष शेतकरी होते. तर १४४.३ दशलक्ष शेतमजूर होते. यावरुन शेतकरी आणि शेतमजूर यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे असे दिसते.

**भारतातील शेतमजूरांच्या समस्या :**

१. हंगामी स्वरुपाचे काम
२. कमी उत्पन्न
३. राहणीमानाचा दर्जा
४. कर्ज बाजारीपणा
५. स्त्री व पुरुष यांच्या वेतनातील तफावत / फरक
६. स्थंलातर
७. शिक्षणाचा अभाव
८. सामाजिक चालीरितीवंरील खर्च

९. शेतमजूरांच्या संख्येतील वाढ

**उपाय :**

१. ग्रामीण भागात लघु व कुटीर उद्योग स्थापन करावेत त्यामुळे शेतीचा हंगाम संपल्यानंतर सुध्दा कामगारांना काम उपलब्ध होईल.

२. शेतीला पुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन इ. प्रकारचे व्यवसाय करावेत.

३. रोजगार हमी योजना कार्यक्रम राबवावेत.

४. शेतमजूरांच्या सहकारी समितीची स्थापना करावी.

५. किमान मजूरी अधिनियम कायदा

६. शेतमजूर आणि किमान वेतन कायद्याची अमंलबजावणी करावी.

७. अन्य कायदेशीर उपाय योजना कराव्यात.

**निष्कर्ष :**

वाढती लोकसंख्या आणि शेतीचे हंगाची स्वरुप यामुळे एकूण शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात वाढ झाली आहे. त्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या प्रश्नांना तोंड दयावे लागत आहे. १९४८ च्या किमान वेतन कायद्याची अमलबंजावणी झालेली नाही. वेगवेगळया राज्यामध्ये किमान व कमाल वेतनामध्ये फरक आहे. तसेच वेतनातील लिंग विषमता आढळून येते. यामध्ये समान कामाकरिता सुध्दा स्त्री व पुरुष यांच्या वेतनामध्ये फरक आहे.

**संदर्भ :**

1. Agricultural Statistics At a Glance -2019 P. No. 12
2. Dutt & Sundharam, "Indian Economy", 66th Revised Edition, S. Chand & Company Ltd, New Delhi. P. No. 659
3. Desai R. G., "Agricultural Economics", (2006) Himalaya Publishing House, New Delhi. P. No. 130
4. Ministry of Labour, Annual Report (2011-12)
5. www.censusindia.net

६. देसाई स. श्री आणि भालेराव निर्मल, “कृषी अर्थशास्त्र”, (१९९५), निराली प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती, पा.नं. १६३

७. नीता वाणी, “कृषी अर्थशास्त्र”, (२०१५) प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. द्वितीय आवृत्ती, पा.नं. १३१

◆◆◆

# शाश्वत पर्यावरणीय विकासावर आर्थिक विकासाचा झालेला परिणाम एक अभ्यास

**विश्वजीत गोपीनाथ नरवडे**

संशोधक विद्यार्थी

कवयित्री बहिणाबाई चौधर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रस्तावना

आर्थिक विकास आणि पर्यावरण यांचा सहसंबध अगदी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्या कधीच एकमेकापासून दूर करता येत नाही . मानव आपल्या सुरवातीच्या काळापासून निसर्गातील घडणा-या असंख्य घटनांतून शिकतआला . त्यांच्या जडणघडणीत पर्यावरणाचा वाटा हा १००% आहे . आज माणूस पर्यावरणाचा विचार केल्याशिवाय आपल्या आर्थिक विकासाची संकल्पनाहि करू शकत नाही. या पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी भारतीय अनेक संस्थानाही आपआपला सहभाग नोंदविला आहे . अनेक आंदोलने हि भारतात सुप्रसिध्द होती त्यात सुंदरलाल बहुगुणा यांचे चिपको आंदोलन, मेघा ताई यांचे जगप्रसिध्द नर्मदा बचाव आंदोलन , आंध्र प्रदेशातील अपिको आंदोलन, नामामी गंगे, नद्यांचे शुद्धीकरण, इत्यादी चळवळी अत्यंत महत्वाचे कार्य करत आहे. पर्यावरणाचा ह्रास होण्याच्या मागचे मुख्य कारण वेगवान प्रगती आणि मानवी समाजाच्या लालसेपोटी, आर्थिक विकास साधण्याच्या हव्यासापोटी पर्यावाराकडे केलेले दुर्लक्ष होय . 200 वर्षांच्या मानवी प्रगतीच्या, ज्ञानाच्या वेगवान प्रगतीने मात्र मानवाला हवामानाचा विसर पडल्याने त्यात झालेला झालेला नाट्यमय बदल, प्रदूषनाचा गाठलेला अति उच्चतम दर, अनेक सजीव प्राणी यांच्या प्रजातीचा झालेला विनाश ,अमर्याद झालेली आणि सातत्याने सुरु असलेली जंगलतोड याचा परिणाम असा झाला कि हवामानात प्रचंड स्वरूपाचा बदल घडून आला, त्यातून ग्लोबल वार्मिंग आणि ओझोन क्षय यासारखे पर्यावरणीय दोष निर्माण झाले. पाणी, जंगल आणि जमीन यांचे नियोजन आणि संवर्धन, आपण वेळीच केले नाही तर आज जे काही विकासाच्या वल्गना केल्या जात आहेत त्या पूर्णपने नाहीश्या होतील. प्रचंड अश्या वैश्विक महामारी असलेल्या नैसर्गिक आपत्तीला सामोर जावे लागेल .

अ) नो गो एरिया या क्षेत्रात पर्यावरणाच्या बाबी समोर ठेवून कोळसा खाणीवर बंदी घातली. यातून उत्पादन आणि विद्धुत उत्पादन योजना पूर्णपणे ठप्प झाली.

आ)महाराष्ट्र यामध्ये पर्यावरण रक्षण यांचा मुद्दा समोर ठेऊन लावासा होऊसिंग प्रोजेक्ट ला बंदी घातली

इ) उत्तराखंड सरकारला अवैध खनन रोकण्यासाठी पर्यावरण मंत्रालयाने त्याला भाग पाडले यातून खाजगी उद्योजक मात्र कमालीचे चिडले यातून विकास कि पर्यावरण हा मुद्दा संपूर्ण भारता समोर उभा राहिला

ई) ओडीसा सरकार याना आदेश देऊन निर्माण व पर्यावरण या दोन्ही मुद्यावर जिंदाल स्टील ला लाल झंडी दाखवण्यात आली

उ) महराष्ट्रातला एनरोन प्रकल्प हा पर्यावरणाचे कारण दाखवून बंद करण्याचे आदेश पर्यावरण मंत्रालय यांनी दिले होते

ऊ) टाटा ननो प्रकल्प हा पश्चीम बंगाल मध्ये पर्यावरणाचे कारण दाखवून बंद करण्यात आला, हजारो एकर जमीन शेतक-याना वापस करण्यात आली.

ऋ) भू अधिग्रहण कायदा अत्यंत मजबूत करण्यात आला होता नवीन उद्योगांना जामीन हवी असेल तर त्या गावातील ८० % जमीन धारकाची मान्यता असणे बंधनकारक ठरवण्यात आले होते

**विषयाची उधिष्टे**

१) पर्यावरणाच्या नुकसानीसाठी कारणीभूत ठरणा-या बाबीचा शोध घेणे

२) पर्यावरण आणि आर्थिक विकास यांच्यात समन्वय प्रस्थापित करणारी यंत्रणा यांचा शोध घेणे

३) लोकसंख्या,पर्यावरण आणि आर्थिक विकास याना सकारात्मक बाबीतून एकत्र साधण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो का? या कारणाचा शोध घेणे होय

४) आता पर्यंत ज्या काही पर्यावरणीय रक्षनात्मक चळवळी झाल्या त्यांचा आढवा घेऊन, त्यांनी घालून दिलेले आदर्शाचा मानव जातीसमोर प्रचार प्रसार करणे . त्यांचे मूल्यात्मक बाबीचा प्रचार व प्रसार करण्याचे उपाय शोधणे

**संशोधनाचे महत्व आणि व्याप्ती**

शाश्वत पर्यावरणीय विकासावर आर्थिक विकासाचा झालेला परिणाम तपासायचे असेल तर त्याची व्याप्ती आणि महत्वा या विषयी माहिती गोळा करावी लागते . या विषयाची व्याप्ती अत्यंत मोठी असून , संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आणि तिच्या अस्तित्व राखन्यासाठीच्या महत्वपूर्ण बाबीविषयी पर्यावर्नीय रक्षण गुंफलेले आहे. संपूर्ण संजीव सृष्टीचे पर्यावरणीय मूल्य टीकवण्यासाठी लागनारी आधारभूत स्वरचना उभी करून, तिचे रक्षण करणे, हे या विषयाचे महत्वहि आहे आणि व्याप्तीहि आहे.

अ) वैश्विक तापमान कमी करण्यासाठी सर्व राष्ट्राने आप आपल्या परीने प्रयत्न करावे

ब) साथीच्या रोगावर मात करण्यासाठी सर्व राष्ट्रांनी WHO च्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे

क) गरिबी ,बेरोजगारी याना दूर करून आरोग्य सुविधा ह्या शेवटच्या नागरिकापर्यंत पोहण्याची व्यवस्था करावी

**आर्थिक विकास आणि शाश्वत पर्यावरण विकास यांच्या संकल्पना**

आर्थिक विकास आणि शाश्वत पर्यावरण या दोन्हीही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण असून या मानवी जीवनाच्या कल्याणावर आधारलेल्या आहेत. या दोन्हीहो संकल्पनेतून केवळ पर्यावरण संतुलन राखून सजीव सृष्टी चे हित साधने होय. **आहे त्या परिस्थितीची जपवणूक करणे आणि तिला प्रदूषित होऊ न देता तिच्या सुरक्षितेची हमी देणे म्हणजेच शाश्वत विकास होय** . आर्थिक विकास म्हणजे , "**या देशातील सर्व तळागाळातील लोकांना आपल्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करता येऊ शकतील एवढे उत्पन्न प्राप्त करून देण्याची हमी प्राप्त करून देण्याची परिस्थिती निर्माण करणे होय"** .

आर्थिक विकास हि संकल्पना साध्य करण्यासाठी माणूस हा पर्यावरणीय उपलब्ध असलेल्या सर्व बाबीचा प्रामुख्याने वापर करत असतो . अर्थात आर्थिक विकास हा मानवाच्या सातत्याने अधिक प्राप्त करण्याच्या मूल्यावर आधारित आहे . मानवी गरज हि कधीच न संपणा-या मुल्यासी निगडीत आहे, ती कमी न होता सतत वाढतच जाते. एकीकडे पर्यावरणीय संतुलन हे एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच अभाधित राहते . तिची एक विशेष मर्यादा संपली कि ,विनाशकारी मूल्याला स्वीकारून बिगडलेल्या पर्यावरणीय परिस्थितीला संतुलित करण्याचा प्रयत्न करते.

**आर्थिक आणि शाश्वत पर्यावरण विकास यांची वैशीष्टे**

आर्थिक विकास हा आर्थिक वृद्धी वर अवलंबून असून तो मानवाच्या अथक प्रयत्नाचा एक भाग आहे . आर्थिक विकास हा सामाजिक विकास साधण्याचे एक साधन आहे. आर्थिक विकास हि प्रक्रिया कधीही न संपणा-या प्रयत्नाची एक दिशादर्शक आहे. आर्थिक विकास हा पर्यावरनात प्राप्त होणा-या नैसर्गिक साधनसामग्री च्या वापरावर अवलांबून असते . आर्थिक विकास हि संकल्पना कधीही कायम राहू शकत नाही , ती काळानुसार बदलत जाते. आर्थिक विकास हा भविष्यातील निर्माण होणा-या मानवी गरजा पूर्तीचा परिणाम आहे. आर्थिक विकास हा कृषी ,उद्योग, सेवा, स्वदेश, विदेश यांना जोडणारा एक दुवा आहे. आर्थिक विकास सातत्याने टिकवून ठेवल्यास गरिबी , बेरोजगारी ,विषमता दूर करता येऊ शकते आणि हे एक महत्वाचे माध्यम आहे .

**परियोजना मंजुरी आणि पर्यावरण**

कोणतीही मोठी परियोजना मंजूर करायची असेल तर त्याची तपासणी पर्यावरणीय मूल्यावर किती परिणाम होईल या तत्वानुसार केली जाते .पण हे तत्व केवळ कागदोपत्री केले जाते, प्रत्यक्षात मात्र कुठल्याची प्रकारची पर्यावरणीय काळजी केली जात नाही , याचा परिणाम असा होतो कि जेवढ्या काही परियोजना आहेत त्याना मान्य करण्याचा दर हा ९७% एवढा आहे. सगळ्यात मोठे सत्य म्हणजे हे कि उद्योग मान्यतेपैकी ८०% उधोग हे खनन क्षेत्रातले आहेत . या क्षेत्रात उद्योग स्थापन करायचा असेल तर पर्यावरण मंत्रालयाचा report सर्वोच्च न्यायालयात सादर केल्यानंतरच मान्यता प्राप्त होते. पुढे आदिवासीच्या अत्यंत जागरूक चळवळी मुळे राष्ट्रीय वननीती १८८४ साली लागू करण्यात आली . पुढे ह्या वननीति १९५२ सालीचा वनकायदा आणि १९८८ चा प्राणी रक्षण कायदा यांच्यात १९९८ साली संशोधन करण्यात आले . यात वन रक्षणापासून प्राकृतिक वनसंपदा , भूमी कटाव , वाळूच्या अतिक्रमनापासून रक्षण , सामाजिक वनीकरण ,वन उत्पादनाचा उपयोग , आदिवासिना वन उत्पादन वापरण्याची मान्यता देण्यात आली . या वन नितिला लागू करण्यासाठी आणि तिला क्रियाशील करण्यासाठी राष्ट्रीय वानिकी कार्य योजना (NATIONAL FORESTRY ACTION PROGRAAM ) लागू करण्यात आली . जिचा उद्देश हा देशातील वनकटाई रोकण्यासाठी आणि देशातील वनाचे क्षेत्रहे ३३% वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

या कमिटीच्या शिफारशीनुसार संपूर्ण उद्योगाचे तीन भागात विभाजन करावे

अ) **रेड झोन** — यात सर्वात जास्त पदुषण करना-या उधोग धंधा यांचा समावेश करावा आणि यांच्यावर पर्यावरण सेस लावाव आणि जबर कर वसूल करावा जोपर्यंत ते पर्यावरण अनुकूल कार्य करत नाहीत तो पर्यंत कर सतत वसूल करावा

आ)**येलो झोन** — यात हवा, पाणी ,भू, यांच्या विभागनिनुसार प्रदूषणाची टक्केवारी निश्चित करावी , त्यानुसार कोण कोणते उद्योग या मध्ये येतात याची नोंद करावी . याना पर्यावरणीय मूल्य जोपासण्यासाठी आदेशित करावे यांच्यावर पर्यावरणीय प्रदूषण वाढीस कारणीभूत ठरवून सरकारी मदत बंद करावी . विधुत वा इतर सोयी यांच्यावर अतिरिक्त प्रदूषण कर लावून वसूल करावे. जसे जसे प्रदूषण उपाययोजना हे उद्योग धंधे करत जातील तस तसे कर कमी करत जावे.

इ) **ग्रीन झोन** — या झोन मध्ये येणा-या सर्व उधोगाची ओळख करून त्याना आपल्या उद्योगात वाढ करण्याची पूर्णपणे मुभा देण्यात यावी .या उधौगाना कर्ज सुविधा हि सवलतीच्या दरात

देण्यात याव्या. ग्रीन झोन असलेले असे उधोग जे आपले संपूर्ण कार्य पर्यावरण अनुकूल असून त्यांच्या पासून पर्यावरणाचे कोणतेही नुकसान होत नाही अथवा त्यांच्याकडून तसा प्रदूषण शून्य करण्याचा प्रयत्न केला जातो . अश्या उधोगाना अनेक सरकारी सुविधा अत्यंत माफक दरात उपलब्ध करून द्याव्या.

वरील तीन पैकी रेड आणि येलो या दोन्हो क्षेत्राला ग्रान झोन मध्ये आपल्या पर्यावरणीय दंडक पाळून येण्याची पूर्णपणे परवानगी असावी .तरच औधोगिक क्षेत्राकडून पर्यावार्नाचे होणारे अतोनात नुकसान व प्रदूषण थांबवता येऊ शकते.

**विकास दर वाढविण्याची सरकारचे पर्यावरणविरोधी तंत्रज्ञान**

गंगा, यमुना, ब्रम्हपुत्रा, दामोधर, गोदावरी, नर्मदा, पूर्णा, मांजरा, कांचन, शरयू ,निरंजना , हुबळी , चिनाब , रावी , बियास , सतलज ,सुवर्णा , या भारतातील काही प्रमुख नद्या आहेत आणि या नद्या च्या काठी शेकडो शहरे आणि उद्योग धंधे निर्माण करण्यात आलेत. पर्यावरणीय प्रदूषणाची कोणतीही काळजी न करता ह्याना उदारीकरणाच्या नावाखाली मान्यता प्रदान करण्यात आल्या . या उद्योगांनी आणि शहरांनी या नद्याचे पाणी इतके प्रदूषित केले कि ते पिण्याच्या पाणी म्हणून उपयोगाचे आहिले नाही . उधाहारणजर द्यायचे झाल्यास दामोधर नदी काठी असंख्य उद्योग धंधे प्रस्थापित झाले आहेत . त्या उधोगांनी अत्यंत अमानुषपणे प्रदूषणकारी खतरनाक रसायन युक्त पाणी दामोधर नदीत सोडल्याने या पाण्यात विषारी मात्रा ह्या ६०० पटीने वाढल्या , हि नाडी झारखंड वरून वाहण्यास सुरवात करते , याच नदीवर भारतातील सर्वात मोठा जलविधुत यंत्रणा daamodhar valley project स्थापन करण्यात आला याची संकल्पना डॉ. बाबसाहेब आंबेडकर या महान विचाईपर तज्ञ यांची होती . प्रचंड प्रमाणात जल साठवणूक करणारी भारतातील अनेक नद्यापैकी एक आहे . पण या झारखंड पासून पश्चिम बंगाल पर्यंत कोयला , लोहा , चुना पत्तर आणि अब्रक यांची ३०० खादाने आहेत . हि खदाने दामोधर या २४ तास वाहणा-या नदीतून वाहणारे पाणी औधोगिक वापरासाठी उपयोगात आणत असतात आणि त्यांच्या बदल्यात अत्यंत विषारी असलेला कचरा नदीत सोडला जातो . याच कारणाने दामोधर नदीचे पाणी हे विखारी कच-यात बदलून जाते . देशातील हि एक मोठ्या नद्यापैकी एक असून छोटे हजारो उद्योग , सिवेज पा लाईन यांच्या मार्फत तीन अरब गैलन विषारी घाण पाणी यमुना नदीत सोडले जाते . या कारणामुळे यमुना नदीचे पाणी हे सामान्यपने आंघोळ करण्यासाठी उपयोगात येणा-या स्तरांपेक्षा एक लाख गुणा प्रदूषित आहे

**हरित तंत्रज्ञान**

विकास आणि पर्यावरण याच्या परस्पर विरोधी नीतीमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी हरित तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्याकडे जगाचे आता लक्ष लागले आहे .प्रदुषणापासून देशाची मुक्तता करणे हे आता जगातील प्रत्येक देशासामोर आव्हान आहे . आता या पर्यावरणीय संकटाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे विकासाबरोबर आत्मघाती निर्णय होईल . जगातला प्रत्येक देश हा अत्यंत कडक नियमावली आणि आदेशामार्फत पर्यावरणीय जागरूकता याचा विस्तार ,प्रचार, प्रसार करत आहे . चीन या देशाचे प्रधानमन्त्री जीआबावो नि विकास नीतीच्या कारणामुळे अत्याधिक प्रदूषण फैलावणा-या उधोग धंधा यांना अत्यंत कडक कर्जाच्या अटी नियमावलीत अडकवून त्यांची संख्या सीमित केली अश्या उद्योगाची संख्या लाखामध्ये होती . या अत्यंत कडक धोरणामुळे चीन मधील ३६% नद्या ह्या जलसुरक्षित झाल्या प्रदूषण मुक्त झाल्यात . भारतात हे धोरण अजूनही सुरु न झाल्याने एकूण ४९% कोटी लोकसंख्या हिला शुद्ध पेयजल प्राप्त होत नाही .

**नव्या विकास रणनीतीची आवशकता**

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम(UNDP) च्या अलीकडील अहवालानुसार संपूर्ण विश्वाची विश्व अर्थव्यवस्था हिचा एकूण आकार हा ६५ ट्रिलीयन डॉलर आहे . जर या एकूण अर्थव्यवस्था ६५ ट्रिलीयन डॉलर पैकी कमीत कमी दोन टक्के अर्थात १.३ ट्रिलीयन डॉलर हे जगातील दहा महत्वपूर्ण निवडक क्षेत्रात याची गुंतवणूक केली तर विश्वामधील सर्व अर्थव्यवस्था कार्बन विसर्जित करना-या इंधनाएवजी हरित जैव तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था मध्ये बदलली जाईल . हि गुंतवणूक न केवळ गरिबी दूर करण्यास उपयुक्त ठरणार नाही तर जगातील आर्थिक मंदी सुद्धा दूर करण्यास अत्यंत महत्वाची ठरेल . या अहवालानुसार जगाला त्यांनी अत्यंत निक्षून सूचना आणि भविष्यातील संकटा बद्दल सुद्धा सांगितले कि येणारा काळ हा अत्यंत नाजूक मोड वर आला आहे . अजूनही फारसी वेळ गेली नसून ,हि वेळ आपल्याला एक अवसर संधी प्राप्त करून देत आहे कि विकास नीतीला हरित विकास नीती म्हणून बदलविण्याची मार्ग प्रदान करत आहे. येनारे२१ वे शतक हे विकासाची जैव नीतीमध्ये नियमितता राहील .

**नेशनल ग्रीन अकाउंटिंग सिस्टम (GNA) -**

आर्थिक विकास पासून पर्यावरणाला होणारे नुकसान कमी कसे करता येईल आणि त्याचे मूल्यमापन कोणत्या प्रकारे करता येयील या वादातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारने **नेशनल ग्रीन अकाउंटिंग सिस्टम (GNA)** लागू करण्याचा निर्णय घेतला . ह्याला लागू करण्यासाठी प्रख्यात पर्यावरण अर्थशास्त्री पार्थ गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एका कमिटीचे गठन करण्यात आले . या कमिटीत अत्यंत महत्वाचे विचारवंत म्हणून किरीट पारीख , विजय केळकर ,नितीन देसाई या सारखे अर्थतज्ञ यांचा सामावेश करण्यात आला . त्यातील महत्वपूर्ण शिफारस म्हणजे भारतातील संपूर्ण उद्योग जगताला तीन भागात विभागणी करणे होय जसे रेड यलो आणि ग्रीन होय . ह्या शिफारसीनुसार भारतातील पर्यावरण रक्षण होणार होते पण येणा-या कोणत्याही सरकारने या शिफारशी कधीच पूर्णपणे लागू केल्या नाहीत .हे एक आपले दुर्दैव मानावे लागेल.

**शाश्वत विकासाच्या समस्या आणि त्यावर उपाययोजना**

शाश्वत विकास साधायचा म्हणजे पर्यावरणीय मूल्याला आहे त्या स्थितीत राखून ठेवणे आणि पुढच्या पिढीला आहे त्या स्थितीत हन्स्तातारीत करणे होय . मग असे करणे आज कुठल्याही देशाला का जमत नाही ?,काय कारण आहेत , याचा शोध घेणे म्हणजे शाश्वत विकासच्या समस्या शोधणे होय , या समस्या शोधून झाल्यावर त्यावर उपाय सांगणे अथात उपाययोजना अमलात आण्यासाठी उपाय योजना करणे होय .

**शाश्वत विकासच्या समस्या**

१) जैव विविधता हि सदैव कधीच राखून ठेवता येत नाही ती काळानुसार आणि परिस्थिती नुसार बदलत असते

२) वाढतो लोकसंख्या हि शाश्वत विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे तो दूर किंव्हा कमी केल्याशिवाय शाश्वत विकासाची संकल्पना कधीच पूर्ण होऊ शकत नाही

३) पर्यावरण मंत्रालय जो पर्यंत आपले स्वनिर्णय घेत नाही आणि पूर्ण क्षमतेने काम करत नाही तो पर्यंत भारतातील प्रदूषण कमी करणे हे शक्य होनार नाही

४) राजकारणी लोकांचा पर्यावरण व प्राधिकरण यांच्यातील हस्तक्षेप जो पर्यंत रोकता येणार नाही तो पर्यंत शाश्वत विकासाची संकल्पना करणे हे अत्यंत अवघड आहे

५) आदिवासी जन समुदाय हा जल जंगल भूमी यांचा रक्षणकर्ता आहे परंतु यांच्यावरच प्रचंड प्रमाणत अन्याय होत असल्याने आणि त्यांच्या कडून जंगल भू संपदा हि हिरावून घेतल्याने चित्र डोळ्यासमोर येते . आदिवासी जनसमुदाय ला हासियावर इथल्या भारत सरकारने टाकले आहे , जो पर्यंत आदिवासी जन समुदायाला त्यांचा अधिकार दिला जात नाही तो पर्यंत शाश्वत विकासाची संकल्पना लागूच करता येत नाही

६) ग्लोबलायझेशनच्या आणि खाज्गिकरनाच्या नावाखाली जी प्रचंड लुट सातत्याने विदेशी गुतंवणूक हिच्या नावाखाली पर्यावरणाची करण्यात आली .यातून निर्माण झालेल्या समस्येला दुर करणे हि एक शाश्वत विकासासमोर मोठी समस्या आहे

७) पर्यावरण मंत्रालया आणि प्राधिकरण यांनी दिलेल्या शिफारशीला भारत सरकारने कधीच स्वीकारले नाही यातून हे पर्यावरण मंत्रालय हे सातत्याने कमकुवत झाले आहे . जो पर्यंत हे मंत्रालय सशक्त होणार नाही तोपर्यंत शाश्वत विकासाची संकल्पना साध्य करता येत नाही

**खालीलप्रमाणे उपाययोजना करता येतील**

अ) पर्यावरण मंत्रालय आणि प्राधिकरण या दोन्हीही संस्था यांना राजकीय हस्तक्षेपा पासून मुक्त करावे आणि त्यांना निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र देण्यात यावे.

आ) विदेशी कंपनी हिला मान्यता देताना त्या कंपनी चा पूर्व पर्यावरणीय प्रदूषणाचा इतिहास तपासून पुढील कार्यवाही करावी

इ) नदीकाठीच्या सर्व च्या सर्व कारखाने हटवून त्यांना नदीकिना-यापासून कमित कमी १ किलोमीटर दूर करावे .

ई) लोकांमध्ये पर्यावरण समंधी पुरेपूर जागरूकता नागरिकात आली पाहिजे यासाठी सर्व प्रकारची अत्याधुनिक संशाधनाचा वापर करून त्याचा प्रसार, प्रचार आणि विस्तार करावा

उ) नदी जोड प्रकल्प राबविल्याशिवाय आता कोणताही पर्याय उरला नाही . या संधर्भात जल प्राधिकरणाकडे संपूर्ण अधिकार देण्यात यावे.

ऊ) संपूर्ण भारत देशाचे तीन भागात रेड यलो आणि ग्रीन असे तीन भागात उद्योग धंधा याचे विभाजन करावे आणि वरील मुद्यात सांगितल्या प्रमाणे कारवाही करावी

**संधर्भ ग्रंथाची यादी**


१) अर्थव्यवस्था एक अवलोकन - अंक १० सप्टेंबर २०११ धनकड प्रकाशन मेरट

२) योजना मासिक नोहेंबर २०१५

३) CENTRAL POLUTION CONTROL BOARD REPORT 2012

४) OUR COMMON FUTURE – EARTH SUMMIT REPORT 1992

५) अग्रवाल अनिल आणि सुनीता नारायन — ग्लोबल वार्मिंग इन एन UNEQAL WORD CENTER FOR SCIENCE AND ENVIRONMENT . REPRINT EDITION NEW DELHI

६) क्लास १२ वी अर्थशात्र पाठ्य पुस्तक भारतीय अर्थव्यवस्थाचा विकास यात प्रकरण ९ पर्यावारीय विकास आणि शाश्वत विकास यांची सकल्पना वर्ष २०२०

७) भारतीय अर्थव्यवस्था — प्रतियोगिता साहित्य सिरीज , भारत मे प्राकृतिक संशाधन , पान क्रमांक ४७

८) कुरुक्षेत्र मासिक अंक ६ वा जुलै २०१३


◆◆◆

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय विश्लेषणात्मक भूमिका

**प्रा.डॉ. महेश मोटे**
सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक
राज्यशास्त्र पदवी—पदव्युत्तर विभाग
श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील विविध राजकीय प्रश्नासंबंधी आणि राजकीय तत्वज्ञानासंबंधी विचार आपल्या विविध ग्रंथ व भाषणातून मांडले, तेच त्यांचे राजकीय विश्लेषणात्मक विचार आहेत. डॉ. आंबेडकरांचे काही राजकीय विचार त्यांनी घटना परिषदेच्या अधिवेशनात केलेल्या भाषणातूनही व्यक्त होतात. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा तत्कालीन राजकारणावर प्रभाव पडलेला दिसतो. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांचे अस्पृश्य समाजाच्या प्रश्नावरही त्यांचा अभ्यास व चिंतन चालू होते. ''अस्पृश्यांना मतदानाचा हक्क पाहिजे, त्यांना निवडणूकीस उभे राहता यावे. त्यांच्या मतदारांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत, अस्पृश्यांना अस्पृश्य प्रतिनिधी अस्पृश्य मतदार संघात अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा द्याव्यात, अशी आंबेडकर यांनी अस्पृश्यांतर्फे कमिटीपुढेसाक्ष दिली. साउथबरो कमिटीमुळे आपली स्वतंत्र लेखी कैफियतही दाखल केली.''[१]

म. फुले, शाहु महाराज यांनी प्रचलित समाज व्यवस्था नाकारून समता, स्वातंत्र्य, बंधुता, स्त्री—पुरूष समानता या तत्वांचा अंगीकार केला. व ती बिजे समाजात रूजविले आहे. तेच कार्य डॉ. बाबासाहेबांनी केले आहे. विधीमंडळावर निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींची जातवार विभागणी अशाी भावी की, त्यातून कोणत्याही बहुसंख्य जमातीला दुसऱ्या जमातीवर राज्य करता येऊ नये. त्याकरिता केंद्रीय विधीमंडळात हिंदू ४० टक्के, मुसलमान ३२ टक्के, अस्पृश्य २० टक्के, ख्रिस्ती ३ टक्के, शीख ४ टक्के व अंग्लो इंडीयन १ टक्का या प्रमाणत प्रतिनिधीत्व देण्यात यावे, असे त्याकाळी सुचविले होते. सदर संशोधन विषय मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय विश्लेषणात्मक भूमिका या विषयाचा संशोधन आराखडा पुढीलप्रमाणे आखला आहे.

**अभ्यास विषयाची उद्‌दिष्टे :**

प्रस्तुत संशोधन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय विश्लेषणात्मक भूमिकेचा अभ्यास हा विषय निवडण्यामागे सध्याच्या काळात आज जग वेगाने पुढे जात आहे, तरी आंबेडकरी विचारांना मागे ठेवून पुढे जाणे शक्य नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार सामान्य व्यक्तीच्या विकासासाठी आज ही हा विषय किती उपयोगी पडतात का त्या हेतूने संशोधन हाती घेतले आहे.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्य समाजवादी विचार जाणून घेणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विधीमंडळातील कार्याचा आढावा घेणे.

३) डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विश्लेषणात्मक भूमिकेचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहितके** : प्रस्तुत अभ्यास विषयासाठीची गृहितके खालील प्रमाणे निश्चित केली आहेत.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्यामुळे राजकीय स्वातंत्र्य निर्माण होण्यास हातभार लाभला असून राजकीय न्यायाची प्रक्रिया गतीमान झाली आहे.

२) डॉ.आंबेडकरांचे विचार कार्यामुळे महिलांचा राजकीय दर्जा उंचावला आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत राजकीय ऐक्या अभावी त्यांना अपेक्षित असणारी राजकीय परिणाम साधणे अवघड झाले आहे.

**संशोधन पध्दती :**

सदर संशोधन लेख पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक व ग्रंथालयीन संशोधनाचा वापर करणे. प्रस्तुत संशोधन अभ्यासात प्रामुख्याने ज्या साधन सामुग्रीचा वापर केला. त्यात प्राथमिक व दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**प्राथमिक स्त्रोत** : डॉ.आंबेडकरांचे लिखित ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, भाषणे आदिंचा उपयोग केला आहे.

**दुय्यम स्त्रोत** : विविध संशोधन ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिकेमधून प्रकाशित झालेले लिखाण, प्रशासकीय परिपत्रके, मासिके, कार्यालयीन दस्ताऐवजांचा वापर करून हे संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

**डॉ. आंबेडकरांचे विधीमंडळातील कार्य :**

रावबहादूर सी. के. बोले यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत नोव्हेंबर १९२७ ला सभा भरली. ते विधेयक डॉ. आंबेडकरांनी विधीमंडळात १९ मार्च १९२८ ला मांडले. त्याचा उद्देश १८७४ सालच्या महारवतन कायद्यात सुधारणा करणे होता. ते विधेयक विचारासाठी विधीमंडळात मांडले. त्यांचे ध्येय अस्पृश्यांना गुलामगीरीतून मुक्त करणे होते.

डॉ. आंबेडकरांनी ही वतनेच नष्ट करण्यास अव्हान केले. ते म्हणाले 'ही वतन पध्दती परकाष्टेची अमानुष आहे.'तिचे समर्थन कोणासही करता येणे शक्य नाही. महारांनी ही वतनदारीची कामे करावी, जर सरकारची इच्छा असेल, तर सरकारने महारांना देण्यात येणाऱ्या वतनांची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घ्यावी.[२]

**लोकशाही :**

अब्राहम लिंकनच्या मते, ''लोकांनी लोकांसाठी लोकांच्या हितासाठी निर्माण केलेले राज्य म्हणजे लोकशाही.'' लोकशाहीत शांततामय पध्दतीने क्रांती हाते. ज्यात गणतंत्र, स्वातंन्य, अधिकार, समता इ.चा समावेश असतो. ज्यात नागरीकांच्या हक्काचा समावेश असून ते सुरक्षीत राखले जातात.लोकशाहीत राज्यकारभाराची सत्ता लोकांच्या हाती असते. त्याच्या इच्छेनुसार सरकारला निर्णय घ्यावे लागतात. असे निर्णय सर्व लोकांना एकत्रघेणे शक्य नसते. म्हणून ठरावीक काळानंतर निवडणूका होतात. या निवडणुकांमध्ये मतदार मत

देऊन आपले प्रतिनिधी निवडतात. निवडून आलेले प्रतिनिधी संविधानाने निर्माण केलेल्या संसद, कार्यकारी मंडळ अशा संस्थामध्ये जातात. संविधानाने नमुद केलेल्या किंवा सांगीतलेल्या प्रक्रियेने संपूर्ण जनतेसाठी निर्णय घेतात.

डॉ. आंबेडकरांच्या मते, संम्प्रदायवाद, प्रांतवाद आणि जातीयवाद हे भारतीय राष्ट्रवादाचे शत्रु असून दलित व मागासलेल्या लोकांचे कल्याण केलेले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांनी वंचीत घटकांसाठी लढा दिला म्हणून नेहरू म्हणतात. ''डॉ. आंबेडकर म्हणजे सर्व प्रकारच्या अन्याय आणि शोषणा विरूध्दच्या लढयाचे प्रतिक होते.''[३]

डॉ. आंबेडकर हे लोकशाहीचे समर्थक होते. त्यांची लोकशाहीवरनितांत श्रध्दा होती. त्यामुळे त्यांनी राज्यघटना तयार करतांना भारतात लोकशाही प्रस्थापित व्हावी, प्रभावी व्हावी, टिकून राहावी यासाठी विचार केला. लोकशाहीमध्ये शांततामय मार्गानी प्रचंड क्रांतीकारी आर्थिक व सामाजिक बदल घडवणे शक्य आहे. कारण लोकशाहीत मानवी समानतेला मान्यता असते. लोकशाहीचे अधिष्ठान मानवी समता आहे.[४]

सार्वत्रिक प्रौढ मताधिकार व्यक्ती स्वातंत्र्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था, मुक्त प्रसार माध्यमेही साधनेपूरविली आहेत. लोकशाही राजकीय जीवनापूरती मर्यादीत नसावी. सामाजिक व आर्थिक जीवनात लागू असावी. यावर त्यांनी सतत भर दिला आहे. दलिताचे पहिले अधिवेशननागपूर येथे ता. ८ व ९ ऑगस्ट १९३० रोजी अखिल भारतीय पातळीवर संघटनात्मक स्वरूपात भरले. ज्यात अस्पृश्यांना राजकीय हक्कांचीमागणी केली. राजकीय सत्ता हातात असल्याशिवाय दलितांचा, अस्पृश्यांचा प्रश्न सुटणार नाही. राजकीय स्वातंत्र्यासाठी सामाजिक हक्काच्या लढयास दुय्यम मानने त्यांना नामंजूर होते.[५]

भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांच्या दुर्बल घटकांच्या हिताकडे दुर्लक्ष करणे, डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. डॉ. आबेडकरांच्या मते, आपल्या हाती असला पाहिजे आणि जेंव्हा तुम्हाला देशाच्या कायदेमंडळात योग्य प्रतिनिधीत्व मिळेल, तेंव्हाच ते शक्य आहे.[६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी राजकीय हक्क निर्माण करून दलितांना आधार देण्याचा प्रयत्न केला. जसे स्वतंत्र मतदार संघ, समानतेचा हक्क, निवडणुक लढवण्याचा हक्क, नोकऱ्यामध्ये आरक्षण देवून त्यांना इतरांच्या बरोबरीला आणण्याचा प्रयत्न केला. ते एकात्म भारतासाठी आवश्यक आहे.[७]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी :**

अस्सल निष्ठावान अस्पृश्य प्रतिनिधींची निवड न होता. सवर्ण हिंदुचे बगलबच्चे अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडले जातील. त्याकाळच्या सामाजिक वातावरणात मनाचा मोठेपणा नसल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. आंबेडकर हे अस्पृश्यांच्या एका अल्पसंख्याक गटाचे नेते आहेत. ते अस्पृश्य वर्गाचे खरेखुरे प्रतिनिधी नाहीत. असा अरोप गांधीनी केला, गांधीजीनी अस्पृश्यांचे आपणच प्रतिनिधी म्हणून दावा सांगितला म्हणून त्यांनी संयुक्त

मतदारसंघाची मागणी सोडून दिली. गोलमेज परिषदेत आंबेडकरांनी अस्पृश्यांची मागणी एक मुखी व्हावी, म्हणून स्वतंत्र मतदार संघ, राखीव जागांची मागणी केली. ब्रिटीश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडयात अस्पृश्यांना राखीव जागा मान्य करून त्यांना आपले प्रतिनिधी निवडण्याचाही अधिकार पण त्यास म. गांधी विरोध केला.[८]

योग्य प्रतिनिधीत्वाच्या बदलात दुसरे काहीही आम्हाला मान्य होणार नाही. अशी भूमिका त्यांनी घेतली होती.स्वतंत्र मतदार संघ व मतदानाच्या आधिकारची मागणी करून मतदार संघाच्या बाबतीत दोन मार्ग आहेत. १. स्वतंत्र मतदार संघ २. राखीव जागेसहीतसंयुक्त मतदार संघ या काळात अस्पृश्य वर्गात मतभिन्नता होती. बहुसंख्य अस्पृश्य समाज स्वतंत्र मतदार संघाच्या बाजूला आहे. संयुक्त मतदार संघात अस्पृश्य वर्गाचा प्रतिनिधी निवडताना बहुसंख्य समाजाला सुध्दा मतदान करण्याचा आधिकार असल्यामुळे, त्यांच्या वर्चस्वाखाली राहणाऱ्यास ते निवडून देतील. असे आपल्या समाजाला वाटते. ही भिती अयोग्यच आहे, असे म्हणणार नाही. आज आरक्षण जागेवरील प्रतिनिधी दलितांच्या प्रश्नासंबंधी जी भूमिका घेतात ती स्वतंत्र नसून त्यांच्या पक्षाची ती भूमिका असते आणि म्हणून डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेली भीती ही खोटी नव्हतीअसेच म्हणावे लागेल.[९]

आपले विचार मांडताना आंबेडकरांनी ओळखले की, त्यांनी घटनेचा एक मसुदा तयार केला. त्यात अस्पृश्य मतदार समाजाला जेथे राखीव जागाठेवल्या जातीलतेथेच स्वतंत्र मतदार संघ असावेत, अन्य ठिकाणी संयुक्त मतदार संघअसावेत, अशी त्यात मागणी केली. मतदानाचा अधिकार अस्पृश्यांना मिळाला, त्यामुळे राजकीय महत्व वाढले. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय हक्कासंबंधी अस्पृश्यांनी विलक्षण जागृती झालेली असल्यामुळे अस्पृश्यांच्या प्रश्नांना सामाजिक व राजकीय स्वरूप प्राप्त झाले आहे.[१०]

अस्पृश्य वर्गातील लायक मतदार सामान्य मतदार संघातूनही मते देतील. अस्पृश्य समाजास कायदेमंडळामध्ये पुरेसे प्रतिनिधीत्व मिळणे, शक्य नसल्याने सामान्य मतदार संघात काही खास जागा देण्यात येतील. या जागावर अस्पृश्य वर्गीयच मतदारच आपला प्रतिनिधी निवडून देतील, या मतदारांना साधारण प्रतिनिधी मतदारसंघातर्फे ही मते देण्याचा आधिकार राहील. अस्पृश्य समाजाची संख्या जास्त असेल. अशा ठरावीक जागीच हे मतदार संघ निर्माण करण्यात येतील. मुस्लीमानप्रमाणे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळून ब्रिटीश हिंदुस्थानातील १४६३ जागांपैकी ७१ जागा अस्पृश्य वर्गास मिळून संयुक्त मतदार संघात ही मताधिकार मिळाला. स्वतंत्र मतदार संघाच्या उपयुक्ततेवर विश्वास असून सुध्दा अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधीत्व राखीव जागासहीत संयुक्त मतदार संघाचे तत्व मान्य करण्यास कॉग्रेस तयार आहे, परंतु त्याकरिता प्रौढ मतदान पध्दती स्वीकारणे आवश्यक आहे.[११]

**गोलमेज परिषदेतील कार्य :**

सविनय कायदेभंग आंदोलन सुरू असतानाच भारताशी संबंधित घटनात्मक प्रश्नांचा विचार करावा, असे ब्रिटनचे प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचे मत होते. याकरिता त्यांनी

लंडनमध्ये एका परिषदेचे आयोजन केले. या परिषदेला गोलमेज परिषद म्हटले जाते. १९३० ते १९३२ या कालावधीत तीन गोलमेज परिषदांचे आयोजन करण्यात आले. १९३० मध्ये गोलमेज परिषद घ्यायचे ठरले असता त्याप्रमाणे ब्रिटीश सरकारने सर्व राष्ट्रीय पक्षप्रमुख व अल्पसंख्याक जाती यांना निमंत्रणे पाठवली त्याप्रमाणे परिषदेसाठीचे निमंत्रण डॉ. आंबेडकर यांना सप्टेंबर १९३० ला मिळाले.[१२]

भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे हित संरक्षण करण्याच्या हेतूने आठ खालील गोष्टीचा समावेश करावा. ही अस्पृश्यांची राजकीय मागणीवर्तुळ परिषदेने मान्य करून ती स्विकारल्याबद्दल ब्रिटीश सरकारला शिफारस करावी, असे खलित्यात म्हटले.

१ समान नागरिकत्व २ समान हक्क ३ जाती व्देषमुलक वागणुक ४ कायदे मंछळात भरपूर प्रतिनिधीत्व ५ सरकारी नोकरीत भरपूर प्रतिनिधीत्व ६ सरकारचे पूर्वग्रह दुषित कृत्य वा हलगर्जीपणा ७ सरकारी खाती ८ गव्हर्नर जनरलच्या मंत्रिमंडळात प्रतिनिधी.इ.[१३]

अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचा खलीता गोलमेज परिषदेत मांडण्यामागे डॉ. आंबेडकरांचा मुलभूत हेतु होता. त्यांनी लंडन गोलमेज परिषदेला सादर केलेला खलीता हाच खरा अस्पृश्यांच्या हक्कांची कैफियत असून त्यात पुढील बाबींचा समावेश होता.

१. बहुसंख्याकांच्या राजीखुषीवर अस्पृश्यांचे हक्क अवलंबून नसावेत. समान नागरिकत्वाचे तत्व असावे.

२. अस्पृश्यता नष्ट करून, नागरिकत्वाचा समान दर्जा प्रस्थापित होण्यासाई खालील मूलभूत हक्कांचा हिंदुस्थानाच्या राज्यघटनेत अंतर्भाव करण्यात यावा.[१४] जसे की, समान हक्काचा, निर्वेध उपयोग घेता येईल, अशी त्यांना हमी देण्यात यावी.''सार्वजनिक उपयोगाकरिता समर्पण केलेल्या, राखुन ठेवलेल्या व परवाना घेतलेल्या सर्व प्रकारच्या स्थावर जंगम इस्टेटी, संस्था, जागा, सलुन्स इत्यादीकांचा पुर्णपणे उपयोग व फायदे होऊ देण्याचे नाकारतो, अशी व्यक्ती शिक्षेस व दंडासही पात्र समजावी.

३. सामाजिक बहिष्कार हे अडथळयाचेदुसरे एक सर्वसामान्य स्वरूप असून सनातनाच्या हातातील ते एक हत्यार आहे, त्याचा प्रतिबंध झाला पाहिजे.[१५]

४. भेदभावापासून संरक्षण मिळण्यासाठी परंपरेवर आधारित हुकूम अगर कायदे केले जावू नयेत.

५.कायदे कौन्सिलात पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे.

६. प्रौढ मतदानाधिकार मिळावा.[१६]

७. विशेष म्हणजे सायमन कमिटी व आय.सी.सी ने सुचविल्याप्रमाणे विविध प्रांतात अस्पृश्यांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे, सरकारी नोकऱ्यांमध्ये अस्पृश्यवर्गीय उमेदवारांची नेमणुक करावी. या समजाला सरकारी नोकरीत पुरेशा प्रमाणात प्रतिनिधीत्व दयावे अशी मागणी ते करतात.[१७]

**संदर्भसुची :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६, पा.नं. १२२
२) माझी आत्मकथा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रकाशक रघुवंशी, पा.नं. ९१
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६, पा.नं. १२६
४) डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार, प्रा. म.द. देशपांडे, प्रकाशक : लोकवाडमय गृह, मुंबई, २००६, पा.नं. ३५
५) भारतीय राजकीय विचारवंत, डॉ. ज.रा. शिंदे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९, पा.नं. ११८
६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, शंकरराव खरात, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, पा.नं. १००
७) उपरोक्त, पा.नं. १०२
८) उपरोक्त, १९८७, पा.नं. ११
९) भारतीय घटनेचे शिल्पकर — डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र आठवा, कै. चांगदेव भवानराव खैरमोडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, जानेवारी १९६३
१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, शंकरराव खरात, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८७, पा.नं. १६९
११) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड ४ था, चां.भा. खैरमोडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १४ एप्रिल १९६६, पा.नं. ७७
१२) उपरोक्त, १९६६, पा.नं. ८०
१३) उपरोक्त, पा.नं. ९३
१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, शंकरराव खरात, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८७, पा.नं. १०६
१५) उपरोक्त, पा.नं. १०४
१६) उपरोक्त, पा.नं. ११५
१७) उपरोक्त, पा.नं. ११६

◆◆◆

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरण विषयक विचार आणि सद्यस्थिती

**संशोधक विद्यार्थी—लक्ष्मीकांत कुरंगळ**
राज्यशात्र विभाग
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना**

आपण जेव्हा सामाजिक न्याय आणि महिला हक्कांवर चर्चा करतो तेव्हा लगेच सर्वात पहिले डॉ बी.आर.आंबेडकर यांचे स्मरण होते.अस्पृश्यांचे नागरिक हक्क, महिला आणि दलित यांच्या उद्धारासाठी त्यांची भूमिका सर्वज्ञात आहे. हिंदू धर्मात उच्चवर्णीय लोकांनी लादलेल्या भेदभावाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यांचा असा विश्वास होता की जोपर्यंत आपल्याकडे जात,वर्ग,पंथ,लिंग आणि जातींमध्ये समानता येत नाही तोपर्यंत आपण खरे स्वातंर्त्य मिळवू शकत नाही. तीच समस्या महिलांच्या बाबतीत हि दिसून येते अलिकडच्या काळात महिलांचे हक्क आणि समानतेसाठी विविध कायदे उपलब्ध असूनही, आपल्याला असे दिसून येते की भारतातील स्त्रिया अद्याप समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळवू शकलेल्या नाही आहेत. जागरूकतेचा अभाव, सामाजिक दबाव, पुरुषप्रधान मानसिकता, आर्थिकदृष्ट्या असक्षमता आणि शिक्षणाचा अभाव यासारखी अनेक कारणे ह्याला कारणीभूत आहेत.

भारतातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण विकासाच्या क्षेत्रातील कोणत्याही उंचीवर असलो तरी आज सर्व महिलांना समान हक्क प्रदान करण्याची आवश्यकता का आहे? व आंबेडकरांच्या .ष्टिकोनातून समान नागरी कायदा आणि त्यांच्या विचाराची प्रासंगिकता ह्यावर हि संशोधनपत्रिका आधारित आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी समान नागरी कायद्याची आवश्यकता —**

जेव्हा आपण नागरी हक्क आणि समानतेबद्दल चर्चा करतो तेव्हा ते सर्व समाजातील सर्व स्त्रियांसाठी असले पाहिजे भलेही ती स्त्री कोणत्याही जात, वर्ण आणि धर्माची असो. जोपर्यंत आम्ही आमच्या नागरिकांना त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी समान कायदे प्रदान करत नाही तोपर्यंत आपण आपल्या समाजात समानतेची अपेक्षा करू शकत नाही. सरकार धर्मनिरपेक्ष असल्याचा दावा करते पण त्याच वेळी ते आपल्या लोकांमध्ये धर्माच्या आधारे भेदभाव हि वाढवित असते. एखाद्याचा धर्म हि एक वैयक्तिक बाब आहे, ज्यामध्ये हस्तक्षेप करू नये. परंतु जेव्हा धर्म समाजावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा राज्य हस्तक्षेप महत्वाचा असतो. सरकारने हे समजून घेणे आवश्यक आहे की लग्न, घटस्फोट, पोटगी

,वारसा आणि दत्तक यासारख्या बाबींमध्ये अधिक सामाजिक परिणाम होतो आणि ती केवळ एक वैयक्तिक बाब नाही. कायद्यातील संदिग्धता समाजातील काही घटकांना लागू होते आणि त्यामुळे समाजात दुही निर्माण होऊ शकते त्यामूळे अनेक समस्या उद्‌भवू शकतात (अहमद २००६). त्याचप्रमाणे जर सरकारने आपल्या नागरिकांसाठी एकसमान नागरी संहिता आणण्याचा प्रयत्न केला तर तेथे विरोध आणि समर्थन ह्या दोन्ही घटना घडतील. परंतु, ह्यातील मुख्य चिंता हि सुधारणेचे उद्दीष्ट हे राजकारण विरहित असले पाहिजे.

समान नागरी संहिता केवळ महिलाच नव्हे तर सर्व नागरिकांमध्ये समानता प्रदान करेल. जेव्हा सरकार स्वत: नागरिकांना कायद्याच्या आधारे विभाजित करीत असते आणि ध र्माच्या आधारे समाजात अंतर वाढवितील तेव्हा असे विधेयक समाजात मतभेद वाढण्याची शक्यता अधिक असते. हे घटक पुढे जातीयवाद आणि धार्मिक कट्टरतांना जन्म देतात आणि ह्यात स्त्रिया नेहमीच दुय्यम टप्प्यावर असतात. समान नागरी कायदा लागू केल्याने आपल्या देशातील महिलांना जास्तीत जास्त फायदा होईल. जोपर्यंत आम्ही कायदेशीर सुरक्षा आणि हस्तक्षेप प्रदान करीत नाही तोपर्यंत महिला समानता आणि महिलाचे हक्क हे साध्य करता येत नाहीत. मुस्लिमांमध्ये लग्न आणि घटस्फोटाचा मुद्दा काझी (मुस्लिम धार्मिक नेते) हाताळत असल्याने,बहुविवाह पद्धती, तीन तलाक ह्या घटनांमध्ये ते कायदेशीरपने न्यायालयात जाऊ शकत नाहीत (अन्सारी,१९९१) .आपल्या देशाला एकसमान नागरी संहिता आवश्यक आहे ही केवळ महिला हक्क आणि समानतेसाठीच नाही तर सर्व नागरिकांमध्ये समानतेसाठीही महत्वाची असेल .

**आव्हाने—**

कोणत्याही देशाच्या विकासासाठी महिला समानता आणि महिला हक्क अविभाज्य असतात. राजकीय आणि अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात आपल्या देशाचा विकास असूनही महिलांना समाजात समान स्थान मिळवता आलेले नाही आहे.सरकारने विविध कायद्यांद्वारे आणि उपाययोजनांच्या माध्यमातून महिलांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला पण तरीही त्याचा परिणाम समाधानकारक नाही आहे.सर्व नागरिकांना त्यांच्या वेगवेगळ्या धार्मिक पार्श्वभूमीशिवाय समान कायदे प्रदान करण्याची समाजाची तातडीची गरज आहे. विवाह ही कोणत्याही समाजाची मूलभूत व्यवस्था असते. केवळ मजबूत पायावर, कोणताही समाज विकसित होऊ शकतो. हिंदू नागरी संहिता हिंदूंसाठी वैयक्तिक कायदे नियमित करते, परंतु मुस्लिम आणि ख्रिश्चनांसाठी स्वतंत्र वैयक्तिक कायदे करतात. घटनेच्या भाग ४ कलम, ४४ मध्ये असे नमूद केले आहे की, राज्य देशभरातील नागरिकांसाठी एकसमान नागरी सेवा देईल .परंतु स्वातंर्त्यानंतर एवढी वर्षे झाली तरी केंद्रात किंवा राज्यात कोणत्याही सरकारने आपल्या सर्व नागरिकांसाठी एकसमान नागरी संहिता तयार करण्यासाठी पुढाकार घेतलेला

नाही. असे का आहे? यामागील काही ठोस कारण असले पाहिजे.

समान नागरी संहिता लागू करण्याच्या मुख्य अडथळा म्हणजे मुस्लिम समाजाचा विरोध. मुस्लिम धर्म विवाह, घटस्फोटाचा मुद्दा शरीयत नमूद केलेला त्यांचा वैयक्तिक कायदा मानतो. विवाह आणि घटस्फोटाच्या मुद्यावर सरकारचा सहभाग हा त्यांचा धार्मिक विषयांमध्ये हस्तक्षेप करण्याचा थेट प्रयत्न असल्याचे ते मानतात. त्यामुळे ते सरकारला या संदर्भात कोणतेही कायदे ते करू देत नाहीत. भारत एक धर्मनिरपेक्ष देश आहे, जिथे प्रत्येकजणस आपल्या धर्माची उपासना करण्याचे स्वतंत्र आहे आणि कोणाच्याही वैयक्तिक धर्मात सरकारचा हस्तक्षेप होऊ नये. कलम ४४ अन्वये राज्यघटनेत विवेकाचे स्वातंर्त्य आणि मुक्त व्यवसायाचे, धार्मिक विषयाचे स्वातंर्त्य दिले गेले आहे. म्हणूनच, कलम ४४.मध्ये नागरिकांसाठी एकसमान नागरी संहिता लागू करण्याची तरतूद आहे आणि कलम ४४ मध्ये लोक आपल्या आवडीनुसार धर्म मानण्यास मोकळे आहेत. परंतु वैयक्तिक धर्माच्या बहाण्याने कोणत्याही समाजाने आपल्या नागरिकांना आपल्या नागरिकांच्या समान हक्कांचा भंग होऊ देऊ नये. समान नागरी कायद्याच्या मुद्यावर न्यायमूर्ती सहाय यांनी राजकीय इच्छाशक्तीबरोबरच सरकारी हस्तक्षेपाची आवश्यकता यावरही प्रकाशशोध टाकतातत्यांनी असे मत मांडले आहे की ''समान नागरी संहिता लागू करणे ही एक मोठी प्रगती असेल , परंतु यासंदर्भात विकास करण्यापूर्वी, इतर अनेक महत्त्वपूर्ण उपायांसह लोकांच्या भावना व भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे''.

भारत धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी, प्रजासत्ताक आहे, जिथे धर्म स्वातंर्त्य ही आपल्या अस्मितेचा सर्वात महत्वाचा घटक आहे. घटनेत धर्माची वैयक्तिक निवड म्हणून केली गेली आहे जी अत्यंत संवेदनशील आहे. भारत बहुलतावादी देश आहे, जिथे अनेक समुदायांचे सहकार्य आहे. म्हणून, जरी महिलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी एकसमान कायदा महत्त्वपूर्ण आहे. पहिली पायरी म्हणजे ह्या कायद्याची स्थिर चौकट बनवणे. सरकार सर्व धार्मिक गटातील घटकांना एकत्र घेऊन या विषयावरील वादविवाद आणि चर्चा सुरू करू शकते. प्रस्तावित समान कायद्याच्या घटकांविषयी चर्चा करण्यासाठी एक समिती गठित केली जाऊ शकते. सर्व लोकांच्या संमतीने एकसमान कोड बिल सुरू करणे फार महत्वाचे आहे . अशाप्रकारे, अनेक अडथळे आणि मर्यादा घालून देखील समान नागरी कायदा बनवण्याचा रस्ता सोपा नाही आहे, परंतु जर आपण आपल्या महिलांना समान हक्क आणि स्वातंर्त्य मिळवण्याच्या दिशेने वचनबद्ध असू तर आपल्याला पुढे जाणे आवश्यक आहे. इतिहासामध्ये कोणताही बदल करणे सोपे नव्हते आणि महिला हक्क आणि समानतेसाठी आपल्याकडे अजून काही मैलांचे अंतर नक्कीच जास्त आहे.

**निष्कर्ष —**

डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे स्वतंत्र भारताचे असे स्वप्न होते कि, जिथे सर्व लोक त्यांच्या कोणत्याही पार्श्र्वभूमीवर असोत,त्यांना समान राजकीय, नागरी आणि आर्थिक हक्क मिळतील. त्यांचा विश्वास होता, कि जर देश आपल्या नागरिकांना समानता प्रदान करू शकत नसेल तर स्वतंत्र असण्याचा काहीही अर्थ नाही. लग्न, घटस्फोट, मालमत्ता आणि दत्तक यासंबंधीचे कायदे नियमित करणारे हिंदू कोड बिल आणण्यामागे ते अग्रणी होते. या विधेयकापूर्वी हिंदू महिलांवर प्रचंड अत्याचाराचा सामना करावा लागला होता. बहुपत्नीत्व पाप होते, तिला तिच्या वडिलांच्या, पतीच्या मालमत्तेत कोणताही हक्क नव्हता आणि पतीपासून घटस्फोट घेण्याचा तिला कुठलाच अधिकार नव्हता. बाबासाहेबांमुळेच आज हिंदू स्त्रियांची अवस्था सुधारलेली आहे आणि त्यांना सर्व कायदेशीर हक्क आहेत. तथापि, बाबासाहेबांची दृष्टी अजूनही पूर्ण झालेली नाही. या विधेयकाचे फायदे अत्यंत मर्यादित आणि केवळ समाजातील एका घटकापुरते मर्यादित आहेत,(बीईएचएफ १९५२) मुस्लिम महिला अजूनही बऱ्याच कायदेशीर हक्कांपासून दूर आहेत. म्हणूनच स्वातंर्त्यानंतर एवढ्य वर्षानंतरही आपल्याकडे असमानतेचा प्रश्न आहे. आपण सर्वांसाठी समान कायदे जो पर्यंत बनवित नाही तोपर्यंत महिलांच्या हक्क किंवा समानतेचे लक्ष्य ठेवू शकत नाही. आपल्याला समान समाजासाठी बाबासाहेबांनी एक दृष्टी दिली आहे ज्याची आपण काळजी घेणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**संदर्भ—**


१. अहमद, एस. २००६. एकसमान नागरी संहिता (घटनेचा अनुच्छेद ४४) एक मृत पत्र. इंडियन जर्नल ऑफ पॉलिटिकल सायन्स मध्ये ,खंड. ६७, क्रमांक ३, ५४५—५५२.

२. अन्सारी, इक्बाल अ १९९१ मुस्लिम महिला अधिकार ध्येय आणि धोरण नवनिर्माण मध्ये आर्थिक आणि राजकीय साप्ताहिक, व्हॉ. २६, क्रमांक १७, १०९५—१०९७.

३. बीईएचएफ१९५२ भारतातील सामाजिक सुधारणरू द वर्ल्ड टुडे इन द हिंदू कोड बिल , रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनेशनल अफेयर्स, खंड. ८, क्रमांक ३, १२३—१३२.

४. भारतीय संविधान कलम२५,४४


◆◆◆

# स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला सक्षमीकरण

**पहाडे सुवर्णरेखा रत्नलाल**
एस.बी.ई.एस. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
औरंगाबाद

**प्रोफेसर डॉ.आघाव नवनाथ**
एस.बी.ई.एस. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
औरंगाबाद

प्रस्तावना:-

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर स्थानिक शासनाच्या नव्या युगाला प्रारंभ झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले ते मर्यादित होते. मात्र ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून ग्रामीण भागाला स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. विशेषतः कलम 40 नुसार पंचायतीच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली.

राज्यघटनेच्या माध्यमातून केंद्र व राज्य यांच्यामध्ये अधिकारांची वाटणी करण्यात आली त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्य सूची मध्ये देण्यात आलेला आहे.त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध घटक राज्यांनी आपापल्या सोयीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज संस्था बद्दल स्वतंत्र कायदे तयार केले.महिलांची स्थिती व दर्जा सुधारण्यासाठी राज्यघटनेच्या चौथ्या भागातील राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्व मध्ये महिलांसाठी स्वतंत्र तरतुदी करण्यात आले आहेत.कलम 38 मध्ये महिलांची स्थिती सुधारून त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी आणि त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.राज्यघटनेतील कलम 39 मध्ये महिला व बालकांसाठी पुरेशा प्रमाणात उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे, त्यांना संरक्षण देणे, आरोग्य व काम करण्याच्या ठिकाणची योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी राज्यांची असते असे म्हटले गेले.

स्थानिक स्वराज्य संस्था हा लोकशाही विकेंद्रीकरणाचा पहिला टप्पा आहे. लोकशाहीतील समता,बंधुता आणि स्वातंत्र्य या मूलभूत संकल्पना प्रत्यक्षात साकार होण्याची संधी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये केलेल्या आरक्षणामुळे निर्माण झाली आहे. लोकशाही प्रेमी कोणत्याही व्यक्तीला ही घटना स्वागतार्ह व आनंदाची वाटणे सहाजिकच आहे.एकविसावे शतक आला अनुसरून स्त्रीयांना हा हक्क दिला जातोय. अशी कौटुंबिक व सामाजिक भावना असण्याची गरज आहे. इतकेच नव्हे तर जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये सदस्यांचे किंवा पदाचे आरक्षण देणे ही लोकशाही मधील क्रमप्राप्त घटना आहे हे मानायला अजून सामाजिक मन तयार होत नाही आणि हीच खरी लोकशाहीची शोकांतिका आहे. विकेंद्रित

लोकशाहीमध्ये लोकशाही ही समाज जीवनाची एक जीवनपद्धती ठरायला हवी तरच ते आरक्षण खऱ्या अर्थाने कृतार्थ होऊ शकेल. समाजजीवनात स्त्रीला स्थान मिळणे हा राजकीय सत्तेचा मूळ उद्देश आहे. पण प्रत्यक्षात या सत्तास्थान आकडे ज्या लोकशाही पद्धतीने सामाजिक न्याय व्यवस्था म्हणून पाहिले जात नसल्यामुळे सत्तेत येण्यापूर्वी ही स्त्री कोणी नसते व सत्ता गेल्यानंतर देखील कोणीच नसते. हे लोकशाहीमध्ये भान असणे गरजेचे आहे.

***शोधनिबंधाचे उद्देश:-

१) स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला विकासाची स्थिती तपासणे.

२) स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांचे कार्य आणि सहभाग याचा अभ्यास करणे.

३) महिला नेतृत्व निर्मिती करणाऱ्या घटकांची पार्श्वभूमी अभ्यासणे.

४) ण राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे.

५) महिला नेतृत्वा समोरील प्रश्नांचा अभ्यास करणे.

*** गृहितके:-

१) स्थानिक स्वराज्य संस्था मुळे महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे.

२) सानी स्वराज्य संस्था यशस्वी होण्यासाठी महिला सबलीकरणाचे आवश्यकता आहे.

३) महिलांना दिलेल्या आरक्षणामुळे लोकशाही प्रबळ होण्यास मदत होत आहे.

*** संशोधन पद्धती:-

प्रस्तुत अभ्यासासाठी द्वितीयक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून तर ते संकलनासाठी संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, त्रि मासिके, मासिके यांचा उपयोग करण्यात आलेला आहे आणि विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**** आशय:-

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लोकशाहीची मूळ आहे. म्हणून लोकशाही प्रबळ करायचे असेल तर लोकसंख्येने अर्धा भाग असलेल्या महिलांना पंचायतराज संस्थांमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. पंचायत राज मधील महिलांच्या राजकीय सहभागाशिवाय लोकशाहीचा विचार करणे म्हणजे लोकशाहीची विटंबना करण्यासारखे आहे. असे मत भारतीय महिला दर्जा समितीचे ज्येष्ठ सदस्य प्रा इक्बाल नारायण व प्रा शिर्शिकर यांनी 1957 च्या मेहता अहवालामध्ये महिलांना समाजाचा एक घटक मांडे होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे देशातील सहा लाख 75 हजार महिला ग्रामपंचायतीच्या सदस्य आहेत आणि 75 हजाराहून अधिक सरपंच आहेत संपूर्ण देशातील 37523 महीला पंचायत समित्यांच्या सदस्य आहेत. 1500 महिला सभापती आहेत त्यांनी 3161 महिला जिल्हा परिषद सदस्य आहेत. तर 122 महिला परिषदेच्या अध्यक्षा आहेत याच प्रमाणे आरक्षणाचा फायदा घेऊन महाराष्ट्रात देखील स्थानिक स्वराज्य संस्था तिन्ही स्तरावर (महाराष्ट्रातील निवडणूक आयोगाच्या 2004 च्या आकडेवारीनुसार) ग्रामपंचायत मधील 93 हजार 333 महिला सदस्य आहेत. 9125 महिला सरपंच आहेत. पंचायत समितीमध्ये 1200 महिला सदस्य व106 महिला सभापती आहेत तर जिल्हा परिषदेमध्ये 576 महिला सदस्य आहेत. तर दहा महिला जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आहेत.स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ते 30 टक्के आरक्षणामुळे महिलांचा मोठ्या प्रमाणात राजकीय सहभाग असल्याचे चित्र आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

73 व्या घटनादुरुस्तीने महिलांसाठी 33 टक्के जागा आरक्षित केल्यामुळे महिला राजकारणात उतरल्या ही सत्य आहे याचा अर्थ असा होतो की आरक्षणामुळे महिलांना राजकारणात प्रवेश करण्याची संधी मिळाली आहे.पण या संधीचे सोने करण्यासाठी महिलांच्या मनावर नेमक्या कोणत्या व्यक्तीचा घटनेचा आणि कोणत्या परिस्थितीचा प्रभाव पडला आहे ती परिस्थिती महत्त्वाची मानावी लागेल.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला आरक्षणाच्या तरतुदीमुळे संस्थांच्या नियमित निवडणुका, महिलांचा राजकारणातील सहभाग, महिलांचे नेतृत्व इत्यादी बाबी मध्ये मोठ्या प्रमाणात भर पडली आहे.तसेच उपेक्षित जाती-जमातीच्या महिलांना राजकारणात येण्याची संधी प्राप्त झाली आहे.महाराष्ट्र मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील घराणेशाहीला काही प्रमाणात आळा बसला आहे.तरुण मतदारांची आणि तरुण महिला प्रतिनिधींची संख्या वाढली आहे. बहुजन समाजाला सत्तेत भागीदारी मिळाली आहे आणि त्यामुळे स्थानिक प्रश्नांची सोडवणूक झाली आणि विकास कार्यातील उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली.थोडक्यात पंचायतराज संस्थांनी अनेक बाबतीत केलेली प्रगती अभिमानास्पद ठरावी अशीच आहे एकूणच या संपूर्ण परिस्थितीचा परिणाम स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण पुण्यामध्ये झालेला दिसून येत आहे.

**** निष्कर्ष:-

१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ज्या राखीव जागा मिळाल्या आणि संधी मिळाली त्या अधिकारांची महिलांना जाणीव नाही.

२) स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये महिलांचा गुणात्मक सहभाग कमी आहे.

३) विविध बैठकांमध्ये महिलांचे प्रत्यक्ष सहभागाचे प्रमाण आणि कामगिरी समाधानकारक आहे.

४) महिला नेतृत्वाचा विकास होत आहे.

५) पंचायत राज व्यवस्थेतील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग समाधानकारक आहे.

****संदर्भ ग्रंथ सूची:-


१) बडे जी एस, भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था: उगम आणि विकास, हिमालया पब्लिशिंग हाऊस मुंबई 1978

२) भांडारकर पू.ल., सामाजिक संशोधन पद्धती, श्री मंगेश प्रकाशन नागपूर 1978

३) बिराजदार/घोडके, भारतातील स्थानिक स्वशासन संस्था, अंशुल पब्लिकेशन नागपुर

४) भोळेभा.ल., भारतीय राज्यव्यवस्था, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर 2003

५) चौधरी अशोक, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961, चौधरी लॉ पब्लिशर्स पुणे 2005

६) गर्गेस.मा., भारतीय समाजविज्ञान कोश खंड चौथा, संचालक समाज विज्ञान मंडळ पुणे 1990

७) गांधी एम के, पंचायत राज, नवजीवन पब्लिकेशन हाऊस अहमदाबाद 1961

८) पंचायत भारती, पंचायती राज प्रबोधन संस्था ठाणे 2004 2005

९) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई 2003 ते 2005

१०) यश मंथन यशदा (त्रैमासिक) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे 2003 ते 2005


◆◆◆

# विद्यार्थी मतदारांमधील राजकीय परिपक्वतेचा स्तर (तिरोडा विधानसभा मतदार संघ क्षेत्राच्या विशेष संदर्भात)

**प्रा. डॉ.शशिकांत ज. चवरे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
न.मा.द.महाविद्यालय, गोंदिया

**संशोधन विषयाचा उद्‌देश :**

प्रस्तुत संशोधन विषय निवडण्यामागील उद्देश पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) विद्यार्थी हा भारतीय लोकशाहीचा आधार स्तंभ आहे. याची जाणीव निर्माण करणे.

२) आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांच्या राजकीय जागृकतांच्या स्तराविषयी पडताळणी करणे.

३) विद्यार्थ्यांच्या राजकीय परिपक्वतेचा स्तर वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये राजकारणाविषयी आकर्षण निर्माण करणे.

**संशोधन विषयाचे गृहीतकृत्य.**

संशोधनाला योग्य दिशा देण्यासाठी पुढील गृहीतकृत्याचा स्विकार केला आहे.

१) विद्यार्थ्यामध्ये राजकीय अधिकारांविषयी जाणीव आहे.

२) विविध अभ्यास शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जाणीव जागृकतेचा स्तर सारखाच आहे.

३) निवडणूक लढविण्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये विशेष रूची आहे.

**संशोधन विषयाचे महत्व :—**

प्रस्तूत निवडलेल्या संशोधन विषयाचे महत्व पुढील प्रमाणे आहे.

१) राजकीय अधिकारांविषयी विद्यार्थ्यांचे मत प्रकट होण्यास मदत होते.

२) प्रचलित राजकीय पर्यावरणाविषयी विद्यार्थ्याच्या जाणीव जागृतांचा स्तर ध्यानात येण्यास मदत होते.

३) भविष्यामध्ये राजकीय क्षेत्रात प्रवेशाच्या बाबतचे ढाडस विद्यार्थ्यांमध्ये आहे काय ? याची कल्पना येण्यास मदत होते.

४) विद्यार्थ्यांमधील रजकीय परिपक्वतेच्या दिशेची कल्पना येण्यास मोलाचे सहकार्य लाभते.

**संशोधन क्षेत्र व संशोधन पद्धती :—**

प्रस्तूत संशोधन विषयाचे संशोधन क्षेत्र तिरोडा विधानसभा मतदार संघ क्षेत्र आहे. महाराष्ट्रातील २८८ पैकी संबंधीत संशेधन क्षेत्र ६४ व्या क्रमांकाचे विधानसभा मतदारसंघ आहे. प्रस्तूत संशोधक विषयाच्या अध्ययनाकरीता प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केला गेला. नमुना म्हणून २०० विद्यार्थ्यांची निवड केलेली होती. त्यात १०० विद्यार्थी व १००

विद्यार्थीनींचा समावेश होता असे विद्यार्थी विविध अभ्यास शाखेवरून निवडण्यात आले होते. प्रस्तूत संशेधन विषयाकरिता गैर—संभाव्य नमुना निवड पद्धतीतील सोयीस्कर व सुविधा जनक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आला होता.

**अ) प्रस्तावना :—**

प्राचिन काळात लाभलेला लोकशाहीचा वारसा व ब्रिटीशांमुळे आधुनिक लोकशाही झालेली तोंड ओळख यामुळे स्वातंष्य प्राप्तीनंतर २६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक गणराज्य झाल्यामुळे भारतीय नागरिकांच्या राजकीय परिपक्वतेचा स्तर वाढण्याची आशा पल्लवीत झाली. असा कोणताही शासन प्रकार नाही, की ज्यात दोष नाही. आधुनिक उदारवाही लोकशही ही अनेक दोषांने ग्रसीत जरी असली तरी त्यात असलेल्या गुणांचे अधि ाक्य जास्त आहे. स्वामी विवेकानंद, जयप्रकाश नारायण, व रामनोहर लोहीया यांच्या सारख्या थोर विचारवंतानी लोकशाहीचा रथ पुढे वाढवण्यात युवकांचा सिंहाचा वाटा राहील असे भाकित केले. भारतीय लोकशाहीची धुरा युवकांच्या मजबूत खांद्यावर सोपविण्यात यावी. या बाबत अनेक विचारवंतानी सकारात्मक मत प्रकट केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी मतदारांच्या जाणीव जागृकता निश्चितपणे वाढझाली असेल. याचे व्यवहारिक रूप तपासने आवश्यक आहे. लोकशाही हा शासन प्रकारच नव्हे तर ती जीवन प्रणाली आहे. शिक्षणाचा झालेला प्रचंड प्रचार आणि प्रसार यामुळे शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. वर्तमान भारतातील लोकशाहीला प्राणवायु देण्याची जबाबदारी विद्यार्थी मतदारांवर आलेली आहे.

उपरोक्त संशोधन विषयाच्या अनुसंधाने तिरोडा विधानसभा मतदार संघ या संशोधन क्षेत्राची निवड केलेली आहे. भारत हा युवकांचा देश आहे. सुमारे ६५: लोकसंख्या १८ ते ३५ या वयोगटात मोडतात. विद्यार्थी मतदारांच्या राजकीय परिपक्वतेचा स्तर तपासण्याकरीता राजकीय परिवक्वतेचा अर्थ, विद्यार्थ्यांच्या राजकीय जाणीवा व जागृकता, तिरोडा विधानसभा मतदार संघ क्षेत्राची ओळख व तिरोडा विधानसभा मतदार संघ क्षेत्रातील तथ्य संकलन व विश्लेषण या मुदयांना अनुसरून पुढील प्रमाणे चर्चा केलेली आहे.

**ब) राजकीय परिपक्वतेचा अर्थ:—**

मनुष्याच्या शारिरीक, बौद्धीक व मानसिक विकासाचे वयोमानानुसार टप्पे वैज्ञानिक आधराव निर्धारित असतात. अगदी त्याच प्रमाणे राजकीय जागृकता व जाणीवा प्रकल्पीत होण्यासाठी विशिष्ठ कालावधीच्या टप्प्याचें परिभ्रमण होणे गरजेचे असते. इंग्लंड व अमेरिका या सारख्या विकसित राष्ट्रांमध्ये विद्यमान स्थितीत नागरिकांच्या राजकीय जाणीवा व जागृकता याचा स्तरात जी नेत्रदिपक प्रगती झाली आहे त्याचे श्रेय त्या देशातील प्रगत राजकीय संस्कृतीच्या वारस्याला दयावे लागेल. आधुनिक लोकशाहीत मतदारामध्ये मी राजकीय निर्णय निर्धारण प्रक्रियेतील एक अभिन्न घटक आहे. निर्णयावरच राजकारणाची चारिष्यता आधारित आहे. याची जाण निर्माण होणे यालाच राजकीय परिपक्तेचा स्तर म्हणता

येईल. राजकीय परिपक्वता या संकल्पनेविषयी अधिक माहिती होण्यासाठी राजकीय परिपक्वतेच्या विविध रूपाची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

१) लोकप्रतिनिधीकरीता आवश्यक असलेल्या गुणांची जाणीव असणे व असे गुण असणाऱ्या जागृत मतदाराने निवडणूक लढविणे.

२) मतदान करणे हे राजकीय अधिकारातील एक अभिन्न भाग आहे. परंतू, केवळ मतदान करणे म्हणजेच राजकीय अधिकारांची प्राप्ती झाली. या गैर—समजापासून दुर राहून राजकीय अधिकारात अभिप्रेत असलेल्या भावार्थनुसार मतदार वर्तण करणे.

३) भावुकता, सहानुभूती, विभूती पूजा व परिवार वादाच्या आहारी न जाता मतदानाचे अधिकार बजावणे.

४) युवकांमध्ये राजकारणा विषयी विशेष रस असणे.

५) लोकप्रतिनीधिंना 'स्वामीचा' दर्जा देण्याची प्रवृत्ती नसणे.

६) मतदान न केल्यामुळे चारिष्यवान लोकप्रतिनीधीची निवड होणार नाही, याची मतदारांमध्ये जाणीव असणे.

उपरोक्त विवेचनावरून राजकीय परिपक्वतेचा विविध रूपा विषयी समज येण्यास मोलाची मदत होते. राजकीय परिपक्वतेचा विविध रूपातून राजकीय परिपक्वतेचा अर्थ स्पष्ट होतो. लोकशाहीच्या निकोप विकासाची धुरा चारिष्यवान लोकप्रतिनीधींच्या निवडीवर अवलंबून असते. याकरीता मतदाराच्या राजकीय परिपक्वतेचा स्तर उंचावने अत्यावश्यक आहे. तेव्हाच ''अब्राध्य लिंकन''१ यांना अपेक्षीत असलेली लोकशाही अस्तित्वात येईल.

**क) विद्यार्थ्यांच्या राजकीय जानिवा व जागृकता :—**

गुणवत्ता पूर्ण शिक्षण हे लोकशाहीच्या निकोप विकासासाठी अत्यावश्यक आहे. जनसामान्याचा प्रयत्न राजकीय जनजागृकता पोहचविण्यात शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे. भारतीय लोकशाहीत निर्माण झालेली मरगळ दुर करण्यात विद्यार्थ्यांचा सिंहाचा वाटा मिळू शकतो. परंतू वर्तमान काळातील विद्यार्थी राजकारणाला सामाजिक सेवेचे व्रत समजून आपले जीवन अर्पण करण्यास धजत नाही ''जयप्रकाश नारायण''[२] यांनी तरूणांवर विश्वास दाखवून तत्कालीन मजबूत राजकीय सत्तेला हादरे दिली. तसा उत्साह निर्माण करण्यात वर्तमान काळातील पुढारी समोर येत नाही. विद्यार्थ्यांच्या संघटना राजकीय पक्ष्याच्या हातातील खेळने झाले आहे. ''पंडित नेहरूंनी मार्च १९५७ मध्ये केलेल्या भाषणात''[३] लोकप्रतिनिधिंना आवश्यक असलेले गुणांचा विद्यार्थ्यांमध्ये नैतिक संस्कार टाकून विकास केल्यास भारतीय लोकशाहीची गुणवत्ता उंचावेल यात दुमत नाही. ''क्मउवबतमल ब्तपमे''[४] मध्ये पाश्चात्य विद्वान भारताच्या लोकशाहीवर जी शंका व्यक्त करतात त्याचे चोख प्रतिउत्तर विद्यार्थी देवू शकतात.

**ड) तिरोडा विधानसभा मतदार संघ क्षेत्राची ओळख :—**

तिरोडा विधानसभा क्षेत्राला तिरोडा तालुक्याचे नांव देण्यात आले आहे. तिरोडा हा

गोंदिया जिल्हयातील महत्वपूर्ण तालुका आहे. तिरोडा विधानसभा मतदार संघ क्षेत्राचा विधानसभा मतदार संघ क्रमांक ''२००९ च्या परिसिमनानुसार ६४ वां क्रमांक आहे.''[५] संशोधन क्षेत्र म्हणून निवडलेल्या तिरोडा विधानसभा मतदारसंघ अंतर्गत ''तिरोडा येथे अदानी उदयोग समुहाचा अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड हा ३३०० मेगावॅट औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहे'' त्याच बरोबर तिरोडा तालुक्यात चोरखमारा सिंचन प्रकल्प आहे. तो नवेगाव—नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या शेजारी आहे. तसेच तिरोडा तालुक्यातील बोदलकसा हा मध्यम सिंचल प्रकल्प असून निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. तलावाच्या परिसरात असलेली वनराई आकर्षित करते. आता इथे पर्यटन विकास महामंडळाचे निवासाचे रिसार्ट पर्यटकांच्या सेवेत सज्ज झाले आहे.''[६] निवडलेल्या संशोधन क्षेत्रात महत्वपूर्ण ऐतिहासिक वारसाचे अस्तित्व आहे. ''तिरोडा तालुक्यातील डाकराम/सुकडी या गावात महानुभाव पंथाचे आद्यप्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांचे तीर्थ क्षेत्र प्राचिन मंदिराच्या स्वरूपात आहे''[७] तिरोडा विधानसभा मतदार संघाचा अधिक परिचय होण्यासाठी २००९ च्या परिसिमनानुसार संशोधक क्षेत्राचा थोडक्यात परिचय पुढील प्रमाणे आहे.

**तिरोडा विधानसभा मतदार संघ : (२००९ च्या परिसीमनानुसार)**

तिरोडा विधानसभा मतदारसंघात तिरोडा तालुक्या खेरीज गोंदिया तालुक्यातील गंगाझरी महसुल मंडळ व गोरेगाव तालुक्यातील गोरेगाव महसुल मंडळाचा समावेश केला आहे. या मतदार संघात चार बदल झाले. एक— जुन्या विधानसभा मतदारसंघात संपूर्ण तिरोडा तालुका नव्हता. पुनर्रचनेनतर या मतदारसंघात पूर्ण तालुक्याचा समावेश केला. दोन— गोंदिया तालुक्यातील गंगाझरी तालुक्याचा नव्याने समावेश केला गेला. तीन— तिरोडा हा अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ होता, तो सर्वसाधारण प्रकारचा झाला आहे. त्यामुळे या मतदारसंघातून नवे नेतृत्व पुढे येणार आहे. चार— तिरोडा तालुक्याचे या मतदार संघावर नियंत्रण राहील. परंतू तिरोडाला गोंदिया व गोरेगाव या दोन तालुक्यांच्या राजकारणाशी जुळवून घ्यावे लागेल. असा बदल झाला आहे. जुन्या मतदार संघावर कॉंग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. (१९७८ ते १९९०) कॉंग्रेसचे सुरवातीस (१९७८ व १९८०) नवबौध्द व नंतर मातंग (१९९० व १९९५) उमेदवार निवडून आले. नवबौद्ध व मातंग या दोन जातीमध्ये राजकीय स्पर्धा होती. त्यामुळे नवबौध्द समाजाचे संघटन येथे भाजपाने केले. कॉंग्रेसकडून हा मतदार संघ भाजपाकडे सरकला होता. (१९९५ व १९९९) तो २००४ मध्ये भाजपकडून राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे सरकला''.[८]

**तिरोडा विधानसभा मतदार संघाच्या निवडणूका :**

तिरोडा विधानसभा मतदार संघ हे गोंदिया जिल्हयातील महत्वपूर्ण विधानसभा क्षेत्र आहे. या विधानसभा मतदार संघा अंतर्गत विधानसभांच्या गतकालीन झालेला निवडणूकांचा आढावा घेतल्यास या मतदार संघ क्षेत्रातील मतदार वर्तनाची कल्पना येण्यात मदत होते.

## या विधानसभा मतदार संघ क्षेत्राच्या निवडणूका

| अ. क्र. | वर्ष | मतदार संघ क्र | मतदार संघाचे नांव | निवडणूकीतील उमेदवार |  | एकूण उमेदवार | मतदारांची संख्या |  | एकूण मतदार | एकूण मतदारांची टक्केवार | विजेता उमेदवार | पक्ष | विजेत्या उमेदवार ला मिळाले ले मत | मतदार संघांचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  | पुरूष | स्त्री |  | पुरूष | स्त्री |  |  |  |  |  |  |
| 1 | 1995 | 145 | तिरोडा | 18 | 1 | 19 | 73525 | 74321 | 147846 | 81.40% | भजनदास बी. वैदय | बी.जे. पी. | 49597 | एससी. |
| 2 | 1999 | 145 | तिरोडा | 5 | — | 5 | 71964 | 72840 | 144804 | 67.88% | भजनदास बी. वैदय | बी.जे. पी. | 34315 | एससी. |
| 3 | 2004 | 145 | तिरोडा | 8 | — | 8 | 77577 | 76631 | 154208 | 69.53% | दिलीप डब्ल्यू. बन्सोड | एनसी. पी. | 49271 | एससी. |
| 4 | 2009 | 64 | तिरोडा | 13 | — | 13 | 100007 | 97690 | 197697 | 72.53% | खुशाल पी. बोपचे | बी.जे. पी. | 56450 | सर्व साधारण गट |
| 5 | 2014 | 64 | तिरोडा | 15 | 1 | 14 | 119579 | 119718 | 239297 | 70.09% | विजय बी. राहांगडाले | बी.जे. पी. | 54160 | सर्व साधारण गट |

स्त्रोत :www.eci.gov.in16

**उपरोक्त तक्तावरून खालील बाबी निष्पन्न होतात.**

१) १९९५ ते २०१४ या दरम्यान झालेल्या विधानसभा निवडणूकीत तिरोडा विधानसभा मदार संघामध्ये सरासरी ७२.२८: मतदान झाले.

२) १९९५ ते २०१४ दरम्यानझालेल्या संशोधन क्षेत्रातील विधानसभा निवडणुकीत ५९ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. त्यात केवळ २ महिला उमेदवारांनी विध ाानसभा निवडणूक लढविण्याचे धाडस दाखविले व त्या निवडणूकीत महिला उमेदवार पराभूत झाल्या.

३) तिरोडा विधानसभा मतदार संघ या संशोधन क्षेत्रातील १९९५ ते २०१४ या दरम्यान झालेल्या विधानसभा निवडणूकीत विजयी उमेदवाराला अनुक्रमे ३३.५४:, २३.६९:, ३१.९५:, २८.५५: व २२.६३: मतदान मिळाले.

४) तिरोडा विधानसभा मतदार संघ १९९५, १९९९ व २००४ या वर्षी अनुसूचीत जातीसाठी आरक्षीत होते २००९ नंतर ही जागा सर्व साधारण गटासाठी ठेवण्यात आली.

ई) निष्कर्ष व उपाय योजना :

**निष्कर्ष :—** विद्यार्थी मतदारांमधील राजकीय परिपक्तेचा स्तर या संशोधन विषयाला अनुसरून तिरोडा विधानसभा मतदार संघ या संशोधन क्षेत्राची निवड करण्यात आली होती. संबंधीत संशोधन विषयाचे अध्ययन करतांना गृहीतकृत्यांना अनुसरून जे निष्कर्ष समोर आलेत त्यांची थोडक्यात चर्चा पुढील प्रमाणे.

१) अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे विद्यार्थी मतदारांमध्ये राजकीय अधिकारा विषयी जाणीव वृद्धींगत होण्यास मदत होत आहे. परंतू राजकीय अधिकारात समाविष्ट असलेल्या व्यापकतेची जान फार थोडया विद्यार्थी मतदारांमध्ये आढळून आली. मतदानाचा अधिकार बजावणे व शासनाला विरोध करणे म्हणजेच राजकीय अधिकार बजावणे असा समज एकूण विद्यार्थी नमुना मतदारांपैकी ७८:विद्यार्थी नमुना मतदारांमध्ये आढळून आले.

२) निवडलेल्या एकूण नमुना विद्यार्थी मतदारापैकी वाणिज्य, विज्ञान व अन्य अभ्यास शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जाणीव जागृकतेचा कला शाखेत मोडणाऱ्या विद्यार्थी नमुना मतदारांच्या तुलनेत अभाव आढळून आला. कला शाखेत मोडणाऱ्या विद्यार्थी नमुना मतदारांनी भविष्यात निवडणूका लढविणार या बाबतीत अधिक पसंती दर्शविली.

३) राजकीय अपराधीकरण व निवडणूकातील वाढता आर्थिक भ्रष्टाचार या प्रमुख कारणांमुळे विद्यार्थी नमुना मतदारांनी राजकारणाला जीवन निर्वाहाचे साधसन म्हणून निवडण्यास ना पसंती दर्शविली आहे.

**उपाय योजना :**

उपरोक्त संशोधन विषयाला अनुसरून संशोधनाअंती संशोधन समस्येचे निराकरण करण्यासाठी पुढील उपाय सुचवता येते.

१) सर्व अभ्यास शाखेमध्ये राजकीय परिपक्वता वाढेल या संबंधीचा अभ्यासक्रम तयार करून राजकीय परिपक्वता हा अनिवार्य विषय सर्व विषय शाखेमध्ये ठेवावा.

२) विद्यार्थ्यातील नेतृत्व गुणांचा विकास होईल. असे उपक्रम महाविद्यालयातील शिक्षण घेणाऱ्या स्तरावर राबवणे.

३) महाविद्यालयात प्रवेश देतांना मतदार यादी नोंद असणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक प्राधान्य दयावे.

४) विद्यापीठ प्रतिनिधी व वर्ग प्रतिनिधीच्या निवडणूका सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारावर प्रत्येक्ष निवडणूकांच्या माध्यमातून घ्याव्यात.

५) राजकीय अधिकारांची व्यापकता समजन्याकरीता सीनेट व नाट्य कलाकारांच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावर विविध शिबिर आयोजित करण्यात यावी.

## संदर्भ ग्रंथ सूची


1 जौहरी जे.सी. व जौहरी सीमा, : ''आधुनिक राजनीती विज्ञान के सिद्धांत'', स्टर्लिंग पब्लिशर्स, प्रा.लि. नई दिल्ली, 2012, पान क्र. 400

2 भोळे भास्कर लक्ष्मण, : ''आधुनिक भारतातील राजकीय विचार'', पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2003, पान क्र. 533

3 गजराज सिंह व गजराज चेतना, : ''भारतीय राजनिती'', अर्जुन पबिलशिंग, नई दिल्ली, 2014, पान क्र. 262

4 राय ओमप्रकाश, : ''भारत की चुनावी राजनीती के बदलते आयाम'', विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, 2006, पान क्र. 230

5 स्त्रोत :– www.eci.gov.in

6 'आपला जिल्हा गोंदिया' प्रकाशक, जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया

7 नखाते दिनेश, : ''गोंदिया जिल्हा गौरव'', साप्ताहिक, गंगाभूमी, गोंदिया 2015–16, पान क्र. 31

8 पवार प्रकाश, : ''महाराष्ट्रच्या न्या राजकारणाची पुनर्रचना'', प्रतिभा प्रकाशन, पुणे, 2009, पान क्र. 166

9 स्त्रोत :– : www.eci.gov.in


◆◆◆

# आधुनिक काळात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत गांधीवादाची उपयुक्तता आणि प्रासंगिकता

**पहाडे सुवर्णरेखा रत्नलाल**
एस.बी.ई.एस. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
औरंगाबाद

**प्रोफेसर डॉ.आघाव नवनाथ**
एस.बी.ई.एस. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
औरंगाबाद

प्रस्तावना:-

स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर भारतीय समाज आणि शासन व्यवस्थेच्या समोर जे अनेक प्रश्न आणि समस्या निर्माण झाल्या आहेत त्या पाहता त्या सर्वांचे मूळ आम्ही स्वीकारलेल्या नवीन व्यवस्था मध्ये असल्याचे जाणवते. स्वराज्य प्राप्तीनंतर आम्ही जे विकासाचे मॉडेल स्वीकारले त्यानुसार लक्षणीय प्रगती झाली मात्र अनेक समस्या आणि प्रश्न निर्माण झाले आहेत हे वास्तव आहे. स्वातंत्र्य पूर्वी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या आणि स्वातंत्र्यसैनिकांनी जे स्वप्न उराशी बाळगले होते ते आता पूर्ण होताना दिसून येत नाही. नवीन समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्था यामधील विकास हे मृगजळ आहे कि काय असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. सामाजिक चंगळवाद, राजकीय भ्रष्टाचार, समाजाचे गुन्हेगारी स्वरूप, शिक्षण व्यवस्थेतील घोडेबाजार, उच्चविद्याविभूषित लोकांची बेकारी, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, स्वच्छ आणि पारदर्शक राज्यकारभाराचा अभाव, सर्व क्षेत्रातील अनाठाई आणि जीवघेणी स्पर्धा हे आणि यासारखे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न कशामुळे आणि कोणामुळे निर्माण झाले याचे उत्तर स्पष्टपणे कुणालाच जरी देता येत नसले तरी देखील आपण जी व्यवस्था स्वीकारली आहे त्यामध्येच कुठेतरी गल्लत झाल्याचे जाणवते. या सर्व प्रश्न आणि आणि समस्या तून बाहेर पडायचे असेल तर राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था यांची मानसिकता बदलावी लागेल. याचे उत्तर आणि निराकरण केवळ गांधी वादामध्ये असल्याचे जाणवते. मग आपण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात गांधीवादाचा स्पीकर का केला नाही हा प्रश्न अनुत्तरितच आहे?

अ) शोधनिबंधाचे उद्देश:-

प्रस्तुत शोधनिबंधाचे खालीलप्रमाणे काही उद्देश आहेत

१) महात्मा गांधी यांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारांची आजच्या परिस्थितीत आवश्यकता आहे काय? याचा अभ्यास करणे.
२) महात्मा गांधीजींच्या विचारांचे महत्त्व अभ्यासणे.
३) स्वातंत्र्योत्तर काळातील विविध समस्या वर महात्मा गांधीजींच्या विचाराने आधारे योग्य पर्याय सुचविणे.
४) आधुनिक लोकशाही शासन लोकाभिमुख करण्यासाठी उपायांचा अभ्यास करणे.

५) भारतीय राजकारण, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, शिक्षण व्यवस्था यामध्ये निर्माण झालेल्या समस्या वर उपाय सुचविणे.

ब) शोधनिबंधाची गृहितके:-

प्रस्तुत शोधनिबंधाची खालील काही गृहितके आहेत.

१) आधुनिक भारतीय समाजातील अनेक समस्यांचे उत्तर महात्मा गांधी यांच्या विचारांमध्ये आहे.

२) महात्मा गांधी यांचे विचार मानवी सुख आणि शांतता यांचे प्रतिपादन करणारे होते.

३) राम राज्य आणि ग्रामराज्य प्रत्यक्षात येण्यासाठी महात्मा गांधी यांचे विचार आवश्यक आहेत.

** सामाजिक विचार आणि प्रासंगिकता:-

१) मद्दयपानास विरोध:-

महात्मा गांधीजी हे दारूबंदी चे कट्टर पुरस्कर्ते होते.मद्यपानातून समाजाचे आधार पतन होतेअसे त्यांचे मत होते.मद्दयपानातून मनुष्य हा नैतिक दृष्ट्या पूर्णपणे खालावतो एखादा अटलबदमाश आणि त्याच्यामध्ये कोणताच फरक उरलेला नसतो.गुन्हेगार हा इतरांच्या मालमत्तेवर दरोडा घालतो तर मद्यपी स्वतःच्या कुटुंबावर दरोडा घालून एक भयंकर गुन्हेगार बनतो. समाजामध्ये आधुनिक काळामध्ये हे चित्र सर्वत्र दिसून येत आहे त्यासाठी महात्मा गांधीजींच्या विचारा आधारे दारूबंदी ची गरज आहे.

२) स्त्रियांच्या प्रगतीबाबत विचार:-

प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना अतिशय निम्न दर्जा होता. त्यामुळे स्त्रियांच्या वाट्याला फक्त उपेक्षा व गुलामगिरी आली. प्राचीन काळात बालविवाहाची प्रथा रूढ होती. त्याचा परिणाम असा झाला की बालविवाहाचे प्रमाण वाढले आणि स्त्रीचे स्वातंत्र्य नाकारले गेले. चूल आणि मूल हेच त्यांचे कार्यक्षेत्र बंद होते. शिक्षणाचा कोणत्याच प्रकारचा गंध त्यांना नव्हता. आर्थिक दृष्टीने ही पुरुषांवरील त्यांचे परावलंबित्व वाढले होते. पुरुषांना अनेक स्त्रियांसोबत विवाह करण्याचा अधिकार होता पण तरुण विधवा पुन्हा विवाह करू शकत नव्हती. म्हणून स्त्रियांची ही अवस्था समाजातील एक दोष होता. महात्मा गांधीजींनी या सर्वांचा सातत्याने विचार केला होता. आजच्या समाजव्यवस्थेमध्ये देखील यापेक्षा असे वेगळे चित्र नाही. आज बाल विवाह जरी नसले तरी देखील स्त्रियांवरील अत्याचार वाढतच आहेत.

३) अस्पृश्यतेचे संबंधी विचार:-

जातीव्यवस्था कितीही वाईट असली तरी देखील भारतीय समाजाचा एक अविभाज्य अंग बनले आहे आणि ही दुर्दैवी स्थिती महात्मा गांधीजींनी ओळखली होती. जातीमुळे समाजाचे विघटन झाले. जातिव्यवस्थेने समाजामध्ये अनेक प्रश्न गंभीर बनवले. महात्मा गांधीजींना वर्णव्यवस्था मान्य होती मात्र त्यांचा जातिव्यवस्थेला तीव्र विरोध होता.

४) हिंदू मुस्लिम एकता:-

महात्मा गांधीजींना या गोष्टीची पुरेपूर जाणीव होती की, भारतीय समाज हा विभिन्न प्रकारच्या गटात विभागला गेला आहे आणि त्याचे वाईट परिणाम सर्वत्र जाणवत आहेत. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय आधारावर भारतीय समाजाचे अनेक भागात विभाजन झाले आहे. सामाजिक विषमतेच्या आधारावर भारतात जाती व्यवस्था अस्तित्वात आली या जाती व्यवस्थेमध्ये अस्पृश्य ते सारखी वाईट रूढी निर्माण झाली या रूढी मुळे एक शोषित वर्ग निर्माण झाला. त्याच बरोबर भारतीय समाजात धार्मिक गट सुद्धा बलवान आहेत. त्या आधारावर देखील समाजाचे अल्पसंख्य व बहुसंख्य असे विभाजन झाले आहे. हे विभाजन महात्मा गांधीजींना मान्य नव्हते.

५) महात्मा गांधीजींचे शिक्षणाचे तत्वज्ञान:-

गांधीजींनी शिक्षणाचे तत्त्वज्ञान वेगवेगळ्या पद्धतीने मांडले आहे. भारतीयांसाठी कोणत्या प्रकारचे शिक्षण उपकारक ठरू शकेल यासाठी त्यांनी सखोल चिंतन केले आहे. आता परंपरागत शिक्षण हे निरुपयोगी ठरणारे नाही.देशाची सर्वांगीण उन्नती होईल अशा प्रकारची शिक्षण पद्धती मांडले जाणे जरुरी आहे. आता केवळ पुस्तकी ज्ञानावर भर देऊन चालणार नव्हते कारण त्याचा व्यवहारात काहीच उपयोग होत नसतो म्हणून व्यावहारिक शिक्षण दिले पाहिजे या मताचे महात्मा गांधीजी होते.

६) गाईंचे संरक्षण:-

फार जुन्या काळापासून गाय हा अत्यंत पूजनीय प्राणी हिंदू धर्माने मानला आहे. गांधीजी वृत्तीने स्वतः धार्मिक असल्यामुळे त्यांनी गोरक्षण याला महत्त्व दिले. गाय हे हिंदूचे आराध्यदैवत आहे त्यामुळे गाईचे संरक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे ते मानत असत. केवळ धार्मिक दृष्टीने पाहिले तर गाईंची पवित्रता निर्विवाद आहे. गाई पासून पूर्ण मिळते खत मिळते बैलाची पैदास होते म्हणून गाय समाजाची धारणा करते. गाय हा एक गरीब व दीन लोकांचे प्रतीक आहे. म्हणून गाईला संरक्षण मिळणे गरजेचे आहे.

****महात्मा गांधीजींचे रामराज्य किंवा ग्राम राज्य:-

१) खेडे हा मूळ गाभा:-

देशाच्या उन्नतीसाठी महात्मा गांधी जी ने खेड्याला महत्त्वपूर्ण मानले आहे. आपल्या आदर्श राज्यांची रचना प्राचीन रामराज्य किंवा ग्रीक नगर राज्याच्या धर्तीवर त्यांनी केली आहे. त्यात प्रत्येक खेडे हा नव्यानेच रचनेचा केंद्रबिंदू असेल.

भारत हा शहर आमचा देश नसून खऱ्या अर्थाने खेड्यांमध्ये वसलेला आहे. अशा पद्धतीने स्वराज्याची राजकीय आर्थिक व सामाजिक या घटकावर आधारलेली असेल. या राज्यांमध्ये समाजाची सेवा हे उद्दिष्ट असेल महात्मा गांधीजींच्या दृष्टिकोनातून स्वराज्य व रामराज्य एकच असून त्यांच्यात लोकशाहीचे चित्र रामायणात आहे असे स्पष्ट होईल.

२) आदर्श राज्याची रचना:-

महात्मा गांधीजींच्या आदर्श राज्यामध्ये प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व स्वयंशासित झाले पाहिजे. त्याचा एक चांगला परिणाम असा होईल की, खालच्या स्तरापासून अशा खेड्यांना शासन चालवण्याचे पूर्ण अधिकार दिले असतील. अशी ग्रामराज्ये पूर्णपणे विकेंद्रित स्वरूपाचे असतील. सरकार आणि ग्रामपंचायत त्यांच्या पद्धतीने हा राज्यकारभार चालवतील. अशा आदर्श राज्यामध्ये श्रमाला अतिशय महत्वाचे स्थान असेल. एकदा श्रमावर आधारलेली समाज व्यवस्था अस्तित्वात आली की वर्णव्यवस्था आपोआपच नष्ट होईल. नव्या आदर्श राज्याला सर्वच व्यवस्था समान प्रतिष्ठेच्या असल्यामुळे सर्वांना आपोआपच सत्ता प्राप्त होईल.

३) आदर्श राज्याची कामे:-

आदर्श राज्यातील कामे महात्मा गांधीजींनी स्पष्ट केली आहेत. विशेषतः त्यातील न्याय पद्धतीबाबत विचार त्यांनी स्पष्ट मांडले. लोकांना न्याय ताबडतोब मिळाला पाहिजे आणि तो मिळविण्यासाठी त्यांना जास्त खर्च येऊ नये. न्यायाच्या कामी मदत करणारा वकील वर्ग जनतेशी समरूप होणारा असला पाहिजे. त्यांनी किती समाजोपयोगी कार्य केले आहे यावरून त्यांची योग्यता ठरवली जावी. तुरुंग म्हणजे केवळ शिक्षा देण्याचे केंद्र न बनता आधार गृह बनावे. या ठिकाणी गुन्हेगारांची गुन्हेगारी वृत्ती कमी करण्याचा प्रयत्न व्हावा. महात्मा गांधीजी केवळ स्वप्नाळू नव्हते अशा प्रकारची पद्धती निर्माण होणे अवघड आहे याची जाणीव देखील त्यांना होती.

४) समाजव्यवस्था:-

महात्मा गांधीजींच्या आदर्श राज्यातील प्रत्येक व्यक्ती सारखीच श्रेष्ठ असेल. भंगी असो वा डॉक्टर प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुटुंबातील धंदा करावा असे महात्मा गांधीजी म्हणतात. त्यामुळे गाव स्वावलंबी होईल व धंद्यात देखील कुशलता राहील. अस्पृश्यता हिंदूंना लागलेला कलंक आहे असे ते मानीत असत. स्त्री शिक्षणावर त्यांनी जोर दिला तसेच मादक द्रव्य सेवनाच्या ते विरोधात होते.

५) राज्याला विरोध करण्याचा अधिकार:-

राज्य जर जनतेच्या इच्छेने प्रतिनिधित्व करत नसेल तर जनतेने कायद्याचा विरोध केला पाहिजे अशावेळी राज्याचा विरोध करणे अधिकार नव्हे तर ते एक कर्तव्य ठरते. विरोध मात्र अहिंसात्मक मार्गानेच करण्यात यावा असे त्यांचे मत होते.

वरील प्रकारच्या विचारांच्या आधारे शोधनिबंधाचे काही निष्कर्ष प्राप्त होतात ते पुढीलप्रमाणे.

क) शोधनिबंधाचे निष्कर्ष व शिफारशी:-

१) महात्मा गांधी यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विचारांची आजच्या परिस्थितीत आवश्यकता आहे.

२) आजच्या काळातील विविध समस्या वर महात्मा गांधी यांच्या विचारा आधारे योग्य पर्याय उपलब्ध होऊ शकतात.

३) आधुनिक लोकशाही शासन व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी महात्मा गांधीजींच्या राम राज याचा उपयोग आहे.

४) महात्मा गांधीजी यांचे विचार मानवी सुख व शांतता यांचे प्रतिपादन करणारे होते.

५) राम राज्य आणि ग्रामराज्य प्रत्यक्षात येण्यासाठी महात्मा गांधीजी यांचे विचार आवश्यक आहेत.

६) महात्मा गांधीजी यांच्या ट्रस्टीशिप सिद्धांत आधारे अर्थव्यवस्थेत सुधारणा होऊ शकतात.

७) समाजातील दैनंदिन प्रश्न आणि समस्या गांधी विचारांच्या आधारे सोडविणे सहज शक्य आहे.

***संदर्भ ग्रंथ सूची

१) गांधीजींना समजून घेताना-धर्मपाल-भारतीय शिक्षण मंडळ, नागपूर

२) सत्याचे प्रयोग-मोहनदास करमचंद गांधी-नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद

३) भारतीय राजकीय विचारवंत-डॉ. रमेश ढोबळे-विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.

४) भारतीय राजकीय विचारवंत-कुलकर्णी व्ही जी-कैलास प्रकाशन औरंगाबाद

५) राजकीय विचार प्रणाली-शुभांगी राठी-कैलास प्रकाशन औरंगाबाद

◆◆◆

# सामाजिक संशोधनातील संशोधन आराखडा व त्याचे महत्व

**श्री.शिवतेज संभाजीराव भोसले**

एम.ए., बी.एड् (राज्यशास्त्र)

**प्रस्तावना :-**

संशोधनामध्ये संशोधन आराखड्याला अनन्य साधारण महत्व आहे. कारण संशोधन आराखड्यामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते आणि संशोधन भरकटत नाही. कोणतेही संशोधन विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेऊनच केले जाते. त्यासाठी योजनाबद्ध पद्धतीने संशोधन कार्य करणे आवश्यक असते. म्हणजेच संशोधन कशा पद्धतीने केले जाणार आहे?, कोणत्या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे?, त्याची साधने कोणती वापरण्यात येणार आहेत?, त्यामध्ये कोणत्या समस्या अंतर्भूत असणार आहेत आणि कशाचा शोध घेण्यात येणार आहे?, त्यासाठी कोणते अनुमान लावण्यात आलेले आहेत?, स्थळ काळ वेळ मर्यादा कशी असेल? , वेळ, श्रम आणि पैशाची बचत कशा प्रमाणे करता येयील आणि संशोधनामध्ये वस्तुनिष्ठता आणि गुणवत्ता आणण्यासाठी कशा प्रकारे संशोधन करण्यात येणार आहे? याची सर्व गोळा बेरीज म्हणजे संशोधन आराखडा होय. म्हणून संशोधनामध्ये संशोधन आराखडा महत्वपूर्ण बाब असते. प्रस्तुत शोध निबंधामध्ये सामाजिक शास्त्रातील संशोधन आराखडा कसा असावा याचा शोध घेण्यात आलेला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :-**

१) संशोधन पद्धती आणि तंत्रांचे अध्ययन करणे.
२) संशोधन आराखड्याचे अध्ययन करणे.
३) संशोधन अराखड्याच्या स्वरूपाचे अध्ययन करणे.
४) संशोधन आराखडा या विषयाचा शोध घेऊन संशोधन कार्यासाठी पूरक साधनाचा शोध घेणे.
५) संशोधन आराखड्याचे महत्व समजून घेणे.

**गृहीतके :-**

१) संशोधन आराखडा संशोधन कार्यासाठी आधारभूत घटक आणि दिशा दर्शक असल्याचे पहावयास मिळते.
२) संशोधन आराखड्यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैशाचा अपव्यय होत नाही.

३) संभाव्य अडथळे आणि समस्यांची पूर्व कल्पना असल्याने त्यावर मात करणे संशोधकाला सुलभ होते.

४) संशोधन आराखड्यामुळे संशोधन क्षेत्र आणि संशोधन कार्याची व्याप्ती वाढत नाही.

५) संशोधन कार्यामध्ये गुणवत्ता आणि वस्तुनिष्ठता आणण्यासाठी संशोधकाला संशोधन आराखड्यामुळे मदत होते.

**संशोधन आराखड्याचा अर्थ आणि व्याख्या :-**

संशोधन कार्यासाठी विशिष्ट साचेबध्द पद्धत वापरणे म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन आराखड्यामध्ये संशोधनाच्या सुरुवाती पासून ते शेवटपर्यंत वापण्यात येणाऱ्या साधनांचा आणि पद्धती तंत्रांचा उल्लेख केलेला असल्याने संशोधन आराखडा संशोधकाला दिशादर्शक असा मार्ग म्हणून ओळखला जातो. अचूक निष्कर्ष काढण्यासाठी संशोधन आराखडा आवश्यक असतो. म्हणजेच संशोधनासाठी वापरली जाणारी साचेबद्ध पद्धत म्हणजे संशोधन आराखडा असतो से म्हणता येयील.

काही विचारवंतांनी आपल्या कुशाग्र बुद्धीच्या आधारे संशोधन आराखड्याच्या व्याख्या केलेल्या आहेत त्यामध्ये डॉ. सुधीर बोधनकर म्हणतात कि, वेळ, श्रम आणि पैसा यांचा महत्तम उपयोग करून संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी तथ्यांचे संकलन, विश्लेषण आणि निर्वचन करून सिद्धांताची मांडणी करण्यासाठी निर्णय घेण्याच्या नियोजन प्रक्रियेला संशोधन आराखडा असे म्हणतात.

**संशोधन आराखड्याचे प्रकार :-**

१) सर्वेक्षणात्मक संशोधन आराखडा
२) अन्वेषणात्मक संशोधन आराखडा
३) वर्णनात्मक संशोधन आराखडा
४) निदनात्मक संशोधन आराखडा
५) प्रयोगात्मक संशोधन आराखडा

**संशोधन आराखड्यामध्ये अंतर्भूत घटक :-**

संशोधन कार्याच्या सुरुवातीपासून ते संशोधन कार्याच्या अहवाल सदरीकरणापर्यंत सर्व बाबींची नोंद संशोधन आराखड्यामध्ये केलेली असते म्हणूनच संशोधकाला संशोधन कार्य करण्यासाठी योग्य दिशा मिळते आणि आदर्श रूपरेषा ठरवून संशोधन कार्याचे तथ्य संकलन करून त्याची मांडणी करणे, त्याचे विश्लेषण करणे, अचूक निष्कर्ष काढणे, इत्यादी बाबी संशोधन आराखड्यामुळे शक्य होतात.संशोधन आराखड्याचे स्वरूप किंवा संशोधन आराखड्यामध्ये अंतर्भूत घटकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

**१)संशोधन समस्या निश्चिती**:-

यालाच संशोधन विषयाची निवड असे देखील म्हटले जाते. संशोधकाला संशोधन करण्यसाठी कोणत्यातरी समस्येची आवश्यकता असते जिच्याबद्दल शोध घेणे हे संशोधकाचे उद्दिष्ट असते. संशोधन आराखड्यामध्ये विषयाची निवड हि पहिली पायरी समजली जाते. संशोधन विषयाची निवड म्हणजेच संशोधनाची सुरुवात असते.

**२)संशोधन विषयाची प्रस्तावना** :-

संशोधन कार्य सुरु करण्यासाठी संशोधकाला विषयाची निवड केल्यानंतर त्या विषयाची प्रस्तावना संशोधन आराखड्यामध्ये करावी लागते. संशोधन विषयाची पार्श्वभूमी आणि संशोधन विषयाबद्दल माहिती संशोधन आराखड्याच्या प्रस्तावनेमध्ये केलेली असते.

**३)संशोधनाचे उद्देश** :-

संशोधकाला संशोधन सुरु करण्यापूर्वी विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेऊनच संशोधन विषयाची निवड आणि सुरुवात करावी लागते. संशोधक करत असलेले संशोधन कार्य हे कुठल्या उद्देशाने प्रेरित आहे किंवा प्रस्तुत संशोधन कार्य कशासाठी करणे गरजेचे आहे हे स्पष्ट करण्यासाठी संशोधन कार्याचे उद्देश निश्चित करणे गरजेचे असते. संशोधकाला संशोधन विषयाची निवड केल्यानंतर संशोधन कार्याचे उद्धेश निश्चित करावे लागतात आणि त्याचा उल्लेख संशोधन आराखड्यामध्ये करणे गरजेचे असते.

**४)संशोधनाचे महत्व**:-

संशोधकाला संशोधन विषयाची निवड केल्यानंतर संशोधन विषयाचे महत्व विषद करावे लागते. संशोधन विषयाची आवश्यकता हा संशोधन विषयाचा आणि संशोधन कार्याचा अत्यंत महत्वाचा भाग आहे.संशोधकाने केलेल्या संशोधन विषयाची फलश्रुती काय असणार आहे ?. संशोधन समस्या शोध घेण्यायोग्य आहे किंवा नाही? हे संशोधन आराखड्यातील संशोधन विषयाच्या महत्वावरून ठरविले जाते त्याचप्रमाणे लक्षातही येते म्हणून संशोधन आराखड्यामध्ये संशोधन विषयाचे महत्व नमूद असणे अत्यंत महत्वाचा घटक असून ते गरजेचे आहे.

**५)गृहीतके**:-

निर्धारित समस्येची संभाव्य उत्तरे म्हणजे गृहीतके होय. संशोधनकर्त्याला संशोधन कार्य करत असताना काही सामान्य अनुमान व्यक्त करावे लागतात. संशोधकाचा संशोधन विषयासंबंधी असलेला तो अभ्यास असतो. संशोधन कार्य योग्य दिशेने सुरु असल्याचे संशोधकाला मदत होण्यासाठी आणि संशोधन कार्य योग्य दिशेने पूर्ण करण्यासाठी गृहीतकांची मांडणी केली जाते

म्हणून गृहीतके हा संशोधन आराखड्यातील एक महत्वाचा घटक आहे तथापि अविभाज्य घटक आहे असे पहावयास मिळते.

**६)समस्यासूत्रण** :-

संशोधन कार्य करण्या अगोदर संशोधकाला समस्या निर्धारित करावी लागते. प्रस्तुत विषयामध्ये किंवा संशोधन कार्यामध्ये कशाचा शोध घेण्यात येणार आहे? म्हणजे नेमकी काय समस्या आहे? याचा स्पष्ट खुलासा संशोधन आराखड्यामध्ये करणे आवश्यक असते. म्हणून संशोधन समस्या आणि तिचे स्वरूप कळण्यासाठी समस्यासूत्रण याचा उल्लेख संशोधन आराखड्यामध्ये करणे क्रमपात्र ठरते.

**७)संशोधन विषयाची मांडणी:-**

संशोधन विषयाची बैठक ही सुस्पष्टरित्या अधोरेखित करणे गरजेचे असते. कारण संशोधन समस्या आणि शोध याचा सविस्तर लेखाजोखा संशोधन आराखड्यामध्ये असणे गरजेचे आहे. संशोधन विषयाच्या मांडणीवरून एकंदरीत संशोधन विषय लक्षात येण्यस मदत होते म्हणून संशोधन विषयाची मांडणी करणे आवश्यक असते. संशोधन विषयाची मांडणी हा संशोधन आराखड्याचा एक महत्वाचा भाग आहे.

**८)संशोधन कार्याचे सामाजिक, सांस्कृतिक,राजकीय आणि भौगोलिक संदर्भ** :-

संशोधन विषय हा समाजामध्ये वास्तविक असलेल्या विषयाशी निगडीत असल्याने समाजाचे प्रतिबिंबच त्यामध्ये असते. संशोधन अराखड्यामाध्येच संशोधकाला संशोधन विषयाचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि भौगोलिक पैलू विषद करावे लगतात. संशोधन विषयाचा सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक आणि भौगोलिक सहसंबंध कसा आहे याचा स्पष्ट उल्लेख संशोधन आराखड्यामध्ये करणे गरजेचे असते.

**९)तथ्य संकलन** :-

संशोधन कार्यासंबंधी तथ्य कशाप्रकारे? कोणत्या पद्धतीने? संकलित करण्यात येणार आहेत याची माहिती संशोधन आराखड्यामध्ये देणे गरजेचे असते कारण संशोधन करताना तथ्य किंवा माहिती गोळा करताना विहित पद्धतीच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले गेले तर विषय सुलभ होतो व विशिष्ट पद्धतीने ठरविल्या प्रमाणे संशोधन कार्य सुरु राहते. तथ्य संकलनाच्या प्राथमिक आणि द्वितीयक अशा दोन व त्याच्या उप पद्धती असल्याने कोणत्या कोणत्या पद्धतींचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात येणार आहे हे संशोधन अराखड्यामध्ये स्पष्ट केल्यास तथ्यांचे संकलन आणि विश्लेषण करणे संशोधकाला सुलभ होते.

**१०)प्रकरणांची रूपरेषा** :-

संशोधनकर्त्याला संशोधन विषयाची विभागणी विविध प्रकरणांमध्ये करावी लागते. जेणे करून संशोधन अध्ययन सुलभ होवून संशोधकास एका सामान्य निष्कर्षापर्यंत पोहोचणे शक्य होते. प्रकरणांच्या रुपरेषेने संशोधनाचे संपूर्ण स्वरूप लक्षात येते नि एका साचेबद्ध पद्धतीने अध्ययन सुरु राहते त्यमुळे संशोधन विषयाची विविध प्रकरणांमध्ये विभागणी करून प्रकरणाची रूपरेषा विषद करणे हा संशोधन आराखड्याचा एक अविभाज्य घटक आहे

**११)संदर्भ ग्रंथसूचि :-**

संदर्भ ग्रंथ सूची हा संशोधन विषयाचा महत्वाचा घटक मानला जातो कारण संशोधन अध्ययन करत असतांना कोणते संदर्भ साहित्य वापरले जाणार याहे याची नोंद संशोधन आराखड्यामध्ये असते आणि टी अत्यावश्यक बाब आहे. संपूर्ण संशोधन कार्य हे संदर्भ ग्रंथ सूचीवर आधारित असते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**उपसंहार :-**

वरील विवेचनावरून असे म्हणता येयील कि, सामाजिक संशोधनामध्ये संशोधन आराखडा हा अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावतो. संशोधन आराखाडा म्हणजे संशोधन कार्याची सुरुवात आणि रूपरेषा आहे. संशोधन अध्ययन करण्यासाठी विषय निवडीपासून त्याविषयाची मांडणी, संशोधन विषयाचे उद्देश, संशोधन विषयाचे महत्व, संशोधन विषयाचे समस्यासुत्रण, संशोधन विषयाची गृहीतके, संशोधनासाठी वापण्य्तं येणारी संशोधन पद्धती, प्रकरणांची रूपरेषा इत्यादी सर्व घटक स्पष्टपणे संशोधन आराखड्यामध्ये नमूद असतात त्यामुळे संशोधन आराखड्याला अनन्य साधारण महत्व प्राप्त होते.

**संदर्भ ग्रंथ सूचि :-**

१) बी.एम.कऱ्हाडे, शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर, २०११.
२) डॉ.वा.भा.पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन , पुणे.२००६
३) एस.के.ढगे व सी.पी.हासे, संशोधन पद्धती, के.एस.प्रकाशन, पुणे, २०११.
४) पु.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७.
५) डॉ.दा.धो.काचोळे, सामाजिक संशोधन पद्धती, कैलाश पब्लिकेशन,औरंगाबाद,

◆◆◆

# महात्मा गांधीजींची 'नई तालीम'

**पहाडे सुवर्णरेखा रत्नलाल**
एस.बी.ई.एस. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
औरंगाबाद

**प्रोफेसर डॉ.आघाव नवनाथ**
एस.बी.ई.एस. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
औरंगाबाद

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. हेस्वातंत्र्यमिळविण्यासाठी अनेक लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. भारताने लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला आणि शासनव्यवस्था,राज्यव्यवस्था, प्रशासन, समाजव्यवस्था, कृषी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था यामध्ये भारतीयांच्या अनुकूल ते नुसार बदल होतील आणि सर्वांचे कल्याण होईल अशी सर्वांनाच अपेक्षा होती. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण आणि ग्रामीण भारत अवतरेल असे वाटत होते. महात्मा गांधीजींच्या रामराज्याचा स्वीकार न करता स्वतंत्र भारताने वेगळ्याच व्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे वर्तमानात अनेक प्रश्नांना येथील समाजव्यवस्था सामोरे जाताना दिसून येत आहे. इंग्रजांच्या पारतंत्र्यात असताना जेवढी बिकट अवस्था झाली नसेल कदाचित त्याहीपेक्षा अधिक हलाखीची परिस्थिती सद्यस्थितीत शिक्षण आणि राजकारण यांची झालेली आहे. मग प्रश्न शिल्लक राहतो की महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली जर भारताने स्वातंत्र्य लढा लढा होता तर मग त्यांना अपेक्षित असलेली शिक्षण प्रणाली आणि समाज व्यवस्था यांचा पुरस्कार स्वतंत्र भारताच्या राजकारण्यांनी का केला नाही.

आजच्या परिस्थितीत समाजासमोर आणि देशासमोर अनेक प्रश्न आहेत त्यातील महत्त्वाचा आणि उल्लेख करण्यासारखा प्रश्न आणि समस्या म्हणजे आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये निर्माण झालेला भ्रष्टाचार आणि जीवघेणी स्पर्धा होय. प्राचीन काळामध्ये जसे मनसबदार आणि जहागीरदार असायचे संस्थानिक असायचे त्याच प्रमाणे आज त्याच प्रमाणे आज संस्थाचालक आहेत आपल्या मनाप्रमाणे ते शिक्षकांची भरती करतात गुणवत्तेला तिथे कुठेच न्याय नाही आणि जागा ही अर्थातच नाही. संपूर्ण देशाला आणि समाजाला या संस्थाचालकांनी वेठीस धरले आहे आणि शासन व्यवस्थेवर देखील त्यांचाच प्रभाव असल्यामुळे शासन देखील या प्रश्नावर काही तोडगा काढू शकत नाही आणि तशी मनस्थिती देखील नाही. उच्च शिक्षण क्षेत्रात अनागोंदी कारभार आहे केवळ गुणपत्रके वर विश्वास ठेवणारी ही शिक्षण व्यवस्था देशाला अंधाराच्या फार मोठ्या खाईत घेऊन जाताना दिसत आहे याचे भान येथील डोळस राजकारण्यांना नाही काय असा प्रश्न कोणत्याही शिक्षण प्रेमी आणि गांधी प्रेमी नागरिकाच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही.महात्मा गांधीजींनी समाज उपयोगी आणि देशाला उपयोगी पडतील असे अनेक प्रयोग आपल्या आयुष्यात केले त्यापैकीच एक म्हणजे'नई तालीम'. त्यांची अमुलाग्र आणि आज होता ती अशी शिक्षण योजना होय. या अद्भुत अशा शिक्षण योजनेची आजच्या नपुसक व्यवस्थेवर मात करण्यासाठी आवश्यकता आहे.

उच्च शिक्षण घेऊन पदवी यावर पदव्या मिळवून सर्व प्रकारच्या गुणवत्ता प्राप्त करून देखील येथील तरुण बेरोजगारीच्या ठेचा खात म्हातारा होत चालला आहे तरीही त्याला ना रोजगार आहे नात्याची भाकरी

शोधण्याची नजर. अशी परिस्थिती का झाली कुणामुळे झाली याचे उत्तरे शोधत बसायला आता वेळ नाही. ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगाराचे धडे देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करायला लावणारी शिक्षणव्यवस्था म्हणजेनयी तालीम. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील भारतच मुळात नई तालीम वर उभारलेला होता. मात्र आजच्या परिस्थितीमध्ये संस्थाचालकांच्या गुलामगिरीत संपूर्ण शिक्षण व्यवस्था असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पैशासाठी महात्मा गांधीजींना इथली शिक्षण व्यवस्था केव्हाच विसरलेली आहे. अतोनात पैसे आणि खंडणी घेऊन भ्रष्ट मानसिकतेचे लोक शिक्षण तज्ञ आणि शिक्षण सम्राट म्हणून मिरवत आहेत."गांधीजींच्या शब्दात सांगायचे म्हटले तर या लोकांनी येथील शिक्षणव्यवस्थेची हत्या करून सर्वत्र हिंसा पसरवली आहे."

महात्मा गांधीजींना केवळ राजकीय स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते तर जनतेची सामाजिक आणि आर्थिक उन्नती अपेक्षित होती. त्यामुळेच सत्याचे प्रयोग करत असताना एसपी परिणामकारकता दिसून येणारे शिक्षण विषयक धोरणावर देखील ते विचार करत होते.महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेली जीवन शिक्षण पद्धती आपल्या देशातील राज्यकर्त्यांनी न स्वीकारल्यामुळे आणि केवळ जुनीच पुस्तकी पद्धती चालू ठेवल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण पद्धती आपले राष्ट्रीय व शैक्षणिक उद्दिष्ट्ये देखील सफल करू शकले नाहीत त्यामुळे शिक्षण व्यवस्थेचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे.

महात्मा गांधीजींनी शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी जी योजना मांडली त्यामध्ये त्यांना ब्रिटिश राजवटीतील शिक्षण पद्धतीतील अनेक दोष दिसले होते. इंग्रजी भाषेला फाजील महत्त्व, पुस्तकी ज्ञानावर भर, हस्तव्यवसाय व हस्तकौशल्य याकडे दुर्लक्ष, विषयाचा आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी कोणता संबंध नाही, भारतीय संस्कृतीशी विसंवाद असलेले शिक्षण की ज्या मध्ये सहकार्य व पंथ भाव यांचा अभाव आहे त्यामुळे व्यापक उद्देश हस्तगत करण्यामध्ये ही शिक्षण व्यवस्था कुचकामी ठरली आहे.

1937 मध्ये महात्मा गांधीजींनी 'हरिजन'या वृत्तपत्रातून एक लेखमाला प्रकाशित करून त्यात शिक्षण योजनेची चर्चा घडवून आणली होती. त्याला मौलिक व आधारभूत शिक्षण (basic education) किंवा वर्धा योजना असे नाव देण्यात आले. या योजनेचे तत्त्व 'काम करताना शिक्षण'(learning through activity) हे होते. श्रमप्रतिष्ठा, ज्ञान प्रतिष्ठा, शील प्रतिष्ठा आणि सेवा प्रतिष्ठा अशा चतुरंग समन्वयातूनच सुसंस्कृत मानव तयार होत असतो. म्हणून प्राथमिक स्तरापासून ते उच्च स्तरापर्यंत विद्यार्थ्यांना हे संस्कार देण्यात यावेत हीच जीवन शिक्षण पद्धती महात्मा गांधीजींना महत्त्वाची वाटत होती.

शिक्षण हे व्यापक क्षेत्र असल्याने बाल शिक्षण, स्त्री शिक्षण,शिक्षणाचे माध्यम, विषयांचे नियोजन, चारित्र्य संवर्धन, उद्योग प्रक्रिया इत्यादी अनेक बाबींचा यथायोग्य परामर्श गांधीजींनी घेतला आहे. याविषयी महात्मा गांधीजी असे म्हणतात," जनतेला स्वाभिमानाने जगायला शिकविणारे व त्यांना माणूस बनविणारे, त्यांच्या पोटाला उद्योग देणारे, त्यांना चारित्र्यसंपन्न बनवून, स्वराज्याला लायक करणारे शिक्षण, जनतेच्या गरजा भागविणारे शिक्षण त्यांना हवे होते. आठ वर्ष सक्तीचे व मोफत शिक्षण, मातृभाषेतून दिले जाणारे शिक्षण,व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविणारे सार्वत्रिक शिक्षण मिळणे हा स्वराज्य इतकाच प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे."

महात्मा गांधीजींच्या शिक्षण योजनेमध्ये मातृभाषेचा अभ्यास सर्वोच्च स्थानी असून तेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे असे ते म्हणतात. राष्ट्रभाषा हिंदी ला त्यामध्ये स्थान होते. अंकगणित, निसर्ग परिचय, समाज परिचय, चित्रकला, संगीत या सर्वाचा अंतर्भाव या मध्ये आहे.हे सर्व विषय उत्पादक उद्योगांच्या माध्यमातूनच शिकवायचे आहेत यामुळे शिक्षण हे स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्यक्ती घडविण्याचे साधन आणि माध्यम होईल आणि यातूनच विद्यार्थ्यांच्या मानसिक तसेच शारीरिक शक्तीचा विकास होईल असे महात्मा गांधीजी म्हणतात. आपल्या खेड्यांचा जो सततअंध:पात व विनाश सुरू आहे तो प्रचलित शिक्षण पद्धतीमुळे दिसून येत आहे.'सदन आणी निर्धन'अशी ही समाजाची कृत्रिम विभागणी आढळून येते ती नवीन समाजव्यवस्थेत असणार नाही इतकेच नव्हे तर प्रत्येकाला चरितार्थासाठी आवश्यक असणारे वेतन आणि स्वातंत्र्य यांची हक्क त्या समाजात मिळतील अशी ग्वाही महात्मा गांधीजींनी या नवीन शिक्षण योजनेतून दिली होती.

प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय.मानवता म्हणजे सत्य आणि सत्य हाच ईश्वर असल्याने मानवतेची सेवा करणे म्हणजे ईश्वर प्राप्ती होय म्हणून माणसाला मानवतेची शिकवण देणारे शिक्षण अधिक उपयुक्त आहे. माणसाला माणूस बनवणारे त्याला उद्योग देणारे आणि चारित्र्यसंपन्न बनवणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. शिक्षण हे काही साध्य नाही तर ते एक साधन आहे.

महात्मा गांधीजींनी शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे सांगितले आहेत.

- स्वावलंबन व स्वयंपूर्णता वाढविणे.
- चारित्र्य संवर्धन करणे आणि नैतिक शिक्षणाद्वारे व्यक्तित्वाचा विकास घडवणे.
- समता, सहिष्णुता व सहकार्य या गुणांची वाढ करणे.
- संस्कृती संवर्धन करणे.
- व्यक्तीला तिच्या हक्काची व अधिकारांची जाणीव करून देणे.
- व्यक्तीला सुशिक्षित करून त्याच्या चरितार्थासाठी उद्योगधंदे निर्माण करण्याबाबत प्रोत्साहन देणे.
- राजकीय सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समानता निर्माण करणे.

महात्मा गांधीजींनी शिक्षण व्यवस्था आणि त्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी काही टप्पे सांगितले आहेत त्यातील बाल्यावस्था हा शिक्षणाचा पहिला टप्पा आणि या टप्प्यामध्ये आठ वर्षापर्यंत महत्त्वाचा काळ असतो. शिक्षकांच्या देखरेखीखाली शारीरिक श्रमाला शिक्षणाचे अंग समजण्यात आले पाहिजे शिक्षकांच्या प्रत्यक्ष संपर्कातून हे शिक्षण अधिक प्रभावी ठरते.

वयाच्या नवव्या वर्षापासून सोळाव्या वर्षापर्यंतचा मुलांच्या शिक्षणाचा दुसरा कालखंड महात्मा गांधीजी मानतात. मुला-मुलींना एकत्रित शिक्षण दिले जावे कारण त्यामुळे सहजीवन व जबाबदारीचे भान त्यांना अधिक लवकर येईल. याच कालखंडात धर्माचे शिक्षण देखील मुले घेऊ शकतात. माता-पित्यांचा व्यवसाय निश्चित झाला असेल तर मुलांना त्या उद्योगधंद्याचे ज्ञान मिळावे तसेच मुलींनी गृह कार्यासाठी

ज्ञान संपादन करावे.सोळाव्या वर्षापर्यंत मुला-मुलींना जगाचा इतिहास, भूगोल त्याचप्रमाणे वनस्पतिशास्त्र,खगोल विद्या, गणित आणि भूमिती या विषयांचे सर्वसाधारण ज्ञान व्हावे.

सोळा ते पंचवीस वर्षाचा कालखंड महात्मा गांधीजींनी शिक्षणाचा तिसरा कालखंड मानला आहे. या कालखंडात प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे व स्थितीप्रमाणे शिक्षण मिळाले पाहिजे.शिक्षण स्वावलंबी असावे यावर भर देत असताना गांधीजी म्हणतात वयाच्या नवव्या वर्षापासून सुरु होणारे शिक्षण स्वावलंबी असावे म्हणजे आपल्या शिक्षणाचा खर्च इतर कोणावरही न पडता विद्यार्थी शिकतच असा उद्योग करतील की त्यातून शाळेचा खर्च बाहेर पडेल. शाळेविषयी आणि शिक्षकांविषयी आपले विचार व्यक्त करताना गांधीजी म्हणतात,"शाळेला उद्योगापासून उत्पन्न तर जरूर व्हायला हवे परंतु प्रारंभीच्या वर्षात खर्च भागवणे इतकी प्राप्ती होणार नाही.या शिक्षण पद्धतीत शिक्षकांना लठ्ठ पगार मिळू शकणार नाही पण त्यांना मिळणारे वेतन त्यांच्या चरितार्थासाठी पुरेसे असले पाहिजे.शिक्षकांमध्ये सेवावृत्ती असावी शिक्षणासाठी प्रचंड व आर्थिक इमारतीची कोणतीच आवश्यकता नाही."

नई तालीम म्हणजे अनुभवातून विज्ञान आणि त्या माध्यमातून शिक्षण ही अविरत चालणारी प्रक्रिया असली पाहिजे असे महात्मा गांधीजी म्हणतात. विद्यार्थीदशेतच अनुभव देणारी ही शिक्षण पद्धती आहे. प्रत्येकाच्या आवडीनिवडीला येथे संधी आहे. सभोवतीच्या परिस्थितीचे निरीक्षण करून निष्कर्षापर्यंत येण्याची वैज्ञानिक पद्धती विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्याची किमया नई तालीम करेल अशी आशा गांधीजींना होती. दिवसाला तीन तास उत्पादक काम सक्तीचे असणारे आणि मध्यम वर्गाला श्रमाचा अनुभव आणि मजुराच्या मुलाला बौद्धिक काम हे दोन्ही तर्फे या शिक्षण पद्धतीत दिसून येतात. सूतकताई, विणकाम, गो शाळेची स्वच्छता, शौचालय सफाई, स्वयंपाक घरात काम करणे ही कामे प्रत्येक विद्यार्थ्याला आलीच पाहिजेत असे महात्मा गांधीजी म्हणत.

महात्मा गांधीजींच्या मते श्रम म्हणजे केवळ काम करणे नव्हे तर शिकतांना श्रम करावे व श्रम करताना शिकावे म्हणजेच श्रम अथवा कृती शिक्षण पद्धतीचा करा बनली पाहिजे. म्हणून शाळेला एखादी कार्यशाळा जोडण्यापेक्षा सर्व शाळा ह्या कार्यशाळा झाले पाहिजेत.म्हणजेच सर्वसाधारण शिक्षण कृतीद्वारे मिळणाऱ्या शिक्षणामुळे आपण जे शिकतो त्याचा उपयोग करू शकतो जे जाणतो ते वापरून बघू शकतो असा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो.या आत्मविश्वासामुळे त्यांचे ज्ञान व जीवन तेजस्वी होऊ शकते असे शिक्षण कमी काळात व कमी खर्चात होऊ शकेल असा गांधीजींना विश्वास होता शिकतांना कमविणे आणि कमावताना शिकण्याची ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवू शकेल.

महात्मा गांधीजींनी उच्च शिक्षणाला देखील प्राथमिक शिक्षणाचा प्रमाणेच आत्मनिर्भर असले पाहिजे असे म्हटले होते यासाठी वैद्यकीय अभियांत्रिकी वाणिज्य आणि कृषी इत्यादी महाविद्यालयाची स्थापना करून त्या माध्यमातून देशाच्या विविध गरजांची पूर्तता करावी असे गांधीजी म्हणतात.

खेड्यातीललोकांच्या गरजांना जास्तीत जास्त अनुकूल होण्याजोगी शिक्षण जर त्यांना द्यायचे असेल तर विद्यापीठ खेड्यात नेले पाहिजे.खेड्यातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षकांना प्रत्यक्ष प्रयोगात्मक शिक्षण देणे शक्य व्हावे म्हणून विद्यापीठाचे आपल्याला अध्यापन शाळेत रूपांतर करावे लागेल शहरात

देणे शक्य होणार नाही आणि शहरांमध्ये गावकऱ्यांच्या परिस्थितीविषयी आस्था देखील आपण उत्पन्न करू शकत नाही.

स्त्रियांनादेखील पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण दिले पाहिजे स्त्री शिकेल तर कुटुंब शिकेल असे महात्मा गांधीजींना वाटत होते.पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्या निरक्षरतेचे कारण केवळ आळस व जळता हेच नव्हे त्याचे मोठे कारण स्त्रियांना कमी लेखण्याची अनादी काळापासून चालत आलेली परंपरा हे सुद्धा आहे. आमच्या सामाजिक परंपरेनुसार पुरुषाने स्त्री स्वतःची जोडीदार इं व सदर मिनी न मानता तिला घरातील काम करणारी दासी व भोगविलास चे साधन बनवले आहे याचा परिणाम असा झाला की समाजाचे अर्थ अंग खूप कमी होऊन बसले आहे तरीही प्रजेची आई आहे असे म्हटले जाते पण तिच्या बाबतीत जो घोर अन्याय होत आहे, तो दूर करणे गरजेचे आहे आजही शिक्षणामध्ये स्त्रियांच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे. हे टाळायचे असेल तर स्त्री शिक्षण महत्त्वाचे आहे.

महात्मा गांधीजींचे शिक्षण योजना कृतिप्रवण आणि स्वावलंबन ता आणणारी आहे. जीवन आणि अभ्यासविषय यामध्ये सुसंवाद तसेच समन्वय साधणारी आहे या शिक्षणामध्ये भारतीय भाषांना प्राधान्य आहे स्त्री शिक्षणाला स्थान आहे स्थानिक गरजांना महत्त्व आहे असे जरी असले तरी देखील ही शिक्षण योजना आज पर्यंत कोणत्याच शासनाने प्रत्यक्षात का आणली नाही हा प्रश्न शेवटी शिल्लक राहतोच.महात्मा गांधीजींच्या या विचारात देशाच्या स्वातंत्र्यापेक्षा देखील देशाची शैक्षणिक व सांस्कृतिक विषमता कमी करून सुसंस्कृत सुशिक्षित समाज निर्माण करावयाचा होता.त्यासाठी त्यांनी शैक्षणिक तत्वज्ञान न मांडता कृतीयुक्त शैक्षणिक विचार प्रत्यक्ष वास्तवात मांडलेले आहेत.शिक्षणाशिवाय भारतीयांना स्वातंत्र्याची जाणीव होणार नाही असे त्यांना नेहमी वाटत होते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी THREE-H म्हणजे H-Head(बुद्धी) H-Heart (मन) H-Hand(कार्यशक्ती) चा उपयोग केला. त्यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन समाज परिवर्तन व समाजाचा विकास होईल अशी त्यांची अपेक्षा होती. महात्मा गांधींची हीच अपेक्षा म्हणजे नई तालीम आज जरी स्वप्नवत वाटत असली तरी देखील भविष्यात ही योजना प्रत्यक्षात यावी असा आशावाद करायला हरकत नाही.

*संदर्भसूची:-


1. महात्मा गांधी यांचे संकलीनवाङ:मय-रा.प्र.कानिटकर
2. महात्मागांधी-कृष्णा कृपलानी
3. महात्मा गांधी यांचे राजकीय चरित्र-अनुवाद-सरोज देशपांडे
4. गांधी दर्शन-डॉ. एम. के.मिश्रा, डॉ.कमलदाधीच
5. शैक्षणिक विचारवंत, पाश्चात्त्य व भारतीय-डॉ. घोरमोडे के यु
6. गांधी विचार दर्शन, अकोलकर ग.वि.
7. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा-मोहनदास करमचंद गांधी.


◆◆◆

# कौटुंबिक हिंसाचार व स्त्रियांचा बळी

**प्रा.भांडवलकर बी.एन.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर (ग.), ता.जि.बीड

**स्त्री विषयक दृष्टीकोन**

कौटूंबिक हिंसेची कारणे किंवा मूळ कुटुंबातच असतात. पुरुषप्रधान कुटुंबात स्त्रीचे स्थान नेहमी दुय्यम राहिलेले आहे. भारतीय संस्कृतीत वाढलेल्या स्त्रियाही अनेकदा पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या वाहक असतात. त्याचबरोबर कुटुंबातील इतर लोकही नवऱ्याचे ऐकले नाही तर तो मारणारच असे मारहाणीचे समर्थन करतात. पुरुष श्रेष्ठ की स्त्री या प्रश्नाचे उत्तर दोघेही पुरुष असेच देतील.

स्त्रियांवरील कुटुंबांतर्गत सत्ता अबाधित राखण्यासाठी व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीच पुरुषप्रधान संस्कृतीच्या नावाखाली जन्माला आलेली हिंसेसाठीची फसवी समर्थने नवीन प्रगत विचार समजून घेण्याातील अडथळा आहेत.

कौटुंबिक हिंसा ही खाजगी बाब नसून एक सामाजिक समस्या आहे. कारण त्याचा संबंध समाजव्यवस्थेशी आहे. समाजाने स्त्रीला देवी, अबला मानले पण तिला कधी माणूसच मानले नाही.

**कौटूंबिक हिंसा आणि स्त्रीभावना**

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये वावरत असताना अत्त्याचारग्रस्त स्त्रिया हया भावनिक संघर्षात अडकलेल्या दिसून येतात.

१) अत्त्याचारग्रस्त असूनही स्वतःलाच अपराधी वाटणे,

२) स्वतःबद्दल लाज वाटणे,

३) आत्मविश्वास कमी होणे,

४) अत्त्याचाराविरुध्द कोर्टात गेल्यास नुकसान करून घेतले अशी भावना येणे,

५) अत्यंत भीती वाटत राहणे,

६) असुरक्षितता वाटणे,

७) नैराश्य येणे,

८) आत्महत्येचा विचार येणे,

९) शारिरीक मानसिक आरोग्यावर परिणाम,

१०) माझेच चुकले की काय, असे वाटत राहणे. उपराक्त स्त्री भावाना कौटूंबिक हिंसेला चालना देते.

**पुरुषांची मानसिकता आणि कौटूंबिक हिंसा**

पुरुषांची स्त्रियांबद्दलची मानसिकता आजही १८ व्या शतकातीलच वाटते.
१) दुय्यमता २) आधारस्तंभ ३) नियंत्रण ४) संचारस्वातंत्र्य ५) घरकाम मूल्य ६) जबाबदाऱ्या ७) परस्परसंबंध ८) उपभोगाची वस्तू ९) अधिकार वाटप १०) निर्णय प्रक्रिया ११) प्रतिष्ठा १२) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क १३) हुंडा १४ ) संशय १५) मालकी हक्क.

वरील बाबतीत पुरुष हा नेहमी स्त्रियावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे २१ व्या शतकात जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांवर अन्याय आणि अत्याचार होताना दिसतो.

देशात दर सहा तासात एक महिला हिंसाचाराचा बळी ठरत आहे. या युवतींना वेगवगळया प्रकारे त्रास दिला जातो. १) जिवंत जाळले जाते २) जबर मारहाण करून तिचा बळी घेतला जातो ३) आत्महत्येस भाग पाडले जाते.

इंटरनॅशनल सेंटर फॉर रिसर्च ऑन वूमन च्या एका अहवालानुसार भारतात दरवर्षी १५ हजाराहून अधिक महिला हिंसाचाराचा बळी ठरत आहेत. जीवनाचा विचार केल्यास असे दिसून येते की. कोणत्याही प्रकारच्या अन्यायाच्या निवारणासाठी केवळ कायदे करून चालणार नाही तर सामाजिक नियंत्रणाच्या अंमलबजावणीची यंत्रणाही तेवढीच भक्कम निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच कायदे हे केवळ पोलिस, न्यायसंस्था यांच्या माध्यमातून राबविण्यात येत नाहीत. तर जर कायदे हे सामाजिक रुढी परंपरांना विरोध करणारे असतील तर त्यांचा प्रभाव समाजावर पडत नाही व त्यांची अंमलबजावणी ही केली जाऊ शकत नाही. हे स्त्रियांच्या विविध कायद्यांच्या अपयशावरुन दिसून येते.

स्त्री पुरुष समानतेचे तत्व स्वीकारुन इतकी वर्ष झाली तरी सध्याच्या सायबर इंटरनेटच्यायुगात भारतातील स्त्रियांची अवस्थ काय दिसते हे पाहणे महत्वाचे आहे. वेगवगळया माध्यमातून लोकांसमोर हे चित्र आणण्याचा प्रयत्न केला जातो आहे,की आजच्या समाजात खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता झालेली आहे. कुटुंबात अनेक निर्णय घेण्याची क्षमता स्त्रियांमध्ये योग्य त्या प्रमाणत झालेली आहे.

परंतु हे माध्यमांचे चित्र जरा बाजूला ठेवून बघितले तर आपल्याला समजेल, की स्त्रियांच्या समस्या जुन्या काळात ज्या होत्या त्याच आजच्या काळातही आहेत. त्यांच्यात फार मोठे परिवर्तन झाले नाही. हुंडाप्रथा, बालविवाहाची समस्या, भ्रणहत्या, स्त्रीयांवर होणारे बलात्कार. वेश्या व्यवसायाचे सगळया शहरांमध्ये वाढलेले प्रमाण, नोकरीच्या ठिकाणी त्यांचे केले जाणारे मानसिक व शारिरीक शंषण या आजच्या स्त्रियांच्या प्रमुख समस्या आहेत व दुर्दैवाने कोणत्याही प्रकारच्या कायद्यांनी त्या दूर झालेल्या नाहीत.

**खालील काही उपायांच्या माध्यमातून स्त्रियांना स्वतःवर होणाऱ्या अत्याचारांना थांबविता येईल.**

१) आज विविध कायदे स्त्रियांना संरक्षण म्हणून संमत झालेले आहेत. त्याची माहिती स्त्रीयांनी करून घ्यावी.

२) कुटुंबात स्त्रियांनी आपले मत ठामपणाने मांडावे भले मग त्याची अंमलबजावणी होवो की न होवो.

३) घरातल्या लोकांनी स्त्रियांना सन्मानानेच वागवावे,

४) केवळ विवाह हाच स्त्रियांच्या आयुष्यातील एकमेव संस्कार असे न मानता त्यांना शिक्षण देण्याकडे कल असावा.

५) स्वतः स्त्रियांनी कोणताही अपमान सहन करु नये व आथिकदृष्टया स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा.

६) भृणहत्या आपल्या कुटुंबात करु नये व कोठे होत असेल तर तशी माहिती द्यावी.

७) पालनपोषणात मुलगा मुलगी असा भेद करु नये.

८) कुटुंबातील लहान मुली आजारी पडल्यास त्यांना मुलांप्रमाणे त्वरित दवाखाण्यात घेऊन जावे.

◆◆◆